# धुळे महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2012-2013

उप संचालक,(मनपा लेप) विभाग - 3, स्थानिक निधी लेखापरिक्षा, औरंगाबाद
लेखा कोष भवन, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ

# अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे धुळे महानगरपालिका यांनी 2012-2013 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

# अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ........ 1

**कलम ९ अ खालील आक्षेप ........ 3**

2 रोखवही व बँक पासबुकमधील शिल्लक रकमेतील तफावतीबाबत. ........ 4

5 जल व मल प्रवाह निधीची स्थापना न करणे व कलमात नमूद बाबींवर खर्च न होणेबाबत. ........ 5

7 विशेष स्वच्छता कर निर्धारित दरापेक्षा निम्म्या दराने आकारणी केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. ........ 6

11 रस्ता अनुदान निधीतून नियमानुसार 10 टक्के इतका निधी वाहतूक नियंत्रण व्यवस्था कामी खर्च न करणेबाबत. ........ 7

14 नळ जोडणी नसलेल्या मालमत्ता धारकांकडून पाणीपटटी कर आकारणी करुन वसुलीची कार्यवाही करणेबाबत. ........ 8

15 धनादेशाद्वारे प्राप्त मालमत्ता कर रक्कम परस्पर नगरोत्थान अभियान रोखवहीत जमा करणेची अनियमितता. ........ 9

17 महानगरपालिका मालकीची शेतजमीनीचा नियमबाहयपणे वापर होत असलेबाबत. ........ 10

27 शासन घोषित गलिच्छ वस्ती मधील मालमत्तांवर कर मागणी व्यतिरिक्त भुईभाडे, सेवा आकार व प्रशासकीय आकार इत्यादीची आकारणी होऊन रकमा वसुल होत नसलेबाबत. ........ 12

34 महानगरपालिकेने शासन निर्देशानुसार महिला व बाल कल्याण करीता 5 टक्के इतकी तरतूद करुन सुध्दा त्यानुसार कोणतीही योजना राबविली नाही. यामुळे गरजू व पात्र लाभार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवण्याची अनियमितता. ........ 13

38 बोर्ड व बॅनर्स खरेदी मधील निविदेत असणा-या त्रुटीबाबत. ........ 14

43 मंजूर अभिन्यासातील अनुज्ञेय असलेले रस्ता व खुली जागा इत्यादी महानगर पालिकेच्या नावे न करण्याची अनियमितता. ........ 15

44 बांधकाम परवानगी प्रकरणे मंजूर करताना अनुज्ञेय अग्निशमन सेवा फी आकारणी करुन वसुल होत नसलेबाबत ........ 16

77 महानगरपालिका हायस्कूलसाठी देण्यांत आलेल्या सादील खर्चाबाबत. ........ 17

83 पदाधिका-यांसाठी लेटर पॅड व व्हीजीटींग कार्ड इत्यादी छपाईसाठी नियम बाहय खर्च केलेबाबत. ........ 18

84 महिला व बालकल्याण विभागाची सन 2012-13 मधील खर्ची टाकण्यात आलेल्या देयकांची नस्ती तपासणी करण्यांस न मिळालेबाबत. ........ 19

95 महिला व बाल कल्याण विभागांतर्गत 5 टक्के इतकी तरतूद करुनसुध्दा महिला करीता कोणत्याही योजना राबविली नसल्यामुळे गरजू व पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांपासून वचिंत ठेवण्याची अनियमितता झालेबाबत. 20

106 धुळे महानगरपालिका सन 2012-13 महानगरलिका हददीतील नाल्याचा गाळ काढणेसाठी खोदकाम करणे, खोदकामातुन निघालेले मटेरीयल उचलनेसाठी व डेडरगांव जलशुध्दीकरण केंद्र येथील आजुबाजुचे परिसरातील साफसफाई करणेसाठी जेसीबी मशीन भाडयाने लावणेचे कामेचे संचिकेत आढळुन आलेल्या अनियमीतते बाबत. ......21

107 सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील जकात संकलनाचे कराराचे कार्यक्षम पालन न करणे व हप्त्याची रक्कम वसुली बाबत ........24

110 समुह भ्रमणध्वनी सेवा करीता झालेल्या नियमबाहय खर्चाबाबत. ........26

116 भोगवटा प्रमाणपत्र न घेता इमारत बांधकामांचा रहिवास / वाणिज्य वापर सुरु करण्याची अनियमितताबाबत. 27

118 अंत्यविधी साहित्य मोफत पुरविणे योजनेसाठी नियमबाहय खर्च करणेची अनियमितता. ........29

119 मक्ता पध्दतीने मनुष्यबळ पुरविणेबाबत. ........30

120 सन 2012 - 2013 चे मंजूर अर्थसंकल्पाबाबत अभिप्राय. ........32

121 आस्थापना बाबींवरील खर्च ठरवून दिलेल्या निकषापेक्षा जास्तीचा झाल्याबाबत. ........36

122 वार्ड क्रमांक 67 मोहाडी भागात शिवानंद कॉलनी ते महादेव मंदिर डि.पी.रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमितताबाबत. ........37

124 विहीत महानगरपालिका हिस्सा रक्कम वेळेत शिक्षण मंडळास अदा न झाल्याने थकबाकीचे दायित्व यात वाढ झालेबाबत. ........40

125 बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना अदा मानधन खर्चाबाबत. ........42

126 अभिन्यासास तात्पुरती मंजुरी नंतर अंतिम मंजुरी प्राप्त न करणेची अनियमितता. ........43

133 पदाधिका-यांना वाहन भाडे भत्ता अनुज्ञेय नसतांना प्रदान केल्याची अनियमितता. ........45

137 कंत्राटी कामासाठी नियुक्त मक्तेदाराने शासकीय विमापत्र न घेता खाजगी विमा संस्थेकडून विमापत्र घेणेची अनियमितता. ........47

144 वार्ड क्रमांक 15 मधील नकाणे रोड ते वाडीभोकर रोड पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. ........48

146 सन-2008 ते 2015 या कालावधीतील आस्थापना विभागाकडील पदोन्नती, नियुक्ती इ. मध्ये झालेल्या अनियमितता बाबतची प्राप्त तक्रारी अर्जानुसार वस्तुनिष्ठ तपासणीवरील अभिप्रायाबाबत. ........52

**कलम ९ ब खालील आक्षेप........56**

10 मालमत्ता कर, थकीत रकमा मागणी नोंदवहीतून कमी करणे, कमी रकमेने नोंदविणे इत्यादी अनियमितताबाबत. ........57

13 दैनंदिन बाजार लिलाव थकीत रकमांबाबत. ........58

16 कॅबीन जागा भाडे नोंदवही व थकबाकी बाबत. ........59

21 महानगरलिका धुळे कर वसुली बाबतचे पावती पुस्तके, जमा रकमेच्या दैनिक भरणा नोंदवहया, ईत्यादी अभीलेखे तपासणी करताना आढळुन आलेल्या त्रुटी / उणीवा बाबत........61

23 मंजूरीशिवाय देयक अदायगी करणेची अनियमितता. ........63

25 सर्व्हे खोली व स्लम जागा भाडे कर रकमा थकीत राहणेबाबत. ........64

26 दैनंदिन बाजार फी वसुलीचा मक्ता अयशस्वी होऊन झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.....66
28 दुकान भाडे थकबाकी वसुलीबाबत.....69
42 आग विझविणे कामी पुरविलेल्या सेवेच्या खर्चाची रक्कम थकीत राहण्याची अनियमितता.....70
47 विवाह नोंदणी फी व शास्ती रक्कम शासनाकडे जमा न करण्याची अनियमितता.....71
49 अनुज्ञेय नसलेल्या सण व उत्सवासाठी नियमबाहयपणे सण अग्रिम रकमांचे प्रदानाबाबत.....72
51 दलितवस्ती योजने अंतर्गत वार्ड क्रं.36 मध्ये श्री मोरे ते सिध्दार्थ नगर चितोड रोड पावेतो व वार्ड क्रं. 34 मध्ये यशवंत नगर मध्ये नवीन 4 इंची डीआाय पाईप लाईन टाकणे, वार्ड क्र. 35 भीम नगर भागामध्ये नविन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणे आणी वार्ड क्रं. 17 नागसेनवाडी ते रमाबाई आंबेडकर नगर पावेतो नविन 6 इंची एसी प्रेशर पाईप लाईन टाकणे बाबत.....74
52 धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 21 जुने धुळे हनुमान मंदीराजवळ 100 एमएम डीइपीइ पाईप लाईन टाकणे व वार्ड क्रं. 12 शिवाजी नगर, वाडीभोकर रोड भागात नवीन 150 व 100 एमएम व्यासाची एचडीपीई असेी प्रेशरपाईप लाईन टाकणे व वार्ड क्रं. 2 मधील ओसपालनगर, तिरुपती नगर, न्यु एकतानगर ई. भागात नवीन 100, 150 व 300 एमएम पाईप लाईन टाकणे बाबत.....82
53 धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 12 जुना प्रभाग शिवाजी नगर भागात नवीन असेी प्रेशन पाईप लाईन टाकणे बाबत. 88
55 महानगरपालिका धुळे येथील सन 2012-13 चे लेखापरिक्षणात दलित वस्ती योजने अंतर्गत वार्ड क्रं. 16 भागात सहा ठिकाणी विंधन विहीरी करणे व जेटपंप बसवीणे बाबतचे कामातील अनियमीतता बाबत.....93
59 आग्रारोड पश्चीम भागातील गळती (पाईप लाईन, व्हॉल्व, नळ कनेक्शन ई) बंद करणे बाबत.....96
61 संपुर्ण देवपुर भागातील गळती (पाईप लाईन, व्हॉल्व, नळ कनेक्शन ई) बंद करणे बाबत.....100
62 धुळे महानगरपालीका वार्ड क्रं. 30 मधील ग.न. 7 मधील भागात पाईप लाईन दुरुस्ती बाबत.....104
65 सुवर्ण जयंती रोजगार योजना अंतर्गत वार्ड क्रं. 33 एकता नगर, शीवम नगर, वीद्यावर्धीनी मागील भागात गटार बांधकाम करणेसाठी, पी.सी.सी. फरशी बविणे, परदी, मजुरीचे बील ई. बाबत.....109
66 सुवर्ण जयंती रोजगार योजना अंतर्गत वार्ड क्रं. 13 मधील एकवीरा नगर रस्ता खडीकरण व गटार बांधकाम, इंद्रप्रस्थ नगर, जितेंद्र नगर, श्रध्दा नगर भागात गटार बांधकाम करणेसाठी चे अभीलेखे उपलब्ध होणे बाबत.....114
67 धुळे महानगरपालीका अंतर्गत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे सन 2012-13 मधील उपलब्ध निधी खर्च ई. बाबत.....119
70 धुळे महानगरपालीका अंतर्गत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे सन 2012-13 मधील उपलब्ध ( निधी खर्च ई. बाबत ).....121
71 धुळे महानगरपालिका सन 2012-13 मध्ये लाईन गळती, व्हॉल बदलणे, पाईप टाकने, पाईप लाईन टाकणे, लिकेज जवळ कॉक्रीट करणे, पाईपलाईन क्रॉस कनेक्शन करणे, आरसीसी पाईप टाकणे ई. कामाचे संचिकेत आढळुन आलेल्या अनियमीततेे बाबत.....125
82 नियमबाहयपणे रोजंदारी कर्मचारी/सेवानिवृत्त कर्मचारी यांना सण अग्रिम देणेबाबत.....129

98 धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 58 मध्ये दुध डेअरी चौक लक्ष्मी वाडी भागात नविन 160 व 200 एमएम एचडीपीई पाईप लाईन टाकणे बाबतचे कामातील अनियमीतता........130

113 जैविक कचरा गोळा करणे व त्याची विल्हेवाट लावणे याकामासाठी अभिकरण संस्था नेमून रॉयल्टी प्राप्त करणे या कामातील अनियमितताबाबत........136

123 वार्ड क्रमांक 66 मोहाडी वरचे गाव श्री.संजय उचाळे ते ब्युटी पार्लर ते विक्रम पाटील रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमितता........138

139 बांधकाम उपकर अदा देयकातून वसुली न करणे तसेच शासन सदरी भरणा न करणेची अनियमितताबाबत. 142

143 वार्ड क्रमांक 15 नदी किनारी जुने शौचालयाचे नजीक नवीन 10 सीटचे शौचालय बांधणे कामातील अनियमितता........143

145 वरखेडी रोड ते सुभाष पुतळा पावेतो नाल्यास रिटेनिंग वॉल बांधणे कामातील अनियमितताबाबत........146

**कलम ९ क खालील आक्षेप........151**

**------------------- निरंक ------------------ ........152**

**कलम ९ ड खालील आक्षेप........154**

3 रोख रक्कम पडताळणी न करणे व रोखवहीतील इतर अनियमितताबाबत........155

4 महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर रकमा उशिराने शासनाकडे भरणा करणेबाबत........156

6 वसूल भरणा किर्द व मागणी नोंदवही प्रमाणे वसूल रकमा यांचा ताळमेळ घेता येत नसलेबाबत........157

8 धुळे महानगरपालिकेच्यादसन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात नगर सचिव विभागातील पोट निवडणुक 2012 मधील उपलब्ध अभिलेख्याबाबत........159

9 एकत्रित मालमत्ता कर व इतर कर वसुलीच्या भरणा किर्द मध्ये मासिक व वार्षिक गोषवारे नोंदविण्यात येत नसलेबाबत........160

12 एकत्रित मालमत्ता कर व इतर कराच्या जमा रकमांच्या तफावतीबाबत........161

18 देयकासोबत आवश्यक तो तपशिल नमूद न करता देयके पारित करणेबाबत........162

19 व्यवसाय कर रकमा भरणा करणेबाबत शासनाकडून 5 टक्के रक्कम प्राप्त करुन न घेतले बाबत........163

20 जन्म मृत्यु फी वसुली व नोंदवहीबाबत........164

22 धनादेश साठा नोंदवही न ठेवणेबाबत........165

24 साहित्य खरेदी अगोदर खर्च रक्कम अदा करणेबाबत........165

29 सहावा वेतन आयोग फरकाची रक्कम भ.निनि. खातेमध्ये जमा नसलेबाबत........166

31 भविष्य निर्वाहनिधी शिल्लकेचे विवरणपत्र खातेदारास अदा न करण्यांची अनियमितता........167

32 सेवानिवृत्त कर्मचा-यांची सहावे वेतन आयोग फरकांची रक्कम थकीत असलेबाबत........168

33 सेवानिवृत्ती धारकांकडून हयातीचे दाखले वेळेत प्राप्त न केलेमुळे निवृत्तीवेतन चुकीचे अदा केलेबाबत........169

35 भविष्य निर्वाहनिधी खात्यामध्ये असणा-या सर्व साधारण त्रुटी........170

36 मालमत्ता करात वाढ न करणेबाबत. ....................................................................................................171
37 मालमत्ता कररक्कम मुदतीत वसूल न झाल्याने अदत्त रकमांवर शास्तीची आकारणी न करणेबाबत........171
39 दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे अद्यावत न करणेबाबत...........................................................................172
40 मुख्य लेखारीक्षक यांचा सन 2012-13 करीताचा लेख्यांवरील अहवाल सादर केले नसलेबाबत. ..................173
41 अग्निशमन व्यवस्था तपासणी वार्षिक फी वसुल होत नसलेबाबत...........................................................174
45 अभिन्यास मंजूर प्रकरणांची नोंद विहीत नोंदवहीत नसलेबाबत. ..............................................................176
46 इमारत परवाना नोंदवहीबाबत. ..........................................................................................................176
48 विवाह मंडळांची नोंदणी न करणे व त्यामुळे फी रकमेचे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. ........................177
50 वकील फी / कायदेशीर सल्लागारास केलेल्या प्रदानाबाबत.........................................................................178
54 धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 28 मध्ये चंपाबाग पत्रकार कॉलनी व जमनागीरी भीलारी भागात नविन 160 एमएम डी पाईप लाईन टाकणे, वार्ड क्रं. 53 मध्ये कैलास नगर भागात 160 व 110 एमएम एचडीपीई पाईप लाईन टाकणे व वार्ड क्रं. 56 गुरुकृपा नगर भागात 110 एमएम पाईप लाईन टाकणे, वार्डक्रं. 58 मध्ये (वार्डक्रं. 38 च्यायादीनुसार) कोळवले नगर भागात 160 व 110 एमएम एचडीपीइ पाईप लाईन टाकणे कामेचे संचिकेत आढळुन आलेल्या अनियमीतते बाबत. ..........................................................................................................180
57 धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात देखभाल दुरुस्ती लेखाशिर्षात पाणी पुरवठा विभागाअंतर्गत केलेल्या खर्च विषयक अभिलेखे व निविदा संचिका लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न केले बाबत. .................187
68 धुळे महानगरपालिकेचे सन 2012-13 चे लेखापरिक्षणामध्ये हनुमान टेकडी पाणी पुरवठा केंद्र येथे 630 केव्हीए स्टँडबाय आऊटडोअर ट्रान्सफार्मर व त्यासाठी लागणारे साहित्य पुरवठा व उभारणी करणे, बाभळे जलशुध्दीकरणे केंद येथील 3000 केव्ही/3एमव्ही, 33 केव्ही व सुखवद रॉवॉटर पंपीग स्टेशन येथील 4000 केव्ही/4 अएमव्ही /33 केव्ही स्टँडबाय ट्रान्सफार्मर व त्यासाठीचे सुरक्षा उपकरणे कामेचे संचिकेत आढळुन आलेल्या अनियमीतते बाबत. ..........................................................................................................197
72 निवृत्ती वेतनाच्या रकमा निवृत्ती वेतन निधीत जमा न करता आवश्यकतेप्रमाणे सर्वसाधारण निधीतून थेट देण्याची अनियमितता. ..........................................................................................................200
73 निवृत्ती वेतन निधी खाती मनपा निधी जमा करणेबाबत.........................................................................200
74 अभिलेखे विभागातील सर्वसाधारण असणा-या त्रुटी..............................................................................201
75 अभिलेखे विभागाकडील सन 2012-13 मधील छपाईबाबतच्या निविदेमधील असणा-या अनियमिततेबाबत. 202
76 सेवा निवृत्ती वेतन विभागात आढळलेल्या इतर अनियमितता.................................................................204
78 धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षासाठी ॲलम, ब्लीचींग पावडर, क्लोरीन गॅस टनर खरेदीबाबतचे निविदा व देयका बाबत. ..........................................................................................................205
79 धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात हातपंप, जेटपंप दुरुस्ती बाबतचे निविदा काढुन केलेल्या कामाबाबतच्या आढळुन आलेल्या अनियमीतता बाबत. ..........................................................................................................209

80 धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात महानगरपालिका हद्दीतील व हद्दीबाहेरील महानगरपालिकेने टाकलेल्या जलवाहीनीवर ज्या नागरीकांनी अनधीकृत नळ कनेक्शन घेतले आहेत त्यांच्यासाठीचे शोधमोहीमेचे कामा बाबतचे निविदा काढुन केलेल्या कामा बाबत. ....212

81 धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात नगर सचिव विभागाकडील सदस्य मानधन, बैठक भत्ता, अतिथी भत्ता बाबतचे उपलब्ध अभिलेख्यांची पडताळणीत आढळुन आलेल्या अनियमीतता. ....214

85 बीओटी तत्वावर शहरातील बगीचे देखभालसह चालविण्यास देणेबाबतचे निविदेतील अटी व शर्ती मधील त्रुटी बाबत. 216

92 धुळे महानगरपालीकेचे सन 2012-13 या वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध सेवापुस्तकांची तपासणीत आढळुन आलेल्या त्रुटी / उणीवा, अधिकारी कर्मचारी यांचा मंजुर आकृतीबंध ई. बाबत. ....217

94 धुळे महानगरपालीकेचे सन 2012-13 या वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध सेवापुस्तकांची तपासणीत कालबध्द व सेवाअंतर्गत आश्वासीत प्रगती योजनेतील वेतन निश्चींती बाबत ....221

96 निवत्ती वेतन निधीबाबत. ....224

97 भविष्यनिर्वाह निधी विभागाकडील रोख वही व बॅक स्टेटमेंट मधील तफावतीबाबत. ....225

99 भविष्य निर्वाह निधी रोखवही व बहृतपत्रक मधील शिल्लक रकमेतील तफावतीबाबत. ....225

100 धुळे महानगरपालीकेचे सन 2012-13 या वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध सेवापुस्तकांची तपासणीत वार्षिक वेतनवाढ मंजूरीत रुपये 10 जादा मंजूरी बाबत. ....226

102 धुळे महानगरपालीकेतील नळ जोडणी व तोडणीचे विहित नमुण्यातील नोंदवहया परिरक्षित न केल्यामुळे शहरातील एकूण नळ संयोजन व तोडणीची संख्या, तसेच पाणी वापर प्रकार, कालावधी व इतर महत्वपूर्ण बाबींचा ताळमेळ घेता आलेला नाही. ....228

103 धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात अधिकारी व कर्मचारी यांचे कडुन तारण पत्र न घेणे व नोंदवही परिरक्षीत नसलेबाबत ....228

104 सन 2012-13 या वर्षात महानगरपालिकेने क्रिडा विषयक खर्चअभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्धा न केले बाबत. ....229

105 धुळे महानगरपालीकेत सन 2012-13 या वर्षात शासकीय आरोग्य संस्थेत कुटूंब नियोजन शस्त्र क्रिया केल्यावर देण्यात येणा-या मोबदल्यात दयावयाचे आर्थिक लाभाचे देयकातील आढळुन आलेल्या अनियमीतता व इतर अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न केलेबाबत ....230

108 सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विभागाकडील जमा पावती पुस्तके व त्या अनुषंगीक उपलब्ध केलेले अभिलेख्याचे तपासणीत आढळुन आलेल्या अनियमीतता बाबत ....232

109 सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील जकात विभागाने तपासणीस उपलब्ध केलेली पावती पुस्तके व अभिलेख्याची तपासणीत आढळुन आलेल्या अनियमीतता ....234

111 आय.डी.बी.आय. बॅक खाते क्रमांक 1030 मध्ये शिल्ल्क पडून असणा-या रक्कमेबाबत. ....236

112 विहीत नमुन्यात आवश्यक त्या नोंदवहया परिरक्षित नसलेबाबत. ....237

114 बांधकाम मोजमाप पुस्तके विहीत नमुन्यात न ठेवणेबाबत. ....238
115 महानगरपालिका हद्दीत पाळीव जनावरे मंजुरी परवानगी शिवाय ठेवणेबाबत. ....239
117 नागरी सुविधा केंद्रामार्फत वसुलात होणाऱ्या विविध फी रकमांचा तपशील सादर न करणेबाबत. ....240
127 शासकीय वाहनांचा विमा शासकीय विमा निधी यांचेकडूनन उतरविणे बाबत. ....241
128 शासकीय वाहन क्रमांक एमएच 18 जी 1007 (जे.सी.बी.) च्या दुरुस्ती करतांना झालेली अनियमितता. ....241
129 भांडार विभागातील कर्मचा-यांकडून प्रतिभूती बंधपत्र न घेतल्याबाबत. ....242
130 शासकीय वाहन जे.सी.बी. एम.एच 18 जी. 1007 चे करीतानविन टायर्स खरेदी करताना झालेलीअनियमितता. ....243
131 भांडार विभागाने जंगम मालमत्ता नोंदवही परिरक्षित केले नसले बाबत. ....245
132 सुकवद व बाभळे या पाणी पुरवठा केंद्राचे विद्युत देयके थकीत असणेबाबत. ....246
134 वॉर्ड क्रमांक 50 मधील भागात नवीन पथदिवे सुविधा करणे ....248
135 वॉर्ड क्रमांक 2 शिवाजीनगर कॉलनी, ओसवाल नगर, भूजल क्रांती, आरती, तिरूपती इ. भागात गर्डर पोल टाकणे व पथदिवे बसविणेबाबतच्या कामात झालेल्या अनियमितते बाबत. ....250
136 सन 2012-13 मध्ये विद्युत विभागाने पथदिवे देखभाल, दुरूस्ती, निगा यावर नियमबाहय केलेल्या खर्चाबाबत. ....252
138 मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मंजुरी दिलेल्या बांधकामांची संविदा नियमबाहयपणे करणेची अनियमितता. ....253
140 अनामत नोंदवही व प्रलंबित रकमांबाबत. ....255
141 कामे पुर्ण झालेनंतर मक्तेदारांना अनुज्ञेय रक्कमेपैकी अंशत: रकमा प्रदान करणेबाबत. ....257
142 मालमत्ता कर मागणी नोंदवही मधील गंभीर अनियमिततांबाबत. ....261
147 मौ.महिंदळे सं.न.92/पै 2 अ 4 चे अभिन्यास मंजुरीतील अनियमिततेबाबत. ....263
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....265
परिच्छेदनिहाय अनुक्रमणिका ....266

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | 77, 83, 119 | 65, 66, 67, 70 | | 29, 31, 32, 33, 35, 72, 73, 74, 75, 76, 96, 97, 99, 111 |
| आयुक्तालय | | | | |
| सामान्य प्रशासन | 110, 146 | | | 92, 94, 100, 103 |
| नगर सचिव | | | | 8, 81 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 17, 122, 137, 144 | 123, 139, 143, 145 | | 114, 138, 141 |
| शहर अभियंता आणि विद्युत विभाग | | | | 132, 134, 135 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 106 | 23, 51, 52, 53, 55, 59, 61, 62, 71 | | 18, 54, 57, 68, 78, 79, 80, 102, 108 |
| लेखा विभाग | 2, 5, 11, 15, 120, 121, 124, 125 | 49, 82 | | 3, 19, 22, 24, 39, 40, 112, 136, 140 |
| लेखापरीक्षण | | 98 | | |
| नगर रचना | 43, 44, 116, 126 | | | 45, 46, 147 |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | 107 | | | 109 |
| कर निर्धारण व संकलन | 7, 14, 27 | 10, 13, 16, 21, 25, 26, 28 | | 4, 6, 9, 12, 36, 37, 142 |
| आरोग्य | 118 | 47, 113 | | 48, 105, 115 |
| भूमी व मालमत्ता विभाग | | | | |
| वाहन विभाग | | | | 127, 128, 130 |
| माहिती आणि | | | | 117 |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जनसंपर्क | | | | |
| विधी विभाग | | | | 50 |
| भांडार | 133 | | | 129, 131 |
| महिला व बालकल्याण विभाग | 34, 38, 84, 95 | | | |
| क्रिडा विभाग | | | | 104 |
| अग्निशमन विभाग | | 42 | | 41 |
| उद्यान विभाग | | | | 85 |
| जन्म मृत्यु नोंदणी विभाग | | | | 20 |

DRAFT

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

## कलम ९ अ खालील आक्षेप

DRAFT

## *2 रोखवही व बँक पासबुकमधील शिल्लक रकमेतील तफावतीबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***बँक पासबुक व रोखवहीतील शिल्लक रकमा यातील तफावतींचा दरमहा ताळमेळ न घेणे दर्शविलेला ताळमेळ नियमानुसार न दर्शविणे यामुळे शिल्लक रकमेत मोठया प्रमाणात तफावत राहणेबाबत.***

DRAFT

सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण सर्वसाधारण रोखवहीत (डे बुक) व विविध बँकेच्या खाती दि.31/03/2013 अखेर शिल्लक असलेल्या रकमांची पडताळणी (ताळमेळ) केली असता खालील तपशीलात नमूद केल्याप्रमाणे तफावती आढळून आलेल्या आहेत.

| अ.क्र. | रोखवहीतील तपशिल व खाते क्रमांक | बँक पासबुक प्रमाणे शिल्लक रक्कम | रोखवही प्रमाणे दर्शविलेली रक्कम | तफावत |
|---|---|---|---|---|
| 1 | युनियन बँक – 2570 | 8566832 | 4794958 | 3771874 |
| 2 | युनियन बँक – 2571 | 16540170 | 12491610 | 4048560 |
| 3 | स्टेट बँक – 10107 | --Nil -- | 25359 | 25359 |
| 4 | युनियन बँक – 17214 | 9401827 | 9333683 | 68144 |
| 5 | स्टेट बँक – 5164 | 8341 | 7786 | 555 |
| 6 | ॲक्सिस बँक - 1748 | 220680415 | 11376840 | 209303575 |
| 7 | ॲक्सिस बँक – 31204 | 4694699 | 479098 | 4215601 |
| 8 | सेंट्रल बँक – 12030 | 3043906 | 259192 | 2784714 |
| 9 | ॲक्सिस बँक – 43295 | 7377045 | 1512217 | 5864828 |
| 10 | देना बँक ( अल्पसंख्यांक) – 39478 | 4963125 | 4961947 | 1178 |
| 11 | महाराष्ट्र बँक (आधार) – 94113 | 1309221 | 1302721 | 6500 |

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51 (3) नुसार प्रत्येक महिन्याच्या शेवटी रोखवही व बँक खाती शिल्लक राहिलेल्या रकमांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. तथापि लेखा विभागाने नियमानुसार प्रत्येक महिन्याच्या शेवटी तसेच वर्षाअखेरीस शिल्लक रकमांचा बँक खाती शिल्लक रकमेशी नियमोचित ताळमेळ

घेतल्याचे आढळून आलेले नाही. माहे मार्च – 2013 अखेर विभागाने जो ताळमेळ दर्शविलेला आहे. तो अत्यंत चुकीचा व तथ्यहीन पध्दतीने नमूद करण्यात आलेला आहे. या कारणास्तव दर्शविलेला ताळमेळ लेखा परीक्षणात मान्य करता येत नाही.

माहे मार्च -2013 अखेर बँक खाते शिल्लक रक्कम व रोखवहीत नमूद असलेली अखेरची शिल्लक रक्कम यांची एकत्रित तफावत एकूण रक्कम रु. 23090888/- इतकी प्रचंड प्रमाणात असल्याचे दिसून येते. विभागाने लेखा परीक्षणापर्यंत सुचित करुनही तफावत रकमांचा ताळमेळ घेऊन (नियमानुसार) रकमा अचूक असल्याचे दर्शविलेले नाही.

तरी विभागाने उपरोक्त नियमात नमूद केलेल्या निर्देशानुसार / कार्यपध्दतीनेच नियमितपणे महिनानिहाय वेळोवेळी बँक व रोखवहीतील शिल्लक रकमांमधील तफावतींचा ताळमेळ घेणे आवश्यक असून दैनंदिन आर्थिक व्यवहार हे कमीतकमी बँक खाते सुरु ठेवून करावेत व अनावश्यक बँक खाती बंद करुन आर्थिक व्यवहार सुरळीत व नियमित होतील याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. तफावत रकमांबाबत नियोमोचित ताळमेळ घेऊन अनुपालन दर्शवावे.

FDSRKNM8201 (Ref No : 08)

## *5 जल व मल प्रवाह निधीची स्थापना न करणे व कलमात नमूद बाबींवर खर्च न होणेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***अधिनियमातील नमूद तरतुदी प्रमाणे जल व मल प्रवाह निधी या नावाचा स्वतंत्र निधी स्थापन न करणे व अधिनियमातील तरतुदी प्रमाणे नमूद बाबींवर निधी अंतर्गत प्राप्त होणारी कर रकम खर्च न करण्याची अनियमितता बाबत.***

मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 91 (ब) नुसार महानगरपालिकेने जल व मल प्रवाह निधी नावाचा एक स्वतंत्र निधी स्थापन करुन अधिनियमातील कलम 134 ते 138 व प्रकरण 12 व 13 यात नमूद केल्याप्रमाणे सदरच्या प्रयोजनासाठी स्वतंत्र बँकेत जल व मल प्रवाह निधी या नावाने प्राप्त होणारा निधी खात्यात जमा करेल व सदर निधीचा वापर प्रकरण 12 व 13 मधील नमूद तरतुदी अमलांत आणणेकामी त्याच प्रयोजनासाठी तो खर्च करतील. वर्षाअखेरीस शिल्लक राहणारा निधी महानगर पालिकेने गुंतवणूक ठेवकामी वापरावयाचा आहे. उपरोक्त नमूद कार्यपध्दतीप्रमाणे सदरचा स्वतंत्र निधी अस्तित्वात आणण्याचे स्पष्ट



DRAFT

निर्देश असताना महानगर पालिकेने सदरचा निधी स्थापना दि.30/06/2003 पासून आजतागायेतो अस्तित्वात आणलेला नाही. सदरबाब नियमबाहय असून वैधानिक तरतुदीचे उल्लंघन करणारी आहे. यामुळे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे महानगर पालिकेने कर रुपाने निधी जमा केला आहे. मात्र प्राप्त केलेला निधी तरतूद दर्शविल्याप्रमाणे नमूद केलेल्या बाबींवरच खर्च न करण्याची अनियमितता केली आहे.

सन 2011-12 चे लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्र. 28 अन्वये आक्षेप नोंदवून ही महानगर पालिकेने जल व मल प्रवाह निधी स्वतंत्र स्थापन करणेबाबत उदासीनता दाखविलेली आहे. यामुळे अधिनियमानुसार जनतेस द्यावयाची सेवा व सुविधा यापासून वंचित राहावे लागत आहे. तसेच निधी स्वतंत्र ठेवण्याचा कोणताही हेतू / उद्देश / फलश्रूती साध्य झालेली नाही.

तरी अधिनियमातील तरतुदीनुसार जल व मल प्रवाह या निधीची स्वतंत्र स्थापना करणे आवश्यक आहे. आक्षेपानुरुप अनुपालन सादर व्हावे.

DATDAWM6901 (Ref No : 35)

## *7 विशेष स्वच्छता कर निर्धारित दरापेक्षा निम्म्या दराने आकारणी केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***विशेष स्वच्छता कर हा सक्तीचा कर असून त्यासाठी शासनाने निर्धारित केलेले कमीत कमी दर रु.100/- प्रति संडास प्रमाणे आकारणी होऊन वसुली होणे आवश्यक असताना आजपावेतो महानगर पालिकेने शासन निर्देशापेक्षा कमी दराने (रक्कम रु.50/- प्रति संडास) सदरचा कर आकारणी करुन वसुलीची केलेली कार्यवाही नियमबाहय असून यामुळे आर्थिक नुकसान होण्याची अनियमितता झाली आहे.***

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, परिपत्रक क्रमांक - बीवायडी 1087/801/सीआर/73/87/युडी-14, दिनांक - 17 जुन 1987 व संचालक, नगर पालिका, संचालनालय, मुंबई यांचे कार्यालयीन परिपत्रक दिनांक - 25/01/1988 नुसार शौचकुप, मलमुत्र विसर्जन स्वच्छता म्हणजेच विशेष स्वच्छता कर ठरावाचे उपविधी 1983 चे क्रमांक - 3 (2) मध्ये दिनांक - 01/04/1988 पासून दुरुस्ती करुन मंजूरी देण्यात आलेले दर प्रति संडास (टोपली) रुपये 300/- व जलधौत (संडास) रुपये 100/- असे कमीत कमी कराचे दर असतील व या प्रमाणे आकारणी करण्याचे सुचित केले आहे.

यानुसार तत्कालीन नगरपरिषदेने ठराव मंजूर करुन सेप्टीक संडासचे वार्षिक दर रु. 50/- ठरवून दिनांक -

DRAFT

01/04/1993 पासून आकारणी करुन मालमत्ता करासोबत सदर कर वसुल करण्यात येत आहे. मात्र आकारणी केलेला दर रु.50/- प्रति संडास हा उपरोक्त परिपत्रकात नमूद केलेला कमीत कमी दर रु. 100/- प्रति संडास पेक्षा रु. 50/- ने कमी आकारण्यात आलेला असल्याने, आकारणी दिनांक - 01/04/1993 पासून मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे.

सदरचा कर हा सक्तीचा कर असून शासनाने ठरवून दिलेल्या किमान व कमाल दराच्या मर्यादेत कर आकारणी होणे आवश्यक असून, त्याप्रमाणे सद्यस्थितीत महानगर पालिकेने किमान दर रु.100/- प्रति संडास प्रमाणे कर आकारणी करुन वसुल करणे अपेक्षित होते. मात्र आजपावेतो महानगर पालिकेने शासन निर्देशित किमान दरापेक्षा कमी दर आकारल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबत लेखा परिक्षण अहवालात वेळोवेळी आक्षेप नोंदवून ( तत्कालीन नगरपरिषद कालावधीपासून) तसेच मागील लेखा परीक्षण अहवाल परिच्छेद क्र. 12 अन्वये आक्षेप होऊनही महानगर पालिकेने किमान दर रु.100/- प्रति संडास प्रमाणे मालमत्ताधारकाकडे आकारणी करण्यात उदासिनता दाखविल्याचे स्पष्ट होत आहे. सदरच्या उदासिनतेमुळे महानगर पालिकेच्या आर्थिक उत्पन्नावर त्याचा विपरीत परिणाम झालेला असून मात्र त्या अनुषंगाने महानगर पालिकेकडून देण्यात येणाऱ्या सेवा सुविधावरील खर्चात वाढ होऊन त्याचा आर्थिक स्थितीवर परिणाम होत आहे.

यामुळे शासनाने विहीत केलेला किमान दर हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचा आर्थिक स्त्रोत वाढविण्याचा हेतू यामुळे साध्य झालेला नाही. व यास महानगर पालिकाची उदासिनता कारणीभूत असल्याचे लेखा परिक्षणाचे स्पष्ट मत आहे.

तरी विभागाने सादर केलेल्या कर मागणी विवरणपत्र नुसार विशेष स्वच्छता कर कमी आकारणीची रक्कम रु. 27,13,850/- चे आर्थिक नुकसान सन 2012-13 करीता झालेले आहे. उत्पन्न वाढीसाठी सदरच्या कराची आकारणी शासन निर्देशाप्रमाणे किमान दर रु.100/- प्रति संडास प्रमाणे होऊन रकमा वसुलात आणणे आवश्यक आहे.

महानगर पालिका निधी

वसुलपात्र रक्कम रु. 27,13,850/-

DATDAWM6901 (Ref No : 39)

## *11 रस्ता अनुदान निधीतून नियमानुसार 10 टक्के इतका निधी वाहतूक नियंत्रण व्यवस्था कामी खर्च न करणेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1350390.00 /-



DRAFT

अंतिम अमान्य रक्कम रु. 1350390.00/-

***शासना कडून प्राप्त होणारे रस्ता अनुदान निधीतून शासन निर्देशानुसार प्राप्त निधी पैकी 10 टक्के इतका निधी शहरातील वाहातूक व्यवस्था, नियंत्रण व्यवस्था इ. बाबींवर खर्च करावयाची असतांना नियमानुसार निधी खर्च केला नसले बाबत.***

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक–संकिर्ण– 2011/प्र.क्र.74/नवि-16,दिनांक – 18 जुलै 2011 नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाकडून नागरी भागात रस्ते तयार करणे किंवा दुरुस्ती अथवा त्या अनुषंगीक करावयाची कामे या करीता लोकसंख्येनुसार महानगर पालिकांना रस्ता अनुदान निधी देण्यात येतो. महानगर पालिकेने एकूण प्राप्त निधीपैकी 10 टक्के इतका निधी शहरातील वाहतूक व्यवस्था सुस्थितीत चालू राहण्यासाठी वाहतूक नियंत्रण व्यवस्था कार्यान्वित करणे, रस्त्यावर दिशादर्शक फलक बसविणे, रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक टाकणे, रस्त्यावर लेन मार्कींग सुस्पष्ट होणे यासाठी विविध रंगात पट्टे देणे इत्यादी महत्वपूर्ण बाबींवर खर्च करणे बंधनकारक आहे.

मात्र सन 2012-13 या आर्थिक वर्षात महानगर पालिकेस रस्ता अनुदान निधी प्राप्त रकमा व त्यापैकी 10 टक्के करावयाची खर्च रक्कम इ.बाबींचा तप शिल इकडील अर्धसमास पत्र क्र. 45 दिनांक- 05/11/2015 अन्वये माहिती संबंधित विभागाकडे मागणी केली असता विभागाने सदर कालावधीत एकूण रक्कम रुपये- 13503904/- इतका निधी प्राप्त झाल्याचे कळविलेले असून उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे 10 टक्के निधीचा खर्च नमूद बाबींवर केल्या किंवा कसे याबाबतचे कोणतेही अभिलेखे, खर्च तपशिल, लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिलेला नाही. यामुळे महानगर पालिकेने शासन निर्देशाप्रमाणे रस्ता अनुदान प्राप्त निधीतून 10 टक्के रक्कम रुपये- 1350390/- खर्च केलेला नाही या म्हणण्यास वाव निर्माण झाला आहे. तरी रक्कम रुपये- 1350390/- शासकीय अनुदानासाठी अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

रस्ता अनुदान शासकीय निधी

अंतिम अमान्य रक्कम रुपये- 1350390/-

DATDAWM6901 (Ref No : 48)

DRAFT

## *14 नळ जोडणी नसलेल्या मालमत्ता धारकांकडून पाणीपटटी कर आकारणी करुन वसुलीची कार्यवाही करणेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***नियमानुसार कर आकारणी करतांना शासनाकडून उपविधी करुन घेणे आवश्यक असतांना, उपविधी न करताच नळजोडणी नसलेल्या मालमत्ता धारकांकडून रुपये- 500/- प्रमाणे पाणीपटटी कर आकारणी करण्यात येत असले बाबत.***

सन 2012-13 करीताचे कर संकलन विभागाकडील एकत्रित मालमत्ता कर व इतर कर यांची मागणी नोंदवही पडताळणी केली असता विभागाने नळ जोडणी नसलेल्या मालमत्ता धारकांकडून रक्कम रुपये- 500/- प्रमाणे पाणीपटटी आकारणी करुन वसुलीची कार्यवाही केलेली आहे. याबाबत मा. महासभा ठराव क्रमांक- 145 दिनांक- 22/04/2010 अन्वये सदरच्या आकारणी दरास व कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 458 नुसार तसेच स्थायी निदेश क्रमांक- 17 दिनांक- 03/06/2002 नुसार महानगर पालिकाचे आर्थिक उत्पन्नाचे व्यवस्थापन करणेकामी महानगर पालिकांनी ऐच्छिक कर आकारावयाचे आहे. मात्र असे कर आकारताना सदरचे कर प्रकार व दर यांचा उपविधी करुन शासनाकडून मंजूरी प्राप्त झाले नंतर कर रकमा वसूलात आणावयाची आहे. तथापि महानगर पालिकेने उपरोक्त नियम व स्थायी निदेशानुसार उपविधी मंजूर करुन घेतलेला नाही. यामुळे नळ जोडणी नसलेल्या मालमत्ता धारकांकडून प्रत्येकी रक्कम रुपये- 500/- प्रमाणे पाणीपटटी आकारणी करुन वसुलीची अनियमितता केली आहे. सदर बाब महानगर पालिकेच्या आर्थिक उत्पन्नाशी निगडीत असून त्याबाबत नियमातील तरतुदीनुसार उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

DATDAWM6901 (Ref No : 51)

## *15 धनादेशाद्वारे प्राप्त मालमत्ता कर रक्कम परस्पर नगरोत्थान अभियान रोखवहीत जमा करणेची अनियमितता.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 5271322.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5271322.00/-

***धनादेशाव्दारे प्राप्त कर रकमां हया नियमानुसार महानगरपालिका सर्वसाधारण रोखवहीत जमा होणे आवश्यक असतांना, विभागाने नियमबाहयपणे सदरच्या रकमां शासकीय निधीचे रोखवहीत जमा घेण्याची अनियमितता केलेली आहे.***

खालील तपशीलात नमूद केल्याप्रमाणे कर संकलन विभागाकडे एकत्रित मालमत्ता कर व इतर कर इत्यादींच्या

DRAFT

रकमा मालमत्ता धारकांकडून धनादेशाद्वारे प्राप्त झालेल्या होत्या. सदर रकमा हया वास्तविकता महानगर पालिका निधीचे सर्वसाधारण रोखवहीत (डे बुक) जमा होणे क्रमप्राप्त होते. तथापि लेखा विभागाने नियमोचित कार्यवाही न करता नियमबाहयपणे थेट नगरोत्थान अभियान या शासकीय निधीच्या स्वतंत्र ठेवलेल्या रोखवहीत जमा करण्याची अनियमितता केली आहे.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 32 नुसार महानगर पालिकेस प्राप्त होणाऱ्या रकमा ( रोख व धनादेश इत्यादी स्वरुपात ) या त्वरीत नमुना क्रमांक 11 मधील महानगर पालिका निधी सर्वसाधारण रोखवहीत जमा होणे आवश्यक आहे. मात्र तपशिलात दर्शविलेली वसूल कर रक्कम रुपये- 5271322/- नियमबाहयपणे थेट शासकीय निधीत जमा केल्याने सन 2012-13 चे आर्थिक उत्पन्नाच्या टक्केवारीवर त्याचा विपरीत परिणाम झालेला आहे.

सदरच्या प्राप्त रकमा कोणत्या प्राधिकारान्वये/आदेशान्वये/नियमानुसार थेट नगरोत्थान अभियान या शासकीय निधीस जमा करण्यात आली याबाबत अनुपालन दर्शविणे आवश्यक आहे. तोपावेतो रक्कम रुपये- 5271322/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

| वसूलीचा दिनांक | वसुल कर रक्कम | मनपा निधी सर्वसाधारण रोख वहीत भरणा रक्कम | नगरोत्थान अभियान रोखवहीत भरणा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| 25/03/2013 | 3428338 | 0 | 3428338 | |
| 25/03/2013 | 1842984 | 0 | 1842984 | |
| एकूण- | 5271322 | 0 | 5271322 | |

म.न.पा. निधी

आक्षेपाधिन रक्कम रुपये-

5271322/-

FDSRKNM8201 (Ref No : 52)

## *17 महानगरपालिका मालकीची शेतजमीनीचा नियमबाहयपणे वापर होत असलेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महानगरपालिकेची शेत जमीन तत्कालीन नगरपालिकेच्या कालावधी पासून भाडेपटटे करारावर दिल्याची नोंद फक्त महानगरपालिके कडे असून, त्याबाबतचे कोणतेही अभिलेखे महानगरपालिका लेखा परिक्षणास सादर***

***करु शकलेली नाही. यामुळे महानगरपालिकेची मोठया प्रमाणावर आर्थिक/ मालमत्ता इ. हानी होत असून यास महानगरपालिकेची उदासिनता/ जाणीवपूर्वक दुर्लक्ष इ. बाबी कारणीभूत असले बाबत.***

बाजार विभागाकडील सन 2012-13 करीताचे जमीन इमारती भाडे मागणी नोंदवही नमुना क्र.81 ची पडताळणी केली असता पान क्र.163 वरील अ.क्र.3 नुसार महानगरपालिकाच्या मालकीचा शेतपट्टा क्र.141/169 हा श्री.कृष्णराव विश्वनाथ मोराणकर या व्यक्तिकडे भाडे पट्टे तत्वावर वापरावयास दिल्याचे नमूद नोंदीवरुन दिसून येते. तथापि नोंदवहीत रकाना क्रमांक 4,5 व 6 यात अनुक्रमे भाडेपट्टे मंजूरी आदेश क्रं/दिनांक, भाडेपट्टे मुदत, हप्ते संख्या इत्यादी महत्वपुर्ण नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. यासंदर्भात इकडील अर्धसमास पत्र क्र 65 दिनांक- 15/11/2015 अन्वये माहिती व अभिलेखे इत्यादीचे मागणी केली असता विभागाने सदरच्या भाडेपट्टे कराराबाबतचे कोणतीही माहिती अथवा अभिलेखे विभागाच्या अधिनस्त उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. याअनुषंगाने अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) सदरचा महानगरपालिका मालकीचा शेतजमीन पट्टा हा भाडेपट्टे तत्वावर संबंधितास कोणत्या आर्थिक वर्षापासून, किती वर्ष कालावधीच्या करारावर, कोणत्या अटी व शर्तीवर, कोणाच्या आदेशान्वये वापरावयास देण्यात आला होता किंवा कसे इत्यादी महत्वपुर्ण बाबींची लेखापरीक्षा अभिलेखे अभावी करता आलेली नाही.

2) विभागाकडे याबाबत अभिलेखे उपलब्ध नसल्याचे पाहाता सदरची शेतजमीन तत्कालीन नगरपरीषद कालावधीत प्रदीर्घ कालावधीपूर्वी भाडेपट्टे तत्वावर संबंधितास वापरावयास दिली असल्याचे म्हणण्यास वाव निर्माण झाला आहे. सदर बाब महानगरपालिकेच्या दृष्टीने अतिशय गंभीर असून प्रदीर्घ कालावधीपासून सदरचा भाडेपट्टाकरार दुर्लक्षित राहण्याची अनियमितता झाली असल्याचे लेखा परीक्षणाचे स्पष्ट मत आहे.

3) सदर शेत जमीन संबंधितांच्या ताब्यात प्रदिर्घ कालावधीपासून असल्याने याबाबत न्यायिक बाब उपस्थित होऊन मालकीहक्कासह महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान सोसावे लागेल. असे लेखा परिक्षणाचे स्पष्ट मत आहे. तरी, याबाबत सत्वर योग्य ती कार्यवाही करुन, सदरची शेतजमीन मालकी महानगरपालिकेची असल्याचे अनुपालन लेखा परिक्षणास दर्शवावे.

4) शेत जमीन सारखी मालमत्ता बाबत आजपावेतो सुधारित भाडेपटटे करार न होणे, संबंधिताकडून जमीन परत प्राप्त न करणे इ. महत्वपूर्ण अनियमितता पाहाता यात महानगरपालिकेने हेतूपुरस्कर/जाणीवर्पूवक दुर्लक्ष केल्यामुळेच सदरची अनियमितता झाली असल्याचे स्पष्ट होत आहे. तरी, सत्वर नियमोचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

5) संबंधितांकडून कोणतेही आर्थिक उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होत नसल्याने महानगरपालिकेचे मोठया कालावधीपासून आर्थिक नुकसान होत आहे. नुकसानी बाबतची परिगणना होणे आवश्यक असून, याबाबत सखोल चौकशी होऊन, संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन उचित कार्यवाहीचे अनुपालन दर्शवावे.

6) महानगरपालिकेने सन- 2012-2013 अखेर पर्यंतच्या आपल्या मालकीच्या स्थावर मालमत्ता यांचा शोध

DRAFT

घेणे क्रमप्राप्त असून, त्यांचे मालकत्व प्राप्त असल्याचे शासकीय दस्ताऐवज दप्तरी उपलब्ध करुन, अनुपालन दर्शविणे आवश्यक आहे.

DATDAWM6901 (Ref No : 65)

## *27 शासन घोषित गलिच्छ वस्ती मधील मालमत्तांवर कर मागणी व्यतिरिक्त भुईभाडे, सेवा आकार व प्रशासकीय आकार इत्यादीची आकारणी होऊन रकमा वसुल होत नसलेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***शासनाने घोषित केलेल्या गलिच्छ वस्ती / झोपडपट्टी तसेच मनपा मालकीच्या स्लम क्लिअरन्स योजनेअंतर्गत असलेल्या खोलीजागा यांच्याकरीता अनुज्ञेय असलेले भुईभाडे, सेवाकर, प्रशासकीय आकार इ. ची मालमत्ता करासोबत आकारणी केली नसल्याने होत असलेल्या आर्थिक नुकसानीबाबत***

DRAFT

महाराष्ट्र शासन गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.एमसीएस/1079/6130 /सी.आर./11/07 दिनांक: 09/01/1987 नुसार झोपडपट्टी मधील रहिवाश्यांकडून आकारावयाचे सेवा आकार, भुईभाडे, प्रशासकीय आकार इत्यादी चे दरामध्ये दि.01/011987 पासून वाढ करण्यात आली असून तयात सेवा कर रु.9/-, प्रशासकीय आकार रु.1/-, भुईभाडे जागा वापर क्षेत्राप्रमाणे विहीत दराने, व्यावसायिक कारणास्तव वापर असल्यास सेवा कर रु.27/- असे निश्चित केले आहेत. त्याअनुषंगाने तत्कालिन नगरपालिका धुळे यांचे ठराव क्र.579 दि.10/01/1989 अन्वये महाराष्ट्र स्लम एरीयाज (इम्प्रुमेंट क्लिअरिंग ॲण्ड रिडेव्हलपमेंट) ॲक्ट 1971 मध्ये धुळे नगरपालिका हद्दीत एकूण 28 वस्त्या यांना गलिच्छ वस्ती म्हणून जाहीर करण्यात आल्या होत्या. त्यांचेकडून उपरोक्त सुधारीत दराने संबंधितांकडून आकारणी करुन अनुज्ञेय रकमा वसुल करणेस मंजूरी प्रदान करण्यात आली होती. तथापि तत्कालिन नगरपालिका धुळे व तद्नंतर धुळे महानगरपालिका अस्तित्वात येऊनही शासन घोषित गलिच्छ वस्ती मधील रहिवाशी यांचेकडून सुधारीत दराने भुईभाडे, सेवा आकार व प्रशासकीय आकार इत्यादीची आकारणी व वसुलीची कार्यवाही आजपावेतो करण्यात आलेली नाही.याबाबत वेळोवेळी लेखापरीक्षण अहवालात आक्षेप नोंदवूनही महानगरपालिकाने सदरचे आकार आकारणेची कार्यवाहीत हेतू:पुरस्कर टाळाटाळ केल्याचे दिसून येते. यामुळे महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्नाच्या मोठया स्त्रोतापासून वंचित राहावे लागत आहे. याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. उपरोक्त शासन निर्देशाप्रमाणे तसेच ठरावान्वये दि.01/01/1987 पासून मंजूर असलेल्या सुधारीत

दराने शासनमान्य एकूण 28 गलिच्छ वस्तीमधील रहिवासी यांचेकडून एकत्रित मालमत्ता करासोबत पुर्वलक्षी प्रभावाने मागणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही वेळीच झाली नसल्याचे आढळून आली आहे. याचा विपरीत परिणाम महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवर होत आहे असे लेखा परीक्षणाचे स्पष्ट मत आहे.

2.शासनाने 1987 नंतर किती गलिच्छ वस्ती / झोपडपट्टी यांना धुळे महानगरपालिका हद्दीकरीता मान्यता दिली किंवा कसे याबाबत अभिलेख्या अभावी अचूकता पडताळता आलेली नाही. अशा मान्यताप्राप्त झोपडपट्टी संख्येत वाढ झाली असल्यास त्यांचे कडूनही उपरोक्त नमूद दराने विविध आकार यांची आकारणी होऊन रकमा वसुल होणे आवश्यक असेल.

3.तत्कालिन नगरपालिका धुळे यांचेकडून सर्व्हे नं.381 मधील झोपडपट्टी करीता स्लम क्लिअरन्स योजनेअंतर्गत सन 1965-66 पासून एकूण 85 खोली बांधून संबंधित भाडेकरुंना वापरावयास देण्यात आलेले आहेत. त्यांचेकडूनही उपरोक्त शासन निर्देशाप्रमाणे विविध आकार यांची आजपावेतो आकारणी करण्यात आलेली नाही. यामुळे संबंधितांकडून आकार रकमा पुर्वलक्षी प्रभावाने आकारणी होऊन वसुलात आणणे आवश्यक असेल.

4.महानगरपालिका धुळे शहर हद्दीतील शासनाने घोषित केलेल्या गलिच्छ वस्ती / झोपडपट्टी यांचे स्वतंत्र एकत्रित मालमत्ता कर मागणी नोंदवही परिरक्षित करुन त्यात मालमत्ता धारक निहाय पुर्वलक्षी प्रभावाने मागणी रकमा (भुईभाडे, सेवा आकार, प्रशासकीय आकार व मालमत्ता वापर प्रकार इत्यादी) यांची परिगणना करुन रकमा वसुलात आणणे आवश्यक असेल.

तरी उपरोक्त अभिप्रायास अनुसरुन आकारावयाच्या रकमांची वसुली करुन अनुपालन दर्शवावे.

DATDAWM6901 (Ref No : 62)

***34 महानगरपालिकेने शासन निर्देशानुसार महिला व बाल कल्याण करीता 5 टक्के इतकी तरतूद करुन सुध्दा त्यानुसार कोणतीही योजना राबविली नाही. यामुळे गरजू व पात्र लाभार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवण्याची अनियमितता.***

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपानिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महिला व बालकल्याण विभागाकडून शासन निर्देशानुसार 5 टक्के इतकी बजेट मध्ये अर्थिक तरतूद करुन सुध्दा योग्य त्या पध्दतीने योजना राबविले नसल्याने झालेल्या अनियमिततेबाबत.***

DRAFT

शासननिर्णय , नगरविकास विभाग, क्रमांक- जीईएन/1093/1198/नावी/14,दिनांक 14/07/1993 व क्रमांक 2005/ प्र.क्र.255/05/नावी-20,दिनांक 08/11/2010 नुसार महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी महानगरपालिकेने सन 2012-13 चे मंजूर अर्थसंकल्पात महिला व बालकल्याण समिती करीता वार्षिक महसुली उत्तपन्नाच्या 5 टक्के रक्कम रुपये 28530000/- इतकी राखीव ठेवून त्यातून विविध योजना राबविणे अनिवार्य केले आहे. तदनुसार महानगरपालिकेने सन 2012-13 अखेर उपरोक्त शासन निर्देशानुसार 5 टक्के इतकी रक्कम राखीव ठेवलेली आहे. मात्र सदर कालावधीत महिला व बाल कल्याणार्थ कोणतीही योजना प्रभावीपणे राबविली नाही. यामुळे शासनाचा गरजु व पात्र महिलांना या योजने मार्फत सक्षम करण्याचा मुळ हेतू साध्य झालेला नाही. तसेच या अनियमिततेमुळे कोणतीही फलश्रती झालेली नाही. 5 टक्के विहित करण्यांत आलेला रक्कम रुपये 28530000/- इतका निधी केवळ योजना न राबविलेमुळे वाया गेले असल्याचे निदर्शनास येत आहे.तरी सदर योजना प्रत्येक वर्षात प्रभावीपणे राबविणेबाबत दक्षता घेणे.

तसेच सदरचा अखर्चित निधी नियमबाहयपणे खर्च होणार नाही याबाबत योग्य ती दक्षता घेणे आवश्यक असेल.

DVERSKM7501 (Ref No : 95)

## *38 बोर्ड व बॅनर्स खरेदी मधील निविदेत असणा-या त्रुटीबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 03**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 165400.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 165400.00/-

***माहिला व बाल कल्याण विभागाच्या अनुदानातून बोर्ड व बॅनर्स खरेदी करताना भांडार विभागाकडून झालेल्या अनियमिततेबाबत.***

माहिला व बाल कल्याण विभागामार्फत सन 2012-13 चे प्राप्त अनुदानातून बाल कामगार जनजागृती करीता बोर्ड व बॅनर्स खरेदीकरीता मनपाच्या भांडार विभागामार्फत निविदा मागविण्यांत आलेल्या असून सदर निविदेमध्ये खालिलप्रमाणे त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1. संबंधित पुरवठादारांने काम सुरु करण्यांचे आदेश मिळालेनंतर आवश्यक असणारा करारनामा विनादिनांकीत करुन दिलेला आहे. उदा. स्टॅम्प पेपर खरेदीदिनांक 25/04/2012 दिसतो आहे. मात्र करारनाम्याचा दिनांक नमूद केलेला नाही. सदर बाब अंत्यत गंभीर आहे.

2. तसेच सदर करारनाम्यामध्ये खाडाखोड आढळत असून सदर बाब अंत्यत गैर आहे. उदा. निविदा रक्कमेत



DRAFT

बदल करण्यांत आलेला आहे.

3. त्याचप्रमाणे देयक अदा करताना करारनाम्यातील अट क्र. 3 नुसार प्रकल्प अधिकारी यांचे प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतरच देय होईल असे नमूद करण्यांत आलेले आहे. मात्र पूर्ण देयक अदा करण्यांत आलेले आहे. तसेच सदर नस्ती तपासली असता फक्त मराठी चे 6 तर उर्दूचे 4 बॅनर्सचे फोटोग्राफ जोडलेले आहेत. उर्वरित मराठीचे बॅनर्स 4 व उर्दूचे 6 व 6 बाय 10 चे 5 बोर्ड फोटोग्राफ जोडलेले नाहीत. सबब ते लावण्यांत आलेचे निदर्शनास येत नाही. सदरहू रक्कम रुपये 165400/- आक्षेपित ठेवण्यांत येत आहे. ( मराठी 4 बाय 3 चे बोर्ड 840/- प्रती एकुण रुपये 3360/- , उर्दू 4 बाय 3 चे 6 बोर्ड 840/- प्रती एकुण 5040/- व 6 बाय 10 चे मोठे 5 बोर्ड रुपये 31400/- प्रती बोर्ड असे एकुण रक्कम रुपये 165400/-)

मनपा निधी

आक्षेपाधिन रक्कम 165400/-

DVERSKM7501 (Ref No : 86)

## *43 मंजूर अभिन्यासातील अनुज्ञेय असलेले रस्ता व खुली जागा इत्यादी महानगर पालिकेच्या नावे न करण्याची अनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 03**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या खुली जागा, रस्ता जागा, व इतर बाबी विकसकाकडून महानगर पालिकेच्या नांवे न करता अभिन्यासास तात्पुरती मंजुरी देणे बाबतची नियमबाहय कार्यवाहीबाबत.***

नगररचना विभाग यांचेकडून सन 2012-2013 या आर्थिक वर्षात रहीवास प्रयोजनार्थ विकसकाने सादर केलेल्या स्वमालकीच्या जमीनीचे अभिन्यासास तात्पुरती मंजुरी देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. सदर प्रस्तावापैकी निवडक प्रकरणांची पडताळणी केली असता खालील प्रमुख अनियमितता आढळून आलेले आहेत.

1) मंजुर अभिन्यासातील एकूण जागेच्या क्षेत्रफळापैकी देय होणाऱ्या खुली जागा **(OPEN SPACE),** नियोजित रस्त्यांची जागा (6,9,12 मीटर इत्यादी प्रमाणे), गटार व्यवस्था, विद्युत व्यवस्था इत्यादी महत्वपुर्ण बाबी स्थायी निदेश क्रमांक-34 दिनांक- 28/05/2005 तसेच उपविधी व अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विकसकाने मा.आयुक्त, महानगरपालिका, धुळे यांच्या नावाने शासकीय दस्ताऐवज जसे– खरेदीखत, 7/12 उतारा, प्रॉपटी कार्ड व इतर तत्सम अभिलेखे इत्यादी अन्वये करुन देणे आवश्यक असताना, विकसकाने संदर्भिय कार्यवाही पुर्ण केलेली नाही, मात्र विभागाने सदरबाब हेतू पुरस्कर दुर्लक्षित करुन विकसकाच्या अभिन्यास प्रस्तावांना

DRAFT

तात्पुरती मंजुरी प्रदान करण्याची अनियमियतता केलेली आहे. (अशा प्रकरणांचा उदाहरणादाखल उल्लेख खाली प्रमाणे नमूद करण्यात येत आहे) यामुळे आजपावेतो सदरचे अभिन्यासातील अनुज्ञेय असलेल्या रस्ता, खुली जागा, व इतर बाबी या प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या नावे होऊ शकलेल्या नाहीत.

2) सदरच्या जागा महानगरपालिकेच्या नावे न झाल्याने मालकी हक्काअभावी महानगरपालिका वंचित राहीली असून सदरच्या जागा व इतर बाबी यांचा संबंधितांकडून/विकसकाकडून गैरवापर होऊन अतिक्रमण/अनधिकृत बांधकामे इत्यादी सारखी न्यायिक बाब उपस्थित होऊन महानगरपालिकेस नाहक सर्वकर्ष झळ सोसावी लागेल व सदरच्या जागा मालकी हक्क प्राप्त करुन विकास करण्याची उचित फलश्रुती प्राप्त होणार नाही, असे लेखापरीक्षणाचे स्पष्ट मत आहे. तरी आर्थिक वर्षातील मंजूर प्रकरणे व यापुर्वीची मंजूर प्रकरणे यात नमूद असलेली खुली जागा, रस्ता जागा व इतर बाबी सत्वर महानगरपालिकाच्या नावे होऊन त्याची नोंद व अभिलेखे दप्तरी ठेवणे आवश्यक असेल.

उदा. मंजूर प्रकरणे- 1) देवपूर सर्व्हे नं.74/2-4 व 74/2-5 (सौ.शशिप्रभा गुलाबराव वाघ) 2) सुव्हीनियर डेव्हलपर्स -81/2/2 देवपूर 3) मेहिंदळे सर्व्हे नं.92/2 अ-4 (सौ.चंद्रकलाबाई दिलीप जगताप) 4) देवपूर सन 63/7 ( पार्थ नंदलाल खंडेलवाल) व इतर 13 प्रकरणे.

3) स्थायी निदेश मधील निर्देशानुसार विकसकाने अभिन्यासात नमुद केलेल्या व महानगरपालिकेच्या नावे करावयाच्या जागांचा विकास करावयाचे स्पष्ट आदेश आहेत. जसे रस्ता तयार करणे, दिवाबत्ती व्यवस्था करणे, गटार व्यवस्था करणे, खुली जागेस कम्पौंड करणे इत्यादी तथापि मंजूर अभिन्यासाची प्रकरणे अंतिम मंजूरीस्तव विकसकाने महानगरपालिकेकडे आजपावेतो सादर केलेली नाहीत. यामुळे उपरोक्त नमूद विकासाची कामे विकसकाने प्रत्यक्षात केलेली नसल्यानेच अंतिम मंजुरीसाठी सादर झालेली नाहीत असे स्पष्ट होते. तरी याबाबत सक्षम प्राधिकाराकडून सखोल तपासणी होऊन नियमोचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

तरी सन 2012-13 अखेरपर्यंत महानगरपालिकेने मंजूरी दिलेल्या अभिन्यासातील जागा संबंधित विकसित करुन महानगरपालिकेच्या नावे करुन दिल्याचे अभिलेखे सक्षम प्राधिकाराकडून प्रमाणित करुन तसा अनुपालन दर्शवावे.

DATDAWM6901 (Ref No : 98)

## *44 बांधकाम परवानगी प्रकरणे मंजूर करताना अनुज्ञेय अग्निशमन सेवा फी आकारणी करुन वसुल होत नसलेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 02**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***नियमानुसार बांधकाम परवानगी देतांना अग्नीशमन सेवा फी शासनाकडून विहीत दर मंजूर करुन त्यानुसार***



DRAFT

***आकारणी होऊन वसुल होणे आवश्यक असतांना तशी नियमोचित कार्यवाही होत नसले बाबतची अनियमितता बाबत.***

सन 2012-13 करीता नगर रचना विभागाने रहिवास व व्यावसायिक/वाणिज्य प्रयोजनार्थ इमारत बांधकाम प्रकरणांना मंजूरी प्रदान केलेली आहे. त्यापैकी काही निवडक प्रकरणांची पडताळणी केली असता संबंधित विकसकाकडून अग्निशमन सेवा फी आकारणी केलेली नाही.

याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र आग प्रतिबंध व जीवन संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 11 नुसार अनुसुची 1 व 2 मध्ये नमूद केलेल्या इमारत बांधकामाचे वर्गीकरणाप्रमाणे अनुज्ञेय होणारी अग्निशमन सेवा फी ची आकारणी होऊन रक्कम वसुल होणे आवश्यक आहे. मात्र अशी अग्निशमन सेवा फी आकारणी न केल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच नियमबाहय प्रकरणे मंजूर होऊन बांधकाम परवानगी देण्याची अनियमितता होत आहे.

2) उपरोक्त अधिनियमात नमुद केल्याप्रमाणे अनुसुचित नमूद केलेले बांधकामाचे वर्गीकरण प्रमाणे आकारावयाचे अग्निशमन सेवा फी चा दर शासनाकडून पुर्व मंजूरी घेऊन आकारणे आवश्यक आहे. मात्र सन 2012-13 पर्यंत महानगरपालिकेने अग्निशमन सेवा फी आकारणी व वसुली इत्यादीची कार्यवाही केलेली नाही. सदरबाब महानगरपालिकेचे आर्थिक हीताचे विरुध्द असून सेवा फी वसुली अभावी फी वसुलीचा मुळ उद्देश/हेतू साध्य होऊ शकलेला नाही.

उपरोक्त बाब पाहाता महानगरपालिकेने सेवा फी सारख्या अधिनियमान्वये उपलब्ध करुन दिलेल्या आर्थिक स्त्रोताचा नियमोचित वापर न केल्याने मोठे आर्थिक नुकसान होऊन त्याचा विपरीत परीणाम महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवर होत आहे. तरी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अग्निशमन फी विहीत दराने (शासनाची पुर्व मंजूरी घेऊन) आकारणी करुन वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

DATDAWM6901 (Ref No : 99)

## *77 महानगरपालिका हायस्कूलसाठी देण्यांत आलेल्या सादील खर्चाबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 02**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 17024.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 135000.00/-

***महानगरपालिका हायस्कूलसाठी देण्यांत आलेल्या सादील खर्च वेतनोतर अनुदानातून भागविणेबाबत.***

DRAFT

सन 2012-13 चे लेखा परीक्षणात माध्यामिक हायस्कूलसाठी सादील खर्चाकरीता खालिलप्रमाणे रकमा हायस्कूलला प्रदान करण्यांत आलेल्या आहेत.

| अ.क्र. | बाब | रक्कम |
|---|---|---|
| 1 | विज बिल | 3810 |
| 2 | टेलिफोन बिल | 13214 |
| 3 | धान्य अग्रिम | 45000 |
| 4 | दिवाळी अग्रिम | 90000 |
| | एकुण रक्काम | 152024 |

या बाबत खालिलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यांत येत आहेत.

1.वरीलप्रमाणे एकुण खर्चापैकी अ.क्र 3 व 4 वगळता सदरील होणा-या खर्चावर शिक्षण विभागाकडून अनुदान संहिता मधील आकस्मिक खर्चामधील (3) बाब क्रमांक 9 नुसार संपूर्ण अनुदान अनुज्ञेय आहे. त्यामुळे सदरचा खर्च अनुदानास पात्र असल्यामुळे महानगरपालिका हायस्कूलने वेतनेत्तोर अनुदानाचा प्रस्ताव तयार करुन अनुदान प्राप्त केले असल्यास सदरची रक्कम महानगरपालिका निधीत जमा करुन पूर्तता दर्शवावी. (152024 - 17024 - 135000)

2.तसेच लेखा परीक्षा कालावधीत धान्य अग्रिम व दिवाळी अग्रिम एकुण रुपये 135000/- माध्यामिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना प्रदान केले असल्याचे निदर्शनास येत आहे. तथापि, सदर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची आस्थापना ही वेतनपथक माध्यामिक शिक्षक विभागाकडे असल्यामुळे त्यांचे वेतन व भत्ते संबंधित विभागाकडून संवितरीत होत असल्यामुळे धान्य व दिवाळी अग्रिम महापालिकानिधीतून प्रदान करणे नियमबाहय आहे. याबाबत यापुढे अशा प्रकारे प्रदाने न करण्यांची गांभिर्याने काळजी घेण्यांत यावी.

तरी निधी बाबत नियमोचित कार्यवाही करण्यांत यावी.

मनपा निधी
वसुलीपात्र रक्कम 135000/-
आक्षेपाधिन रक्कम 17024/-

DVERSKM7501 (Ref No : 114)

## *83 पदाधिका-यांसाठी लेटर पॅड व व्हीजीटींग कार्ड इत्यादी छपाईसाठी नियम बाहय खर्च केलेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 02**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 28350.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 28350.00/-



DRAFT

***महानगरपालिका पदाधिका-यांसाठी लेटर पॅड व व्हीजीटींग कार्ड इ. छपाईसाठी नियम बाहय खर्च केलेबाबत.***

महानगरपालिकेचे लेखा विभागाकडील प्रमाणंक क्रमांक 791 ,दिनांक 29-5-2012 मे. योगेश प्रिंटर्स, धुळे, यांना महपालिकेचे अभिलेखे इत्यादी छपाईबदल अदा केले आहेत. प्रमाणकांसोबत देयके पडताळणी केले असता खालिल तपशिलाप्रमाणे पदाधिका-यांसाठी लेटरपॅड व व्हीजीटींग कार्ड इत्यादी छपाई केले बदलची रक्कम समाविष्ठ आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| 01 | पदाधिका-यांची लेटर पॅड व व्हीजीटींग कार्ड इ. छपाई चे देयक (मे. योगेश प्रिंटर्स, धुळे) | 28350 |

1. नगरविकास विभागाकडील शासन निर्णय संकीर्ण -2004/468/प्र.क्र. 84/04/नवि-20, दिनांक 24 जानेवारी 2004 व दिनांक 22 जानेवारी 2010 नुसार महानगर पालिकांच्या सदस्यांना मानधनात दुरध्वनी , लेखनसामुग्री व टपाल इत्यादीचा खर्च समाविष्ठ असतांना वरीलप्रमाणे खर्च रुपये 28350/- नियमबाहय आहे. याबाबत जबाबदारी निश्चीत करुन रक्कम वसुल करावी.

2. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 19 अ (1) व कलम 88 व 89 मध्ये सदर बाबींवर खर्च करण्यांची तरतूद नसतांना कोणत्या प्राधिकारान्वये खर्च करण्यांत आला याबाबत स्वयंस्पष्ठ आभिप्राय नमूद करुन रक्कम वसुल करुन पूर्तता दाखवावी.

मनपा निधी

आक्षेपाधिन रक्कम 28350/-

DVERSKM7501 (Ref No : 119)

## *84 महिला व बालकल्याण विभागाची सन 2012-13 मधील खर्ची टाकण्यात आलेल्या देयकांची नस्ती तपासणी करण्यांस न मिळालेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 38350.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 38350.00/-

***महिला व बालकल्याण विभागाची सन 2012-13 मधील खर्ची टाकण्यात आलेल्या देयकांची नस्ती तपासणी करण्यांस न मिळालेबाबत.***



DRAFT

लेखा विभागातील सेंट्रल कॅश बुक तपासणी केल्यानुसार महिला व बालकल्याण विभागामार्फत प्रवचन कार्यक्रम , केबल जाहिरात इ. संबंधित देयके सोबत देण्यात आलेल्या विवरणपत्रकाप्रमाणे अदा केल्याचे आढळते. परंतु तत्संबंधीची नस्ती (ठराव किंवा करारपत्रक,निविदा ,तक्ता इ.) तपासणी करता उपलब्ध् झालेली नाही. त्यामुळे लेखा परीक्षण करता आलेले नाही.

| अ क्र | लेखा विभागाचा प्रमाणंक क्रमांक | दिनांक | पुरवठादारांचे नांव / देयक अदा करण्यांत आलेल्या पार्टीचे नाव | तपशिल | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 546 | 14/5/2012 | मी महाराष्ट्र धुळे टिव्ही कार्यक्रम | श्री खंगेद्र महाराज यांचे जाहिर प्रवचनाचा खर्च | 600 | सदर खर्चाकरीता समितीचा ठराव करण्यांत आलेला होता का तसेच खर्च करण्यांसाठी मान्यता घेण्यांत आलेली होती का |
| 2 | 547 | 14/5/2012 | धुळे टिव्ही कार्यक्रम | वरीलप्रमाणे | 900 | |
| 3 | 548 | 14/5/2012 | सुमन शॉपिंग स्टोअर्स, धुळे | वरीलप्रमाणे | 8350 | |
| 4 | 549 | 14/5/2012 | श्याम फोटो धुळे | वरीलप्रमाणे | 1500 | |
| 5 | 550 | 14/5/2012 | सुनिल मंडप डेकोरेटर्स धुळे | वरीलप्रमाणे | 27000 | |
| | | | एकुण खर्च | | 38350 | |

याबाबत स्वयंस्पष्ठ आभिप्राय नमूद करुन रक्कम वसुल करुन पूर्तता दाखवावी.तरी नियमोचित कार्यवाही करण्यांत यावी.

मनपा निधी

आक्षेपाधिन रक्कम 38350/-

DVERSKM7501 (Ref No : 118)

DRAFT

## *95 महिला व बाल कल्याण विभागांतर्गत 5 टक्के इतकी तरतूद करुनसुध्दा महिला करीता कोणत्याही योजना राबविली नसल्यामुळे गरजू व पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांपासून वचिंत ठेवण्याची अनियमितता झालेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2853000.00/-

***महानगरपालिकेने विहित शासननिणर्यानुसार अर्थसंकल्पामध्ये 5 टक्के इतकी तरतूद करुन सुध्दा गरजू व पात्र महिलेकरीता कोणतीही योजनां प्रभावीपणे न राबविलेमुळे शासनाचा मुळ उददेश सफल न झालेबाबत.***

शासन निर्णय , नगरविकास विभाग क्रमांक.जीईएन/1093/1198/नावि/14,दि14/7/1993, व क्रमांक संकीर्ण /2005/प्रक्र 255/05/नवि-20, दि. 8/11/2010 नुसार महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी महानगरपालिकेने महिला व बालकल्याण समिती करीता वार्षिक महसुली उत्पन्नाच्या 5 टक्के रक्कम राखीव ठेवून त्यातून विविध योजना राबविणे अनिवार्य केले आहे. तदनुसार महानगरपालिकेने सन 2012-13 करीता उपरोक्त शासननिर्णयानुसार 5 टक्के इतकी रक्कम रुपये 2853000/- राखीव ठेवलेली आहे. मात्र सदर कालावधीत महिला व बालकल्याणार्थ कोणतीही योजना प्रभावीपणे राबविलेली नाही. यामुळे शासनाचा गरजु व पात्र महिलांना या योजनेमार्फत सक्षम करण्याचा मुळ हेतू साध्य झालेला नाही. तसेच या अनियमिततेमुळे कोणतीही फलश्रती झालेली नाही. 5 टक्के विहित करण्यांत आलेला निधी केवळ योजना न राबविलेमुळे वाया गेले असल्याचे निदर्शनास येत आहे. तरी सदर योजना प्रत्येक वर्षात प्रभावीपणे राबविणेबाबत संबंधितांनी दक्षता घेणे आवश्यक राहील.

DVERSKM7501 (Ref No : 95)

## ***106 धुळे महानगरपालिका सन 2012-13 महानगरलिका हददीतील नाल्याचा गाळ काढणेसाठी खोदकाम करणे, खोदकामातुन निघालेले मटेरीयल उचलनेसाठी व डेडरगांव जलशुध्दीकरण केंद्र येथील आजुबाजुचे परिसरातील साफसफाई करणेसाठी जेसीबी मशीन भाडयाने लावणेचे कामेचे संचिकेत आढळुन आलेल्या अनियमीतते बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 17**

*लेखा शीर्ष :देखभालदुरुस्ती मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 651312.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 154160.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 497152.00/-

***कामाचे टुकडे पाडुन कामे करणे, तांत्रीक व प्रशासकीय मान्यता आदेश संचीकेत न जोडणे, दरपत्रक मागविणेसाठी विहीत पध्दतीचा अवलंब न करणे, साहीत्य तपासणी व विल्लेवाट बाबत विहीत कार्यवाही न करणे, तुलनात्मक तक्ता तयार न करणे, दरपत्रकांची तपासणी व कार्यवाही नियमानुसार न करणे, व्हॅट रक्कम कमी वसूली / कपात न करणे, मंजुरीपेक्षा जादा खर्चास नियमानुसार मंजुरी न घेणे, कामाचे मोजमाप ई.***



DRAFT

***अभीलेखे उपलब्ध न करणे, अंदाजपत्रकातील दर बाबत दरसुची नमुद न करणे, काम पुर्ण झालेचे अहवाल न जोडणे, करारनाम्यावर कार्यालयाची मोहर न लावणे, क्रमपात्र कपाती कमी वसुली अथवा वसुली न करणे, कामाचे आदेशापुर्वीचे केलेल्या कामाची रक्कम अदा करणे, अंदाजपत्रके, प्रशासकीय मान्यता, करारनामा ई. संचीकेत न लावणे, ई.***

(प्रमाणक क्रंमांक 4219, दिनांक 28/03/2013 रक्कम 600907, प्रमाणक क्रंमांक 4372, दिनांक 15/03/2013 रक्कम 50405)

1. महानगरलिका हददीतील नाल्याचा गाळ काढणेसाठी खोदकाम करणे, खोदकामातुन निघालेले मटेरीयल उचलने

2. डेडरगांव जलशुध्दीकरणे केंद्र येथील आजुबाजुचे परिसरातील साफसफाई करणे

याबाबत खालील प्रमाणे अभीप्राय आहेत.

1. उक्त कामे कामाचेटुकडे पाडुन करण्यात आली आहेत, उक्त अ.क्रं. 1 चे कामाची जाहीरात प्रसीध्दी दै. आपला महाराष्ट्र मध्ये दि. 05/05/12 मध्ये प्रसीध्द केल्याचे संचीकेतील चेकलीष्ट मध्ये व दिनांक 23/01/12 चे टीपणीत नमुद केली आहे, परंतु संचीकेत प्रसीध्दी जाहीरात वृत्तपत्र अथवा जाहीर नोटीस पत्र जोडलेले नसलेने जाहीरात प्रसीध्दी बाबत खात्री करता येत नाही, तसेच अ.क्रं. 2 चे कामासाठी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच इतर ठिकाणी कामाबाबत योग्य प्रकारे प्रसिध्दी करण्यात आलेली नाही, त्यामुळे काम करणेसाठी पुरेसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे दिसून येते, नियमानुसार टुकडे पाडुन कामे देता येत नसताना तशी कार्यवाही केली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील परिशीष्ट 3 नियम 466 (4) नुसार सामान्यपणे तीन महीन्याच्या आत पुन्हा करावयास लागतील अशा कामांकरीता अशा स्वरुपाची कामे निवीदेत एकत्रीत करुन दर करार करणे व्यवहार्य व इष्ट होईल असे नमुद केले आहे, असे असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

2. कामास तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता आदेश सक्षम प्राधिका-यांचे संचिकेत आढळुन आले नाहीत, महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 158, 160 व 161 नुसार मंजुरी घेणे आवश्यक असताना तसे आदेश संचिकेत आढळुन आले नाहीत.

3. अ. क्रं. 1 चे रुपये 600907 चे काम असलेने नीवीदा मागवुन कार्यवाही करणे आवश्यक असताना दरपत्रके कशी मागविण्यात आली, सदर कृती नियमबाहय आहे, महाराष्ट्र नगरपालिका लेखासहिता 1971 चे नियम 169 नुसार कार्यवाही करणे आवश्यक होते, व अ.क्रं.2 चे कामासाठी दरपत्रके मागविणेसाठी विहित पध्दतीचा अबलंब करण्यात आला नाही, कंत्राटदारांकडे प्राधीकृत अनुज्ञप्तीचे प्रमाणपत्रे मागविण्यात आलेली नाहीत, शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग निर्णय क्रं. भांखस 1088/(2512)/उदयोगा 6, दिनांक 2 जानेवारी 1992 मधील 8.3 (इ) नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4. कामासाठी वापरण्यात आलेले साहीत्य योग्य असल्याबाबत तपासणी केल्याचे अहवाल, जलवाहीनीचे साहित्य बदलताना जुने, निरुपयोगी साहित्य उपयोगात आणले किंवा कार्यालयात जमा करुन त्याची कशी विल्लेवाट लावण्यात आली याचा तपशील संचिकेत आढळुन आला नाही. नगरपालीका लेखा संहीता 1971

DRAFT

नियम 183 (3) नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

5. प्राप्त दरपत्रकाचे तांत्रीक बाबींचा तक्ता व प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता त्या–त्या संचिकेत तयार करुन जोडण्यात आलेला नाही. केवळ टिपणीमध्येच प्राप्त दरपत्रके व दर नमुद करुन मंजुर घेण्यात आल्याचे दिसुन येते, प्राप्त दरपत्रकापैकी उक्त नमुद अ. क्रं.1 चे कामाचे सचिंकेत चेकलीष्ट व टीपणी दि. 23/01/12 मध्ये जाहीरात प्रसीध्दी तारीख दि. 05/05/12 प्रसीध्दीपुर्वीच कशी नमुद केली हे स्पष्ट होत नाही, तसेच सदरचे टीपणीत कार्यादेश तारीख 30/05/12 पुढील तारीख कशी नमुद केली, याबाबत सत्यता पटवीणे आवश्यक आहे. नगरपालीका लेखा संहीता 1971 नियम 170 नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

6. अ.क्रं. 1 चे कामाचे संचिकेत प्राप्त दरपत्रके सचिंकेत नाहीत, यावरुन दरपत्रके मागविणे व तपासणी करणेचे कामी योग्य ती तपासणी केली नसल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा लेखापरिक्षा (सुधारीत) अधीनियम 2011 चे कलम 6 नुसार स्थानीक प्राधीकरणाने लेखापरीक्षणास अभीलेखे दर्शविणे आवश्यक आहे.

7. खर्च देयके प्रमाणकावर मंजुरीबाबत देयकावर सक्षम प्राधीकारी यांच्या सहया घेण्यात आल्या नाहीत व रक्कम प्रदानाबाबत सहया घेण्यात आलेल्या नाहीत. नगरपालीका लेखा संहीता 1971 नियम 174 नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

8. खालील नमुद देयकात आयकर, व्हॅट, अनामत, शीक्षण शुल्क रक्कम ई. रकमा कपात करण्यात आलेली नाही.

| प्रमणक क्रं. | कपात न केलेली रक्कम | | | | | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| | अनामत | आयकर | व्हॅट | शीक्षण शुल्क | एकुण | |
| 4219 | 30045 | - | 30045 | - | 60090 | दीलीप पुंडलीक पाटील |
| 4372 | 504 | 1008 | 2520 | 30 | 4062 | दीलीप पुंडलीक पाटील |
| एकुण | 30549 | 1008 | 32565 | 30 | 64152 | |

वर नमुद केलेनुसार अनामत रक्कम रु. 30549, आयकर रु. 1008, शीक्षण शुल्क रु.30 एकुण रु. 64152 रक्कम नियमानुसार वसुल करुन मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे. निवीदे सोबत ठेकेदाराने व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र जोडले नसल्यामुळे शासन अधीसुचना दिनांक 4/4/2012 नुसार देयकातुन 5 टक्के व्हॅट रक्कम कपात करणे आवश्यक असताना 2 टक्के व्हॅट रक्कम कपात केली असलेमुळे उर्वरित 3 टक्के रक्कम उक्त प्रकरणात रु. 32565 वसुल करुन चलनव्दारे भरणा करणे आवश्यक आहे.

9. प्रमाणक क्रं. 4219 रु.600907 चे कामाचे आदेश दिनांक 30/05/12 असल्याचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्रात व कामाचे गोषवा-यात नमुद केलेले आहे, तसेच पाणी पुरवठा विभागाचे कार्यादेश नोंदवही सन 2012-13 मध्ये खात्री केली असता सदरचे आदेश क्रं.5 दिनांक 30/05/2012 ला निर्गमीत झालेले आहेत. देयकात कामाचे आदेशापुर्वीचे दि.24/04/12 ते 29/05/12 कालावधीतील रु. 433000 मंजुर करण्यात आली आहे, त्यामुळे सदरची रक्कम रु. 433000 वसुलपात्र असल्याकने वसुल करुन मनपा निधीत जमा करावी.

10. उक्त सर्व कामासाठी अंदाजपत्रके तयार करुन त्यावर सक्षम प्राधीकारी यांच्या सही व पदनामे नमुद

DRAFT

करणे, कोणत्या दरसुचीनुसार अंदाजपत्रके तयार केली ते नमुद करणे, सदरची कामे करणेपुर्वीचे अहवाल व काम पुर्ण झालेवर घेतलेले अहवाल सचिंकेत जोडणे, ई. बाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही. नगरपालीका लेखा संहीता 1971 नियम 158 नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

11. प्र.क्रं. 4219 चे देयक मंजुरी शीफारस अभीयंता यांनी रु. 588528 केली असताना रु. 600907 चे देयक मंजुर करण्यात आलेमुळे रु. 12379 रक्कम जादा मंजुरी व प्रदान झाली आहे. सदर रक्कमे बाबत खुलासा सादर करणे आवश्यक आहे.

12. प्रमाणक क्रं. 4219 चे कामासाठी निवीदा मागवुन कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. महाराष्ट्र नगरपरीषद लेखा सहिता 1971 चे नियम 169 नुसार निवीदा मागवीने आवश्यक आहे. प्र. क्रं. 4372 कामाचे दरपत्रके मागवीणे, उघडणे ई. कार्यवाही महाराष्ट्र नगरपरीषद लेखा सहिता 1971 चे नियम 170 नुसार करण्यात आली नाही, मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 58 खालील औचीत्याची तत्वे वनियम 107 मधील तरतुदी व शासन निर्णय एसखुओ 1077/60963/एसपीओ/572/आयएनडी 6,दि. 21/2/78 व उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.भांखस 1088/ (2512)/ उदयोग 6 ,दि. 02/01/92 व सुधारणा 02/11/2001 नूसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

13. उक्त कामांस महाराष्ट्र नगरपरीषद लेखा सहिता 1971 चे नियम 160 नुसार मंजुरी घेण्यात आलेली नाही.

14. प्र.क्रं. 4219 चे कामाचे आदेश, करारनामा, कामाची मुदत, वापरण्यात आलेली दरसुची याबाबतचे अभीलेख संचीकेत नसल्याने त्याबाबत खात्री करता आली नाही. सार्वजनीक बांधकाम विभाग परिच्छेद 132 व 133 नुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम अभीयंत्याची तांत्रीक मान्यता घेणे आवश्यक आहे, तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 160 व 162, 173 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

15. उक्त कामांची मोजमापे किरकोळ बांधकामाची नोंदवही महाराष्ट्र नगरपरीषद लेखा सहिता 1971 चे नियम 181 नुसार नमुना 138 मध्ये घेणे आवशक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

16. करारनाम्यावर कार्यालयाची मोहर लावण्यात आलेली नाही. नगरपालीका लेखा संहीता 1971 नियम 173 नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

17. मोजमाप पुस्तीका क्रं. 2 व 3 तपासणी उपलब्ध करण्यात न आलेने त्याबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा लेखापरिक्षा ( सुधारीत) अधीनियम 2011 चे कलम 6 नुसार स्थानीक प्राधीकरणाने लेखापरीक्षणास अभीलेखे दर्शविणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 88 दिनांक 03/12/2015 देवुन अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 88)

### *107 सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील जकात संकलनाचे कराराचे कार्यक्षम पालन न करणे व हप्त्याची रक्कम वसुली बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : जकात मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 126893701.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 126893701.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 61893701.00/-

***सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील जकात संकलनाचे कराराचे कार्यक्षम पालन न करणे, हप्त्याची रक्कम पुर्णतः वसुली न करणे, हप्ता थकीत कालावधीतील रकमेवर व्याज आकारणी व वसुली, आणी हप्ता थकीत राहिल्याबाबत बँक गॅरंटीचे रोखीकरण न करणे ई.***

DRAFT

धुळे महापालिकेने जकात संकलनाचा ठेका दिनांक २७/०८/२०११ ते २६/०८/२०१२ या कालावधीसाठी मे. एम.ई.पी.टोल रोड प्रा.लि. मुंबई या कंपनीला रुपये ७२०९००००० किंमतीस साप्ताहिक रुपये १३८६३४६२ प्रमाणे ५२ हप्त्यात भरणा करणेचे करार अटी नुसार मान्यता दिलेली आहे. सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील जकात संकलनाचे कराराचे कार्यक्षम पालन न करणे, हप्त्याची रक्कम पुर्णतः वसुली न करणे, हप्ता थकीत कालावधीतील रकमेवर व्याज आकारणी व वसुली, आणी हप्ता थकीत राहिल्या बाबत बँक गॅरंटीचे रोखीकरण न करणे ई. बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१. जकात संकलनाचे साप्ताहिक देय रक्कम अनियमीत व अप्रमाणशीरपणे भरणा केलेली आहे. साप्ताहिक देय भरणा रक्कमेपैकी रुपये २८५५३४४८ रक्कम उपलब्ध अभीलेख्यानुसार वसुल करण्यात आलेली नाही. जकात कराराचे अटीनुसार अपवादात्मक परिस्थीतीत आयुक्तांचे परवानगीने हप्त्याची रक्कम उशीराने परंतु २० टक्के व्याजाच्या आकारणीसह भरणा करता येईल असे नमुद असल्याने ठेकेदाराकडुन थकीत साप्ताहिक रकमेवर वारंवार २० टक्के आकारणी करण्यात आलेली आहे, दंडात्मक तरतुद करण्यात आलेली नाही, कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीनुसार उपलब्ध लेख्याची तपासणी केली असता थकीत साप्ताहिक रकमेवर रुपये ५६७७१८१ व्याज आकारणी रक्कम वसुल करण्यात आलेली नाही, तसेच साप्ताहिक थकीत रक्कम लेखापरिक्षण कालावधीपर्यंत भरणा न केलेमुळे सदरचे रकमेवर दिनांक ३१/०१/२०१६ पर्यंत व्याज आकारणी रक्कम रुपये २७६६३०७२ वसुल करण्यात आलेली नाही. उक्त नमुद केलेनुसार एकुण रक्कम ६१८९३७०१ वसुल केली नसल्याचे लेखारिक्षणास आढळुन आले याबाबत खात्री करुन रक्कम वसुल केली नसल्यास जकात ठेकेदाराकडुन वसुल करणे आवश्यक आहे.

२. जकात कराराचे अटीनुसार अपवादात्मक परिस्थीतीत आयुक्तांचे परवानगीने हप्त्याची रक्कम उशीराने परंतु २० टक्के व्याजाच्या आकारणीसह भरणा करता येईल असे नमुद असल्याने ठेकेदाराकडुन थकीत साप्ताहिक रकमेवर वारंवार २० टक्के आकारणी करण्यात आलेली आहे, करारात दंडात्मक तरतुद करण्यात आलेली नाही. महानगरलिकेमार्फत जकात/पारगमन शुल्क वसुलीसाठी अभीकर्ता नेमण्याची कार्यपध्दती नगर विकास विभागाचे परिपत्रक क्रं. जकात २०११/प्रक्र.११/वि ३४, दिनांक १९/०४/२०११ चे नियम ३ नुसार

अभीकर्त्यामार्फत जकात वसुलीचे नियंत्रणासाठी एक्सने अकांउंट बाबत करारनाम्यात अट समाविष्ठ करण्यात आलेली नाही. त्यामुळे जकात वसुलीवर प्रत्यक्ष नियंत्रण राहीले नाही. तसेच अभीकर्त्याने जकात वसुलीचा दैनंदिन अहवाल सादर केल्याचे अभीलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न केल्याने खात्री करता आली नाही.

३. शासन नगर विकास विभागाचे परिपत्रक क्रं. जकात २०११/प्रक्र.११/वि ३४, दिनांक १९/०४/२०११ ३(७) नुसार कोणत्याही परिस्थीतीत देय हप्ता महापालिकेस थकीत राहू नये म्हणून बँक गॅरंटी ६५०००००० चे रोखीकरण करुन हप्ता वसुल करुन पंधरा दिवसाच्या आत बँक गॅरंटी रकमेचा भरणा करण्याची तरतुद असताना मोठया प्रमाणात रक्कम थकीत राहुनही महापालिकेने अशी कार्यवाही केली नाही.

उक्त विषयी सन २०११-१२ चे लेखापरिक्षणात सदरचा परिच्छेद घेतलेला असताना त्यानुसार कार्यवाही केलेली नाही. व जकात अभीकर्त्याचे हित जोपासल्याचे दिसुन येते.

४. जकात अभीकर्त्याकडुन करार कालावधीत महापालिकेच्या कर्मचा-यांची जकात कामासाठी सेवा घेतल्याचे व त्यापोटी रुपये २२३०१२८ रक्कम वसुल केल्याचे उपलब्ध अभीलेख्यावरुन दिसुन आले, परंतु जकात कामासाठी किती कर्मचारी जकात अभीकर्त्याचे कामासाठी वर्ग करण्यात आली, कोणत्या दराने वेतन भत्ते, निवृत्ती वेतन व रजावेतन अंशदाने ई. रकमा वसुल केली याबाबतचे अभीलेख लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न केल्याने याबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (स्वीयेत्तर सेवा ई.) मधील नियम ३९, ४४ ते ५१ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 113 दिनांक 30/12/2015 देवून अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी अभिप्राय प्राप्तर न झालेमुळे परिच्छे द अंतिम करण्या/त आला.

REVSSSM5909 (Ref No : 113)

### *110 समुह भ्रमणध्वनी सेवा करीता झालेल्या नियमबाहय खर्चाबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 03**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 380363.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 348853.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 31510.00/-

***महानगरपालिकेच्या पदाधिकारी व अधिकारीकर्मचारी यांना समुह भ्रमणध्वनी सेवा देणे व त्यावरील खर्च मनपा निधीतून करणे इ. बाबी करिता महानगरपालिका अधिनियमात कोणतीही तरतूद नसतांना नियमबाहयपणे केलेल्या खर्चा बाबतची अनियमितता.***

सन 2012-13 या कालावधीत महानगरपालिकेने पदाधिकारी /अधिकारी /कर्मचारी यांना भ्रमणध्वनी

DRAFT

सेवा पुरविली असून त्यावर माहे मार्च 2013 अखेर खालील तपशिलाप्रमाणे एकूण रक्कम रु.380363/- इतका खर्च झालेला आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग नाव | संख्या | भ्रमणध्वनी सेवा खर्च |
|---|---|---|---|
| 1 | पदाधिकारी | 04 | 31510 |
| 2 | अधिकारी / कर्मचारी | 45 | 348853 |
| | एकूण | 49 | 380363 |

याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार महानगरपालिका पदाधिकारी /अधिकारी /कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी समूह भ्रमणध्वनी व सिमकार्ड उपलब्ध करुन देणे व त्यावरील होणारा खर्च महानगरपालिका निधीतून करणे इत्यादीबाबत कोणतीही तरतुद नाही. यामुळे महानगरपालिकेने सदर बाबीवर केलेला खर्च रक्कम रुपये 31510/- नियमबाहय ठरतो.

2) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 458 नुसार भ्रमणध्वनी सेवा व खर्च यासाठी महानगरपालिकेने कोणताही उपविधी शासनाकडून मान्य करुन घेतल्याचे आढळ होत नाही. यामुळे झालेली खर्चाची कार्यवाही नियमबाहय ठरते.

3) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण 2004/468/प्र.क्र.84/04/नवि-20 दिनांक.24/02/2005 व 22/01/2010 नुसार महानगरपालिका सदस्यांना रक्कम रुपये 7500/- दरमहा मानधन मंजूर असून, मानधन रकमेत दुरध्वनी, लेखन सामुग्री व टपाल या बाबींवरील खर्चाचा समावेश करण्यात आल्याचे स्पष्ट नमुद आहे. यामुळे उपरोक्त नमुद पदाधिकारी यांच्या भ्रमणध्वनी सेवा खर्च रक्कम रुपये 31570/- नियमबाहय असून वसुलीस पात्र आहे.

सबब, नियमबाहयपणे समुह भ्रमणध्वनी सेवा व खर्च रक्कम रुपये 380363/- लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अमान्य करण्यात येत आहे तसेच यापुढे नियमबाहय भ्रमणध्वनी सेवा खर्च निधीतून होणार नाही याबाबत दक्षता घेणे आवश्यक असेल.

म.न.पा निधी

आक्षेपाधीन रक्कम रुपये - 348853

वसुलपात्र रक्कम रुपये - 31510

एकूण - 380383

DATPBKM6701 (Ref No : 112)

## ***116 भोगवटा प्रमाणपत्र न घेता इमारत बांधकामांचा रहिवास / वाणिज्य वापर सुरु करण्याची अनियमिततााबाबत.***

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

DRAFT

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मनपा हददीत रहीवास व वाणिज्य प्रयोजनार्थ बांधकाम झालेल्या इमारतीचा संबंधित मालकांनी अधिनियमातील तरतूदी प्रमाणे सक्षम प्राधिकाराकडून भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही. अशा इमारतींचा भोगवटा अनुज्ञेय नसतांना वापरात आणण्याची व त्यावरील मालमत्ता कर व इतर कर यांचे होत असलेल्या आर्थिक नुकसानीची अनियमितता झाले बाबत.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 263 नुसार महानगरपालिका हद्दीत इमारत बांधकामे रहिवास / वाणिज्य प्रयोजनार्थ कामे पुर्ण झाल्यानंतर एक महिन्याच्या आत संबंधिताने महानगरपालिकाकडे अर्ज सादर करुन सदर इमारतीचा नमुद प्रयोजनार्थ भोगवटा सुरु करण्यासाठी परवानगी घेणे बंधनकारक आहे. सदर अर्जानुसार मा.आयुक्त यांनी भोगवटा परवानगी नाकारल्याचे कळविले नसेल तोपर्यंत अशा इमारतींचा भोगवटा करणे अनुज्ञेय राहणार नाही.

तथापि सन 2012-13 या आर्थिकवर्षात नगररचना विभागाने एकूण 1022 बांधकाम परवानगी प्रकरणांना रहिवास / वाणिज्य प्रयोजनार्थ मंजुरी दिल्याचे आढळून आले आहे तसेच सन 2012-13 पुर्वी ही अशा प्रकरणांना विभागाने बांधकाम परवानगी दिलेली आहे.मात्र इकडील अर्धसमास पत्र क्रमांक- 121 दिनांक- 15/01/2016 अन्वये आजपावेतो महानगरपालिका हद्दीतील कीती इमारतींना संबंधित बांधकाम मालक यांनी कामे पुर्ण झाल्याबाबत कळविले असून त्यापैकी कीती जणांना महानगरपालिकाने इमारत भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केले. याबाबत माहिती मागणी केली असता विभागाने महत्वपुर्ण माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाही या अर्थी महानगरपालिका हद्दीत इमारत बांधकामासाठी मंजुरी प्रदान केले नंतर संबंधितांकडून रहिवास / वाणिज्य प्रयोजनार्थ बांधकामे पुर्ण होऊन भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न करताच नियमबाहयपणे सदरच्या इमारती वापरात आणण्याची अनियमितता होत असून महानगरपालिकाने याबाबत आजपावेतो कोणतीही नियमोचित कार्यवाही केली नसल्याचे लेखा परीक्षणात आढळून आले आहे. तरी याबाबत नियमानुसार योग्य ठरणारी कार्यवाही होणे आवश्यक असून महानगरपालिकाने मंजुरी दिल्याप्रमाणे इमारतींचे बांधकामे रहिवास / वाणिज्य याच प्रयोजनार्थ इमारतींचा संबंधितांकडून वापर सुरु झाला किंवा कसे या बाबींची पडताळणी होऊन मालमत्ता व इतर करांचे आर्थिक नुकसान झाले किंवा कसे याबाबी पडताळून अनुपालन दर्शवावे तसेच उपरोक्त नियमान्वये आवश्यक असलेले भोगवटा प्रमाणपत्र प्राप्तीसाठी संबंधितांकडून विहीत कालावधीत महानगरपालिकाकडे अर्ज सादर होतील. यासाठी योग्य ती तजवीज विभागाकडून होणे आवश्यक आहे.

DATDAWM6901 (Ref No : 121)

DRAFT

## *118 अंत्यविधी साहित्य मोफत पुरविणे योजनेसाठी नियमबाहय खर्च करणेची अनियमितता.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 03**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1253120.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1253120.00/-

***अधिनियम अथवा शासनाचे कोणतेही निर्देश नसतांना महानगरपालिकेने नियमबाहयपणे अंत्यविधी साहीत्य मोफत देण्याची योजना राबविणे व त्यावर खर्च करण्याची केलेली अनियमितता बाबत.***

DRAFT

सन 2006-07 या आर्थिक वर्षापासून महानगरपालिकेने मोफत अंत्यविधी सहित्य पुरविणे ही योजना सुरु केली असून, या योजनेअंतर्गत हद्दीतील सर्व जनतेसाठी अंत्यविधी करीता आवश्यक साहित्य जळाऊ लाकूड 7 मण, 3 लिटर डिझेल / रॉकेल व 50 गोवऱ्या इत्यादी मक्तेदार नेमुन पुरविली जाते. यानुसार शहरातील देवपूर, चितोडरोड, मोहाडी व कुमार नगर इत्यादी ठिकाणाच्या अमरधाम साठी एकूण - 3 मक्तेदार नेमण्यात आलेले आहेत. सन 2012-13 या आर्थिक वर्षात सदर योजनेवर एकूण रक्कम रुपये 1253120/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 6 कलम 63 (11) नुसार तरतूद करावयाच्या आवश्यक बाबीत केवळ प्रेतांची विल्हेवाट लावणे यासाठी जागा ठेवणे, नियमन करणे व बेवारस प्रेतांची विल्हेवाट लावणे या बाबींचा समावेश असताना कोणत्याही निकषा शिवाय सर्वांसाठी मोफत अंत्यविधी साहित्य पुरविणे ही बाब नियमबाहय ठरते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 9 कलम 88 नुसार महानगरपालिका निधीचे उपाययोजना करावयाचे ते प्रयोजन स्पष्ट करण्यात आले असून, तरतुदीच्या मर्यादेतच महानगरपालिकाने निधीतून खर्च करणे आवश्यक आहे. यामुळे सदर निधीतून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे केवळ बेवारस प्रेताची विल्हेवाट लावणे व इतर प्रेतांची विल्हेवाट लावणेसाठी जागा ठेवणे ( अमरधाम करीता जागा) याच बाबींसाठी खर्च करणे वैधानिक ठरते. सबब मोफत अंत्यविधी साहित्य पुरविणे यासाठी मक्तेदार नेमून केलेला खर्च एकूण रक्कम रुपये 1253120/- ही कार्यवाही अधिनियमाच्या तरतुदी विरुध्द झाली आहे.

2) सदर योजनेसाठी मा.स्थायी समिती ठराव क्रमांक – 41 दिनांक. 01/06/2006 नुसार त्याचप्रमाणे ठराव क्रमांक - 32 दिनांक 31/03/2012 व ठराव क्रमांक – 97 दिनांक. 10/08/2012 नुसार योजना तात्पुरती सुरु ठेवण्यासाठी मान्यता दिलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 89 नुसार तरतुद

असल्याखेरीज महानगरपालिका निधीतून खर्च करणे अनुज्ञेय होत नाही. यामुळे तरतुदी खेरीज होणारे ठराव हे अधिनियमातील कलम 451(1) नुसार अंमलबजावणी न करता विखंडीत करणे आवश्यक आहे. मात्र या योजनेसाठी तशी नियमोचित कार्यवाही वेळीच न झाल्याने अनावश्यक खर्चाचा भार महानगरपालिका वर पडलेला असून याचा विपरीत परीणाम आर्थिक स्थितीवर होत आहे.

3) दिनांक 11/07/2012 च्या टिपणीत मा.अध्यक्ष, राज्य वित्त आयोग यांनी नाराजी व्यक्त करुन सदर योजना बंद करणेबाबत सुचित केले होते. तथापि मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 32 दिनांक 31/03/2012 व ठराव क्रमांक 97 दिनांक10/08/2012 नुसार सदरची योजना सुरु ठेवणेस व धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्याची अनियमितता झालेली आहे. वास्तविकता प्रशासनाने अधिनियमातील तरतुदी नुसार ठराव विखंडीत करणेची कार्यवाही करणे आवश्यक होते.

सबब नियमबाहयपणे केलेला एकूण खर्च रक्कम रुपये 1253120/- वसुल होणे आवश्यक आहे.

म.न.पा.निधी

वसुलपात्र रक्कम रुपये - 1253120/-

DATDAWM6901 (Ref No : 122)

DRAFT

## *119 मक्ता पध्दतीने मनुष्यबळ पुरविणेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 971560.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 971560.00/-

***शासनाचे निर्देशानुसार कोणतेही मनुष्यबळ पुरविण्याची संविदा नियमबाहय असेल असे असतांनाही महानगरपालिकेने नियमबाहयपणे मनुष्यबळ पुरविणे साठी मक्तेदार नेमणूक करणे व त्यावर खर्च करण्याची अनियमितता केली आहे.***

सन 2012-13 चे लेखा परीक्षणात प्रमाणके पडताळणी केली असता, खालील तपशिलात नमुद केलेल्या बाबींकरीता महानगरपालिकेने मनुष्यबळ पुरविणेकामी मक्ता पध्दतीने संबंधित मक्तेदाराला रक्कम रुपये 971560/- इतके प्रदान केले आहे. सदरचा खर्च हा प्रातिनिधीक स्वरुपात दर्शविण्यात येत आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | मक्तेदार | अदा रकमेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| 4178 | 01/03/2013 | 168291 | सरस्वती स्वयंरोजगार संस्था, धुळे | फायर फायटर वाहन ठेका पध्दतीने ड्रायव्हर पुरविणे मानधन रक्कम. |
| 4179 | 01/03/2013 | 45916 | सरस्वती स्वयंरोजगार | फायर फायटर वाहन ठेका पध्दतीने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | संस्था, धुळे | ड्रायव्हर पुरविणे मानधन रक्कम. |
| 4180 | 01/03/2013 | 5400 | मेजर सिक्युरिटी सर्व्हीस | ठाकरे संकुल सुरक्षा रक्षक पुरविणे. |
| 4202 | 02/03/2013 | 2264 | मेजर सिक्युरिटी सर्व्हीस | ठाकरे संकुल सुरक्षा रक्षक पुरविणे. |
| 4186 | 28/03/2013 | 155346 | सरस्वती स्वयंरोजगार संस्था, धुळे | फायर फायटर वाहन ठेका पध्दतीने ड्रायव्हर पुरविणे मानधन रक्कम. |
| 3306 | 17/12/2012 | 129863 | मेजर सिक्युरिटी सर्व्हीस | प्रभाग कार्यालये, महानगरपालिका आवार, जकात नाके इत्यादी ठिकाणी सुरक्षा रक्षक पुरविणे मानधन खर्च. |
| --- | --- | 464480 | सरस्वती स्वयंरोजगार संस्था, धुळे | माहे एप्रिल 12 मे मार्च 13 या कालावधीत आरोग्य विभाग घंटा गाडी करीता चालक पुरविणे मानधन खर्च. |
| | एकूण | 971560 | | |

याबाबत अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) इकडील अर्धसमास पत्र क्रमांक- 142 दिनांक- 28/01/2016 अन्वये संबंधित विभागाकडून मागणी करुनही आरोग्य विभाग (फक्त आकडेवारी) वगळता इतर कोणत्याही विभागाने मक्ता पध्दतीने पुरविलेल्या मजुर / ड्रायव्हर / सुरक्षा रक्षक इत्यादी बाबतच्या मंजुर नस्ती प्रकरणे, कार्योदेश, निविदा प्रक्रीया इत्यादी महत्वपुर्ण अभिलेखे लेखा परीक्षणात उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. यामुळे अदा खर्चाची एकूण रक्कम व आवश्यक त्या बाबींची उचित लेखा परीक्षण करता आलेले नाही.

2) उपरोक्त खर्च तपशिलाची प्रमाणके पडताळणी केली असता, महानगरपालिकाने विविध कारणास्तव वाहनचालक, सुरक्षारक्षक पुरविणे या कामासाठी विविध मक्तेदार यांची नेमणुक करुन मनुष्यबळ पुरविणे करिताचा खर्च मक्तेदार यांना अदा केलेला आहे.

नगरपरीषद प्रशासक, संचालनालय, स्थायी निर्देश क्रमांक – 36 दिनांक 29 डिसेंबर 2005 मधील परिच्छेद क्रमांक – 13 व 14 नुसार कोणत्याही परिस्थितीत मनुष्यबळ पुरविण्याची संविदा संस्थेने करुन नये असे स्पष्ट निर्देश असल्याने उपरोक्त बाबी करीता महानगरपालिकाने मक्तेदार यांच्या नियुक्त्या करणे व त्या अनुषंगाने मनुष्य बळाच्या मजुरीवर / मानधनावर खर्च करणे नियमबाहय असून उपरोक्त स्थायी निर्देशाचे विरुध्द जाऊन कार्यवाही केली आहे. यामुळे सन 2012-13 करीता झालेल्या खर्चासह उपरोक्त प्रांतिनिधीक खर्चाची दर्शविलेली रक्कम रुपये 971560/- लेखा परीक्षणात मान्य करता येत नाही.

3) उपरोक्त नमुद कामांकरीता मनुष्यबळाची मागणी करुन त्याबाबत खर्च करणे ही नियमबाहय बाब असून सदर बाबींवरील खर्च हा रोजंदारी वरील मजुरांवर होणाऱ्या अनियमित असलेल्या खर्चाप्रमाणेच असून यामुळे

DRAFT

महानगरपालिकावर नाहक खर्च बोजा पडत आहे व यामुळे संबंधितांकडून न्यायिक बाब निर्माण होऊ शकते यामुळे असे खर्च होणार नाहीत याबाबत योग्य ती दक्षता वेळीच घेणे आवश्यक असेल.

4) उपरोक्त तपशिलात नमूद केलेल्या कारणांसाठी नियुक्त केल्या गेलेल्या मक्तेदारांनी पुरविलेल्या मनुष्यबळामार्फत संबंधित विभागांनी कोणती कामे प्रत्यक्षात करुन घेतलीत याबाबतचा कोणताही तपशिल लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्याने त्यांनी केलेली कामे, हजेरीपत्रक, रकमा प्रदानाचा तपशिल इत्यादी महत्वपुर्ण बाबींची सत्यता पडताळता आलेली नाही.

सबब नियमबाहयपणे झालेला खर्च रक्कम रुपये 971560/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

म.न.पा.निधी

आक्षेपाधीन रक्कम रुपये – 971560/-

DATDAWM6901 (Ref No : 142)

### *120 सन 2012 - 2013 चे मंजूर अर्थसंकल्पाबाबत अभिप्राय.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 17**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***सन- 2012-2013 चे मंजुर अर्थसंकल्पातील सर्वसाधारण असलेल्या अनियमितता बाबत. जसे- शासन निर्देशानुसार अर्थसंकल्प तयार न करणे, वस्तुनिष्ठ व अचुक अर्थसंकल्प तरतूदी करणेची खबरदारी न घेणे, मागील तीन वर्षाच्या सरासरी उत्पन्न व खर्च आकडेवारी अर्थसंकल्प तयार करतांना विचारात न घेणे, लेखे विहीत कालावधीत बंद न करणे, मत्ता व दायित्व विवरणपत्र सक्षम प्राधिकारास वेळेत सादर न करणे, इ.***

महानगरपालिका धुळे या संस्थेने सन 2012-13 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणात मंजूर अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता मा.आयुक्त, महानगरपालिका धुळे यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2011-12 चे सुधारीत व कलम 95 नुसार सन 2012-13 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज दिनांक 18/02/2012 रोजी स्थायी समितीसमोर सादर केले. त्याचा स्थायी समितीने चर्चा करुन ठराव क्रमांक 12 दिनांक 18/02/2012 नुसार सर्वसाधारण सभेसमोर सादर केला. त्यामध्ये महानगरपालिका धुळे यांच्या सर्वसाधारण सभेने सुधारणा व दुरुस्त्या करुन सन 2012-13 करीताचा मुळ अर्थसंकल्प जमा रक्कम रुपये 2664637000/- व खर्च रक्कम रुपये 2982344000/- यास महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक 84 दिनांक 29/03/2012 अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. तसेच



DRAFT

महानगरपालिका धुळे यांचे सन 2012-13 च्या सुधारीत अर्थसंकल्पास स्थायी समितीने ठराव क्रमांक 22 दिनांक 30/03/2013 नुसार मंजुरी प्रदान करुन सर्वसाधारण सभेकडे सादर केला व सर्वसाधारण सभेच्या ठराव क्रमांक 181 दिनांक 16/05/2013 अन्वये सुधारीत अर्थसंकल्प जमा रक्कम रुपये 1383607403/- व खर्च रक्कम रुपये 1593428712/- यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

2) महानगरपालिका धुळे यांच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 व 100 नुसार सर्वसाधारण सभेने मंजुर केलेले सन 2012-13 या वित्तीय वर्षाचा मुळ अर्थसंकल्प व कलम 103 व 104 अन्वये संमत केलेल्या सुधारीत अर्थसंकल्पीय जमा व खर्चाच्या रकमांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | जमा रक्कम | खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | मुळ अर्थसंकल्प | 2664637000 | 2982344000 |
| 2 | सुधारीत अर्थसंकल्प | 13833607403 | 1593428712 |

उपरोक्त नमुद तपशिलाचे अवलोकन केले असता अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना सन 2012-13 चे मुळ अर्थसंकल्प, सुधारीत अर्थसंकल्प व प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या रक्कमा पाहता अर्थसंकल्प तयार करताना प्रत्यक्ष अपेक्षित जमा रक्कम व त्या आधारावर खर्च रक्कम यामध्ये मोठया प्रमाणात वाढ करुन ( फुगवून) दाखविण्यात आलेली आहे. वस्तुनिष्ठ व अचुकतेने अर्थसंकल्प तयार करण्याची योग्य ती खबरदारी घेण्यात आलेली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 26 व स्थायी निर्देश परिपत्रक क्रमांक नपसु00/प्र.क्र.24/2000/1 दिनांक 13/10/2000 नुसार अर्थसंकल्पीय अंदाजपत्र तयार करताना संस्थेच्या प्रत्यक्ष उत्पन्नाचे व प्रत्यक्ष खर्चाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या उत्पन्न व खर्चाच्या सरासरीवर आधारीत असावयास पाहीजेत. मागील चार वर्षाच्या प्रत्यक्ष जमा व प्रत्यक्ष खर्चाबाबतची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | प्रत्यक्ष जमा | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2008 – 2009 | 698208393 | 762116680 |
| 2 | 2009 – 2010 | 1097096219 | 1003172959 |
| 3 | 2010 – 2011 | 106795690 | 1035191584 |
| 4 | 2011 – 2012 | 1176684550 | 1138015815 |
| 5 | 2012 - 2013 | 1369676244 | 1325355902 |

वरील प्रमाणे मागील वर्षाची व सन 2012-13 ची प्रत्यक्ष जमा व खर्च पाहाता मुळ व सुधारीत अर्थसंकल्प तयार करताना शासनाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाहीचा अवलंब करुन अर्थसंकल्प अंदाजपत्रक तयार केल्याचे दिसून येत नाही.

3) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 94(1) नुसार मा.आयुक्त यांनी प्रत्येक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील वर्षातील वार्षिक लेखे मान्यतेसाठी स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतु सन 2012-13 चे वार्षिक लेखे दिनांक 10/10/2013 रोजी सादर केले असल्याने महानगरपालिकेचे दिनांक 31/03/2012 रोजी विहीत कालावधीत लेखे बंद झालेले नाहीत असे लेखापरीक्षणाचे मत आहे. लेखे उशीराने बंद करण्याबाबतचे अनुपालन होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 60 व 61 नुसार महानगरपालिकाने वार्षिक लेखे यांचा

DRAFT

गोषवारा नमुना क्रमांक 28 प्रमाणे मत्ता व दायित्वे नमुना क्रमांक 29 प्रमाणे तयार करुन संचालक, नगर विकास विभाग, मुंबई व स्थानिक निधी लेखा परीक्षा विभाग, नवी मुंबई यांना सत्वर पाठविणे आवश्यक असताना सन 2012-13 करीताचे विहीत नमुन्यात आकडेवारी /विवरणपत्र सादर करण्यात आलेले नाहीत.

5) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 246 (3) व राज्यसूचीच्या अ.क्र.05 नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्य शासनाच्या वैधानिक आणण्यात आले असून, 1992 च्या 74 व्या घटना दुरुस्तीने राज्य घटनेत 243 (3) कलमाचा समावेश करुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात आला त्यामुळे महानगरपालिकांच्या कार्य, कर्तव्ये, निधीची तरतूद व जबाबदाऱ्यात वाढ करुन नव्याने 18 विषय महानगरपालिकांकडे सोपविण्यात आले. 11 वा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी देशातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखे व अर्थसंकल्प यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी National Accounting Manual च्या धर्तीवर एकसारखी लेखा संहिता तयार करण्याविषयी राज्य शासनास सुचित केले. शासन निर्णय, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक.06 जुलै 2005 नुसार National Muncipal Accounting Manual लागू करण्याचे आदेश सर्व महानगरपालिकांना दिलेले आहेत. तथापि धुळे महानगरपालिकेने अद्यापही (Aecrual Base Double Entry) उपर्जित तत्वावर व्दिनोंद लेखा पध्दतीने लेखे ठेवलेले नाहीत. Single Entry लेखे ठेवण्यात आलेले आहेत. सदर लेख्यांवरुन सन 2012-13 चा अर्थसंकल्प तयार केलेला आहे.

6) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाच्या आदेश व परिपत्रकान्वये महानगरपालिकांनी त्यांचा वार्षिक अर्थसंकल्प तयार करताना राखीव निधी ठेवण्याबाबत सुचना केलेल्या आहेत.

अ) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- जीईएन-1093/325/प्र.क्र.24 नवि-32 दिनांक-17/04/1993 नुसार महिला व बाल कल्याणासाठी 5 टक्के अर्थसंकल्पाचा निधी राखीव ठेवावा.

ब) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक – जीईएन-1093/1981 मदि-14 दिनांक – 14/07/1993 नुसार अपंगांसाठी 3 टक्के निधी राखीव ठेवावा.

क) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक – जीईएन-1655/प्र.क्र.46/नवि-33 दिनांक 14/02/2002 नुसार नगरसेवकांना 2 टक्के निधी राखीव ठेवावा.

ड) नगर विकास विभाग, परिपत्रक क्रमांक -14200/2264/प्र.क्र.144/नवि-24 दिनांक. 26/02/2001 नुसार आर्थिक दुर्बल घटकांसाठी 5 टक्के राखीव निधी ठेवावा.

7) नगर विकास विभाग,शासन परिपत्रक क्रमांक – बीसीसी-1089/6056/डी 10 दिनांक 03/07/1982 नुसार Aaturary Provision 5 टक्के ठेवणे आवश्यक आहे. अखेरची शिल्लक दर्शविलेले अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता, उपरोक्त नमुद 1 ते 5 शासन निर्णय / परिपत्रक नुसार नमुद केल्याप्रमाणे बाबनिहाय राखीव निधी रकमांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही.

8) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 27 (6) व शासन निर्णय दिनांक 04/05/2006 नुसार आस्थापना खर्च 35 टक्के पेक्षा जास्त होऊ नये असे स्पष्ट नमुद असताना धुळे महानगरपालिकेचा आस्थापना खर्च हा 46 टक्के पेक्षा अधिकचा आहे.

DRAFT

9) जमा रक्कम वाढविणे – सन 2011-12 च्या अर्थसंकल्पाच्या जमेच्या बाजुचे अवलोकन केले असता महानगरपालिकेचे अर्थसंकल्पीय अंदाज हे पारंपारिक पध्दतीने घेतलेले आहेत. मागील तीन आर्थिक वर्षाच्या प्रत्यक्ष जमा रक्कम व त्यावर आधारित चालू अर्थसंकल्पात जमा होऊ शकणाऱ्या सरासरी जमा रकमा गृहीत धरणे आवश्यक आहे. परंतु मागील तीन वर्षातील प्रत्यक्ष जमा रकमा खुप कमी असताना त्या प्रमाणात जमा रकमा न घेता त्यात अनावश्यक वाढ दर्शवून जमा रक्कमा घेतलेल्या आहेत. यावरुन जमा रकमा वाढविल्याचे स्पष्ट होते.

10) महानगरपालिकेने घसारा निधी नियमावली तयार करुन त्याप्रमाणे घसारा निधीची रक्कम निश्चित करुन अंदाजपत्रकात तरतूद करणे आवश्यक आहे. धुळे महानगरपालिकेने घसारा निधीची तरतूद केलेली नाही ही बाब शासन निर्देशाविरुध्द आहे.

11) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 100 नुसार महानगरपालिकेने पाणी पुरवठा निधी उभारणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिकेच्या कर्मचारी / अधिकाऱ्यांच्या तीन महिन्याच्या एकूण वेतनाइतका वेतन / निवृत्ती वेतन राखीव निधी उभारणे आवश्यक असताना अशी कार्यवाही महानगरपालिकेने केलेली नाही.

12) धुळे महानगरपालिका, धुळे वित्तीय विवरणपत्राचा आधार मानून जमा व खर्चाचे लेखाशिर्षनिहाय तपशिलवार वर्गीकरण छोटया घटकापर्यंत केलेले नाही.

13) अर्थसंकल्पीय तरतूदी प्राप्त झाल्यानंतर खर्च करणारे विभाग त्यांना प्राप्त तरतूदीनुसार रकमा प्रत्यक्ष जमा नसल्या तरी रकमा महानगरपालिकेकडे उपलब्ध आहेत किंवा नाही याचा विचार न करता वर्ष अखेरीस रकमा खर्च केल्या जातात यामुळे देयतेत (Liability) वाढ होते.

14) आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या सहा महिन्यांनंतर जमा होणाऱ्या प्रत्यक्ष रकमा (उत्पन्न) व होणारा प्रत्यक्ष खर्च यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी आढावा तफावती दूर करुन आर्थिक संतुलन राखण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे अशा आढावा बैठकीत कठोर उपाययोजना करण्याऐवजी फक्त शिल्लक तरतूदी दिल्या जातात व याची चर्चा देखील (सुधारीत अंदाज) सभागृहात होत नाही.

15) धुळे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक फक्त वार्षिक खर्च नियोजनापुरतेच मर्यादित दिसून येते. संपूर्ण धुळे शहर विकासाचा दिर्घकालीन विकास आराखडा ( Development Plan) तयार करुन प्रत्येक वर्षाच्या अंदाजपत्रकातून विभागनिहाय तरतूदीची विभागणी करुन अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या नियोजन व खर्चावर नियंत्रण करण्याबरोबरच महानगरपालिकेच्या विकास कार्यक्रमाची तत्वे दिशा व खर्चाचे अग्रक्रम दिसून आले पाहिजेत. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून किमान उत्पन्नाच्या आधारे जास्तीत जास्त आवश्यकतांची पुर्तता करुन शक्य होईल तेवढी आर्थिक उद्दीष्टे साध्य केली गेली पाहिजेत व त्यासाठी लागणाऱ्या सर्व साधन सामुग्री, कर्मचारी, प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी पुरेपुर वापर करुन नियोजित उद्दीष्टे साध्य केल्याचे दाखविण्याचे अर्थसंकल्प हे प्रभावी साधन आहे.

16) महानगरपालिकेचा अर्थसंकल्प हा ढोबळ आकडेवारीत व्यक्त केलेला आहे. अर्थसंकल्प पुस्तकात विविध

DRAFT

विभागात वाटप केलेल्या तरतूदीमधून साध्य करावयाची आर्थिक व भौतिक उद्दीष्टे स्पष्ट करणे आवश्यक आहे. अशी उद्दीष्टे अर्थसंकल्प पुस्तकात समाविष्ठ नाहीत. त्यामुळे वित्तीय शिस्त न राखता फक्त रकमा खर्च करण्याकडे कल दिसून येतो ( केला जातो) व भौतिक उद्दीष्टे साध्य करता येत नाहीत आणि सामान्य करदात्यांच्या पैशाचा विनियोग योग्य प्रकारे झाला किंवा नाही याची खात्री पटत नाही.

17) विविध विभागांना वाटप केलेला अर्थसंकल्पीय तरतूदी वार्षिक नियोजन करुन समप्रमाणात वर्षाच्या सुरुवातीपासून खर्च करणे अपेक्षित आहे. परंतु तसे न करता आर्थिक वर्ष संपताना खर्च करण्याकडे कल दिसून येतो. वाटप केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदी वर्षाअखेरीस संपवल्या नाही तर खालील प्रमाणे घटना घडतात.

अ) विभागाच्या खाती शिल्लक राहिलेली अर्थसंकल्पीय तरतूद वर्षाअखेरीस व्यपगत होते.

ब) विभागाकडून मागील वर्षी अर्थसंकल्प तरतूद व्यपगत झाल्यामुळे पुढील वर्षी तरतूद कमी प्राप्त होते.

क) नियंत्रण अधिकारी संबंधित विभागास मागील आर्थिक वर्षाच्या तरतुदीप्रमाणे कमी खर्च करण्यासाठी बजावतात यामुळे व आर्थिक वर्षाच्या समाप्तीमुळे तरतूदी व्यपगत होण्याचे शासकीय नियम व वेळेचे बंधन यामुळे संबंधित विभागाचे अधिकारी आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी दिलेली वित्तीय तरतूद संपविण्याची घाई करताना दिसतात.

ड) विविध विकासाच्या योजनांसाठी घेतलेली कर्जे त्यांची परतफेड व व्याजाचे हप्ते त्या त्या योजनेवर न टाकल्यामुळे संबंधित योजनांचे मूल्य कमी दिसून येते व अंतिम उपभोगत्याकडून कराच्या रुपाने वसुल करावयाची किंमत अपूरी राहते.

DATPBKM6701 (Ref No : 01)

### *121 आस्थापना बाबींवरील खर्च ठरवून दिलेल्या निकषापेक्षा जास्तीचा झाल्याबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***आस्थापना खर्चाची विहीत मर्यादा 35 टक्के इतकी असतांना महानगरपालिकेने नियमबाहयपणे आस्थापना खर्च 46.33 टक्के इतका विहीत मर्यादेपेक्षा जादा करणेची अनियमितता झालेली आहे.***

सन 2012-13 साठी महानगरपालिका धुळे यांच्या आस्थापना विषयक बाबींच्या खर्चाची पडताळणी केली असता, महानगरपालिकेच्या लेखा विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या परिशिष्ठ मध्ये दर्शविण्यात आलेल्या आस्थापनाविषयक खर्चाची माहिती तपासली असता सन 2012-13 या आर्थिक वर्षात आस्थापना खर्चाची टक्केवारी 46.63 टक्के एवढी येते. थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे आहे.

आस्थापना खर्च = <u>परिशिष्ठ क</u> x 100
परिशिष्ठ अ – परिशिष्ठ ब

= <u>467894689</u> x 100 = 46.63 टक्के
1003274016

आस्थापना खर्च टक्केवारी = 46.63 टक्के

यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-2005/ वर्गीकरण /प्र.क्र.379 /05/नं-6 वि 24 दिनांक 04/05/2006 नुसार महानगरपालिका धुळे ही ड वर्ग महानगरपालिका असुन अशा ड वर्ग महानगरपालिकांच्या आस्थापना खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी आस्थापना खर्चाची मर्यादा जास्तीत जास्त 35 टक्के एवढी आहे. जर आस्थापना खर्च 30 टक्के पेक्षा जास्त होत असेल तर सदरील महानगरपालिकेच्या नवीन पद निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येऊ नये असे नमूद केलेले आहे. सन 2012-13 साठीचा महानगरपालिका धुळे यांच्या आस्थापनेचा खर्च विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त झालेला आहे. ( 46.63 टक्के)

2) महानगरपालिका धुळे यांची आस्थापना खर्च टक्केवारी निश्चित करताना स्थायी निर्देश क्र.26 दिनांक 23/02/2005 मधील नमुद केलेल्या टक्केवारीच्या सुत्रानुसार टक्केवारी 46.63 टक्के अचुक असल्याचे स्पष्ट होत नाही. (सुत्रामध्ये परिशिष्ठ अ (3) + परिशिष्ठ ब (3) प्रमाणे आकडेवारी विचारात घेतली नसल्याने) सबब आस्थापना खर्चाच्या टक्केवारीत वाढ होऊ शकते.

3) शासन स्थायी निर्देश क्रमांक 26 प्रमाणे आस्थापना खर्चाबाबतची परिशिष्ठ अ, ब व क प्रमाणे सविस्तर आकडेवारी उपलब्ध झालेली नाही. सादर केलेली माहिती गोषवारा स्वरुपात आहे. त्यामुळे महानगरपालिका धुळे यांनी सन 2012-13 साठी दर्शविलेली 46.63 टक्के आस्थापना खर्चाची आकडेवारी योग्य असल्याचे प्रमाणित करता येत नाही. तरी योग्य ती सविस्तर आकडेवारी विचारात घेऊन सुधारीत आस्थापना खर्चाची टक्केवारी सादर होणे आवश्यक आहे.

4) महानगरपालिका धुळे यांची आस्थापना खर्चाची टक्केवारी काढताना स्थायी निर्देश क्रमांक 26 नुसार योग्य ती कार्यवाही करावी व आस्थापना खर्चाची योग्य व बरोबर अशी आकडेवारी शासनाकडे वेळोवेळी सादर करण्याची दक्षता घ्यावी.

DATPBKM6701 (Ref No : 157)

DRAFT

## *122 वार्ड क्रमांक 67 मोहाडी भागात शिवानंद कॉलनी ते महादेव मंदिर डि.पी.रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमितताबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 10**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1051789.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 959552.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 92237.00/-

***अधिनियमातील तरतूदी नुसार आयुक्त यांनी केलेली संविदास मा. स्थायी समिती कडे मान्यतेस्तव तसेच महानगरपालिकेकडे माहीतीस्तव सादर न करणे, काम मजुर सहकारी संस्थेकडे न देता जाहीर निविदा मागवून करणे, कामाचे परिमाणाचे मोजमाप पुस्तक उपलब्ध न करणे, वाहातूक दर प्रमाणित न करणे, कामात बदल/ वाढ करुन जादा खर्च करणे, रॉयल्टी रक्कमेचा भरणा नसणे, इ. प्रकारच्या अनियमितता बाबत.***

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | लेखाशिर्ष | म.न.पा.निधी | | | |
| 2 | प्रशासकीय मान्यता | मा.आयुक्त, महानगरपालिका धुळे, दिनांक – 11/01/2011<br>रक्कम रुपये – 999555/- | | | |
| 3 | तांत्रिक मंजुरी | कार्यकारी अभियंता, महानगरपालिका धुळे पत्र क्रमांक 428 दिनांक. 17/02/2011 रक्कम रुपये 999555/- | | | |
| 4 | निविदा रक्कम | 999555/- | | | |
| 5 | निविदा प्रकार | जाहीर निविदा | | | |
| 6 | निविदा प्रसिध्दी व कालावधी | दै.देशदूत दिनांक – 11/08/2011 | | | |
| 7 | प्राप्त निविदा | तीन | | | |
| 8 | मंजूर निविदा तपशिल | अंदाजपत्रकीय दराने. मक्तेदार- गायत्री कन्स्ट्रक्शन | | | |
| 9 | स्थायी समितीची मंजुरी | निरंक | | | |
| 10 | कार्योदेश | मा.आयुक्त,मनपा धुळे पत्र क्र. 2011-12/276<br>दिनांक.23/11/2011 | | | |
| 11 | कामाची मुदत | सहा महिने | | | |
| 12 | काम पुर्ण दिनांक | 24/04/2012 | | | |
| 13 | काम मुदतीत पुर्ण | आहे | | | |
| 14 | करारनामा | 100/- | | | |
| 15 | जिल्हा दर सुची वर्ष | 2009 - 2010 | | | |
| 16 | मो.मा.पु. / पा.क्र. | 23 पा.क्र.31 ते 34 | | | |
| 17 | खर्च तपशिल | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
| | | 1484 | 07/08/2012 | 105179 | प्रथम धावते |
| | | 4051 | 21/03/2013 | 946610 | दुसरे व अंतिम |
| | | | एकूण | 1051789 | |

DRAFT

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) सदरचे रस्ता डांबरीकरणाचे कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 नुसार मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मंजुरी प्रदान केली आहे. सदर नियमातील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांनी संविदा केलेली कामे ही मा.स्थायी समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावी व त्यास पुढील सभेपर्यंत समितीने आक्षेप न घेतल्यास ती मान्य झाल्याचे समजण्यात येऊन ती माहिती मा.महासभेपुढे सादर होणे क्रमप्राप्त असताना तशी नियमोचित कार्यवाही न करता कामास प्रशासकीय मंजुरी देण्याची अनियमितता झालेली आहे.

2) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक – सीएटी-07/06/प्र.क्र.94/ इमा-2 दिनांक–16/11/2006 नुसार रक्कम रुपये 15.00 लक्ष पर्यंतची कामे ही बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था / सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देण्याबाबत सुचित असून अशी कामे संबंधितांनी मंजुर अंदाजपत्रकीय दराने करुन देणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचे परिपत्रक क्रमांक – जीईएल-1093/2365/प्र.क्र.126/93/नवि-4 दिनांक-20/10/1993 नुसार निविदा मागविणे व स्वीकारणेबाबत मार्गदर्शक सुचना असून त्यानुसार शासकीय / निमशासकीय संस्थांना प्राधान्याने बांधकामे देण्याचे निर्देश आहेत. मात्र महानगरपालिकेने उपरोक्त निर्देशानुसार सदरचे काम मजुर सहकारी संस्था / सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना न देता जाहीर निविदा मागवून करण्याची अनियमितता झालेली आहे. अशा अनियमित बाबींमुळे महानगरपालिकेचा काळ अपव्यय झालेला आहे. (जाहीर निविदा प्रसिध्दी, अंतिम करणे, प्रसिध्दी खर्च इत्यादी) याबाबींवर प्रतिबंध घालणे आवश्यक आहे.

3) सदर झालेल्या कामांची परिमाणे मोजमाप पुस्तक क्रमांक 23 पान क्रमांक 31 ते 34 वर नोंदविण्यात आलेली आहेत. सदरचे मोजमाप पुस्तक देयकासोबत पडताळणी कामी विभागाने उपलब्ध करुन दिली नाही. यामुळे झालेल्या कामाची सविस्तर परिमाणे यांची पडताळणी होऊ शकलेली नाही.

4) या कामासाठीचे मंजुर अंदाजपत्रकातील नमुद दर पडताळता दरात Lead Charges समाविष्ठ करुन दर स्वीकृत करण्यात आले आहेत. मात्र दर पृथ:करण, वाहतुकीचा तपशील, नकाशे मंजुरी इत्यादी सादर केले नसल्याने दरात किती कि.मी. अंतर Lead Charges समाविष्ठ आहेत किंवा कसे याची सत्यता पडताळता आलेली नाही.

5) सदर कामास प्रशासकीय मंजुरी व तांत्रिक मंजुरी ही रक्कम रुपये 999555/- इतकी असताना तसेच काम अंदाजपत्रकीय दराने मंजुर असताना मात्र कामावर प्रत्यक्षात रक्कम रुपये 1051789/- इतका खर्च झालेला आहे. याअर्थी मक्तेदाराने कोणतीही पुर्व मंजुरी न घेता कामात बदल केला असल्यानेच रक्कम रुपये 52234/- जादाचे काम करण्याची अनियमितता झाली आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 167 नुसार पुर्व मंजुरीशिवाय झालेल्या खर्चाची निकड पडताळता आलेली नाही. यामुळे खर्च रक्कम रुपये 52234/- लेखा परीक्षणात मान्य करता येत नाही.

6) शासन निर्देशाप्रमाणे मंजुर अंदाजपत्रकात गौण खनिज वापर साहीत्य प्रकार यासाठी एकूण 530.78 घ.मी.करीता रक्कम रुपये 70003/- इतकी रॉयल्टी बाबीची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र सदर कामाचे अदा देयकाची पडताळणी केली असता, संबंधित मक्तेदाराने उपरोक्त नमूद परिमाणाचे गौण खनिज साहित्य

DRAFT

वापरताना रॉयल्टी महसुल शासन सदरी भरणा करणे महानगरपालिकेस क्रमप्राप्त होते. तशी कपातीची कार्यवाही झालेली नाही. यावरुन संबंधिताने सदरच्या कामावर अवैध मार्गाने गौण खनिज साहित्य वापरल्याचे म्हणण्यास वाव निर्माण झालेला असून रक्कम रुपये 40003/- इतके शासकीय महसूलाचे कायमस्वरुपी नुकसान झाले आहे. सदरचे नुकसान वसुल होणे आवश्यक आहे.

7) मंजुर निविदेतील अनुसुची 3 व 4 पडताळता निरंक माहिती मक्तेदाराने नोंदविली आहे. तसेच शेडयुल बी जोडण्यात आलेले नाही. यामुळे मक्तेदाराकडे रस्ता कामासाठी आवश्यक ती मशिनरी, प्लॉन्ट, तांत्रिक कामगार/मजुर, उपलब्ध वाहन प्रकार, साहित्य इत्यादी महत्वपुर्ण बाबी उपलब्ध होत्या किंवा कसे या महत्वपुर्ण बाबींची सत्यता पडताळता आलेली नाही. निविदेत उपरोक्त नमुद बाबींची त्रुटी असताना / निविदा सदोष असतांना कोणत्या निकषावर अंतिम झाली याबाबत अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

8) निविदा अटी व शर्ती तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 169 (4) नुसार मक्तेदाराकडून 10 टक्के या विहीत दराने सुरक्षा अनामत ठेव कपात करणे बंधनकारक असताना मात्र प्रत्यक्षात अदा देयकातून 4 टक्के या दराने अनामत ठेव रक्कम कपात करण्याची नियमबाहय कार्यवाही केली आहे. नियमबाहय दराने अनामत कपात करुन संबंधितांचे दायित्व कमी करुन आर्थिक हित जोपासल्याचे आढळून आले आहे.

9) कामाचे मोजमाप पुस्तक उपलब्ध न केल्यामुळे मक्तेदाराने कार्यादेश प्राप्ती नंतर प्रत्यक्षात कामास केव्हा सुरुवात केली, खडीकरणाचे कामानंतर किती कालावधी नंतर डांबरीकरणाचे काम केले याबाबत कामाचे दिनांक, कालावधी या तांत्रिक दृष्टया आवश्यक बाबींची सत्यता पडताळता आलेली नाही.

10) कामातील इतर अनियमितता –

अ) कामावर वापरलेल्या साहित्याची मक्तेदाराने शासकीय यंत्रणेकडून गुणवत्ता तपासणी केल्याचे आढळून येत नाही.

ब) देयकासोबत कामावर वापरलेले डॉक्टर साहित्याचे गेट पास, बिजके इत्यादी सादर केलेले नाहीत.

उपरोक्त अनियमिततेमुळे कामावरील खर्च खालील प्रमाणे अमान्य करण्यात येत असून इतर शासकीय वसुली रक्कम संबंधितांकडून वसुल करुन शासन सदरी भरणा करणेची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

म.न.पा.निधी

आक्षेपाधीन रक्कम रुपये 959552/-

वसुलपात्र रक्कम रुपये 52234/-

शासकीय कपात रक्कम रुपये 40003/-

गुंतलेली एकूण रक्कम रुपये 1051789/-

DATDAWM6901 (Ref No : 158)

## *124 विहीत महानगरपालिका हिस्सा रक्कम वेळेत शिक्षण मंडळास अदा न झाल्याने थकबाकीचे दायित्व यात वाढ झालेबाबत.*

**NA**

DRAFT

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***नियमानुसार अनुज्ञेय मनपा हिस्सा 50 टक्के अनुदान रक्कमा अर्थसंकल्पात तरतूद करुनही त्याच आर्थिक वर्षात शिक्षण मंडळास अदा न करता दायित्वात नाहक वाढ करुन घेणेत आलेने मोठया प्रमाणावर अनुदान रक्कमेचे दायित्व राहाण्याची अनियमितता झालेली आहे.***

सन 2012-13 या आर्थिक वर्षा अखेरीपर्यंत महानगरपालिकेने खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिका शिक्षण मंडळास एकूण रक्कम रुपये- 50950000/- इतकी महानगरपालिका हिस्सा रक्कम (आस्थापना खर्च 50 टक्के दयावयाचा निधी) अदा केली असून, विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रानुसार दिनांक- 31/03/2013 अखेर रक्कम रुपये- 49353415/- इतकी हिस्सा रक्कम प्रदानाअभावी थकीत राहील्याचे आढळून आले आहे. (यात सन- 2002-2003 पासूनच्या थकीत रकमांचा समावेश आहे.)

| अ.क्र. | रक्कम मागणीचे वर्ष | थकीत रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | 2002-03 ते 2011-2012 | 49268599 | विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रातील नमुद मागणी आकडेवारी नुसार |
| 2 | 2012-2013 | 84816 | |
| | एकूण रक्कम रुपये- | 49353415 | |

याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

महानगरपालिका शिक्षण मंडळास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 88 ( ई) नुसार अनुज्ञेय होणारे आस्थापना खर्चाचे 50 टक्के इतके अनुदान महानगरपालिकेने स्व: उत्पन्नातून दयावयाचे आहे. यासाठी महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 25 (2) ( ब) नुसार प्रत्येक आर्थिक वर्षाचे मंजूर अर्थसंकल्प यात दयावयाच्या अनुदानाची तरतूद करणे आवश्यक आहे.

तथापि, महानगरपालिकेने उपरोक्त नियमान्वये प्रत्येक वर्षाचे मंजूर अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद करुनही माहे मार्च 2013 अखेर पर्यंत शिक्षण मंडळास एकूण रक्कम रुपये- 49353415/- इतके अनुदान प्रदान केलेले नाही. याअर्थी, महानगरपालिकेने प्रत्येक आर्थिक वर्षाचे मंजूर अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद करुनही त्याच वर्षात अनुदान अदा न करता रकमा थकीत ठेवण्याची अनियमितता केलेली आहे. सदर बाब अर्थसंकल्प निहाय खर्च होत नसल्याचे सिध्दता दर्शविते.

अनुज्ञेय अनुदानाच्या रकमा वेळीच शिक्षण मंडळास अदा न झाल्याने महानगरपालिकेच्या दायित्वात नाहक वाढ झाली असून, उपरोक्त कलमान्वये अनुदानाचे 50 टक्के इतके दायित्व हे अटळ दायित्व आहे.

DRAFT

सदर बाब पाहाता महानगरपालिकेने आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन आजपावेतो एकूण रक्कम रुपये- 49353415/- चे अनुदानापासून शिक्षण मंडळास वंचित ठेवण्याची अनियमितता केली आहे. याबाबत यापुर्वी लेखा परीक्षण अहवालात आक्षेप नोंदवूनही ( सन 2011-12 परिच्छेद क्र.22) नियमोचित कार्यवाही झाल्याचे आढळ होत नाही.

तरी माहे- मार्च 2013 अखेर थकीत असलेली 50 टक्के हिस्सा अनुदानाची रक्कम रुपये- 49353415/- शिक्षण मंडळास सत्वर अदा होणे आवश्यक असून, अनुदान रकमां विहीत कालावधीत अदा होऊन थकीत राहणार नाहीत याबाबतची दक्षता घेणेत यावी.

DATDAWM6901 (Ref No : 105)

### *125 बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना अदा मानधन खर्चाबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 03**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3000000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3000000.00/-

***शासन निर्देशा नुसार महानगरपालिका चालवित असलेल्या बालवाडया हया खाजगी संस्थांना चालविण्यास दयावयाच्या असून, त्यांच्या मानधनाचा खर्च हा संबंधित खाजगी संस्थांनी करावयाचा आहे. असे स्पष्ट असतांना देखील मनपा ने बालवाडया स्वतः चालविणे व मानधनाचा खर्च करणेची अनियमितता केलेली आहे.***

DRAFT

सन 2012-13 या आर्थिक वर्षात खालील तपशिलात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेने शिक्षण मंडळास बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना मानधनाची एकूण रक्कम रुपये- खर्च अदा करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | कालावधी | तपशिल | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | दि.1/04/2012 ते दि.31/03/2013 | एकूण 57 शिक्षिका व 55 मदतनीस यांचे मासिक मानधन रक्कम | 3000000 |
| | | एकूण- | 3000000 |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) तत्कालीन नगर परीषद धुळे यांचे कालावधी पासून बालवाडी मधील एकूण 57 शिक्षिका व 55 मदतनीस हया कार्यरत असून त्यांना अनुक्रमे रक्कम रुपये 4089/- मानधन व रुपये 10/- सादील खर्च असे एकूण रक्कम रुपये 4099/- व मदतनीस यांना रक्कम रुपये- 2000/- प्रति महिना या प्रमाणे रकमा प्रदान करण्यात येत आहेत. वास्तविकता, नगर परीषद प्रशासन संचालनालय यांचे परीपत्रक क्रमांक – नपप्रसं-2005/बालवाडया/प्र.क्र.34015 दिनांक. 24 मे 2005 मध्ये अ.क्र.11 मध्ये नमुद केल्याप्रमाणे नगर परीषदेने

स्वत:च्या बालवाडया देखील खाजगी संस्थेकडे चालविण्यासाठी सुपूर्त करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश असून, परीपत्रकासोबतचे परिशिष्ठ ( III) नुसार शिक्षिका व मदतनीस यांच्या मानधनावरील संपुर्ण खर्च संबंधित खाजगी संस्थांनी स्वत: करावा. व यासाठी कोणतेही अनुदान दिले जाणार नाही. इतक्या स्पष्ट सुचना असूनही महानगरपालिकेने आजपावेतो त्यानुसार उचित कार्यवाही केल्याचे आढळ होत नाही. म्हणून आजही शिक्षण मंडळाकडून नियमबाहयपणे बालवाडया चालविण्याची अनियमितता होत असून बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांच्या मानधनावरील खर्च नाहक महानगरपालिकेस सोसावा लागत आहे. सदर बाब पुर्णत: नियमबाहय असून महानगरपालिकेने सदर बाबीकडे लेखा परीक्षण अहवालात आक्षेप नोंदवूनही ( सन 2011-12 चे अहवालातील परीच्छेद क्रमांक.21) हेतूपुरस्कर कार्यवाही केली नसल्याचे लेखा परीक्षणाचे स्पष्ट मत आहे. यामुळे सन 2012-13 मधील मानधन खर्च रक्कम रुपये- 3000000/- लेखा परीक्षणात मान्य करता येत नाही.

2) सन 2012-13 या कालावधीत महानगरपालिकेच्या किती बालवाडया कोणकोणत्या प्रभागात सुरु होत्या त्यांची संख्या, बालवाडीतील प्रवेशित विदयार्थी संख्या, वयोगट, बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांचे नियुक्ती आदेश, मानधन रक्कम मंजुरी आदेश, ठराव क्रमांक, दिनांक इत्यादी सर्व अभिलेखे लेखा परीक्षणास सदरच्या अर्धसमास पत्र क्रमांक- 104 दिनांक- 16/12/2015 अन्वये मागणी करुनही पडताळणी कामी उपलब्ध झालेले नाहीत. यामुळे शिक्षण मंडळ यांचेकडून सदर कालावधीत सुरु असलेल्या बालवाडी संर्दभातील कोणतीही सत्यता पडताळता आलेली नाही. यामुळे महानगरपालिकेने कोणत्या निकषावर मानधनाच्या रकमा प्रदान केल्या याची खात्री होऊ शकलेली नाही.

3) मानधन रकमांचे देयक पारित करताना लेखा विभागाने महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे परिशिष्ठ एक सर्वसाधारण वित्तीय तत्वे या नमूद बाबी प्रमाणे उचित लेखा परीक्षा केल्याचे आढळ होत नाही. उदा.मंजुरी आदेश नसणे, मंजुर कार्यालयीन टिपणी नसणे, शिक्षिका व मदतनीस यांचे कालावधी नुसार उपस्थिती पत्रक न जोडणे, सादील खर्चाचा तपशिल न देणे इत्यादी बाबतची लेखा परीक्षा न करता देयके पारित करण्याची अनियमितता केली आहे.

4) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 19 नुसार प्रदान रकमांच्या संबंधितांकडून पोहोच पावत्या प्राप्त करुन घेण्यात आलेल्या नाहीत.

सबब, उपरोक्त अनियमिततेमुळे मानधनावरील एकूण खर्च रक्कम रुपये- 3000000/- लेखा परीक्षणात मान्य करता येत नाही.

महानगरपालिका निधी

आक्षेपाधीन रक्कम रुपये- 3000000/-

DATDAWM6901 (Ref No : 104)

## *126 अभिन्यासास तात्पुरती मंजुरी नंतर अंतिम मंजुरी प्राप्त न करणेची अनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 05**



DRAFT

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***विभागाने तात्पुरती मंजुरी प्रदान केलेल्या अभिन्यासाचे विकसक यांनी नियमानुसार 1 वर्षाचे आत सदरच्या अभिन्यासास महानगरपालिकेची अंतिम मंजुरी घेतल्याचे आढळून आलेली नाही. तथापी मनपाने नियमानुसार संबंधितांवर शास्तीची कार्यवाही न करण्याची अनियमितता झालेली आहे.***

सन 2012-13 या आर्थिक वर्षात नगर रचना विभागाने पुरविलेल्या अभिलेख्यानुसार तसेच माहिती पाहाता, एकूण- 17 अभिन्यासांना (LAYOUT) रहिवास प्रयोजनार्थ विभागाने तात्पुरती मान्यता प्रदान केली आहे. (TENTATIVE PERMISSION) या सर्व विकसकांनी मा.जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून जमीन महसुल कलम 44 नुसार सदर जमीनी अकृषक म्हणून परवानगी घेऊन, अशा मंजूर प्रस्तावांना जिल्हा भूमी निरीक्षक भूमी अभिलेखे या नगर भूमापन अधिकारी यांचे कडून अभिन्यासातील भूखंड, रस्ता व खुली जागा इत्यादींना सिमांकन प्राप्त करुन तात्पुरती मान्यता प्राप्त दिनांकापासून एक वर्षाचे आत सदरच्या अभिन्यासास अंतिम मंजुरी ही महानगरपालिकेकडून प्राप्त करावयाची आहे. तथापी सदर कालावधीत तात्पुरती मंजुरी घेतलेल्या अभिन्यासास संबंधित विकसकाने अंतिम मंजुरी करीता प्रस्ताव सादर केलेले नाहीत.

याबाबत अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) नियमानुसार एक वर्षाचे आत विकसकांनी अभिन्यास अंतिम मंजुरीसाठी सादर केलेले नाहीत. यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 52 नुसार सदरची एकूण प्रकरणे शास्तीच्या कार्यवाहीस पात्र असताना, नगर रचना विभागाने अद्यापपावेतो नियमोचित कार्यवाही केलेली नाही. याउलट अशा अभिन्यासातील भूखंडावर होणाऱ्या रहीवास प्रयोजनाच्या बांधकामांना बांधकाम परवानगी देण्याची अनियमितता केली आहे.

2) तात्पुरती अभिन्यासास मंजुरी देताना विभागाने अभिन्यासातील अनुज्ञेय खुली जागा व रस्ता जागा हया संबंधितांकडून महानगरपालिकेच्या नावे करुन घेऊन ताब्यात घेतलेल्या नाहीत यामुळे संबंधित विकसकाकडून मंजूर अभिन्यासातील जागा यात फेरफार, कमी-जास्त क्षेत्रफळ करणे इत्यादी अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) नियमानुसार विकसकाने प्रस्तावित अभिन्यासातील खुली जागा, रस्ता जागा हयांचा विकास (रस्ता तयार करणे, गटारी बांधणे, दिवाबत्ती सुविधा उपलब्ध करणे, खुली जागेस कंम्पौंड बांधणे इत्यादी) करुन दिले नसल्याने किंवा त्या त्या कामांचे अंदाजित रक्कमेइतकी रक्कम वसुल अथवा बँक गॅरेंटी विभागाने वेळीच संबंधितांकडून प्राप्त करुन घेतली नसल्याने अनुज्ञेय कालावधी समाप्ती नंतरही विकसकाने सदरचे अभिन्यासास अंतिम मंजूरी प्राप्त करुन घेण्यात हेतुपुरस्कर टाळाटाळ, विलंब केल्याचे लेखा परीक्षणाचे स्पष्ट

DRAFT

मत आहे.

4) अभिन्यासास अंतिम मंजुरी प्राप्त झाली नसल्याने संबंधित विकसकाने नियमानुसार सदरची जमीन मा.जिल्हाधिकारी यांचेकडून अकृषक करुन घेऊन संबंधित विभागाकडून जमीन क्षेत्रास सिमांकन प्राप्त केले किंवा कसे याबाबतची कोणतीही अचुकता लेखा परीक्षणात पडताळता आलेली नाही.

5) सन 2012-13 अखेरपर्यंत अभिन्यासास विकसकाने अंतिम मंजुरी प्राप्त करुन घेतलेली नसल्याने, तसेच सदरच्या भूखंडात उपलब्ध करुन दयावयाच्या सेवा सुविधाबाबत कोणतीही अंदाजित रक्कम, बँक गॅरेंटी इत्यादी महानगरपालिकेने विकसकाकडून प्राप्त केले नसल्याने खालील नमूद बाबींवरील खर्चाचा बोजा महानगरपालिकेवर पडत असून पर्यायाने त्याचा नाहक आर्थिक भुर्दंड कर रुपाने सर्व सामान्य जनतेस व अनुदान स्वरुपात शासनास सोसावा लागत असल्याचे स्पष्ट होते.

अ) अंतर्गत रस्ते, गटार, पथदिवे इत्यादी मुलभूत सुविधा महानगरपालिका निधीतून अथवा शासकीय अनुदानातून देणे.

ब) खुली जागा विकसित करणेकामी करावी लागणारी सर्व प्रकारची बांधकामे, साहित्य इत्यादी वरील खर्चाचे करावे लागणारे अतिरिक्त चे नियोजन.

क) अभिन्यासातील खुली जागा, रस्ते जागा इत्यादी वेळीच महानगरपालिकेच्या ताब्यात न मिळणे व विकसित न झाल्याने त्यावर होणारे अतिक्रमण अथवा विकसकाकडून होणारा गैरवापर यामुळे निर्माण होणारी न्यायिक बाब व त्यावरील खर्चाचे नियोजन इत्यादी.

तरी उपरोक्त नमुद अनियमिततेबाबत नियमोचित कार्यवाही प्रस्तावित होऊन अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

DATDAWM6901 (Ref No : 103)

## *133 पदाधिका-यांना वाहन भाडे भत्ता अनुज्ञेय नसतांना प्रदान केल्याची अनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 77375.00/-

***महानगरपालिकेने दिनांक 25 मे 2005 चा शासन निर्णय लागू नसतांनासुध्दा सदरच्या शासन निर्णयास अनूसरुन पदाधिका-यांना त्यांचे खाजगी वाहन शासकीय कामकाजास्तव वापरल्याकामी खाजगी वाहन प्रतिपूर्ती भत्ता अदा केलेने झालेली अनियमितता.***

सन 2012-13 मध्ये धुळे महानगरपालिकेमधील महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, विरोधी पक्ष नेता



DRAFT

यांना शासन निर्णय दिनांक 25/5/2005 अन्वये शासकीय अधिका-यांना देण्यात येणा-या खाजगी वाहन भाडे प्रतिपूर्ती योजनेचा लाभ देण्यात आले असल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले. सदर प्रकरणी खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे. -

1) निवडक महिन्यामध्ये खालीलप्रमाणे पदाधिका-यांना त्यांचे खाजगी वाहन शासकीयकामकाजास्तव वापरल्याकामी खाजगी वाहन प्रतिपूर्ती भत्ता खालीलप्रमाणे अदा केला आहे. :-

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| 4298 | 11/03/2013 | 13875.00 | श्री भगवान गवळी, विरोधी पक्षनेता यांचे खाजगी वाहन प्रतिपूर्ती भत्ता. |
| 4299 | 11/03/2013 | 20500.00 | सौ. मंजूळा गावित महापौर यांचे खाजगी वाहन प्रतिपूर्ती भत्ता माहे. डिसेंबर 12 |
| 4300 | 11/03/2013 | 43000.00 | सौ. मंजूळा गावित महापौर यांचे खाजगी वाहन प्रतिपूर्ती भत्ता माहे. जाने व फेब्रू 13 |
| | एकुण | 77375.00 | |

2) शासन निर्णय क्रमांक वाहन 1000/प्रक्र.65/विनिमय, दिनांक 10/09/2001 अन्वये वाहन वापरासंबंधीचे धोरण ठरविण्यात आलेले होते. सदर शासन निर्णयामधील परिच्छेद क्रमांक 5 नूसार जे शासकीय अधिकारी शासन वाहन वापरणेसे पात्र आहेत व ज्यांना वाहन अनुज्ञेय आहेत परंतू कार्यालयाकडे त्यांचकरीता शासकीय वाहन उपलब्ध नसेल, तर त्याऐवजी शासकीय अधिका-याने स्वत:चे खाजगी वाहन शासकीय कामकाजास्तव वापरले असता, त्याबदल्यात त्यांना प्रतिपूर्ती भत्ता देणेत यावा असे निर्देश आहेत. तथापि, शासन निर्णय क्रमांक वाहन 10.05/प्र.क्र.13/ 2005/विनिमय दिनांक 25/5/2005 अन्वये दिनांक 10/9/2001 च्या अनुषंगाने सदर खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत एक रक्कम निश्चित करणेत आली. त्याअनुषंगाने महानगरपालिकेने स्थायी समितीने सन 2006 मध्ये ठराव करून पालिकेमधील पदाधिकारी यांना सदर योजना लागू केली.

3) सदरची योजना ही फक्त शासकीय अधिका-यांनाच लागू करणेत आलेली होती, परंतू महानगरपालिकेने सदर योजना घेतला आहे. तसेच दिनांक 25/5/2005 आणि दिनांक 10/9/2001 मधील शासन निर्णयामध्ये सदरची योजना स्थानिक स्वराज्य संस्था यांना लागू आहे याबाबत उल्लेख करणेत आलेला नाही. तसेच मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील नियम क्रमांक 19-अ नूसार (मानधन,फी किंवा भत्ते) राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने महानगरपालिकेस पदाधिका-यांना मानधन, भत्ते किंवा इतर सुविदा देण्यात येतील, असे नमुद आहे. त्याअनुषंगाने धुळे महानगरपालिकेने सदर ठरावास राज्य शासनाची मंजूरी घेतल्याचे नस्तीमध्ये आढळून येत नाही.

4) सदरची योजना ही शासन निर्णय दिनांक 31 डिसेंबर 2007 च्या अन्वये एप्रिल 2012 पासून

DRAFT

पुर्णपणे बंद करणेत आलेली आहे. तरीही धुळे महानगरपालिकेने सन 2012-13 मध्येही सदर योजना सुरू ठेवून सन 2015-16 मध्ये सदर योजना सूरू असल्याचे दिसून येते.

5) सदरची अनियमितता ही तत्कालीन अधिका-यांनी शासन निर्णयाचे समग्र अवलोकन न करता, नियमबाहयपणे महानगरपालिकेस लागू करून घेतली आहे. तरी सन 2006 ते 2015 या कालावधीत पदाधिका-यांना सदर योजनेचा लाभ घेतला असल्याचे दिसून येत असून प्रदान केलेल्या रकमेची परीगणना करून घेवून वसूलीची कार्यवाही करणेत यावी.

पदाधिका-यांना प्रदान केलेल्या वाहन भत्त्याची नोंदवही न ठेवल्याने एकुण किती रक्कम पदाधिका-यांना अतिप्रदान केलेली आहे याची परीगणना करणे शक्य झालेले नाही. तरी वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे रुपये 77375.00 रक्कमेची तत्काळ वसूली करून शासन खाती जमा करणेची कार्यवही करावी.

मनपा निधी

वसूलपात्र रक्कम रु.77375.00

CCFNKKM8401 (Ref No : 152)

### *137 कंत्राटी कामासाठी नियुक्त मक्तेदाराने शासकीय विमापत्र न घेता खाजगी विमा संस्थेकडून विमापत्र घेणेची अनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 922048.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 922048.00/-

***कंत्राटी पध्दतीने देण्यात आलेल्या बांधकामा बाबत संबंधित मक्तेदाराकडून बांधकामावरील कामगारांसाठी काढावयाचा विमा हा शासन निर्देशाप्रमाणे शासकीय विमा निधी संचालनालयाकडून न घेता तो नियमबाहयपणे खाजगी विमा कंपनींकडून घेण्यात आल्याने झालेल्या नुकसानीची अनियमितता बाबत.***

सन 2012-13 या आर्थिक वर्षात बांधकाम विभाग कडून विविध योजनेअंतर्गत विकास कामे (बांधकामे) कंत्राटी पध्दतीने करण्यात आलेली असून, त्यासाठी मक्तेदार नियुक्त करण्यात आले होते. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक - विकास 1098/प्र.क्र.28/98/शासन हमी दिनांक. 19/08/1998 अन्वये कंत्राटी पध्दतीने देण्यात येणाऱ्या कामांच्या बाबतीत कामगारांचे विमापत्र हे संबंधित मक्तेदाराने फक्त शासकीय विमा निधी संचालनालयाकडून घेण्याचे स्पष्ट निर्देश असून त्या अनुषंगाने मा.उपसचिव, नगर विकास यांचे पत्र क्रमांक -जीईएन 1098/1357 /प्र.क्र.166/98/नवि-



DRAFT

24 दिनांक. 03 नोव्हेंबर 2003 अन्वये आयुक्त, सर्व महानगरपालिका, यांना कार्यवाही करण्याचे व विमा संचालनालय यांचे व्यतिरिक्त अन्य विमा कंपनी कडून घेतलेली विमापत्रे स्वीकारण्यात येऊ नयेत व तशी विमापत्रे घेण्यात आली असल्यास विमासंचालनालयाने कळविलेली विमापत्र रक्कम संबंधित कंत्राटदाराच्या देय होणाऱ्या रकमेतून वसुल करुन शासन सदरी भरणा करणेबाबत स्पष्टपणे सुचित करण्यात आले आहे.

तथापि महानगरपालिकेने सदर कालावधीत कंत्राटी पध्दतीने दिलेल्या कामाकरीता नियमबाहयपणे संबंधित मक्तेदाराकडून सादर करण्यात आलेला खाजगी संस्थेचे विमापत्र स्वीकृत करण्यात आले आहे. सदर बाब शासन निर्देशाविरुध्द झाली आहे. यामुळे शासन निर्णयाचा मुळ उद्देश साध्य होऊ शकलेला नाही. तसेच संबंधितांच्या अनुज्ञेय असलेल्या रकमेतून विमापत्र रक्कम वसुली न झाल्याने शासकीय वसुलीचे आर्थिक नुकसान झाले आहे.

तरी अहवालासोबतचे परिशिष्ठ क्रमांक 1 मध्ये उदाहरणादाखल नमुद कामांबाबत उपरोक्त शासन निर्णयानुसार किमान 1% या दराने कामगार विमा रक्कम रुपये- 922048/- संबंधितांकडून वसुल होणे आवश्यक असून, सन 2012-13 या कालावधीत महानगरपालिकेने पुर्ण केलेली तसेच अपूर्ण राहीलेली बांधकामे यांची सविस्तर माहिती विमा निधी संचालनालयाकडे सादर करुन त्यांनी निर्धारित केलेली विमा रक्कम संबंधित कामाचे मक्तेदाराकडून वसुल करुन शासन सदरी रकमा जमा करणेची कार्यवाही केल्याचे अनुपालन सादर होणे आवश्यक आहे तसेच यापुढे कंत्राट पध्दतीने करण्यात येणाऱ्या बांधकामांबाबत कामगार विमापत्र हे शासकीय विमा निधी संचालनालय यांचेकडून घेणेचे नियमोचित कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी.

मनपा निधी

वसुलपात्र रक्कम रुपये- 922048/-

DATDAWM6901 (Ref No : 160)

### *144 वार्ड क्रमांक 15 मधील नकाणे रोड ते वाडीभोकर रोड पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 13**

*शासकीय निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 5067512.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 243323.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 4824189.00/-

***शासन निर्देशाप्रमाणे निविदा प्रसिध्दी शासनाच्या संकेतस्थळावर न करणे, कमी दराची निविदाकारास वाटाघाटीस न बोलविता नियमबाहयपणे क्रमांक- 3 वरील निविदाकारास कामाचे आदेश देणे, निविदाधारकाच्या प्रमाणपत्रावरील स्वाक्षरी व निविदेवरील स्वाक्षरी यात तफावत असणे, कामाचा कालावधी***



DRAFT

***संपूनही काम अपूर्ण राहाणे, शासकीय अनुज्ञेय रकमांच्या कपाती न करता देयके पारित करणे इ. प्रकारच्या अनियमितते बाबत***

DRAFT

<table>
<tr><td>1</td><td>लेखाशिर्ष</td><td colspan="4">नगरोत्थान योजना</td></tr>
<tr><td>2</td><td>प्रशासकीय मान्यता</td><td colspan="4">मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे पत्र क्र.928 दिनाक. 16/11/2011<br>रक्कम रुपये 5165626/-</td></tr>
<tr><td>3</td><td>तांत्रिक मंजुरी</td><td colspan="4">कार्यकारी अभियंता, महानगरपालिका धुळे<br>पत्र क्रमांक 323 दिनांक. 13/10/2011<br>रक्कम रुपये 5165626/-</td></tr>
<tr><td>4</td><td>निविदा प्रकीया</td><td colspan="4">जाहीर निविदा - वृत्तपत्रात प्रसिध्दी<br>दैनिक गावकरी दिनांक 27/01/2012</td></tr>
<tr><td>5</td><td>प्राप्त निविदा संख्या</td><td colspan="4">चार</td></tr>
<tr><td>6</td><td>मंजुर निविदा</td><td colspan="4">मे.सुंदर माधव कन्स्ट्रक्शन, धुळे<br>वाटाघाटीने अंदाजपत्रकीय दराने</td></tr>
<tr><td>7</td><td>मंजूर दरास मान्यता</td><td colspan="4">मा.स्थायी समिती<br>ठराव क्रमांक 52 दिनांक 09/05/2012</td></tr>
<tr><td>8</td><td>कामाचे आदेश</td><td colspan="4">मा.आयुक्त, महानगरपालिका धुळे<br>पत्र क्रमांक. निरंक दिनांक. निरंक</td></tr>
<tr><td>9</td><td>कामाची मुदत</td><td colspan="4">2 महिने</td></tr>
<tr><td>10</td><td>काम पुर्ण दिनांक</td><td colspan="4">देयकासोबत जोडलेले नाही</td></tr>
<tr><td>11</td><td>मोजमाप पुस्तक क्रमांक</td><td colspan="4">16</td></tr>
<tr><td>12</td><td>जिल्हा दरसुची वर्ष</td><td colspan="4">नमुद नाही</td></tr>
<tr><td rowspan="2">13</td><td rowspan="2">कामावरील खर्च तपशिल</td><td>प्र.क्र.</td><td>दिनांक</td><td>रक्कम रु.</td><td>तपशिल</td></tr>
<tr><td>4</td><td>31/05/2012</td><td>4824189</td><td>प्रथम व अंतिम.</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td></td><td></td><td>4824189</td><td></td></tr>
</table>

याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) सदर कामाची जाहीर निविदा वृत्तपत्रातून प्रसिध्दीस देण्यात आली आहे. तथापि, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रंमाक- सीएटी-01/05/प्र.क्र.26/इमारती- 2 दिनांक- 31 मार्च, 2005 तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 202 नुसार रक्कम रुपये- 50.00 लक्ष पेक्षा जादा अंदाजपत्रकीय रक्कम असलेल्या कामांची निविदा सुचना वृत्तपत्रात प्रसिध्दीस

देण्यापुर्वी महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी शासनाकडे सादर करण्याचे व अशी कार्यवाही केली नसल्यास त्या कामाच्या निविदा सक्षम प्राधिकाऱ्याने कोणत्याही परिस्थितीत उघडू नयेत तसेच जर अशा निविदा स्वीकृत होऊन कामे हाती घेतली असतील तर त्याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित अधिकारी यांची असेल असे स्पष्ट करण्यात आले आहे. असे असतानाही महानगरपालिकेने शासन निर्देशाप्रमाणे या कामाची निविदा प्रसिध्दी वृत्तपत्रात करण्यापुर्वी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी न करण्याची अनियमितता केलेली आहे.

2) सदरचे कामासाठी एकूण चार निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदांचे निविदा दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | मेसर्स समीर इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10 टक्के जादा |
| 2 | सुंदर माधव कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20 टक्के जादा |
| 3 | राजनंदनी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3 टक्के जादा |
| 4 | राधेय कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 25 टक्के जादा |

उपरोक्त प्राप्त निविदा दर पाहाता अ.क्र.3 वरील राजनंदनी कन्स्ट्रक्शन या निविदाधारकाचे दर तुलनेने कमी असल्याने त्यांना कामाचे आदेश अधिकृतपणे अनुज्ञेय ठरत असताना थेट मे.सुंदर माधव कन्स्ट्रक्शन या निविदाकारास वाटाघाटीस बोलावणे नियमबाहय ठरते. (कारण सदरचा निविदाकार क्रमांक 2 चे कमी दर असलेले निविदाकार नाहीत किंवा प्रथम व व्दितीय कमी दर असलेल्या निविदाकाराने कामास नकार दिलेला नाही.) यामुळे महानगरपालिकेने हेतु पुरस्कर/ जाणीवपुर्वक निविदाकारास सदरच्या कामासाठी निश्चित केला या म्हणण्यास लेखा परीक्षणात वाव निर्माण झाला आहे. (अशा परिस्थितीत फेरनिविदा काढणे उचित ठरले असते) तरी मे.सुदर माधव कन्स्ट्रक्शन यांना कोणत्या निकषावर/नियमान्वये वाटाघाटीस बोलावून मक्तेदार म्हणून कामाचे आदेश देण्यात आले याबाबत अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

3) मे.सुंदर माधव कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करण्याचे कोणत्या तांत्रिक निकषावर तयारी दर्शविली याबाबतचा सक्षम तांत्रिक अधिकारी यांनी स्पष्ट अहवाल नोंदविलेला नाही. यामुळे अंदाजपत्रकात नमुद मापदंडा प्रमाणेच व कामाची गुणवत्ता व दर्जा यावर विपरीत परीणाम होणार नाही या अनुषंगानेच मक्तेदार कामास तयार होते किंवा कसे याबाबतची सत्यता पडताळता आलेली नाही. याच अनुषंगाने सदरचे कामाची गुणवत्ता व दर्जा याबाबत मा.आमदार, धुळे यांचे पत्र क्र.धुशाविस/ स्विस/1788/12 दिनांक.21/06/2012 अन्वये महानगरपालिकेस नागरीकांच्या तक्रारी अर्जाच्या संदर्भासह विचारणा केल्याचे नस्तीवरुन आढळून आल्याने साशंकतेस वाव निर्माण झाला आहे.

4) प्राप्त निविदांची पडताळणी केली असता मंजूर निविदेतील मक्तेदाराचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत मक्तेदार प्रमाणपत्रावरील स्वाक्षरी निविदा पुस्तकातील निविदाधारक व भरलेले दर येथील (पान क्रमांक 29) स्वाक्षरीत तफावत असल्याचे दिसून आलेले आहे. यावरुन सदर

DRAFT

कामाची निविदा प्रक्रीया, मक्तेदार निश्चिती महानगरपालिकेकडून ठरवून व केवळ ठरवून दिलेल्या नियमान्वये मक्तेदार निश्चित केल्याचे दर्शविण्याचा जाणीवपुर्वक प्रयत्न केला असल्याचे लेखा परीक्षणाचे स्पष्ट मत आहे. सदरची अनियमितता पाहाता कामाची निविदा प्रक्रीया पुर्णत: नियमबाहय ठरते.

5) कामाच्या प्रशासकीय मान्यतेतील अट क्रमांक 2 नुसार या योजनेतील मंजूर कामे दोन वर्षाच्या आत पुर्ण करावयाची होती तथापि मार्च- 2013 अखेरपर्यंत (जवळजवळ तीन वर्ष) सदरचे काम अपुर्ण राहीले असून यामुळे योजनेचा मुळ उद्देश साध्य होऊ शकलेला नाही.

6) सदरचे काम मक्तेदाराने विहीत मुदतीत पुर्ण केलेले नाही किंवा मुदत वाढीसाठी अर्जही सादर केलेले नाहीत अशा परिस्थितीत विभागाने मक्तेदारावर निविदा अटी व शर्ती तसेच महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण -05/06//प्र.क.53/इमा-2 दिनांक.28/09/2006 नुसार दंडात्मक व इतर कोणतीही उचित कार्यवाही प्रस्तावित केलेली नाही. सदर अनियमिततेतून मक्तेदाराचे हीत जोपासले गेल्याचे दिसून आले आहे.

7) शासन निर्देशानुसार अंदाजपत्रकात रॉयल्टी या कामी रक्कम रुपये 140011/- इतकी तरतुद करण्यात आली होती. मात्र धावते देयक पडताळता संबंधित मक्तेदाराने कामावर वापरलेल्या गौण खनिजाचे रॉयल्टी रक्कम शासन सदरी भरणा केल्याचे कोणतेही दस्ताऐवज (चलन, पावती व परवाना इत्यादी) देयकासोबत आढळ होत नाहीत तसेच देयकातून रॉयल्टी रकमेची कपात करुन शासन सदरी भरणा झालेला नाही. यावरुन मक्तेदाराने कामावर अवैध गौण खनिज साहीत्य वापरुन रक्कम रुपये 140011/- इतक्या शासकीय महसुलाचे कायमस्वरुपी नुकसान झाले आहे. याबाबत संबंधितांकडून वसुलीची कार्यवाही होऊन रक्कम शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

8) या कामाचे मंजूर अंदाजपत्रक पाहाता खडी साहीत्य- 12 कि.मी. व मुरुम- 10 कि.मी. या अंतरावरील खदानीवरुन आणल्याचे दर्शविले आहे. मात्र सदरचे अंतर प्रमाणित करणारा क्वॉरी चार्ट जोडण्यात आलेला नाही तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता 1984 मधील परिच्छेद क्रमांक 142 प्रमाणे मंजूर अंदाजपत्रकासोबत साहीत्य वाहतूक अंतरासाठी सक्षम प्राधिकाराची पुर्व मान्यतेची प्रत तसेच खदान नकाशा व खदानीपासुन प्रत्यक्ष कामाचे स्थळ दर्शविणारा नकाशा प्रमाणपत्र इत्यादी पाहावयास मिळालेले नाही. यामुळे कामावर वापरलेल्या साहीत्याचे अंतर व त्या अनुषंगाने अदा झालेला लिड चार्ज योग्य असल्याची खात्री होणे आवश्यक आहे.

9) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विकास/1098/प्र.क्र.2889/शासन हमी दिनांक.19/08/1998 नुसार कंत्राटी कामाचा कामगार विमा कामाचे आदेशापुर्वी मक्तेदाराने काढलेला नाही. यामुळे किमान 1 टक्के या दराने रक्कम रुपये 51656/- संबंधितांकडून वसुल करुन शासकीय विमा निधी संचालनालय यांचेकडे भरणा होणे आवश्यक आहे.

10) मंजूर निविदा पाहाता मक्तेदाराने निविदेतील अनुसुची 3 व 4 निरंक तपशील आहे. यामुळे मक्तेदाराकडे उपलब्ध मशीनरी प्लांट तांत्रिक सक्षम कर्मचारी / मजूर, उपलब्ध साहीत्य व वाहन

DRAFT

तपशील इत्यादी महत्वपुर्ण बाबी बाबत सत्यता पडताळता आलेली नाही. सदरचे काम तांत्रिक व कुशल काम असल्याने मक्तेदाराकडे उपरोक्त बाबींची उपलब्धता कशी झाली किंवा कसे याबाबत विभागाने कोणतीही खातरजमा न करता मक्तेदार निश्चितीची कार्यवाही केली आहे.

11) सदर कामाच्या देयकातून महाराष्ट्र शासन, कामगार व ऊर्जा विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र.108/कामगार-7अ, दिनांक. 17 जुन 2010 अन्वये बांधकाम उपकर 1 टक्के या दराने वसुलात आणणे आवश्यक असताना देयकातून रक्कम रुपये 51656/- वसुल न केल्याने शासकीय महसुलाचे नुकसान झाले आहे. रक्कम वसुल होऊन शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहेत.

12) शासन निर्देशाप्रमाणे सदर कामाचे तांत्रिक लेखा परीक्षण महानगरपालिकेने करुन घेतल्याचे आढळ होत नाही. यामुळे सदर कामाचे जवळजवळ 95 टक्के इतके प्रदान होऊनही मक्तेदाराने अंतिम देयक सादर न करणे, विभागाने जाणीवपुर्वक लेखा परीक्षण न करणे, काम पुर्णत्वाचा दाखला न देणे इत्यादी बाबींतून काम अपुर्ण दर्शविण्याची अनियमितता केली आहे.

13) कामावर वापरलेले डांबर साहीत्याचे मुळ बीजके, गेटपास इत्यादी देयकासोबत सादर केलेले नसताना देयके प्रदान करण्याची अनियमितता झालेली आहे.

उपरोक्त अभिप्रायानुसार कामावरील खर्च खालील प्रमाणे अमान्य करण्यात येत आहे.

नगरोत्थान योजना

अंतिम अमान्य रक्कम रुपये- 4824189/-

वसुलपात्र रक्कम रुपये- 243323/-

गुंतलेली रक्कम रुपये- 5067512/-

DATDAWM6901 (Ref No : 167)

## ***146 सन-2008 ते 2015 या कालावधीतील आस्थापना विभागाकडील पदोन्नती, नियुक्ती इ. मध्ये झालेल्या अनियमितता बाबतची प्राप्त तक्रारी अर्जानुसार वस्तुनिष्ठ तपासणीवरील अभिप्रायाबाबत.***

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*मनपानिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***सन- 2008 ते 2015 या कालावधीत महानगरपालिकेने नियमबाहयपणे नियुक्त देणे, सामाजिक आरक्षण, सेवा जेष्ठता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता इ. महत्वपूर्ण बाबींकडे दुर्लक्ष करुन पदोन्नती देणे, सेवा प्रवेश नियमावली मंजुर नसणे, चौकशी अहवाल शासनास सादर न करणे इ. बाबतची अनियमितता.***

DRAFT

सन- 2012-2013 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करते वेळी मा. उपसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरिक्षा, उपविभाग-3, औरंगाबाद या कार्यालयास श्री. सुनंद श्रावण भामरे, वसुली निरिक्षक, धुळे महानगरपालिका, धुळे यांनी दिनांक- 17/12/2015 अन्वये महानगरपालिकेतील आस्थापना विभागाने नियुक्ती, पदोन्नती, सामाजिक आरक्षण इ. बाबत अनियमितता झाले असल्याची तक्रार अर्जाव्दारे केली आहे. त्या अनुषंगाने पडताळणी केली असता, खालील प्रमाणे तक्रारी मुदयातील तथ्ये नमुद करण्यात येत आहेत.

1) सन- 2003 पासून धुळे महानगरपालिका आस्तित्वात आलेली असून, आज पर्यंत महानगरपालिकेने आपली स्वत:ची सेवा प्रवेश नियमावली शासनाकडून मंजुर करुन घेतलेली नाही. यामुळे सदर कालावधीत झालेल्या सरळसेवा भरती, पदोन्नती प्रकरणे, इ. बाबतची कार्यवाही ही सेवा प्रवेश नियमावली शिवाय झाल्याचे स्पष्ट होते.

2) इकडील अर्धसमास प्रत्र क्रमांक- 165 दिनांक- 08/02/2016 अन्वये मागणी केल्या प्रमाणे विभागाने उपलब्ध केलेल्या माहीती, अभिलेखे, नस्ती इ. ची पडताळणी केली असता, सन- 2008 ते 2015 या कालावधीत महानगरपालिकेने उपायुक्त, सहायक आयुक्त, सहायक सार्वजनिक आरोग्यधिकारी, समाज विकास अधिकारी, लेखापाल/अधिक्षक, नगरसचिव, सॅनेटरी मुकादम, ओव्हरसियर, वरिष्ठ सहायक, लिपीक इ. पदावर कर्मचारी वर्ग-3 व वर्ग-4 मधील एकूण 18 कर्मचारी यांना पदोन्न्ती देण्यात आलेली आहे. सदरच्या पदोन्नतीत तक्रारी अर्जातील मुददा क्रमांक- 1 व 2 नुसार पुढील प्रमुख अनियमितता झाल्याचे स्पष्ट होते.

अ) वर्ग-2 संवर्गातील पदे अनुक्रमे उपायुक्त, सहायक आयुक्त, सहायक सार्वजनिक आरोग्यधिकारी, लेखापाल/अधिक्षक, समाज विकास अधिकारी इ. एकूण 5 पदासाठी कार्यरत कर्मचारी यांचे मधून पदोन्नती देतांना सक्षम प्राधिकाराने निर्देशित नियमानुसार सामाजिक आरक्षण शासनाकडून मंजुर करुन घेऊन तदनंतर आपल्या अधिकार कक्षेत येणा-या (असणा-या) पदांच्या संख्येवरच विहीत कार्यपध्दतीने जसे- सेवा जेष्ठता, आरक्षण प्रवर्ग, व इतर आवश्यक अर्हता इ. महत्वपूर्ण बाबी विचारात घेतलेल्या नाहीत. शासनाची कोणतीही मान्यता न घेता परस्पर पदोन्नती देण्याची अनियमितता झाल्याचे नमुद तक्रारी प्रमाणे यात तथ्य असल्याचे स्पष्ट होत आहे.

ब) उपरोक्त नमुद पदांवर संबंधित कर्मचारी यांना पदोन्नती देतांना आस्थापना विभागाने सामाजिक आरक्षण, पदोन्नतीचे प्रचलित नियम/आदेश/शासन निर्णय इ., मंजुर कर्मचारी आकृतीबंध मंजुर नसणे, कर्मचारी सेवाजेष्ठता यादी मंजुर नसणे/प्रमाणित नसणे, पदोन्नतीसाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता इ. महत्वपूर्ण वैधानिक तरतूदींकडे हेतूपुरस्कर दुर्लक्ष केल्याचे उपलब्ध अभिलेख्यांवरुन स्पष्ट झाले असून, तक्रारीमधील सामाजिक आरक्षण डावलणे या महत्वाच्या बाबीचा उददेश निष्फळ ठरल्याचे म्हणण्यात तथ्य असल्याचे स्पष्ट होत आहे.

3) सन- 2012 मध्ये महानगरपालिकेने एकूण 7 न्यायालयीन म्युनसिपल फंडातील कर्मचारी यांना रिक्त पदी समावून घेण्यात आले असून सदरचे समायोजन नियमबाहयपणे झाल्याचे तक्रारीतील मुददा क्रमांक- 3 मध्ये नमुद असून, त्या अनुषंगाने पडताळणी केली असता खालील प्रमाणे तथ्य आढळून आलेली आहेत.

अ) एकूण-7 कर्मचारी यांचे समायोजनास त्यांचे संवर्ग निहाय, सेवा जेष्ठते प्रमाणे, शैक्षणिक अर्हता इ. नुसार



DRAFT

पात्र असणा-या कर्मचारी यांना पुर्वलक्ष प्रभावाने सेवा धरणे इ. अटीसह महानगरपालिका ठराव क्रमांक- 212 दिनांक- 17/09/2010 अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

ब) म. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दिनांक- 3 मे, 2012 नुसार सदर एकूण 7 कर्मचारी यांचे रिक्त पदी समायोजन करावयाचे झाल्यास नगर विकास विभागाचे दिनांक- 16 नोव्हेंबर, 2006 चे शासन परिपत्रकात नमुद केलेल्या विहीत कार्यपध्दतीने कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तथापि, संबंधितांना रिक्त पदी समावून घेतांना विहीत कार्यपध्दती प्रमाणे कार्यवाही न करता संबंधित कर्मचा-यांचे समायोजन झाल्याचे दिसून येत आहे.

क) सदरच्या अनियमित समायोजनाचे आदेश मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 451 नुसार रदद करणे बाबत महानगरपालिकेने पत्र क्रमांक- धुमपा/आस्था/618 दिनांक- 12/09/2012 अन्वये प्रस्ताव सादर करण्यात येऊन शासनाने दिनांक- 23/04/2013 अन्वये महानगरपालिकेस आपले स्तरावर उचित कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित केले असतांनाही, आजतयागत विभागाने याबाबत कोणतीही कार्यवाही न करता संबंधितांचे हित जोपासल्याचे स्पष्ट झाले आहे.

ड) म. अवर सचिव, पत्र क्रमांक- धुमपा2013/प्रक्र190/नवि-25 दिनांक- 14/03/2014 अन्वये आस्थापना खर्च जास्त असल्याने म्युनसिपल फंड कर्मचारी यांचा पद मंजुरीचा प्रस्ताव स्पष्टपणे नाकारला असल्याने उपरोक्त नमुद एकूण 7 कर्मचारी यांच्या नियमबाहय समायोजनाचा आधार इतर उर्वारित कर्मचारी घेऊन न्यायिक बाब उपस्थित करुन महानगरपालिकेच्या अडचणीत वाढ करु शकतात ही बाब स्पष्ट होत आहे.

इ) संबंधित एकूण 7 कर्मचारी यांचे समायोजन करतांना विभागाने वैधानिक तरतूदी, सामाजिक आरक्षण, उपलब्ध पदे, त्यासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, सेवा जेष्ठता, वयोमर्यादा शिथिलता, इ. महत्वपूर्ण बाबींकडे हेतूपुरस्कर दुर्लक्ष करुन समायोजनाची नियमबाहय कार्यवाही केल्याचे उपलब्ध अभिलेख्यांवरुन स्पष्ट होत आहे.

4) कंत्राटी पध्दतीने स्टेनो पदावर नियुक्ती देऊन मानधन अदा करणे याबाबत सन- 2011-2012 चे लेखा परिक्षणात सविस्तर आक्षेप नोंदवून खर्च अमान्य करण्यात आलेला आहे.

5) श्री. राकेश नेरकर यांना पत्र क्रमांक- धुमपा/आस्था/149 दिनांक- 08/05/2012 अन्वये लिपीक या मंजुर पदावर सरळसेवा भरती न करता नियुक्ती देण्यात आलेली असून, सदरची कार्यवाही संपूर्ण पणे नियमबाहय असून, सक्षम प्राधिकाराने आपल्या अधिकारांचा गैरवापर केल्याचे स्पष्ट होत आहे. वेतन व भत्ते अदायगीची रक्कम परिगणित होऊन वसुली बाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

6) श्री. सुनंद श्रावण भामरे, यांनी शासनाकडे यासर्व बाबींबाबत दिनांक- 23/07/2014 अन्वये तक्रार केली असता, म. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, यांनी दिनांक- 19/09/2014 अन्वये सदर प्रकरणांची चौकशी करुन सविस्तर अहवाल आपल्या अभिप्रायासह शासनास सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले असून, त्या अनुषंगाने महानगरपालिकेचे सहायक आयुक्त (सा.प्र) यांनी दिनांक- 26/12/2014 अन्वये आपला सविस्तर चौकशी अहवाल तत्कालीन मा. आयुक्त यांचे कडे मंजुरीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर केला असता, मा. आयुक्त यांनी नवीन आयुक्त यांचे समोर अहवाल कार्यवाहीस्तव ठेवावा असा अभिप्राय नोंदवून अहवाल शासनास सादर

DRAFT

होणे आजतयागत प्रलंबित राहीले आहे. यामुळे अहवालात नमुद अभिप्राय पाहाता योग्य ती कार्यवाही होण्यास विलंब झाला असून, यास प्रशासनाने हेतूपुरस्कर विलंब केल्याचे म्हणण्यास वाव निर्माण झाला आहे.

उपरोक्त अनियमितता पाहाता, श्री. सुनंद भामरे यांनी उपस्थित केलेल्या सन- 2008 ते 2015 या कालावधीतील नियुक्ती, पदोन्नती, सामाजिक आरक्षण इ. बाबत नियमबाहय कार्यवाही झाल्याचे तक्रारी मुदयांच्या अनुषंगाने लेखा परिक्षणात दखल घेण्यात आली असून, त्यात प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे उपलब्ध अभिलेखे, तसेच सहायक आयुक्त (सा.प्र) यांच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दिसून आले असून याबाबत संबंधितांची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे तसेच सदरचा चौकशी अहवाल शासनाकडे सत्वर सादर करणेचे स्पष्ट मत लेखा परिक्षणात नोंदविण्यात येत असून, संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

DATPBKM6701 (Ref No : 169)

DRAFT

# कलम ९ ब खालील आक्षेप

DRAFT

## *10 मालमत्ता कर, थकीत रकमा मागणी नोंदवहीतून कमी करणे, कमी रकमेने नोंदविणे इत्यादी अनियमितताबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 8438.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 8438.00/-

***कर मागणीच्या रकमां पुढील वर्षाचे मागणी नोंदवहीत नोंदवितांना रकमां कमी रक्कमेने नोंदविणे, थकीत रक्कम न नोंदविणे, इ. प्रकारची अनियमितता करुन आर्थिक नुकसान केले बाबत.***

DRAFT

सन 2012-13 आर्थिक वर्षाकरीता कर संकलन विभागाकडील एकत्रित मालमत्ता कर पाणीपट्टी कर यांची मागणी नोंदवहयांची पडताळणी केली असता, खालील तपशिलात नमूद केलेल्या उदाहरणा दाखल मालमत्ता धारकांचा सन 2011-12 या वर्षाअखेरीस थकीत राहीलेल्या रकमा सन 2012-13 चे मागणी नोंदवही नोंदविताना संबंधितांनी कर मागणीच्या थकीत रकमा कमी रकमेने नोंदविणे, मागणी कमी करुन निरंक दर्शविणे इ.प्रकारच्या अनियमितता केलेले आहे. यामुळे थकीत रकमांची एकूण मागणी कमी होऊन महानगरपालिकेचे कायमस्वरुपी आर्थिक नुकसान झालेले आहे. नुकसानीची रक्कम रुपये- 8438/- व तपशिल हा अत्यंत प्रातिनिधीक असून, अनियमितता पाहाता विभागाकडील सर्व मागणी नोंदवहयाचे परिपूर्ण पडताळणी करुन मागणी नोंदवहीत थकीत रकमांची नोंद उचित झाली असल्याचे प्रमाणित होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहीता 1971 नियम क्रमांक 76 मधील तरतुदीप्रमाणे मागील वर्षाच्या कराच्या थकीत राहीलेल्या रकमा पुढील वर्षाच्या मागणी नोंदवहीत अचूकपणे घेतल्याबाबत सक्षम प्राधिकारी याने खात्री करुन तसे प्रमाणपत्र प्रत्येक मागणी नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे. तरी नुकसानीची रक्कम रुपये- 8438/- वसूलात आणून अनुपालन दर्शवावे.

| अ.क्र. | मालमत्ताधारक नांव | मालमत्ता तपशिल | कर प्रकार | सन 2011-12 प्रमाणे थकीत | सन 2012-13 प्रमाणे थकीत | तफावत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बिसमल फत्तुमल | कुमार नगर /A-2/10 | पाणीपट्टी कर | 200 | 0 | 200 |
| 2 | धरमदास जेसूमल | कुमार नगर | स्वच्छता कर | 143 | 0 | 143 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | /D-4/9 | | | | |
| 3 | साबुमल किशामल | कुमार नगर /F-5/3 | पाणीपट्टी कर | 1206 | 0 | 1206 |
| 4 | हिरालाल रघूनाथ रेलन | कुमार नगर /4-3/7 | पाणीपट्टी कर | 500 | 0 | 500 |
| 5 | अशोक भिवसन पाटील | पद्मनाभ नगर /20/1/257 | मालमत्ता कर | 10126 | 3931 | 6195 |
| 6 | पेखराज शिवनदास | कुमारनगर /R-7/1 | स्वच्छता कर | 50 | 0 | 50 |
| | | | शिक्षण कर | 03 | 0 | 03 |
| | | | वृक्ष कर | 11 | 0 | 11 |
| | | | अग्नीशमन | 11 | 0 | 11 |
| | | | जललाभ | 06 | 0 | 06 |
| | | | दिवाबत्ती | 06 | 0 | 06 |
| | | | मलनिसारण | 06 | 0 | 06 |
| | | | पथकर | 06 | 0 | 06 |
| | | | मलप्रवाह | 50 | 0 | 50 |
| | | | म. शि कर | 45 | 0 | 45 |
| | | | एकूण- | 12369 | 3931 | 8438 |

मनपा निधी

वसुलपात्र रक्कम रुपये- 8438/-

DATDAWM6901 (Ref No : 47)

DRAFT

### *13 दैनंदिन बाजार लिलाव थकीत रकमांबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 5413174.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 5413174.00/-

***दैनंदिन बाजार फी वसुलीचा मक्ता देण्यात आलेल्या मक्तेदारांकडून वेळोवेळी मक्ता रक्कम पूर्णपणे वसुल न करणे यामुळे मोठया प्रमाणावर रक्कम थकीत राहाण्याची अनियमितता झालेली असून, यामुळे आर्थिक नुकसान झाले आहे.***

मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम 1949 चे कलम 128 नुसार व लिलाव अटी व शर्ती नुसार संबंधितांकडून मागणी रकमांची वसुली करण्याची कार्यवाही त्या त्या आर्थिक वर्षात झाली असती तर सन 2012-13 अखेर खालील तपशिलात नमूद केलेली दैनंदिन बाजार वसुली मक्त्याची थकीत रक्कम रुपये- 5413174/- थकीत राहीली नसती पर्यायाने सदर अनियमिततेमुळे महानगर पालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.

तपशिलात नमूद थकीत रकमा हया तत्कालीन नगर परिषद कालावधीतील असून आजपावेतो संबंधितांवर निविदा अटी व शर्ती प्रमाणे महानगर पालिकेने कोणतीही कार्यवाही प्रस्तावित केल्याचे आढळ होत नाही. यामुळे रकमा थकीत राहील्या असून यास विभागाची वसुलीतील उदासिनता स्पष्ट दिसून आली आहे. पर्यायाने यामुळे महानगर पालिकेच्या उत्पन्नावर परिणाम झाला असून विकास कामे व आर्थिक स्थिती यावर विपरीत परिणाम होत आहे.

तरी संबंधितांकडून थकीत रक्कम रुपये- 5413174/- सत्वर वसूल होऊन अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | नाव | वर्ष | येणे बाकी रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | श्री. योगेंद्र सखाराम बुरकुळे | 1988-89 | 1000 |
| 2 | श्री. रविंद्र मुरलीधर कदम | 1992-93 | 53625 |
| 3 | सौ. लक्ष्मीबाई विठल क्षीरसागर | 1994-95 | 279131 |
| 4 | श्री.रविंद्र मुरलीधर कदम | 1995-96 | 285342 |
| 5 | श्री. शरद पांडूरंग पाटील | 1996-97 | 391050 |
| 6 | श्री. रावण तुळशीराम नवले | 1997-98 | 10000 |
| 7 | श्री. रविंद्र मुरलीधर कदम | 1998-99 | 1193192 |
| 8 | | 1999-00 | 1235234 |
| 9 | श्री.किशोर विठल पाटोळे | 1999-00 | 10000 |
| 10 | श्री. सुभाष विठल पाटोळे | 2000-01 | 1954600 |
| | एकूण | | 5413174 |

म.न.पा. निधी

वसुलपात्र रक्कम रुपये– 5413174/-

DATDAWM6901 (Ref No : 50)

## *16 कॅबीन जागा भाडे नोंदवही व थकबाकी बाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 03**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1027499.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1027499.00/-

***कॅबिन भाडे नोंदवही नुसार मोठया प्रमाणावर भाडे थकीत असून, मागणी नोंदवहीत कर मागणी न करणे, रकमां सक्षम प्राधिकाराकडून प्रमाणित न करणे इ. अनियमितता बाबत.***

सन 2012-13 या आर्थिक वर्षाची कर संकलन विभागाकडील कॅबीन जागा भाडे मागणी नोंदवहीची पडताळणी केली असता, माहे मार्च 2013 अखेर एकूण रक्कम रुपये- 1027499 /- इतकी थकीत राहीली आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) विभागाने मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम 1949 चे कलम 128 मधील तरतुदीप्रमाणे थकीत रकमा वसुल करणेबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले आहे. यामुळे थकबाकीच्या रकमेत वाढ झालेली आहे. नियमोचित कार्यवाही होत नसल्याने महानगर पालिकेस उत्पन्नापासून वंचित राहावे लागले आहे. थकीत रकमा वसुल होणेबाबत कार्यवाही होऊन रकमा थकीत राहणार नाहीत याबाबत संबंधितांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

2) नोंदवहीत खालील तपशिलात नमुद केलेल्या भागात केवळ थकीत रकमा नोंदविण्यात आलेल्या असून सन 2012-13 ची चालू मागणी करण्यात आलेली नाही. वास्तविकता महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 75 व 76 नुसार प्रत्येक वर्षाकरीता आकारणी करुन संबंधितांच्या नावे मागणी नोंदवहीत नोद घेणे आवश्यक आहे. मात्र नमुद तपशिलातील भागात चालू मागणी रक्कम नोंदविण्यात आलेली नाही तसेच वसुली झालेली नाही. सदर बाब नियमबाहय असून यामुळे महानगर पालिकेस आर्थिक नुकसान सोसावे लागले आहे. कोणत्या आदेशान्वये, नियमान्वये चालु मागणी करण्यात आली नाही किंवा कसे याबाबत अनुपालन आवश्यक असून, चालू मागणी नोंदवून वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | भागाचे नाव | संख्या | चालू मागणी |
|---|---|---|---|
| 1 | पेठ नं. 1 ते 13 | 189 | निरंक |
| 2 | देवपुर | 33 | निरंक |
| 3 | सुभाष नगर | 27 | निरंक |
| 4 | एस.टी.स्टँड | 03 | निरंक |
| 5 | दादा सरदार नगर, अतिक्रमण | 39 | निरंक |
| | एकूण | 291 | निरंक |

3) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 75 व 76 नुसार मागणी नोंदवहीत नमुद नोंदी सक्षम प्राधिकाराने वेळोवेळी तपासणी करुन नोंदी साक्षांकीत केलेल्या नाहीत तसेच वर्षा अखेरीस मागणी, वसुल व थकबाकी रकमा यांचा वार्षिक गोषवारा अचूक नोंदवून साक्षांकीत करण्यात आलेला नाही. सबब, उपरोक्त



DRAFT

अनियमिततेमुळे सन- 2012 -13 मधील एकूण मागणी, वसुल व थकबाकी रकमा यांची अचूकता प्रमाणित करता येत नाही. तरी नोंदी अद्यावत करुन सक्षम प्राधिकाराकडून प्रमाणित होणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त अनियमिततेबाबत सत्वर कार्यवाही करुन कर मागणी नोंदवून थकीत रक्कम रुपये- 1027499/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

म.न.पा निधी

वसुलपात्र रक्कम रुपये- 1027499/-

DATDAWM6901 (Ref No : 53)

## *21 महानगरलिका धुळे कर वसुली बाबतचे पावती पुस्तके, जमा रकमेच्या दैनिक भरणा नोंदवहया, ईत्यादी अभीलेखे तपासणी करताना आढळुन आलेल्या त्रुटी / उणीवा बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 10**

*लेखा शीर्ष : कर संकलन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1994.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1994.00/-

***महानगरलिका धुळे कर वसुली बाबतचे पावती पुस्तके, जमा रकमेच्या दैनिक भरणा नोंदवहया, ईत्यादी अभीलेखे तपासणी करताना आढळुन आलेल्या त्रुटी / उणीवा बाबत***

महानगरलिका धुळे कर वसुली बाबतचे पावती पुस्तके, जमा रकमेच्या दैनिक भरणा नोंदवहया, ईत्यादी अभीलेखे तपासणी करताना आढळुन आलेल्या त्रुटी / उणीवा बाबत खालील प्रमाणे अभीप्राय आहेत.

1. बुक क्रं. 262 पावती क्रं. 7437 दि. 16/3/13 रुपये 1994 रोखवहीत जमा नोंद नाही. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहीता 1971 मधील नियम 11 नुसार जमा करणे आवश्यक आहे, तसेच नियम 79 नुसार वसुली संबंधातील नोंदीची तपासणी करणे, व नियम 80 नुसार दैनिक वसुलीचा हिशोब ठेवणे आवश्यक आहे.

2. बुक क्रं. 278 पावती क्रं. 9033 दि. 21/3/13 वसुली रु. 2630 अक्षरी रक्कम नमुद केली असुन प्रत्यक्ष जमा रु. 2622 रुपये 8 कमी भरणा, बुक क्रं. 219 पावती क्रं. 3105 दि. 5/3/13 रुपये 1692 वसुली असुन जमा रुपये 1685 रुपये 7 कमी भरणा आहे. अशाप्रकारे इतर महीण्यातील पावत्यांची तपासणी करुन कमी भरणा केलेल्या रकमा मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहीता 1971 मधील नियम 79 नुसार वसुली संबंधातील नोंदीची तपासणी करणे आवश्यक आहे,

3. पावती बुक क्रं. 306 पावती क्रं. 11812 दि. 26/3/13 रुपये 6943 एका प्रतिवर रद्य लिहीले परंतु पावती रद्य केले बाबत सही केली नाही आणी पावतीची कार्बन प्रत रद्य केलेली नाही, पावती क्रं. 11871 व 11872 दि. 30/3/13 अनुक्रमे रुपये 1573 व 2573, एकाप्रतिवर रद्य लिहीले परंतु रद्य केले बाबत सही केली नाही व पावतीची कार्बन प्रत रद्य केलेली नाही. बुक क्रं. 247 पावती क्रं.5959 दि. 21/3/13 रुपये 4608, बुक क्रं. 213 पावती क्रं. 2502 दि. 4/3/13 रु. 3823 एकाप्रतिवर रद्य लिहीले परंतु रद्य केले बाबत सही केली नाही, बुक क्रं. 284 पावती क्रं. 9605 व 9606 दि. 22/3/13 ते 30/3/13 रुपये 4818 पावतीची एक प्रत लिहीली व एक प्रत कोरी आहे आणि लिहीलेली प्रत रद्य केलेली नाही, बुक क्रं. 284 पावती क्रं. 9644 दि. 25/3/13 रु. 1074, पावती क्रं. 9645 वर पावती क्रं. 9644 ची कार्बन प्रत आहे पावतीची एक प्रत कोरी व दुसरी प्रत कॅन्सल लिहीले परंतु सही केली नाही. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहीता 1971 मधील नियम 10 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4. बुक क्रं. 307 पावती क्रं. 11958 ते 12000, बुक क्रं. 336 पावती क्रं. 14842 ते 14900, बुक क्रं. 341 पावती क्रं. 15391 ते 15400, बुक कं. 184 पावती क्रं. 99678 ते 99700 बुक क्रं. 284 पावती क्रं. 9654 पावतीवर Cancelled शिक्का मारला परंतु पावत्या रद्य केलेबाबत सही केली नाही.

5. बुक क्रं. 263 पावती क्रं. 7562 खोडुन 7561 व 7574 खोडुन 7573 केले आहे परंतु पावती बुक प्रमाणीत करताना तशी नोंद घेतलेली नाही. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहीता 1971 मधील नियम 9 (7) नुसार अंशता वापरण्यात आलेली पावती पुस्तके नंतरच्या वर्षात वापरण्यात आली नसतील तर, त्यातील न वापरलेल्या पावत्या, वर्षाच्या अखेरीस रद्य करण्यात येतील व प्राधीकृत अधीका-याकडून त्याप्रमाणे पृष्ठांकीत करण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

6. बुक क्रं. 285 पावती क्रं. 9797 व 9800 रक्कdम अनुक्रमे रुपये 9462 व 5076 दि. 30/3/12 असे चुकीचे वर्ष नमुद केलेले आहे. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहीता 1971 मधील नियम 10 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

7. बुक क्रं. 231 पावती क्रं. 4309 दि. 7/3/13 रुपये 6295 खोडुन रुपये 4756 लिहीण्यात आली परंतु दुरुस्ती बाबत सही केली नाही. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहीता 1971 मधील नियम 10 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

8. पावती बुक क्रं. 1601 ते 1700 मध्ये पावती क्र. 1634 ते 1700, पावती क्रं. 401 ते 500 मध्ये पावती क्र. 478 ते 500, पावती क्रं. 1401 ते 1500 मध्ये पावती क्र. 1463 ते 1500, पावती क्रं. 301 ते 400 मध्ये पावती क्र. 374 ते 400, पावती क्रं. 1701 ते 1800 मध्ये पावती क्र. 1750 ते 1800, पावती क्रं. 2501 ते 2600 मध्ये पावती क्र. 2540 ते 2600, पावती क्रं. 2701 ते 2800 मध्ये पावती क्र. 2740 ते 2800, पावती क्रं. 2101 ते 2200 मध्ये पावती क्र. 2141 ते 2200, को-या पावत्या आहेत, सदर पावत्या रद्य केलेल्या नाहीत, पावती बुकास क्रमांक दिलेले नाहीत व पावती पुस्तकावर प्रमाणपत्र नोंदविण्यात आलेले नाही. को-या वापर न केलेल्या पावत्या बाबत महाराष्ट्र

DRAFT

नगरपालीका लेखा संहीता 1971 मधील नियम 9(2) नुसार पावती पुस्तके प्रमाणीत करुन त्यावर शीक्का वठविण्यात येईल तसेच 9(7) नुसार अंशता वापरण्यात आलेली पावती पुस्तके नंतरच्या वर्षात वापरण्यात आली नसतील तर, त्यातील न वापरलेल्या पावत्या, वर्षाच्या अखेरीस रद्य करण्यात येतील व प्राधीकृत अधीका-याकडून त्याप्रमाणे पृष्ठांकीत करण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

9. रोज भरणा किर्द दिनांक 19/3/13 रोजी पा.क्रं. 5976 ते 5979 रक्कम रुपये 55563 ची खतावणी दोन पानावर दोन वेळा घेण्यात आली आहे. सदरची एका पानावरील नोंद रद्य करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहीता 1971 मधील नियम 10 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

10. दैनिक वसुली नोंद भरणा किर्द पेजींग केलेल्या नाहीत, किर्दचे सुरवातीला 5 ते 6 कोरे पाने तसेच दैनंदिन नोंदी नंतर मध्ये मध्ये कोरी पाने व किर्द लिखान संपलेनंतरही कोरी पाने सोडण्यात आलेली आहेत. सदरची पाने रद्य केलेली नाहीत. महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहीता 1971 मधील नियम 8 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 40 दिनांक 03/11/2015 देवुन अभीप्राय मागविण्यात आले होते तथापी कोणतेही अभीप्राय प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतीम करण्यात आला.

REVSSSM5909 (Ref No : 40)

## *23 मंजूरीशिवाय देयक अदायगी करणेची अनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 773318.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 773318.00/-

अंतिम अमान्य रक्कम रु. 773318.00/-

***देयके पारित करतांना प्रमाणकाची लेखापरीक्षा व तपासणी न करता देयक पारित करणेत आलेली असल्याने झालेली अनियमितता.***

श्री.सचिन पी दिक्षित यांना रक्कम रुपये 948008 अदा करणेत आली आहे. याबाबतचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | प्रमाणक क्रमांक /दि. | देय रक्कम | अदा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वार्ड क्रमांक 22 मध्ये जूने धुळे, गुरूदत्त | 4279 08/3/2013 | 948008.00 | 379203 | 40 टक्के रक्कम अदा |



DRAFT

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | कॉलनी मध्ये गुरूदत्त मंदीरामागील रस्ता कॉँक्रीट करणे | 4384<br>15/3/2013 | | 394115 | |
| | | एकुण | 948008 | 773318 | |

याबाबतचे अभिप्राय खालिलप्रमाणे आहेत :-

1] महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 13 नुसार देयकास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेण्यात आलेली नाही.

2] देयकासोबत नियम 16 नुसार देयक प्रदानाचे सक्षम अधिकाऱ्याने मंजूरी आदेश जोडलेले नाही.

3] सदर देयक संबंधित विभागाकडुन कधी प्राप्त झाले तसेच संबंधित विभाप्रमुख अधिकाऱ्यानी देयक स्वाक्षरी करुन सादर केलेले नसतांना, लेखा विभागाने कोणत्या वित्तीय निकषावर देयकाची अदायगी केली, याबबतचे कोणतेही सत्यता प्रमाणित होत नसल्याने लेखा विभागाने लेखा संहीतेतील परिशिष्ठ 2 मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रमाणकाची लेखापरीक्षा न करता देयक पारित करणेची अनियमितता केल्याने दिसुन येते. सदर बाब वित्तिय औचित्त्यास अनुसरुन नाही.

तरी उपरोक्त अभिप्रायानुसार खर्च रक्कम रुपये 773318 लेखापरिक्षणात आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

मनपा निधी

आक्षेपाधीन रुपये 773318

CCFNKKM8401 (Ref No : 12)

## *25 सर्व्हे खोली व स्लम जागा भाडे कर रकमा थकीत राहणेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 312241.00 /-

***नियमित व वेळीच भाडे रकमा वसूल न केल्याने रकमा थकीत राहणे, भाडेपट्टे करारासंबंधीचे अभिलेखे उपलब्ध नसणे, सुधारीत दराने आकारणी न करणे, करारनामे करून न घेणे, इ. अनियमितते बाबत.***

सन 2012-13 ची सर्व्हे खोली व स्लम जागा भाडे मागणी नोंदवहीची पडताळणी केली असता खालील तपशिलात दर्शविलेल्या प्रमाणे दि.31/03/2013 अखेर एकूण रक्कम रु.312241/- इतकी भाडे / कर मागणी थकीत असल्याचे आढळून आले आहे.

अ)

| अ.क्र. | मागणी प्रकार | कर तपशिल | जागा संख्या | थकीत रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्व्हेखोलीभाडे | पेठ नं.5 खोली भाडे | 16 | 1209 |
| 2 | | पेठ नं.5 खोली भाडे | 53 | 6884 |
| 3 | | वडजाई नाका | 07 | 1050 |
| 4 | | मनपा स्कूल बोर्ड | 07 | 16637 |
| 5 | | वॉटर वर्क्स | 07 | 16368 |
| 6 | | जाहिरात बोर्ड | 12 | 6132 |
| | एकूण | | | 48280 |

ब)

| अ.क्र. | मागणी प्रकार | कर तपशिल | जागा संख्या | थकीत रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | स्लम खोली भाडे | खोलीभाडे | 0 | 36512 |
| 2 | | पाणीपट्टी | 0 | 205436 |
| 3 | | विशेष स्वच्छता कर | 0 | 22013 |
| | एकूण | | 0 | 263961 |
| एकूण एकंदर | | | | 312241 |

DRAFT

याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 128 नुसार विभागाने थकीत रकमा वसुलीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही. पर्यायाने रकमा थकीत राहून महानगरपालिकाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

2) तत्कालिन नगरपालिका, धुळे यांचे कालावधीत महानगरपालिकाच्या मालकीच्या खोली जागा या मालमत्ता भाडे तत्वावर देण्यात आलेल्या आहेत. मात्र संबंधितांना जागा भाडेपट्टयाने देताना कोणत्या नियमान्वये, किती कालावधीसाठी, कोणत्या अटी शर्तीवर देण्यात आल्या आहेत. याबाबत विभागाने अभिलेखे उपलब्ध केलेले नाहीत. यामुळे मालमत्ता हस्तांतरणाची अचूकता पडताळता आलेली नाही.

3) सदरच्या खोली जागा भाडे पट्टे तत्वावर देऊन मोठा कालावधी झालेला असून भाडे दर हे अतिशय नाममात्र असून ते कालबाहय झालेले आहेत. महानगरपालिकाचे आर्थिक उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सुधारीत दराने (नियमोचित) आकारणी होणे आवश्यक असून भाडे पट्टे प्रक्रीया पुर्न: स्थापित करुन महानगरपालिकाचे आर्थिक उत्पन्न वाढविणे आवश्यक असेल.

4) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे स्थायी निदेश क्र.39 तसेच परिपत्रक क्र.नपप्रस/ नपा. स्था. मा/अल्प मुदत हस्तां/प्र.क्र.735/06/41 दिनांक:10 ऑगस्ट 2006 नुसान महानगरपालिकाच्या मालकीच्या जागा भाडेपट्टे तत्वावर वापरावयास देताना महानगरपालिका व भाडेपट्टे धारक या दोघांमध्ये स्वयंस्पष्ट असलेल्या अटी व शर्तीचा लेखी स्वरुपात विहीत रकमेच्या मुद्रांकावर करारनामा अस्तित्वात

येणे आवश्यक असल्याचे स्पष्ट निर्देश असतानाही तत्कालीन नगरपालिका व तद्नंतर महानगरपालिका यांनी निर्देशानुसार संबंधित भाडेपट्टे धारक यांचे सोबत नियमोचित असे करारनामे करुन घेतलेले नाहीत. या अनियमिततेमुळे महानगरपालिकाच्या मालकी असलेल्या सदरच्या मालमत्ता बाबत भविष्यात न्यायीक बाब (मालकी हक्क, अतिक्रमण इत्यादी.) उपस्थित होऊन महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होण्याचा संभाव्य धोका नाकारता येत नाही. तरी उपरोक्त स्थीयी निदेश व परिपत्रकास अनुसरुन करारनामा करुन घेणेबाबत उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

5) सद्यस्थितीत महानगरपालिकाने आपल्या मालकीच्या उपरोक्त मालमत्ता यांचेबाबत आढावा घेऊन भाडेपट्टे मुदत /कालावधी संपुष्टात आला असल्यास संबंधित भाडेकरु यांचेकडून मालमत्ता ताब्यात घेणे आवश्यक असेल व जर महानगरपालिकेस त्या मालमत्ता पुन्हा भाडेपट्टे तत्वावर दयावयाच्या झाल्यास नियमानुसार योग्य ती प्रक्रीया करणे आवश्यक असेल.

6) उपरोक्त नमुद अ.क्र.5 नुसार कार्यवाही होत नाही किंवा विलंब होत असल्यास मुदत/कालावधी संपलेल्या मालमत्तांच्या बाबत स्थायी निदेश क्र.39 अन्वये नमुद कार्यपध्दतीचा अवलंब करुन दरवर्षी भाडेपट्टा रकमेत 5 ते 10 टक्के इतकी भाडेवाढ करणे आवश्यक असून महानगरपालिकेवर कोणत्याही प्रकारचा/स्वरुपाचा बोजा निर्माण होणार नाही किंवा न्यायिक अडचणी येणार नाहीत असा करारनामा करुन घेणे हिताचे ठरेल.

उपरोक्त अभिप्रायानुसार पुर्तता होऊन थकीत रक्कम रुपये 312241/- वसुलात आणून अनुपालन दर्शवावे.

मनपा निधी

वसुलपात्र रक्कम रु. 312241/-

DATDAWM6901 (Ref No : 60)

## *26 दैनंदिन बाजार फी वसुलीचा मक्ता अयशस्वी होऊन झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 05**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 65330.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 65330.00/-

***शासन निर्देशानूसार अंदाजित रकमेवर विहीत दराचे मुद्रांकावर करारनामा नसणे,निवीदा अटी / शर्तीप्रमाणे मक्तेदाराकडून बँक गॅरंटी प्राप्त नसतांना कार्यादेश देणे, मक्तेदाराने मक्ता अर्धवट सोडणे, मक्तेदारास वापरण्यास दिलेल्या पावती पुस्तकांचा हिशेब न देणे, सरकारी बोली रकमेपेक्षा कमी महसूल जमा होणे, इ. स्वरूपाच्या अनियमितता बाबत.***

DRAFT

सन 2012-13 साठी महानगरपालिकेने दैनंदिन बाजार फी वसुली करीता रक्कम रु.2540000/- इतकी सरकारी बोली किंमत निश्चित करुन लिलाव पध्दतीने मक्तेदार नियुक्त करणेसाठी जाहीर निविदा प्रसिध्दी प्रक्रीया करुन एकूण सहा (6) लायक व्यक्ति मार्फत लिलाव करुन त्यातील जादा बोली असलेले श्री.संदीप जगन्नाथ पाटील यांची बोली रक्कम रु.3100000/- यास अंतिम मंजुरी देण्यात आली. मात्र लिलाव अटी व शर्तीप्रमाणे संबंधित मक्तेदाराने बँक गॅरेंटी भरुन करारनामा करणेस कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. या कारणास्तव संबंधिताची अनामत रक्कम रु.10000/- जप्त करण्यात आली. तद्नंतर पुन्हा निविदा प्रक्रीया करुन लिलाव प्रक्रीया करण्यात आली. त्यात लायक एकूण तीन (3) व्यक्तिंनी सहभाग नोंदविला त्यापैकी श्री.रवि हरीश्चंद्र आगवणे यांची जादा रकमेची बोली रक्कम रु.2581000/- अंतिम मान्य होऊन कार्यादेश दि.31/05/2012 अन्वये दि.12/06/2012 ते दि.11/06/2013 या मुदतीकरीता रक्कम रु.645250/- इतकी राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरेंटी व दर सोमवारी रक्कम रु.49504/- महानगरपालिकेकडे भरणा करणे या अटी शर्तीसह देण्यात आले. तथापि मक्तेदाराने नमूद बँक गॅरेंटी न भरता दि.18/06/2012 ते दि.27/08/2012 या कालावधीत दैनंदिन बाजार फी वसुलीचे काम करुन खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रु. 866894/- (अ.क.2 प्रमाणे रक्कम रु.544569/- व अ.क्र.5 प्रमाणे रक्कम रु.322325/- (अनामत रक्कम जप्त)) महानगरपालिकेकडे भरणा केली असून दि.28/08/2012 पासून सदरचा मक्ता मुदतपूर्व सोडून दिला आहे. उर्वरित कालावधीत (महानगरपालिकाचे कर्मचारी यांनी दैनंदिन बाजार फी वसुलीचे काम करुन तपशीलात नमूद केल्याप्रमाणे (अ.क्र.1 व अ.क्र.4 अन्वये)) एकूण रक्कम रु.1678276/- इतकी फी वसुल केली आहे. यानुसार सन 2012-13 मध्ये महानगरपालिकेने एकूण रक्कम रु.2545170/- इतकी फी वसुलात आणलेली आहे.

| अ.क्र. | कालावधी | फी वसुल यंत्रणा | वसुल फी | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | दि.01/04/2012 ते दि.11/06/2012 | मनपा कर्मचारी | 696510 | प्रथम मक्तेदार न आल्याने. |
| 2 | दि.18/06/2012 ते दि.27/08/2012 | श्री.रवि हरीश्चंद्र आगवणे (मक्तेदार) | 544569 | फेर मक्तेदार नियुक्ती होऊन. |
| 3 | दि.28/08/2012 ते दि.02/10/2012 | निरंक | 0 | मक्तेदाराने अटी व शर्ती प्रमाणे रकमेचा भरणा न केल्याने. |
| 4 | दि.03/10/2012 ते दि.31/03/2013 | मनपा कर्मचारी | 981766 | मक्तेदाराने मक्ता अर्धवट सोडल्याने |
| 5 | दि.18/02/2013 | श्री.रवि हरीश्चंद्र | 322325 | अ.क्र.3 मधील कालावधीतील |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आगवणे (मक्तेदार) | | देय असणारी करारनामा, अटी व शर्ती प्रमाणे फी, दंड इत्यादी रक्कम समायोजनाने. |
| एकूण | | | 2545170 | |

याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) श्री.रवि हरीश्चंद्र आगवणे यांचेकडून करारनामा हा रुपये 200/- चे मुद्रांकावर करण्यात आलेला आहे. वास्तविकता संबंधितांकडून शासन राजपत्र दि.27/04/2006 नुसार मुंबई मुद्रांक नियम 1958 मध्ये झालेल्या सुधारणा अन्वये लिलाव बोली रक्कम रु. 2581000/- करीता एकूण रक्कम रुपये- 1700/- मुल्य असलेल्या मुद्रांकावर करारनामा होणे आवश्यक होते. (एकूण अंदाजीत रकमे पैकी रुपये- 1000000/- साठी रुपये- 100/- व त्यानंतर प्रत्येकी रुपये- 100000/- साठी रुपये- 100/- प्रमाणे परिगणना करुन अनुज्ञेय मुंद्रांकाची रक्कम) मात्र, संबंधितांकडून नियमबाहयपणे रक्कम रु.200/- च्या मुद्रांकावर करारनामा करण्यात आला आहे. यामुळे रक्कम रु. 1500/- (1700-200 = 1500/-) इतके शासकीय महसुलाचे नुकसान झाले आहे. नुकसानीची रक्कम वसुल होऊन शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

2) श्री.रवि हरीश्चंद्र आगवणे, मक्तेदार यांनी बाजार फी मक्ता अर्धवट सोडण्यास पुढील काही बाबी कारणीभूत असल्याचे लेखा परीक्षणात आढळून आले आहे.

अ) निविदा, करारनामा, कार्योदेश इत्यादी मधील अटी व शर्तीप्रमाणे संबंधित मक्तेदाराकडून विहीत कालावधीत बँक गॅरेंटी रक्कम रुपये- 645250/- वसूल न केल्याने/घेतल्याने.

ब) बँक गॅरेंटी दिलेली नसतांना महानगरपालिकेने मक्तेदारास कार्यादेश देण्याची नियमबाहय कार्यवाही केलेली असल्याने.

क) दोन आठवडे पर्यंत विहीत हप्ता रक्कम थकीत राहीली असतानाही (अ.क्र.3 मधील नमूद कालावधीत) अटी व शर्तीप्रमाणे 18 टक्के व्याज आकारणी न करणे व मक्ता रद्द न करणे.

ड) मक्ता कालावधीत मक्तेदाराने फी वसुली करीता वापरलेली पावती पुस्तके वेळोवेळी विभागाकडे जमा न करणे.

उपरोक्त अनियमितता आढळून आले नंतरही विभागाने वेळीच कार्यवाही केली असती तर मक्ता यशस्वी झाला असता असे लेखापरीक्षणाचे स्पष्ट मत आहे.

3) मक्तेदारास महानगरपालिकाने पुरविलेल्या 28 पावती पुस्तकांचा (पावती पुस्तक क्रमांक 248 ते 275 पावती क्रमांक 72201 ते 75000) रक्कम रुपये- 28000/- इतका हिशोब (28x100x10) सादर केलेली नाही. सदर पावती पुस्तके कोणत्या कालावधीत वापरण्यात आली. वसुल रकमा महानगरपालिकेकडे भरणा केले किंवा कसे याबाबतची सत्यता पडताळता आलेली नाही.

4) दैनंदिन बाजार फी वसुलीची सरकारी बोली रक्कम रुपये- 2581000/- असताना प्रत्यक्षात रुपये- 2545170/- इतकी फी वसुल झालेली आहे. रक्कम रुपये- 35830/- इतकी कमी फी वसुल न होणेस

DRAFT

मक्तेदाराने मक्ता अर्धवट सोडणे, बँक गॅरेंटी न घेणे, अदा पावती पुस्तकांप्रमाणे रकमा प्राप्त न करणे, विहित कालावधीत मक्तेदाराकडून फी रकमा प्राप्त न करणे इत्यादी महत्वपुर्ण बाबी कारणीभूत असल्याने नुकसान रक्कम रुपये- 35830/- संबंधितांकडून वसुलात आणणे आवश्यक आहे.

5) दैनंदिन बाजार फी वसुलीचा मक्ता अयशस्वी झाल्याने उर्वरित कालावधीकरीता महानगरपालिका कर्मचारी यांचेकडून फी वसुलीची कार्यवाही करावी लागल्यामुळे आस्थापनेवरील खर्च वाढल्याने प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न आस्थापना खर्च पाहाता अत्यंत नगण्य ठरले असून त्याचा विपरीत परिणाम महानगरपालिकाच्या उत्पन्नावर झालेला असून करारनाम्यात अशा नुकसानीबाबत अटी व शर्तीचा कोणताही उल्लेख नसल्याने सदर बाब महानगरपालिकाच्या हिताविरोधात गेली आहे असे लेखापरीक्षणाचे स्पष्ट मत आहे.

उपरोक्त अनियमिततेमुळे महानगरपालिकाचे आर्थिक नुकसान झालेले आहे याबाबत उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मनपा निधी

वसुलपात्र रक्कम रुपये- 65330/-

(मुद्दा क्र.1,3 व 4)

DATDAWM6901 (Ref No : 61)

### *28 दुकान भाडे थकबाकी वसुलीबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 5931334.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 5931334.00/-

***नियमानुसार दुकान / शॉपिंग इत्यादींचे भाडे नियमित वसुल न केल्याने रकमा थकीत राहाणे व त्याचा उत्पन्नावर विपरीत परीणाम होत असलेबाबतची अनियमितता.***

सन 2012-13 करिता दुकान / शॉपिंग इत्यादीचे भाडे मागणी नोंदवहीची पडताळणी केली असता, माहे मार्च 2013 अखरे एकूण रक्कम रुपये 5931334/- दुकान भाडे थकीत राहीले आहे. त्यापैकी प्रातनिधीक स्वरूपात मोठया प्रमाणवार दुकान भाडे थकीत असलेल्या शॉपिंग सेंटरची नावे खालीलप्रमाणे नमुद केली आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 128 मध्ये नमुद केल्या प्रमाणे महानगरपालिकेने संबंधित दुकान / शॉपिंग / गाळा धारक यांचेकडून वेळोवेळी अनूज्ञेय असलेले दुकान भाडे वसूल करण्याची ठोस कार्यवाही संबंधित विभागाने नियमित केली नसल्यानेच भाडे रक्कम थकीत ठेवण्याच्या प्रवृत्तीत वाढ झाली



DRAFT

असून, यामुळे महानगर पालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झालेले आहे. सदरचे शॉपिंग / दुकान भाडे हे महानगर पालिकेच्या मुख्य उत्पन्न स्त्रोतापैकी एक असून त्याच्यात सातत्य राखणे आवश्यक असल्याने तशी नियमोचित कार्यवाही करून थकीत रक्कम रुपये 5931334/- वसूल करावे व दुकान भाडे कदापि थकीत राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घेणे आवश्यक असेल.

| अ.क्र | शॉपिंग सेंटरचे नांव | एकूण गाळे संख्या | थकीत भाडे रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | प्रबोधनकार ठाकरे व्यापारी संकूल | 108 | 2066179 |
| 2 | शिवाजी चौपाटी ओटे | 21 | 305000 |
| 3 | सर्वपल्ली डॉ.राधाकृष्णन शॉपिंग सेंटर | 42 | 297510 |
| 4 | इतर शॉपिंग सेंटर | 771 | 3262645 |
| | एकूण | 942 | 5931334 |

मनपा निधी

वसुलपात्र रक्कम रुपये 5931334/-

DATDAWM6901 (Ref No : 63)

## *42 आग विझविणे कामी पुरविलेल्या सेवेच्या खर्चाची रक्कम थकीत राहण्याची अनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 408689.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 408689.00/-

***शहर हददीबाहेर पुरविलेल्या अग्नीशमन सेवा पोटी अनुज्ञेय असलेली खर्चाची रक्कम संबंधितांकडून वेळीच वसुल न करता थकीत राहीलेबाबतची अनियमितता.***

अग्निशमन विभागाकडील अभिलेख्यांची पडताळणी केली असता मागणी नोंदवहीत नमूद केल्याप्रमाणे व विभागाने पुरविलेल्या माहितीनुसार सन- 2012-2013 अखेर पर्यंत अग्निशमन विभागाने महानगरपालिका हद्दीबाहेर लागलेल्या आग सारख्या आपत्कालीन घटनेकरीता आग विझविणे कामी तत्पर सेवा संबंधित व्यक्ति/संस्था/व्यवसायिक/उद्योग/शासकीय कार्यालये व इतर बाबी करीता उपलब्ध करुन दिलेली होती. त्याबाबत विभागाने/ महानगरपालिकाने विहीत केलेली सेवा फी वेळीच वसुल होणे आवश्यक होते. मात्र खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रुपये- 408689/-

DRAFT

आजपावेतो संबंधितांकडून प्राप्त न झाल्याने थकीत राहण्याची अनियमितता झालेली आहे.

| अ.क्र. | मागणी वर्ष | थकीत सेवा फी रक्कम |
|---|---|---|
| 1 | 2005–06 ते 2011-12 | 344689 |
| 2 | 2012-2013 | 64000 |
| एकूण | | 408689 |

थकीत रक्कम पाहाता त्यात सन 2005-2006 पासून रकमांचा समावेश असून थकीत कालावधी पाहाता रकमा वसुलीस मोठा विलंब झाल्याचे दिसून येते. तरी थकीत रक्कम रुपये- 408689/- संबंधितांकडून सत्वर वसुल होणे आवश्यक आहे. तसेच यापुढे शहर हद्दीबाहेर पुरविण्यात येणाऱ्या अग्निशमन सेवेपोटी देय होणारी सेवा फी रक्कम वेळीच वसुलात आणणेबाबतची उचित कार्यवाही होईल याची दक्षता विभागाने घ्यावी.

मनपा निधी

वसुलपात्र रक्कम रुपये- 408689/-

FDSRKNM8201 (Ref No : 92)

## *47 विवाह नोंदणी फी व शास्ती रक्कम शासनाकडे जमा न करण्याची अनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*शासकीय निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 90600.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 90600.00/-

***विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम नियमानुसार शासकीय कोषागारात भरणा न करता ती महानगरपालिका निधीत घेऊन नियमबाहयपणे वापरात आणण्याची अनियमितता.***

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 नुसार तसेच नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक का-13/रवका/विवाह नोंदणी, दिनांक. /04/2008 नुसार विवाह नोंदणी करण्याचे काम महानगरपालिकेकडे दिनांक. 01/05/2008 पासून हस्तांतरीत करण्यात आले असून महानगरपालिकेचे आयुक्त यांना विवाह निबंधक म्हणून घोषित केले आहे. त्यानुसार सन 2012-13 या आर्थिक वर्षात महानगरपालिकेने विवाह नोंदणी फी व शास्तीची फी रक्कम रुपये 90600/- इतकी वसुली प्राप्त केली आहे.

याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) विवाह नोंदणी नियम 1999 चे नियम 12 नुसार निबंधकाकडे आलेली सर्व फी आणि शास्तीची



DRAFT

रक्कम इत्यादी सर्व रकमा शासकीय कोषागारात जमा करण्याचे स्पष्ट नमुद असताना महानगरपालिकेने उपरोक्त नमुद महसूल रक्कम रुपये 90600/- आजपावेतो शासन सदरी जमा न करता महानगरपालिका निधीत नियमबाहयपणे जमा करुन नियमित वापरात आणण्याची अनियमितता केलेली आहे.

2) सन 2012-13 मध्ये विवाह नोंदणी फी रक्कम रुपये 50/- प्रति प्रमाणपत्र याप्रमाणे दर आकारणी करण्यात आलेली आहे. सदरचे दर शासनाने निश्चित केले किंवा कसे याबाबत लेखा परीक्षणात सत्यता पडताळता आलेली नाही.

3) दिनांक 01/05/2008 पासून विवाह नोंदणी फी व शास्ती रक्कम महानगरपालिकेकडून वसुल होऊन महानगरपालिका निधीत जमा होत असल्याने शासकीय महसूल रकमेचे कायमस्वरुपी आर्थिक नुकसान झालेले आहे. सबब दिनांक 01/05/2008 पासून महानगरपालिकेने वसुल केलेली विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम यांची परीगणना करुन अनुज्ञेय होणारी सर्व रक्कम शासकीय कोषागारात जमा होणे आवश्यक आहे.

4) सन 2012-13 मध्ये महानगरपालिकेने वसुल केलेली फी एकूण रक्कम रुपये 90600/- करीता भरणा कीर्द व पावती पुस्तक यांची निवडक महिन्याकरीता पडताळणी केली असता विभागाने प्रकरण निहाय फक्त विवाह नोंदणी फी वसुल केल्याचे दिसून येते. वास्तविकता विलंबाने विवाह नोंदणी होणाऱ्या प्रकरणात नियमानुसार शास्तीची रक्कम मंजूर दराने वसुल होणे आवश्यक होते. तथापि नियमोचित कार्यवाही झाली नसल्याने शास्तीच्या महसूल उत्पन्नापासून शासनास वंचित राहावे लागले आहे.

तरी उपरोक्त अभिप्राय पाहाता महानगरपालिकेकडून वसुल होणारी विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम विहीत दराने वसुल करुन शासकीय कोषागारात पुर्वलक्षी प्रभावाने सत्वर भरणा होणे आवश्यक आहे व यापुढे वसुल झालेली रक्कम/फी/शास्ती वेळीच कोषागारात जमा होईल याची दक्षता घेण्यात यावी.

DRAFT

शासकीय निधी

वसुलपात्र रक्कम रुपये. 90600/-

FDSRKNM8201 (Ref No : 110)

## *49 अनुज्ञेय नसलेल्या सण व उत्सवासाठी नियमबाहयपणे सण अग्रिम रकमांचे प्रदानाबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 522500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 522500.00/-

***शासन निर्देशा नुसार अनुज्ञेय असलेल्या सण/उत्सव यांचे व्यतिरिक्त इतर अनुज्ञेय नसलेल्या सण/उत्सव करिता नियमबाहयपणे सण/उत्सव अग्रीम रकमांचे प्रदानाची अनियमितता.***

सन 2012-13 या आर्थिक वर्षात खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेतील कर्मचारी यांना सण व उत्सव याकरीता अग्रिम म्हणून एकूण रक्कम रुपये 522500/- चे प्रदान करण्यात आलेले आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | खर्चाचा तपशिल | विभाग |
|---|---|---|---|---|
| 42 | 09/04/2012 | 2500 | मुख्य कार्यालय<br>कर्मचारी संख्या - 1<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | सहायक आयुक्त महानगरपालिका |
| 43 | 09/04/2012 | 12500 | कर्मचारी संख्या - 5<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | जकात विभाग |
| 45 | 09/04/2012 | 7500 | कर्मचारी संख्या - 3<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | वसुली विभाग |
| 47 | 09/04/2012 | 5000 | कर्मचारी संख्या - 2<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | बांधकाम विभाग |
| 49 | 09/04/2012 | 7500 | कर्मचारी संख्या - 3<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | आरोग्य विभाग |
| 52 | 09/04/2012 | 37500 | कर्मचारी संख्या - 15<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | मलेरीया विभाग |
| 55 | 09/04/2012 | 212500 | कर्मचारी संख्या - 85<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | आरोग्य सफाई कामगार स्त्री |
| 56 | 09/04/2012 | 237500 | कर्मचारी संख्या - 95<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | आरोग्य सफाई कामगार पुरुष |
| | एकूण | 522500 | | |

याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अग्रिम-2010/प्र.क्र.12/10/विनिमय दिनांक.10/05/2010 तसेच मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम क्र.142 नुसार अनुज्ञेय असलेल्या सण अग्रिम प्रकार यात उपरोक्त तपशिलातील नमुद सण/उत्सव या प्रकारचा समावेश नसताना नियमबाहयपणे सण अग्रिम रकमा प्रदान करण्याची अनियमितता झाली आहे.

2) देयकासोबत नमूद कर्मचारी संख्येप्रमाणे त्या त्या विभागातील कर्मचारी यांचे मागणी अर्ज आढळून आलेले नाही किंवा संबंधितांनी ते पडताळणी कामी उपलब्ध केलेले नाहीत. यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांकडून प्रत्यक्षात अग्रिम रकमेची मागणी झाली किंवा कसे याची सत्यता पडताळता आलेली नाही.

3) अग्रिम प्रदानाच्या रकमा प्राप्त झालेबाबत संबंधितांकडून कर्मचारी निहाय पोचपावती प्राप्त करुन घेण्यात आलेली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 19 नुसार पोचपावती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 25 नुसार सदरबाबी करीता मंजूर अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद उपलब्ध असल्याची खात्री होऊ शकलेली नाही.

5) सदरचे अग्रिम वेतनाशी निगडीत असल्याने देयके नमुना नं.22 नुसार तयार करण्याचे प्रयोजन विषद होणे आवश्यक आहे.

6) अग्रिम नोंदवहीत प्रदान अग्रिमाचा तपशील कर्मचारीनिहाय नोंदविण्यात आलेला नाही. यामुळे सदर अग्रिम रकमांचे समायोजन / वसुली नियमानुसार विहीत हप्ता कालावधीत झाली किंवा कसे तसेच माहे मार्च - 2013 अखेर प्रलंबित रकमा इत्यादी बाबतचा सविस्तर तपशील पडताळता आलेला नाही.

सबब खर्च रक्कम रुपये 522500/- संबंधितांकडून वसुल होणे आवश्यक आहे.

म.न.पा.निधी

वसुलपात्र रक्कम रुपये 522500/-

FDSRKNM8201 (Ref No : 66)

## *51 दलितवस्ती योजने अंतर्गत वार्ड क्रं.36 मध्ये श्री मोरे ते सिध्दार्थ नगर चितोड रोड पावेतो व वार्ड क्रं. 34 मध्ये यशवंत नगर मध्ये नवीन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणे, वार्ड क्र. 35 भीम नगर भागामध्ये नविन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणे आणी वार्ड क्रं. 17 नागसेनवाडी ते रमाबाई आंबेडकर नगर पावेतो नविन 6 इंची एसी प्रेशर पाईप लाईन टाकणे बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 23**

*लेखा शीर्ष :दलितवस्ती योजना राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1359357.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1309250.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 50107.00/-

***निविदा प्रसिध्दी व निविदा कार्यवाही नियमानुसार न करणे, प्रशासकीय आदेश न काढणे, ठराव मंजुरी प्रत संचिकेत न लावणे, अंदाज पत्रकीय दरापेक्षा जादा दराने कामास मंजुरी देणे, निविदा मंजुरी विलंबाने करणे,***



DRAFT

***कामास मुदतवाढ नियमानुसार न देणे, दरसुची पडताळणीस उपलब्ध न करणे, पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध नसलेबाबत प्रमाणपत्र न घेणे, विहित नोंदवहयामध्ये नोंदी न घेणे, शासन निर्देशानुसार राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी न करणे, अंदाजपत्रक परिपुर्ण व अचुक न करणे, वसुली पावती व चलन पडताळणीस उपलब्ध न करणे, 15 ते 25 लक्ष पर्यंतचे कामे विनानिविदा न करणे, मोजमाप पुस्तीकेतील नोंदी व पडताळणी नियमानुसार न करणे, साहित्याची चाचणी शासकीय संस्थेकडुन न करणे, कामाचा विमा व कामगार उपकर रक्कम, जकात वसुली रक्कमा देयकातुन कपात न करणे, व्हॅट रक्कम कमी कपात करणे, देयकावर नियमानुसार नोंदी व सहया न घेणे, अनुदानाचे स्वतंत्र लेखे न ठेवणे, उपयोगीता प्रमाणपत्रे व ताळमेळबाबतचे अभीलेखे न दर्शविने, प्रस्तावीत कामावर पुर्वी खर्च झाला किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणाची खात्री न पटविणे ई.***

DRAFT

| अ.क्रं. | बाब | तपशील |
|---|---|---|
| 1 | लेखा शिर्ष | नागरी दलीत वस्ती पाणी पुरवठा योजनासाठी (विशेष घटक योजना) |
| 2 | प्रशासकीय मान्यता | आदेशाची प्रत संचिकेत उपलब्ध नाही |
| 3 | निविदा प्रकार | जाहिर निविदा |
| 4 | निविदा प्रसिध्दी व कालावधी | 16/2/12 ते 23/02/12 निविदा स्विकारणे 24/02/12 दै. देशदुत धुळे दि. 16/02/12 |
| 5 | प्राप्त/ निविदा | प्रत्येक कामासाठी तिन |
| 6 | स्थायी समीती मंजुरी | ठराव / आदेशाची प्रत उपलब्ध नाही. |
| 7 | कामाची मुदत | 2 महिणे |

काम निहाय इतर तपशील खालील प्रमाणे आहे.

| कामाचे नांव व मोजकाम पुस्तीका | तांत्रीक मान्यता | निविदा रक्कम | मंजूर निविदा तपशील | कार्यादेश | काम पुर्ण दिनांक | काम मुदतीत पुर्ण आहे | करारनामा | जिल्हा दर सुची वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्रं. | | | | | | | | |
| वार्ड क्रं. 36 मध्ये श्री मोरे ते सिध्द ार्थ नगर चितोड रोड पावेत ो नवीन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणे | का.अ. , मनपा धुळे अ.क् रं. 28 8 दि. 30/ 09/2011 रु. 81 9677 | रु. 81967 7 | भावीक कन्ट् रक्शन कं. धुळे , अंदाज पत्रकीय दरापे क्षा 6 टक्के जादा दराने | क्रं.धुमप ा/पापु- 1/2012-13 दि. 15/05/12 | 24/12/ 2012 | नाह ी | रु. 100 बॉड वर , दि. 15/05/12 | 2011- 12 |
| वार्ड क्रं. 34 मध्ये यशवंत नगर नवीन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणे | का.अ. , मनपा धुळे अ.क् रं. 28 7 दि. 30/ 09/2011 रु. 93 2954 | रु. 93295 4 | भावीक कन्ट् रक्शन कं. धुळे , अंदाज पत्रकीय दरापे क्षा 6 टक्के जादा दराने | क्रं.धुमप ा/पापु- 2/2012-13 दि. 15/05/12 | 24/12/ 2012 | नाह ी | रु. 100 बॉड वर , दि. 15/05/12 | 2011- 12 |
| वार्ड क्रं. 35 मध्ये भीमनगर र भागामध्ये नवीन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणे | का.अ. , मनपा धुळे अ.क् रं. 28 6 दि. 30/ 09/2011 रु. 77 4482 | रु. 77448 2 | भावीक कन्ट् रक्शन कं. धुळे , अंदाज पत्रकीय दरापे क्षा 6 टक्के जादा दराने | क्रं.धुमप ा/पापु- 3/2012-13 दि. 15/05/12 | 24/12/ 2012 | नाह ी | रु. 100 बॉड वर , दि. 15/05/12 | 2011- 12 |

DRAFT

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वार्ड क्रं. 17 नागसेनवाडी ते रमाबाई आंबेडकर नगर पावेतो नविन 6 इंची एसी प्रेशर पाईप लाईन टाकणे | का.अ. , मनपा धुळे अं.क्रं. 475 दि. 24/11/2011 रु. 633017 | रु. 633017 | अकीब कन्स्ट्रक्शन धुळे , अंदाज पत्रकीय दरापेक्षा ३ टक्के जादा दराने | क्रं.धुमपा/बावि/ 2012-13 दि. 10/05/12 | 03/07/2012 | आहे | रु. 100 बॉडवर , दि. नमुद नाही. | 2006-07 |

(प्रमाणक क्रंमांक 17, दिनांक 20/12/2012 रक्कम रु. 249107) वार्ड क्रं. 36 मध्ये श्री मोरे ते सिध्दार्थ नगर चितोड रोड पावेतो नवीन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणे, (प्रमाणक क्रंमांक 16, दिनांक 20/12/2012 रु. 264828) वार्ड क्रं. 34 मध्ये यशवंत नगर मध्ये नवीन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणे, (प्रमाणक क्रंमांक 15, दिनांक 20/12/2012 रु. 233385) वार्ड क्रं. 35 मध्ये भीमनगर भागामध्ये नवीन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणे,(प्रमाणक क्रंमांक 14, दिनांक 20/12/2012 रक्कम 612037) वार्ड क्रं. 17 नागसेनवाडी ते रमाबाई आंबेडकर नगर पावेतो नविन 6 इंची एसी प्रेशर पाईप लाईन टाकणे बाबतचे संचिकेतील उपलब्ध अभिलेख्यानुसार खालीलप्रमाणेअभीप्रायआहेत.

1) संचिकेत जाहीर निवीदा प्रसिध्दी एकाच वृतपत्रात दैनिक देशदुत मध्ये प्रसीध्द केल्याची दिनांक 16/02/12 जाहीर निवीदा प्रत जोडली आहे, वृत्तपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे. सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. जाहिरात 2009/प्र.क्र. 137/का-34 दि. 31/08/2009 नुसार जाहिरातीचे वितरण चक्रीय पध्दतीने करणे, वितरणाचे अधीकार जिल्हा माहिती अधिकारी यांना असुन एक क-वर्ग दैनिक व एक साप्ताहिक मध्ये, आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी. चे प्रमाण लक्षात घेवुन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) प्राप्त तिन्ही नीविदाकारांच्या नीविदेची पाकीटे दिनांक 03/03/12 रोजी एकाच वेळी पाकीट क्रं. 1 व 2 उघडण्यात आले आहेत, निविदाकारांकडुन तांत्रिक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे माविण्यात आले नाहीत, निविदा दोन प्रतित मागवील्या नाहीत, निविदाकारांनी फक्त ठेकेदार नोंदणी / नुतणीकरण प्रमाणपत्राची प्रत जोडली आहे. तसेच तांत्रीक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे, निवीदा बाबतच्या

अटी व शर्ती पुर्तता बाबत व्यापारी लिफाफा तुलनात्मक तक्ता व त्यानंतर व्यापारी लिफाफा उघडुन तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर निविदा समीतीच्या अधीकारी यांच्या सहया घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. नगर परिषद संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 36 क्रं.नप्रस/ निविदा मागविणे/ 05/प्र.क्र.151 /05/9,दिनांक 29/12/05 अ.क्रं. 27 मध्ये पात्रता ठरविण्याचे निकष दिलेले आहेत. तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रं.भाखंस 2001/(2949)/ उद्योग-6 दि. 25/06/2002 नुसार कार्यवाही न करता, ठेकेदारांची पात्रता पडताळुन न पहाता सर्वच निविदा धारकाचे, व्यापारी लिफाफे उघडण्यात आले मुळे सदरची कृती नियमबाहय ठरते.

3) प्रस्तावीत कामास प्रशासकीय मान्यता घेतल्याचे आदेशाची प्रत तसेच ठराव मंजुरीची प्रत संचिकेत नसल्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 162 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. 4) वार्ड क्रं.36, 34, 35 निविदा दि. 03/03/2012 ला उघडण्यात आल्या व कामाचे आदेश दि. 15/05/12 ला देण्यात आले, तसेच वार्ड क्रं. 17 निविदा 03/03/2012 ला उघडण्यात आल्या व कामाचे आदेशदिनांक 10/05/2012 ला देण्यात आले, निविदा उघडल्यालनंतर दोन महिणे पेक्षा विलंबाने कार्यवाही केली. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 171 (6) नुसार व स्थाई निदेश नियम 466 (4) परिशिष्ट तिन - निविदा मागविण्याची आणि स्विकृत करण्याची कार्यपध्दती (36) नुसार निविदा उघडल्यानंतर त्यांची विल्हेवाट लावण्यामध्ये कोणताही टाळता येण्याजोगा विलंब करता येणार नाही. सामान्यपणे ते उघड केल्याच्या दिनांकापासुन एका आठवडयाच्या आत त्याची विल्हेवाट लावण्यात येईल आणि कोणत्याही परिस्थितीत एका महिण्यापेक्षा अधिक कालावधीत त्याची विल्हेवाट लावणार नाही असे नमुद असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5) वार्ड क्रं.36, 34, 35 कामाची मुदत कार्यादेश दिनांक 15/05/2012 पासुन 2 महिण्याची असताना प्रकरणात दिनांक 24/12/2012 ला काम पुर्ण झाले आहे. काम 5 महिणे 10 दिवस विलंबाने पुर्ण झाले आहे. त्यामुळे नियमानुसार प्रतिदिन दंड आकारणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही. ठेकेदाराने मुदतवाढ मागणीचे कारण संयुक्तीक नसताना मुदतवाढ मंजुरी दिली आहे, परंतु सदर पत्रावर दंडाबाबत नमुद केले नाही. माहे नोव्हेंबर महिण्यात 31 तारीख चुकीची टाकली आहे. मुदतवाढी साठी सबळ कारण नसताना सक्षम प्राधीकारी यांची मंजुरी घेतलेली नाही. पुनश्च: पडताळणी करुन नियमानुसार दंडाची रक्कम आकारणी करुन वसुल करणे आवश्यक आहे. फक्त वार्ड क्रं. 17 मधील काम मुदतीत पुर्ण केले आहे.

6) देयकातील दर पडताळणी करणेसाठी जिल्हा दरसुची सन 2006-07 व 2011-12 उपलब्ध न केलेमुळे सदरचे दर जिल्हा दरसुचीप्रमाणे आहेत किंवा नाही याची खात्री करता आली नाही. मुंबई प्रांतिक अधीनियम 1949 चे अनुसुची ड चे प्रकरण 8 मधील 6(1) (2) अन्वये लेखारिक्षणास सर्व कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे हे अधीकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे.

7) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर, महानगरपालिकेने

DRAFT

किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारका कडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

8) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही, त्यामुळे त्याच त्या प्रभागात एकाच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

9) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार वीभाग क्रं. भाखसं 1088/(2512)/ उदयोग 6 दिनांक 2/1/1992 मधील परिच्छेद 5 परिशीष्ट 3 व क्रं. भाखसं 2002/(2990)/ उदयोग 6 दिनांक 4/2/06 नुसार महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवण्यात आलेल्या वस्तुंची खरेदी करावी लागेल असे बंधनकारक असताना अशी सुचना निवीदेमध्ये अंतर्भुत केल्याचे दिसुन आले नसलेमुळे शासन निर्देशा नुसार कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

10) अंदाजपत्रकासोबतचे Measurement Sheet जोडलेले नाही फक्त Abstract sheet आहे. निविदा विक्री बाबत निविदांना क्रमांक दिलेले नाहीत, विक्रि निविदा व प्राप्त रकमा, निविदा विक्री, इसारा रक्कम, सुरक्षा रक्कम, लोकवर्गणी ई. बाबतची पावतीबुके, नोंदवही व इतिवृत लेखापरिक्षणास दर्शविण्यात आली नाही तसेच वृत्तपत्रे निविदा जाहिरात, वृत्तपत्रक जाहिरात देयके तपासणीस उपलब्ध केले नाहीत याशीवाय नियमानुसार देयकातील सर्व कपाती रकमाचा चलनव्दारे भरणा केलेले चलन लेखापरिक्षणास दर्शविण्यात आले नाहीत. महाराष्ट्रत नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 79 नुसार उक्त नमुद अभीलेख लेखापरिक्षणास दर्शविणे आवश्यक आहे.

11) महाराष्ट्र शासन सार्वजनीक बांधकाम विभाग शासन नीर्णय क्रं. सीएटी 07/2006/प्र.क्र. 94/इमारती-2 दिनांक 16/11/2006 नुसार रुपये 15 लक्ष पर्यंतची कामे वीनानीवीदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशीक्षीत बेराजगार अभीयंता यांना देणे, नीर्णय क्रं. सीएसटी 1097/प्र.क्र. 42/ इमारत-2 दि.29/07/20025 नुसार नोंदणीकृत स्थापत्य सुशीक्षीत बेरोजगार अभीयंता यांना रुपये 25 लक्ष पर्यंतची कामे वीना नीवीदा अंदाजपत्रकीय दराने देणे आवश्यक आहे, व नीर्णय क्रं. सीएसटी/01/प्र.क्र. 26/इमारत-2दि.31/05/05 नुसार 5 लक्ष कींमती पर्यंतच्या कामाचे वाटप हे पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांना 34 टक्के, सुशीक्षीत बेराजगार अभीयंता यांना 33 टक्के व मजुर सहकारी संस्थांना 33 टक्के या प्रमाणात वाटप करणे आवश्यक आहे, असे असताना आवश्यक असताना नीवीदा प्रसीध्द करुन काम देण्यात आले आहे. त्यामुळे वार्ड क्रं.36 रु.14946, वार्ड क्रं. 34 रु.15990, वार्ड क्रं.,35 रु. 14003 मधील जादा खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे

12) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 135 सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिण्यातून किमान एकदा नगर अभियंत्या कडून तपासण्यात येतील आणि मोजमाप पुस्तकामध्ये त्याची सही असेल. मोजमाप पुस्तकेतील वित्तीय हिशोबांची नगर

DRAFT

अभियंत्यांच्या कार्यालयाकडुन आणि लेखा विभागाकडुन तपासणी करण्यात येईल असे नमुद असताना तशी कार्यवाही केली नाही.

13) सार्वजनीक बांधकाम विभाग परिपत्रक क्रं. 2004/प्र.क्र. 109/रा.म. 2 दि. 22/03/2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थैंकडुन घेणे आवश्यक आहे तो घेणेत आलेला नाही.

14) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 138 मोजमाप पुस्तक अनुक्रमांकीत करण्यात येईल व मोजमाप पुस्ततकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमुद करुन त्यावर लेखापाल व लेखापरिक्षक स्वाक्षरी करतील असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

15) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 139 काम पुर्ण होईल तेंव्हा नगर अभियंता नियम 210 मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार लेखा प्रमुखाकडे नमुना 62 मध्ये पूर्णतेचा अहवाल सादर करील किंवा तसे प्रमाणपत्र देईल, वार्ड क्रं. 34 मध्ये अंदाजपत्रक रुपये 932954 मंजुर असुन अंदाज पत्रकाची प्रत्यक्ष बेरीज रु. 950640 येते.वार्ड क्रं. 34 मध्ये अंदाजपत्रक रुपये 747482 मंजुर असुन काम पुर्ण झाल्याबद्दलचे प्रमाणपत्रात रु. 774482 अंदाज पत्रकीय रक्कम नमुद केली आहे. एखाद्या कामाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा अधिक रकमेचे काम झाले असल्यास नगर अभियंता अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष तरतुद व वाढीव काम यांचे प्रमाण, दर, कामाची किंमत यांच्यातील तफावतीची तुलना करुन त्याचे स्पष्टीकरण देईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही केली नाही.

16) महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्रं. विमास-1098/प्र.क्र.28/98/ शासनहमी दि.19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडेच करावा, तसेच नगर विकास विभाग पत्रक क्रं. जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 दि. 03/11/2003 नुसार शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. वार्ड क्रं.36 कामाचा विमा रु. 2491 व कामगार विमा रु. 2491, वार्ड क्रं. 34 कामाचा विमा रु.2648 व कामगार विमा रु. 2648, वार्ड क्रं. 35 कामाचा विमा रु. 2334 व कामगार विमा रु. 2334, वार्ड क्रं.17 कामाचा विमा रु.4590 व कामगार विमा रु. 4590 एकुण रुपये 24126 वसुल करुन विमानिधीकडे जमा करणे आवश्यक आहे.

17) धुळे महानगरपालिका जकात नियम 2005 नुसार महानगरपालिका हद्दीत वापर, उपयोग व विक्री किंवा इतर कारणाकरीता आयात करण्यात येणा-या मालावर महानगरपालिका जकात आकारतील असे नमुद असताना जकात रक्कम देयकातुन वसुन केली नाही. जकात वसुल करुन मनपा निधीमध्ये भरणे आवश्यक आहे.

18) वार्ड क्रं. 17 ची मोजमाप पुस्तीका तपासणीस उपलब्ध केली नाही, तसेच मोजमाप पुस्तीका क्रं. 13 वर काम झालेवर प्रमाणपत्र नोंदवुन त्यावर सक्षम अधिका-यांच्या सहया व शिक्के घेतले नाहीत, मोजमापे प्रत्यक्षात करणा-या अधिका-याने दिनांकीत सही केली पाहीजे आणि नोंद केलेल्या मोजमापाचा स्वीकार केल्याचे प्रतिक म्हणून कंत्राटदाराची सही मिळवीली पाहिजे. महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम नियमावली मधील परिच्छेद 24(11) नुसार कामाचे मोजमाप उप अभीयंता यांनी 100 टक्के व

DRAFT

कार्यकारी अभीयंता यांनी 5 टक्के प्रत्यक्ष बाबनिहाय तारखेसह करणे आवश्यक आहे.

19) निवीदेसोबत ठेकेदाराने व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र जोडले नसल्यामुळे शासन अधीसुचना दिनांक 4/4/2012 नुसार देयकातुन 5 टक्के व्हॅट रक्कम कपात करणे आवश्यक असताना 2 टक्के व्हॅट रक्कम कपात केली असलेमुळे उर्वरित 3 टक्के रक्कम वार्ड क्रं. 36 रु. 7474, वार्ड क्रं. 34 रु. 7945, वार्ड क्रं. 35 रु. 7142 ठेकेदाराकडुन वसुल करुन चलनव्दारे भरणा करणे आवश्यक आहे.

20) संचिकेतील देयक प्रमाणक क्रं. 14 दिनांक 20/12/2012 वर देयक मंजुरी व रक्कम ठेकेदारास प्रदान बाबतच्या सहया घेतलेल्या नाहीत. देयक प्रमाणक क्रं. 17, 16, 15 दिनांक 20/12/12 तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही, सचिंकेतील देयकाचे झेरॉक्स प्रतिवर देयक मंजुरी सहया घेण्यात आल्या नसल्याचे दिसुन येते, तसेच देयकावर कंत्राटदार यांची महसुल मुद्रांक लावुन सही घेण्यात आली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 166 नुसार प्रदान देयकावर प्रदान केल्यानंतर "देण्यात आले व रद्द केले" अशी अक्षरे पृष्ठांकीत करुन नियम 182 नुसार देय प्रदानाची पावती घेण्यात येईल व पावतीवर दिनांक व यथोचीत मुद्रांक लावण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 147 नुसार नमुना 64 मध्ये प्रदान प्रमाणक तयार करतील आणि त्याच्या अचुकपणाबद्ल व खरेपणाबद्दल टोकनमध्ये सही करुन देयकांचे संपूर्ण तपशील, अनुज्ञेयता, वजाती व अर्थसंकल्पीय शीर्ष, दिनांकपर्यंत मंजूर करण्यात आलेली व वापरण्यात आलेली अर्थसंकल्पाची एकूण रक्कम, याची देखील प्रदान प्रमाणका मध्ये नोंद घेण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही कलेली नाही.

21) शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग निर्णय क्रं.नादव-2011/पापुयो/अनुदान/प्र.क्र.185/पापु-24 दिनांक 5 मार्च 2012 मधील क्रं. 2 नुसार योजनेअंतर्गत मंजुर व मुक्त अनुदानाच्या रकमेचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत, प्राप्त निधी 31 मार्च 12 पर्यंत खर्च करावी, अखर्चीत रकमेचा हिशोब ठेवावा, अनुदानाचे उपयोगीता प्रमाणपत्र आणी काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र शासनास पाठवावी, खर्चाचा महालेखापाल यांचे लेख्याशी ताळमेळ घालुन अहवाल शासनास पाठवावा असे निर्देश असताना तशी कार्यवाही केली नाही.

22) सचिकेत दिनांक 1/7/13 रोजीचे टिपणीत याच कामासाठी सन 2013-14 मध्ये पाईप लाईन टाकणेसाठी प्रस्तावास मंजुरी मीळाली आहे, सदर काम सन 2012-13 मध्ये पुर्ण केले असुन सन 2012-13 या वर्षात 16 लक्ष निधी प्राप्त झाला होता, त्यामुळे ठेकेदारांना बिले पुर्ण अदा झाले नाही, वार्ड क्रं. 36 कामाचे एकुण बील रु. 853241 पैकी पुर्वी अदा केलेली रु. 249160 वगळुन उर्वरीत रु. 604134 अदा करणेस प्रस्तावीत केले नुसार मंजुरी दिली आहे. तसेच वार्ड क्रं. 34 कामाचे एकुण बील रु. 1062096 पैकी पुर्वी अदा केलेली रु. 264828 वगळुन उर्वरीत रु. 797268 अदा करणेस प्रस्तावीत केले नुसार मंजुरी दिली आहे. वार्ड क्रं. 35 कामाचे एकुण बील रु. 858861 पैकी पुर्वी अदा केलेली रु. 233385 वगळुन उर्वरीत रु. 625476 अदा करणेस प्रस्तावीत केले नुसार मंजुरी दिली आहे. एकदा पुर्ण झालेल्या कामावर परत नव्याने प्रस्ताव कसा सादर केला व एकाच कामासाठी दोनवेळा प्रदान झाले

DRAFT

किंवा कसे याबाबत लेखापरिक्षणास खात्री पटवीण्यात आली नाही. एकदा पुर्ण झालेल्या कामावर परत नव्याने प्रस्ताव कसा सादर केला व एकाच कामासाठी दोनवेळा प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरिक्षणास खात्री पटवीण्यात आली नाही.

23) वार्ड क्रं. 17 मध्ये बाब क्रं. 4 मध्ये 100 एमएम एसी प्रेशर पाईप दर अंदाजपत्रकात रु. 201 प्रती नग असताना देयकात प्रतिनग रु. 210 आकारणी केलेमुळे रुपये 3420 रक्कम जादा प्रदान झाली आहे, सदरची रक्कम ठेकेदार यांचेकडुन वसुल करुन निधीत जमा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 56, 57, 58 दिनांक 16/11/2015 व 72 दिनांक 24/11/2015 देवुन अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी उक्त बाबतीत समर्पक अभिप्राय प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

REVSSSM5909 (Ref No : 56)

***52 धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 21 जुने धुळे हनुमान मंदीराजवळ 100 एमएम डीइपीइ पाईप लाईन टाकणे व वार्ड क्रं. 12 शिवाजी नगर, वाडीभोकर रोड भागात नवीन 150 व 100 एमएम व्यासाची एचडीपीई अेसी प्रेशरपाईप लाईन टाकणे व वार्ड क्रं. 2 मधील ओसपालनगर, तिरुपती नगर, न्यु एकतानगर ई. भागात नवीन 100, 150 व 300 एमएम पाईप लाईन टाकणे बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 23**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा मनापा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1134574.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1083627.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 50948.00/-

***निविदा प्रसिध्दी व निविदा कार्यवाही नियमानुसार न करणे, प्रशासकीय आदेश न काढणे, ठराव मंजुरी प्रत संचिकेत न लावणे, निविदा मंजुरी विलंबाने करणे, अंदाजपत्रकीय दराचे 3 टक्के जादा दराने कामास मंजुरी देणे, अंदाजपत्रक बेरीज ई. चुक दर्शविणे, दरसुची पडताळणीस उपलब्ध न करणे, पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध नसलेबाबत प्रमाणपत्र न घेणे, विहित नोंदवहयामध्ये नोंदी न घेणे, वसुली पावती व चलन पडताळणीस उपलब्ध न करणे, मोजमाप पुस्तीका उपलब्ध न करणे, साहित्य चाचणी शासकीय संस्थेकडुन न करणे, कामाचा विमा व कामगार उपकर रक्कम, जकात वसुली रक्कमा देयकातुन कपात न करणे, व्हॅट रक्कम कमी कपात करणे, देयकावर नियमानुसार नोंदी व सहया न घेणे, प्राकलनात नमुद नसलेले कामा कामास मंजुरी न घेणे, विहीत मुदतीत काम न केलेमुळे दंडाची रक्कम वसुल न करणे, रक्कम जादा प्रदानाबाबत अभीलेखे न दर्शविने ई.***



DRAFT

| अ.क्रं. | बाब | तपशील |
|---|---|---|
| 1 | लेखा शिर्ष | मनपा निधी |
| 2 | प्रशासकीय मान्यता | आदेशाची प्रत संचिकेत उपलब्ध नाही |
| 3 | निविदा प्रकार | जाहिर निविदा |
| 4 | निविदा प्रसिध्दी व कालावधी | 22/07/11 ते 18/08/11 , जाहीर निवीदा प्रत दै. श्रमराज्य दि. 20/07/11 वृत्तपत्र नाही. |
| 5 | प्राप्त निविदा | प्रत्येकी तीन |
| 6 | स्थायी समीती मंजूरी | ठराव / आदेशाची प्रत उपलब्ध नाही. |
| 7 | कामाची मुदत | वार्ड क्रं. 21 (1) महिणा व वार्ड क्रं.12 व 2 (4) महिणे |
| 8 | मोजमाप पुस्तक क्रमांक | उपलब्ध नाही |
| 9 | काम पुर्ण दिनांक | वार्ड क्रं. 21 व 12 चे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नाही , वार्ड क्रं.2 दि. 22/07/2012 |
| 10 | काम मुदतीत पुर्ण आहे | वार्ड क्रं. 21 व 12 चे कामाची खात्री करता आली नाही , वार्ड क्रं.2 चे काम मुदतीत पुर्ण नाही. |
| 11 | जिल्हा दर सुची वर्ष | वार्ड 21 नमुद नाही व वार्ड 12 सन 2011-12, वार्ड क्रं. 2 सन 2006-07 |
| 12 | तांत्रीक मान्यता | वार्ड 21-का.अ. ,मनपा धुळे अ.क्रं.419 दि.05/02/11 रु.163085 , वार्ड 12-का.अ. ,मनपा धुळे अ.क्रं.113 दि. 23/06/11 रु.1528230 , वार्ड 2- का.अ. ,मनपा धुळे अ.क्रं. 309 दि.23/12/10 रु.805809 |
| 13 | निविदा रक्कम | वार्ड 21 – रु. 163085 , वार्ड 12 - रु. 1528230 व |
| 14 | मंजूर निविदा तपशील | वार्ड 2 - रु.805809 |
| 15 | करारनामा | वार्ड 21 महर्षी वाल्मीक ब.उ.बे.से.स.सं.म. धुळे , अंदाजपत्रकीय दराचे 3 टक्के जादा दराने |
| 16 | कार्यादेश | वार्ड 12 व 2 – संजय डी. गायकवाड. धुळे , अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3 टक्के जादा दराने |

(वार्ड क्रं. 21 चे प्रमाणक क्रंमांक 1561, दिनांक 07/08/2012 व रक्कम 110727 पैकी 10 टक्के रु. 11073 व प्रमाणक क्रं. 3770 दिनांक 28/01/2013 रक्कम रु. 110727 व वार्ड क्रं. 12 चे प्रमाणक क्रंमांक 1510, दिनांक 07/08/2012 रक्कम 133922 व प्रमाणक क्रं. 4282 दिनांक 08/03/2013 रक्कम रु. 500000 आणी वार्ड क्रं. 2 चे प्रमाणक क्रंमांक 4220, दिनांक 05/03/2013 रक्कम 389925)

1. संचिकेत जाहीर निवीदा प्रसिध्दी वृत्तपत्राची प्रत संचीकेत जोडली नाही, संचीकेतील चेकलीस्ट नुसार एकाच वृतपत्रात दैनिक श्रमराज्य दिनांक 20/07/11 मध्ये प्रसीध्दी जाहीर निवीदा प्रत झेरॉक्स संचीकेत जोडली आहे, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. जाहिरात 2009/प्र.क्र.137/ का-34

दि.31/08/2009 नुसार जाहिरातीचे वितरण चक्रीय पध्द्तीने करणे व प्रसीध्दी अधीकार जिल्हा माहिती अधिकारी यांना असुन एक क-वर्ग दैनिक व एक साप्ताहिक मध्ये, आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी.चे प्रमाण लक्षात घेवुन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2. उक्त प्रकरणात वार्ड क्रं. 21 व 12 प्राप्त 3 नीविदाकारांचे नीविदा पाकीटे दिनांक 7/09/11 रोजी व वार्ड क्रं. 2 चे दिनांक 30/09/2011 रोजी एकाच वेळी पाकीट क्रं. 1 व 2 उघडण्यात आले आहेत, निविदाकारांकडुन तांत्रिक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे माविण्यात आले नाहीत, निविदा दोन प्रतित मागवील्या नाहीत, निविदाकारांनी फक्त ठेकेदार नोंदणी / नुतणीकरण प्रमाणपत्राची प्रत जोडली आहे. तसेच तांत्रीक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे, निवीदा बाबतच्या अटी व शर्ती पुर्तता बाबत व्यापारी लिफाफा तुलनात्मक तक्ता व त्यानंतर व्यापारी लिफाफा उघडुन तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर निविदा समीतीच्या अधीकारी यांच्या सहया घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. नगर परिषद संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 36 क्रं.नप्रस/ निविदा मागविणे/ 05/प्र.क्र.151 /05/9, दिनांक 29/12/05 अ.क्रं. 27 मध्ये पात्रता ठरविण्याचे निकष दिलेले आहेत. तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रं.भाखंस 2001/(2949)/ उद्योग-6 दि. 25/06/2002 नुसार "तांत्रिक निविदेचा लिफाफा" मध्ये अत्यावशक कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत व्यापारी लिफाफा उघडण्याणपुर्वी स्वतंत्ररित्या सादर करणे निविदाकारास बंधनकारक राहील अन्यथा निविदा अग्राहय दर्शविण्यात येवून त्याचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येवु नये, असे असताना ठेकेदारांची पात्रता पडताळुन न पहाता सर्वच निविदा धारकाचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आले मुळे सदरची कृती नियमबाहय ठरते.

3. प्रस्तावीत कामास प्रशासकीय मान्यता घेतल्याचे आदेशाची प्रत तसेच ठराव मंजुरीची प्रत सचिकेत नसल्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 162 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4. वार्ड क्रं. 21 व 12 च्या निविदा दि. 7/09/2011 ला ऊघडण्यात आल्या व वार्ड क्रं. 21 चे कामाचे आदेश दि. 21/11/11 व वार्ड क्रं. 12 चे कामाचे आदेश दि. 25/01/12 ला देण्यात आले, आणी वार्ड क्रं. 2 ची निविदा दि.30/09/2011 ला ऊघडून कामाचे आदेश दि.27/12/2011 ला देण्यात आले, निविदा उघडल्यालनंतर जवळपास दोन महिणे विलंबाने कार्यवाही केली. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 171 (6) नुसार व स्थाई निदेश नियम 466 (4) परिशिष्ट तिन - निविदा मागविण्याची आणि स्विकृत करण्याची कार्यपध्दती (36) नुसार निविदा उघडल्यानंतर त्यांची विल्हेवाट लावण्यामध्ये कोणताही टाळता येण्याजोगा विलंब करता येणार नाही. सामान्यपणे ते उघड केल्याच्या दिनांकापासुन एका आठवडयाच्या आत त्यांची विल्हेवाट लावण्यात येईल आणि कोणत्याही परिस्थितीत एका महिण्यापेक्षा अधिक कालावधीत त्याची विल्हेवाट लावणार नाही असे नमुद असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

DRAFT

5. करारनाम्यावर महानगरपालीकेची माहेर वठविण्यात आली नाही. नगर परिषद संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 36 क्रं.नप्रस/निविदा मागविणे/05/प्र.क्र.151/05/9,दिनांक 29/12/05 परिशीष्ट क (15) मध्ये नमुद केलेनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

6. देयकातील दर पडताळणी करणेसाठी दरसुची उपलब्ध न केलेमुळे सदरचे दर जिल्हा दरसुचीप्रमाणे आहेत किंवा नाही याची खात्री करता आली नाही. मुंबई प्रातिंक अधीनियम 1949 चे अनुसुची ड चे प्रकरण 8 मधील 6(1) (2) अन्वये लेखारिक्षणास सर्व कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे हे कर्मचारी यांचे कर्तव्य आहे.

7. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

8. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही, त्यामुळे त्याच त्या प्रभागात एकच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

9. महाराष्ट्र शासन सार्वजनीक बांधकाम विभाग शासन नीर्णय क्रं. सीएटी 07/2006/प्र.क्र. 94/इमारती-2 दिनांक 16/11/2006 नुसार रुपये 15 लक्ष पर्यंतची कामे वीनानीवीदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशीक्षीत बेराजगार अभीयंता यांना देणे, नीर्णय क्रं. सीएसटी 1097/प्र.क्र. 42/ इमारत-2 दि. 29/07/20025 नुसार नोंदणीकृत स्थापत्य सुशीक्षीत बेरोजगार अभीयंता यांना रुपये 25 लक्ष पर्यंतची कामे वीना नीवीदा अंदाजपत्रकीय दराने देणे आवश्यक आहे, व नीर्णय क्रं. सीएसटी/01/प्र.क्र. 26/इमारत-2 दि. 31/05/05 नुसार 5 लक्ष कींमती पर्यंतच्या कामाचे वाटप हे पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांना 34 टक्के, सुशीक्षीत बेराजगार अभीयंता यांना 33 टक्के व मजुर सहकारी संस्थांना 33 टक्के या प्रमाणात वाटप करणे आवश्यक आहे, असे असताना आवश्यक असताना नीवीदा प्रसीध्द करुन काम देण्यात आले आहे. त्यामुळे वार्ड क्रं. 21 चे रु. 3322 व वार्ड क्रं. 12 चे रु. 39006 आणी वार्ड क्रं. 2 चे रु. 22714 रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

10. निविदा विक्री बाबत निविदांना क्रमांक दिलेले नाहीत, विक्रि निविदा व प्राप्त रकमा, निविदा विक्री, इसारा रक्कम, सुरक्षा रक्कम, लोकवर्गणी ई. बाबतची पावतीबुके, नोंदवही व इतिवृत लेखापरिक्षणास दर्शविण्यात आली नाही तसेच वृत्तपत्रे निविदा जाहिरात, वृत्तपत्रक जाहिरात देयके तपासणीस उपलब्ध केले नाहीत याशीवाय नियमानुसार देयकातील सर्व कपाती रकमाचा चलनव्दारे भरणा केलेले चलन लेखापरिक्षणास दर्शविण्यात आले नाहीत. महाराष्ट्रत नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 79 नुसार उक्त नमुद अभीलेख लेखापरिक्षणास दर्शविणे आवश्यक आहे.

11. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 135 सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद

करण्यात येईल आणि अशी कामे महिण्यातून किमान एकदा नगर अभियंत्या कडून तपासण्यात येतील आणि मोजमाप पुस्तकामध्ये त्याची सही असेल. मोजमाप पुस्तकातील वित्तीय हिशोबांची नगर अभियंत्यांच्या कार्यालयाकडुन आणि लेखा विभागाकडुन तपासणी करण्यात येईल असे नमुद आहे परंतु मोजमाप पुस्तीका उपलब्ध नसलेने तशी खात्री करता आली नाही.

12. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 138 मोजमाप पुस्तक् अनुक्रमांकीत करण्यात येईल व मोजमाप पुस्ततकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमुद करुन त्यावर लेखापाल व लेखापरिक्षक स्वाक्षरी करतील असे निर्देश आहे परंतु मोजमाप पुस्तीवका उपलब्ध नसलेने तशी खात्री करता आली नाही.

13. महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्रं. विमास-1098/प्र.क्र.28/98/ शासन हमी दि.19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडेच करावा, तसेच नगर विकास विभाग पत्रक क्रं. जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 दि. 03/11/2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा वार्ड क्रं. 21 चा रु.1107 व वार्ड क्रं. 12 चा रु.6340 व वार्ड क्रं. 2 चा रु. 3899 एकुण 11346 वसुल करुन भरणा करणे आवश्यक आहे.

14. शासन निर्णण उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रं. बीसिए 2009/प्र.क्र.108/कामगार-7अ दिनांक नुसार देयकातुन बांधकाम मुल्याच्या 1 टक्का कामगार कल्याण उपकर वसुल करण्यात आलेला नाही, तरी वार्ड क्रं. 21 चा रु. 1107 व वार्ड क्रं. 12 चा रु. 6340 व वार्ड क्रं. 2 चा रु. 3899 एकुण 11346 वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

15. मोजमाप पुस्तीका तपासणीस उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रमाणपत्र नोंदवुन त्यावर सक्षम अधिका-यांच्या सहया व शिक्के घेतले, मोजमापे प्रत्यदक्षात करणा-या अधिका-याने दिनांकीत सही केली, आणि नोंद केलेल्या मोजमापाचा स्वीकार केल्याचे प्रतिक म्हणून कंत्राटदाराची सही मिळवीली कींवा कसे याबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम नियमावली मधील परिच्छेद 24(11) नुसार कामाचे मोजमाप उप अभीयंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभीयंता यांनी 5 टक्के प्रत्यक्ष बाबनिहाय तारखेसह करणे आवश्यक आहे.

16. वार्ड क्रं. 21 चे देयक प्रमाणक क्रं 1561 दिनांक 7/8/12 एकुण देयक रु. 110727 पैकी 10 टक्के प्रदान रु. 11073 व प्र.क्रं. 3770 दि. 28/1/13 रु. 110727 व वार्ड क्रं. 12 चे देयक प्रमाणक क्रं 1510 दिनांक 7/8/12 एकुण देयक रु. 133922 प्रत संचिकेत आहे, प्रमाणक क्रं. 4282, दिनांक 08/03/2013 रुपये 500000 देयकाचे प्रमाणकावर देयक मंजुरी सहया घेण्यात आल्या नाहीत, तसेच देयकावर कंत्राटदार यांना रक्कम प्रदानाबाबत सही घेतली नाही. संचीकेतील तपशीलानुसार वार्ड क्रं.21 चे काम रु. 110727 चे झाले असुन यापैकी दिनांक 7/8/12 ला रु. 11073 रक्कम प्रदान केलेली आहे, सदरची रक्कम दिनांक 28/1/13 चे देयकातुन वजा करुन उर्वरित देयकाची रक्कम प्रदान करणे आवश्यक असताना केलेल्या कामापेक्षा जादा रु. 11073 रक्कम प्रदान झाली आहे. वार्ड क्र. 2 चे देयक प्रमाणक क्रं. 4220 दिनांक 05/03/2013 रु. 389925 देयकाचे प्रमाणकावर देयक मंजुरी सहया घेण्यात आल्या

DRAFT

नाहीत, तसेच देयकावर कंत्राटदार यांना रक्कम प्रदानाबाबत सही घेतली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 166 नुसार प्रदान देयकावर प्रदान केल्यानंतर "देण्यात आले व रद्द केले" अशी अक्षरे पृष्ठांकीत करुन नियम 182 नुसार देय प्रदानाची पावती घेण्यात येईल व पावतीवर दिनांक व यथोचीत मुद्रांक लावण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 147 नुसार नमुना 64 मध्ये प्रदान प्रमाणक तयार करतील आणि त्याच्या अचुकपणाबद्ल व खरेपणाबद्दल टोकनमध्ये सही करुन देयकांचे संपूर्ण तपशील, अनुज्ञेयता, वजाती व अर्थसंकल्पीय शीर्ष, दिनांकपर्यंत मंजूर करण्यात आलेली व वापरण्यात आलेली अर्थसंकल्पाची एकूण रक्कम, याची देखील प्रदान प्रमाणका मध्ये नोंद घेण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

17. वार्ड क्रं. 21 चे देयकात अंदाजपत्रकात नमुद नसलेले काम रुपये 23927 जादा केले आहे. कामाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा अधीक रकमेचे काम झाले असलेमुळे त्यातस मंजुरी घेणे आवश्यक आहे, याबाबतचे अभिलेख दर्शवीण्यात यावे.

18. कामे मुदतीत काम पुर्ण केले किंवा नाही याबाबत काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नसलेमुळे खात्री करता आली नाही, जर कामे मुदतीत पुर्ण नसतील तर नियमानुसार दंडाची रक्कम आकारुन देयकातुन वजा करणे आवश्यक आहे.

19. धुळे महानगरपालिका जकात नियम 2005 नुसार महानगरपालिका हद्दीत वापर, उपयोग व विक्री किंवा इतर कारणाकरीता आयात करण्यात येणा-या मालावर महानगरपालिका जकात आकारतील असे नमुद असताना जकात रक्कम देयकातुन वसुन केली नाही. जकात वसुल करुन मनपा निधीमध्ये भरणे आवश्यक आहे.

20. निवीदे सोबत ठेकेदाराने व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र जोडले नसल्यामुळे शासन अधीसुचना दिनांक 4/4/2012 नुसार वार्ड क्रं. 21 चे देयकातुन 5 टक्के व्हॅट रक्कम कपात करणे आवश्यक असताना 4 टक्के व्हॅट रक्कम कपात केली असलेमुळे उर्वरित 1 टक्के रक्कम ठेकेदाराकडुन रु. 1107, वार्ड क्रं. 12 चे देयकातुन 5 टक्के व्हॅट रक्कम कपात करणे आवश्यक असताना 2 टक्के कपात केली असलेमुळे उर्वरीत 3 टक्के रक्कम रु. 15000 व वार्ड क्रं. 2 चे देयकातुन 5 टक्के व्हॅट रक्कम कपात करणे आवश्यक असताना 2 टक्के कपात केली असलेमुळे उर्वरीत 3 टक्के रक्कम रु. 11698 एकुण रु. 27805 वसुल करुन चलनव्दारे भरणा करणे आवश्यक आहे.

21. वार्ड क्रं. 12 मध्ये दोन अंदाजपत्रके जोडली आहेत, एक जिल्हा दरसुची नुसार व एक एमजीपी दरसुचीनुसार असुन दोन्ही अंदाजपत्रकावर मंजुरी सहया असून एक दि. 23/06/11 व दुसरे 29/6/11 रोजी मंजुर केले असुन दोन्हीवर अ.क्रं. एकच 113 नोंदवीला आहे. अंदाजपत्रकात बाब क्रं. 15 मध्ये दर रु. 4289.25 असून देयक आकारणीत रु. 2440 लावला आहे, त्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही.

22. वार्ड क्रं.2 चे प्राकलनात नमुद नसलेले जादा रुपये 34903 व 4158 एकुण 39061 जादा काम केले आहे. वाढीव कामाबाबत नियमा प्रमाणे मान्यता घेण्यात आलेली नाही, यामुळे जादा रक्कम प्रदानास

व जास्तीचे कामास मुंबई मनपा कलम 68 ई नुसार स्थायी समीतीची मान्यता घेणे, सा.बां.विभाग नियम पुस्तीका नियम 227 व मनपा लेखासंहीता 1971नियम 162(1) व 167(4) नुसार सक्षम प्राधीका-याची पुर्व मान्यता घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

23. वार्ड क्रं.2 चे कामाची मुदत चार महीणे होती, त्यानुसार काम 27/4/12 पर्यंत काम पुर्ण होणे आवश्यक असताना मुदतीत काम पुर्ण केले नाही, त्या मुळे नियमानुसार दंडाची रक्कम आकारुन देयकातुन वजा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. अर्धसमास पत्र क्रं. 75 दिनांक 26/11/2015 वअर्धसमास पत्र क्रं. 77, 76 दिनांक 27/11/2015 देवुन अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी अभिप्राय प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

REVSSSM5909 (Ref No : 77)

## *53 धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 12 जुना प्रभाग शिवाजी नगर भागात नवीन अेसी प्रेशन पाईप लाईन टाकणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 18**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा मनापा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 180960.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 174771.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 6189.00/-

***निविदा प्रसिध्दी व निविदा कार्यवाही नियमानुसार न करणे, प्रशासकीय आदेश न काढणे, ठराव मंजुरी प्रत संचिकेत न लावणे, निविदा मंजुरी विलंबाने करणे, अंदाजपत्रकीय दराचे 8 टक्के जादा दराने कामास मंजुरी देणे, अंदाजपत्रक बेरीज ई. चुक दर्शविणे, दरसुची पडताळणीस उपलब्ध न करणे, पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध नसलेबाबत प्रमाणपत्र न घेणे, विहित नोंदवहयामध्ये नोंदी न घेणे, वसुली पावती व चलन पडताळणीस उपलब्ध न करणे, मोजमाप पुस्तीका उपलब्ध न करणे, कामाचा विमा व कामगार उपकर रक्कम, जकात वसुली रक्कमा देयकातुन कपात न करणे, व्हॅट रक्कम कमी कपात करणे, देयकावर नियमानुसार नोंदी व सहया न घेणे, ई.***

| अ.क्रं. | बाब | तपशील |
|---|---|---|
| 1 | लेखा शिर्ष | मनपा निधी |
| 2 | प्रशासकीय मान्यता | आदेशाची प्रत संचिकेत उपलब्ध नाही |



DRAFT

| | | |
|---|---|---|
| 3 | तांत्रीक मान्यता | का.अ. , मनपा धुळे अ.क्रं. 449 दि. 18/01/2008 रु. 450113 |
| 4 | निविदा रक्कम | रु. 450113 |
| 5 | निविदा प्रकार | जाहिर निविदा |
| 6 | निविदा प्रसिध्दी व कालावधी | वृत्तपत्र नाही. |
| 7 | प्राप्त निविदा | तीन |
| 8 | मंजूर निविदा तपशील | मे. महाले कन्ट्रक्शन धुळे , अंदाजपत्रकीय दराचे 8 टक्के जादा दराने |
| 9 | स्थायी समीती मंजुरी | ठराव / आदेशाची प्रत उपलब्ध नाही. |
| 10 | कार्यादेश | क्रं.धुमपा/पापु 8/2008-09 दि. 15/07/08 |
| 11 | कामाची मुदत | 6 महिणे |
| 12 | काम पुर्ण दिनांक | |
| 13 | काम मुदतीत पुर्ण आहे | नाही |
| 14 | करारनामा | रु. 100 बॉंडवर , दि. नमुद नाही |
| 15 | जिल्हा दर सुची वर्ष | |
| 16 | मोजमाप पुस्तक क्रमांक | उपलब्ध नाही |

DRAFT

(प्रमाणक क्रंमांक 2327, दिनांक 21/11/2008 व रक्कम 85614 व प्रमाणक क्रं. 3772 दिनांक 28/01/2013 रक्कम 180960)

1. संचिकेत जाहीर निवीदा प्रसिध्दी वृत्तपत्राची प्रत संचीकेत जोडली नाही, संचीकेतील चेकलीस्ट) नुसार एकाच वृतपत्रात दैनिक सकाळ दिनांक 03/04/08 मध्ये प्रसीध्दी जाहीर निवीदा प्रत झेरॉक्स संचीकेत जोडली आहे, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. जाहिरात 2009/प्र.क्र.137/ का-34 दि.31/08/2009 नुसार जाहिरातीचे वितरण चक्रीय पध्द्तीने व वितरणाचे अधिकार जिल्हा माहिती अधिकारी यांना असुन एक क-वर्ग दैनिक व एक साप्ताहिक मध्ये, आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी.चे प्रमाण लक्षात घेवुन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात

आलेली नाही.

2. प्राप्त 3 नीविदाकारांच्या नीविदा पाकीटे दिनांक 13/05/08 रोजी एकाच वेळी म्हणजे 5.00 वाजता पाकीट क्रं. 1 व 2 उघडण्यात आले आहेत, यावरुन पहील्यावेळी पाकीट क्रं. 1 व त्यानंतर पाकीट क्रं. 2 उघडण्यात आले नसल्याचे स्पष्ट होते, निविदाकारांकडुन तांत्रिक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे माविण्यात आले नाहीत, निविदा दोन प्रतित मागवील्या नाहीत, निविदाकारांनी फक्त ठेकेदार नोंदणी / नुतणीकरण प्रमाणपत्राची प्रत जोडली आहे. तसेच तांत्रीक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे, निवीदा बाबतच्या अटी व शर्ती पुर्तता बाबत व्यापारी लिफाफा तुलनात्मक तक्ता व त्यानंतर व्यापारी लिफाफा उघडुन तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर निविदा समीतीच्या अधीकारी यांच्या सहया घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. नगर परिषद संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 36 क्रं.नप्रस/ निविदा मागविणे/ 05/प्र.क्र.151 /05/9,दिनांक 29/12/05 अ.क्रं. 27 मध्ये पात्रता ठरविण्याचे निकष दिलेले आहेत. तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रं.भाखंस 2001/(2949)/ उद्योग-6 दि. 25/06/2002 नुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफयासोबत सादर करणे शक्य झाले नाही तर ती कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत व्यापारी लिफफा उघडण्याणपुर्वी स्वतंत्ररित्या सादर करणे निविदाकारास बंधनकारक राहील अन्यथा निविदा अग्राहय दर्शविण्यात येवून त्याचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येवु नये, असे असताना ठेकेदारांची पात्रता पडताळुन न पहाता सर्वच निविदा धारकाचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आले मुळे सदरची कृती नियमबाहय ठरते.

3. प्रस्तावीत कामास प्रशासकीय मान्यता घेतल्याचे आदेशाची प्रत तसेच ठराव मंजुरीची प्रत सचिकेत नसल्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही. सार्वजनीक बांधकाम विभाग परिच्छेद 132 व 133 नुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम अभीयंत्याची तांत्रीक मान्यता घेणे आवश्यक आहे, तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 162 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4. निविदा दि. 13/05/2008 ला उघडण्यात आले, दिनांक 11/06/08 ला नीवीदा दर सादर केले, न्युनतम निविदाकारास वाटाघाटीसाठी पत्र दिल्याचे संचिकेत नाही, निविदाकार यांनी दि. 03/06/08 ला कार्यालयास दिलेले पत्र दि. 4/6/08 रोजी दाखल केल्याचा आवक शिक्का पत्रावर आहे व न्युनतम निविदाकार यांनी अंदाजपत्रक दराचे 8 टक्के जादा दराने काम करण्यास तयार असल्याचे पत्रात नमुद केले आहे, करारनामा केल्याची तारीख करारनाम्यावर नमुद नाही, कामाचे आदेश दि. 15/07/08 ला देण्यात आले, निविदा उघडल्यानंतर जवळपास दोन महिणे विलंबाने कार्यवाही केली. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 171 (6) नुसार व स्थाई निदेश नियम 466 (4) परिशिष्ट तिन - निविदा मागविण्याची आणि स्विकृत करण्याची कार्यपध्दती (36) नुसार निविदा उघडल्यानंतर त्यांची विल्हेवाट लावण्यामध्ये कोणताही टाळता येण्याजोगा विलंब करता येणार नाही. सामान्यपणे ते उघड केल्याच्या दिनांकापासुन एका आठवडयाच्या आत त्यांची विल्हेवाट लावण्यात येईल आणि कोणत्याही परिस्थितीत एका महिण्यापेक्षा अधिक कालावधीत त्याची विल्हेवाट लावणार नाही असे

DRAFT

नमुद असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5. करारनाम्यावर दिनांक व महानगरपालीकेची माहेर वठविण्यात आली नाही. नगर परिषद संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 36 क्रं.नप्रस/ निविदा मागविणे/ 05/प्र.क्र.151 /05/9,दिनांक 29/12/05 परिशीष्ट क (15) मध्ये नमुद केलेनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

6. देयकातील दर पडताळणी करणेसाठी एमजीपी दरसुची सन 2006-07 उपलब्ध न केलेमुळे सदरचे दर जिल्हा दरसुचीप्रमाणे आहेत किंवा नाही याची खात्री करता आली नाही. मुंबई प्रातिंक अधीनियम 1949 चे अनुसुची ड चे प्रकरण 8 मधील 6(1) (2) अन्वये लेखापरिक्षणास सर्व कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे कर्मचारी यांचे कर्तव्य आहे.

उपरोक्त बाबींचे अनुपालन सादर करुन अशी अनावश्यक / नियमबाहय अग्रिम प्रदाने होणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. रक्कम रुपये 532500/- संबंधितांकडून वसुल करुन पुर्तता दर्शवावी.

म.न.पा.निधी

वसुलपात्र रक्कम रु. 532500/-

FDSRKNM8201 (Ref No : 67)

## *98 धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 58 मध्ये दुध डेअरी चौक लक्ष्मी वाडी भागात नविन 160 व 200 एमएम एचडीपीई पाईप लाईन टाकणे बाबतचे कामातील अनियमीतता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 19**

*लेखा शीर्ष : नविन पाईप लाईन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1058424.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1005503.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 52921.00/-

***निविदा प्रसिध्दी व निविदा कार्यवाही नियमानुसार न करणे, प्रशासकीय आदेश न काढणे, ठराव मंजुरी प्रत संचिकेत न लावणे, अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने कामास मंजुरी देणे, निविदा मंजुरी विलंबाने करणे, दरसुची पडताळणीस उपलब्ध न करणे, पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध नसलेबाबत प्रमाणपत्र न घेणे, विहित नोंदवहयामध्ये नोंदी न घेणे, अंदाजपत्रक परिपुर्ण व अचुक न करणे, वसुली पावती व चलन पडताळणीस उपलब्ध न करणे, रु.15 ते 25 लक्ष पर्यंतचे कामे विनानिविदा करणे, मोजमाप पुस्तीका उपलब्धे न करणे, साहित्य चाचणी शासकीय संस्थेकडुन न करणे, कामाचा विमा व कामगार***

DRAFT

***उपकर रक्कम, जकात वसुली रक्कमा देयकातुन कपात न करणे, व्हॅट रक्कम कमी कपात करणे, देयकावर नियमानुसार नोंदी व सहया न घेणे, ई.***

(प्रमाणक क्रंमांक 437, दिनांक 03/05/2012 व रक्कम 1058424)

| अ.क्रं. | बाब | तपशील |
|---|---|---|
| 1 | लेखा शिर्ष | नविन पाईप लाईन |
| 2 | प्रशासकीय मान्यता | आदेशाची प्रत संचिकेत उपलब्ध नाही |
| 3 | तांत्रीक मान्यता | का.अ., मनपा धुळे अ.क्रं.387 दि.18/01/2010 रु.974897 |
| 4 | निविदा प्रकार | जाहिर निविदा |
| 5 | निविदा प्रसिध्दी व कालावधी | दि.22/07/2011 ते 18/08/2011 निविदा स्विकारणे दि. 23/08/11, श्रमराज्य 20/07/2011 |
| 6 | प्राप्त निविदा | तिन |
| 7 | मंजूर निविदा तपशील | हर्ष कन्ट्रक्शन धुळे, अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3 टक्के जादा दराने |
| 8 | स्थायी समीती मंजुरी | ठराव / आदेशाची प्रत उपलब्ध नाही. |
| 9 | कार्यादेश | क्रं.धुमपा/पापु-79/2011-12 दि. 26/12/2011 |
| 10 | कामाची मुदत | 4 महिणे |
| 11 | काम पुर्ण दिनांक | 28/03/2012 |
| 12 | काम मुदतीत पुर्ण आहे | - |
| 13 | करारनामा | रु. 100 बॉडवर, सही खालील दि. 16/12/2011 |
| 14 | जिल्हा दर सुची वर्ष | 2010-11 |
| 15 | मोजमाप पुस्तक क्रमांक | उपलब्ध नाही |

DRAFT

धुळे महानगरपालिकेचे सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात वार्ड क्रं. 58 मध्ये दुध डेअरी चौक लक्ष्मीवाडी भागात नविन 160 व 200 एमएम एचडीपीई पाईप लाईन टाकणे कामाचे उपलब्ध अभिलेख्यात आढळुन आलेल्या कामातील अनियमीतता बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. संचिकेत जाहीर निवीदा प्रसिध्दी वृत्तपत्राची प्रत जोडली नाही, संचीकेत एकाच वृतपत्रात श्रमराज्य दिनांक 20/07/11 मध्ये प्रसीध्दी बाबत जाहीर निवीदा प्रत झेरॉक्स जोडली आहे, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. जाहिरात 2009/प्र.क्र.137/ का-34 दि.31/08/2009 नुसार जाहिरातीचे वितरण शासनमान्य दराने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत चक्रीय पध्द्तीने (रोटेशन) करणे बंधनकारक आहे. तसेच जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु. 20 लक्षापर्यंत आहे त्याचे वितरणाचे अधिकार जिल्हा माहिती अधिकारी यांना असुन एक क-वर्ग दैनिक व एक साप्ताहिक मध्ये, आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी.चे प्रमाण लक्षात घेवुन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2. प्राप्त 3 नीविदाकारांची नीविदा पाकीटे दिनांक 06/09/11 रोजी एकाच वेळी पाकीट क्र. 1 व 2 उघडण्यात आले आहेत, निविदाकारांकडुन तांत्रिक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे माविण्यात आले नाहीत, निविदेसोबत फक्त कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र अथवा सुशिक्षीत बेराजगार अभियंता नुतणीकरण प्रमाणपत्र प्रती जोडलेल्या आहेत, नुतणीकरण प्रमाणपत्रे हर्ष कन्ट्रक्शन यांचे दि. 22/07/12 पर्यंत, सचीन दीक्षीत यांचे दि. 13/01/12 पर्यंत व विजय गवळी यांचे दि. 19/10/11 पर्यंत नुतणीकरण केलेले आहेत, त्यापुढील नुतणीकरण केलेच्या प्रमाणपत्राच्या प्रति घेण्यात आलेल्या नाहीत.

3. निविदा दोन प्रति मागवील्या नाहीत, तांत्रीक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे, निवीदा बाबतच्या अटी व शर्ती पुर्तता बाबत व्यापारी लिफाफा तुलनात्मक तक्ता व त्यानंतर व्यापारी लिफाफा उघडुन तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर निविदा समीतीच्या अधीकारी यांच्या सहया घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. नगर परिषद संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 36 क्रं.नप्रस/ निविदा मागविणे/ 05/प्र.क्र.151 /05/9,दिनांक 29/12/05 अ.क्रं. 27 मध्ये पात्रता ठरविण्याचे निकष दिलेले आहेत. तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रं.भाखंस 2001/(2949)/ उद्योग-6 दि. 25/06/2002 नुसार "तांत्रिक निविदेचा लिफाफा" मध्ये अत्यावशक कागदपत्रात आयकर नोंदणी बाबतचे क्रमांक दर्शविणारे निविदाकाराने दिलेले साक्षांकित प्रमाणपत्र, विक्रीकर नोंदणीबाबतचा क्रमांक दर्शविणारे निविदाकाराने दिलेले साक्षांकीत प्रमाणपत्र, आयकर आणि विक्रीकर निपटारा प्रमाणपत्र मिळण्यासाठी सक्षम अधिका-याकडे केलेल्या अर्जाची पोहोंच पत्राची प्रमाणित प्रत, यापैकी कागदपत्रे तांत्रिक लिफाफयासोबत सादर करणे शक्य झाले नाही तर ती कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत व्यापारी लिफाफा उघडण्याणपुर्वी स्वतंत्ररित्या सादर करणे निविदाकारास बंधनकारक राहील अन्यथा निविदा अग्राहय दर्शविण्यात येवून त्याचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येवु नये, असे



DRAFT

असताना ठेकेदारांची पात्रता पडताळुन न पहाता सर्वच निविदा धारकाचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आले मुळे सदरची कृती नियमबाहय ठरते.

4. प्रस्तावीत कामास प्रशासकीय मान्यता घेतल्याचे आदेशाची प्रत तसेच ठराव मंजुरीची प्रत सचिकेत नसल्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 162 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5. निविदा दि. 06/09/2011 ला उघडण्यात आल्या, न्युनतम निविदाकारास वाटाघाटीसाठी 19/10/11 ला पत्र देसुन दि. 21/10/11 ला बोलावले व निविदाकार यांनी दि. 14/11/11 ला कार्यालयास पत्राव्दारे अंदाजपत्रक दराचे 3 टक्के जादा दराने काम करण्यास तयार असल्याचे नमुद केले आहे, करारनामा केल्याची तारीख करारनाम्यावर नमुद नाही, करारनाम्यावरील सही खालील तारीख 16/12/11 असुन कामाचे आदेश दि. 26/12/11 ला देण्यात आले, म्हणजे निविदा उघडल्यानंतर जवळपास साडेतीन महिणे विलंबाने कार्यवाही केली. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 171 (6) नुसार व स्थाई निदेश नियम 466 (4) परिशिष्ट तिन - निविदा मागविण्याची आणि स्विकृत करण्याची कार्यपध्दती (36) नुसार निविदा उघडल्यानंतर त्यांची विल्हेवाट लावण्यामध्ये कोणताही टाळता येण्याजोगा विलंब करता येणार नाही. सामान्यपणे ते उघड केल्याच्यां दिनांकापासुन एका आठवडयाच्या आत त्यांची विल्हेवाट लावण्यात येईल आणि कोणत्याही परिस्थितीत एका महिण्यापेक्षा अधिक कालावधीत त्याची विल्हेवाट लावणार नाही असे नमुद असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

6. देयकातील दर पडताळणी करणेसाठी एमजीपी दरसुची सन 2010-11 उपलब्ध न केलेमुळे सदरचे दर जिल्हा दरसुचीप्रमाणे आहेत किंवा नाही याची खात्री करता आली नाही. मुंबई प्रांतिक अधीनियम 1949 चे अनुसुची ड चे प्रकरण 8 मधील 6(1) (2) अन्वये लेखारिक्षणास सर्व कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे हे कर्मचारी यांचे कर्तव्य आहे.

7. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

8. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही, त्यामुळे त्याच त्या प्रभागात एकच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

9. महाराष्ट्र शासन सार्वजनीक बांधकाम विभाग शासन नीर्णय क्रं. सीएटी 07/2006/प्र.क्र.



DRAFT

94/इमारती-2 दिनांक 16/11/2006 नुसार रुपये 15 लक्ष पर्यंतची कामे वीनानीवीदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशीक्षीत बेराजगार अभीयंता यांना देणे, नीर्णय क्रं. सीएसटी 1097/प्र.क्र. 42/ इमारत-2दि. 29/07/20025 नुसार नोंदणीकृत स्थापत्य सुशीक्षीत बेरोजगार अभीयंता यांना रुपये 25 लक्ष पर्यंतची कामे वीना नीवीदा अंदाजपत्रकीय दराने देणे आवश्यक आहे, व नीर्णय क्रं. सीएसटी/01/प्र.क्र. 26/इमारत-2दि.31/05/05 नुसार 5 लक्ष कींमती पर्यंतच्या कामाचे वाटप हे पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांना 34 टक्के, सुशीक्षीत बेराजगार अभीयंता यांना 33 टक्के व मजुर सहकारी संस्थांना 33 टक्के या प्रमाणात वाटप करणे आवश्यक आहे, असे असताना आवश्यक असताना नीवीदा प्रसीध्द करुन काम देण्यात आले आहे.

10. निविदा विक्री बाबत निविदांना क्रमांक दिलेले नाहीत, विक्रि निविदा व प्राप्त रकमा, निविदा विक्री, इसारा रक्कम, सुरक्षा रक्कम, लोकवर्गणी ई. बाबतची पावतीबुके, नोंदवही व इतिवृत लेखापरिक्षणास दर्शविण्यात आली नाही तसेच वृत्तपत्रे निविदा जाहिरात, वृत्तपत्रक जाहिरात देयके तपासणीस उपलब्ध केले नाहीत याशीवाय नियमानुसार देयकातील सर्व कपाती रकमाचा चलनव्दारे भरणा केलेले चलन लेखापरिक्षणास दर्शविण्यात आले नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 79 नुसार उक्त नमुद अभीलेख लेखापरिक्षणास दर्शविणे आवश्यक आहे.

11. महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्रं. विमास-1098/प्र.क्र.28/98/ शासन हमी दि.19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडेच करावा, तसेच नगर विकास विभाग पत्रक क्रं. जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 दि. 03/11/2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा व कामगार विमा उतरविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे रुपये 10584 वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यकक आहे.

12. शासन निर्णण उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रं. बीसिए 2009/प्र.क्र.108/कामगार-7अ दिनांक नुसार देयकातुन बांधकाम मुल्याच्या 1 टक्का कामगार कल्याण उपकर वसुल करण्यात आलेला नाही, तरी तो वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. त्यातमुळे रुपये 10584 वसुल करुन कामगार कल्याण उपकर रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

13. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसुचना दि. 06/08/2012 व मुंबई महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 च्या नियम 27 मधील उपनियम 5 नुसार सदर कामाच्या देयकातुन 0.25% स्थानिक संस्था कर / जकात वसुल करुन मनपा निधीमध्ये भरणे आवश्यक आहे.

14. मोजमाप पुस्तीका तपासणीस उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रमाणपत्र नोंदवुन त्यावर सक्षम अधिका-यांच्या सहया व शिक्के घेतले, मोजमापे प्रत्यक्षात करणा-या अधिका-याने दिनांकीत सही केली, आणि नोंद केलेल्या मोजमापाचा स्वीकार केल्याचे प्रतिक म्हणून कंत्राटदाराची सही मिळवीली

DRAFT

कींवा कसे याबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम नियमावली मधील परिच्छेद 24(11) नुसार कामाचे मोजमाप उप अभीयंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभीयंता यांनी 5 टक्के प्रत्यक्ष बाबनिहाय तारखेसह करणे आवश्यक आहे.

15. देयक प्रमाणक क्रं 437 दिनांक 03/05/12 रुपये 1058424 प्रत संचिकेत आहे, देयकाचे प्रमाणकावर देयक मंजुरी सहया घेण्यात आल्या नाहीत, तसेच देयकावर कंत्राटदार यांना रक्कम प्रदानाबाबत सही घेतली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 166 नुसार प्रदान देयकावर प्रदान केल्यानंतर "देण्यात आले व रद्द केले" अशी अक्षरे पृष्ठांकीत करुन नियम 182 नुसार देय प्रदानाची पावती घेण्यात येईल व पावतीवर दिनांक व यथोचीत मुद्रांक लावण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 147 नुसार नमुना 64 मध्ये प्रदान प्रमाणक तयार करतील आणि त्याच्या अचुकपणाबद्ल व खरेपणाबद्दल टोकनमध्ये सही करुन देयकांचे संपूर्ण तपशील, अनुज्ञेयता, वजाती व अर्थसंकल्पीय शीर्ष, दिनांकपर्यंत मंजूर करण्यात आलेली व वापरण्यात आलेली अर्थसंकल्पाची एकूण रक्कम, याची देखील प्रदान प्रमाणका मध्ये नोंद घेण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

16. तांत्रीक मान्यता रु. 974897 घेण्यात आली असून कामावर रु. 1058424 खर्च झाला आहे, त्यामुळे जास्तीची रक्कम रु. 83527 ला मंजुरी घेणे आवश्यक आहे. तसेच अंदाजपत्रकासोबतचे मेजरमेंट शीट मध्ये बाब क्रं. 20 समावीष्ट करण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकातील बाब क्रं. 1 व 5 चे काम अंदाजपत्रकापेक्षा अनुक्रमे 93.96 व 94.62 टक्के जादा करण्यात आले असुन बाब क्रं. 8 मधील दर मंजूर रु. 46018 व बाब क्रं. 13 मधील दर मंजुर रु. 3969 ची बाब अंदाजपत्रकात समावीष्ट नसताना सदरचे काम झाल्याचे व देयकात आकारणी केल्याचे दिसून येते. प्राकलनात नमुद साहित्य / कामापेक्षा बाब क्रं. 1 व 5 चे काम 10 टक्के पेक्षा जादा केले आहे. वाढीव कामाबाबत नियमा प्रमाणे मान्यता घेण्यात आलेली नाही, यामुळे जादा रक्कम प्रदानास व जास्तीचे कामास मुंबई मनपा कलम 68 ई नुसार स्थायी समीचीची मान्यता घेणे, सा.बां.विभाग नियम पुस्तीकानियम 227 व मनपा लेखासंहीता 1971नियम 162 (1) व 167 (4) नुसार सक्षम प्राधीका-याची पुर्व मान्यता घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

17. निविदेतील अटी व शर्ती नुसार पाईपची तांत्रीक तपासणी करणे आवश्यक आहे, सदरची तांत्रीक तपासणी शासकीय यंत्रनेकडुन करण्यात आलेली नाही. सार्वजनीक बांधकाम विभाग परिपत्रक क्रं. 2004/प्र.क्र. 109/रा.म. 2 दि. 22/03/2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थ्‌ेकडुन घेणे आवश्यक आहे.

18. निविदेसोबत व्हॅट प्रमाणपत्र जोडले नसलेमुळे व्हॅट 5 टक्के कपात करणे आवश्यक असताना 2 टक्के कपात करण्यात आली आहे, त्यामुळे शासन अधसुचना दिनांक 4/4/2012 नुसार उर्वरीत रक्केम

DRAFT

रु. 31753 वसुल करुन चलनव्दारे भरणा करणे आवश्यक आहे.

19. करारनामा रु. 100 चे स्टँप पेपरवर करण्यात आला आहे, सदरचे काम रुपये 10 लाखाचे वर झालेमुळे मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 मधील तरतुदीनुसार 10 लाखाचे वरील प्रत्येक 1 लाखापर्यंत रु. 100 घेणेबाबत नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दि. 20/07/2009 नुसार घेणे आवश्यक आहे.

20. निविदा निविदाकारांच्या उपस्थितीत किंवा त्यांच्या अधिकृत अभिकर्त्यांच्या उपस्थितीत मुख्य अधिका-याकडुन किंवा समितीच्या कोणत्याही दोन सदस्यांकडुन उघडण्यात येईल, व तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 134 दिनांक 21/01/2016 देवुन अभिप्राय व अभिलेख मागविण्यात आले होते तथापी समर्पक अभिप्राय व अभिलेखे प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 134)

## *113 जैविक कचरा गोळा करणे व त्याची विल्हेवाट लावणे याकामासाठी अभिकरण संस्था नेमून रॉयल्टी प्राप्त करणे या कामातील अनियमितताबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 06**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***जैविक कचरा गोळा करणे साठी 20 वर्ष कालावधी करिता रॉयल्टी तत्वावर नेमलेल्या अभिकरण संस्थेने आजपर्यंत किती रॉयल्टी रक्कम महानगरपालिकेकडे जमा केली किंवा कसे, तसेच सक्षम प्राधिकाराकडून सन-2012 नंतरचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही, सन- 2012-13 मध्ये संस्थेने कचरा विल्हेवाट कामी केलेला खर्च व प्राप्त शुल्क याचा कोणताही शुल्क सादर न करणे, शहरातील खाजगी दवाखाने व त्यांची खाट संख्या इ. तपशिल आजपर्यत मनपास न देणे, संस्थेवर नियंत्रणाची जबाबदारी मनपाची असतांना उपरोक्त अपूर्णते बाबत कोणतीही कार्यवाही संस्थेवर न केल्याने योजनेची योग्य ती फलश्रृती प्राप्त न केले बाबतची अनियमितता झाली आहे.***

शहरात शासनमान्य वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या रुग्णालये / दवाखाने इत्यादी व्यावसायिकांकडून



DRAFT

त्याचप्रमाणे अशी सेवा देणारे शासकीय रुग्णालये / दवाखाने इत्यादी कडून नियमित निर्माण होणाऱ्या जैविक कचरा (BIOMEDICAL WASTE DISPOSAL) याची विल्हेवाट लावणे या करीता जैविक घातक घन कचरा अधिनियम 1998 नुसार तसेच नगरविकास विभाग यांचे शासन निर्णय क्र.घकव्य/1006/प्र.क्र.53/नवि16 दिनांक. 26/11/2006 मधील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे महानगर पालिका ही चालक व निर्माता (दवाखाने व कचरा विल्हेवाट लावणारी संस्था) यांच्यात मध्यस्थ म्हणून काम करेल व चालकाकडून कचरा निर्माता यांचेकडून विहीत दराने शुल्क आकारुन कचरा विल्हेवाट सेवा समाधानकारक पुरवेल असे नमूद असून त्यापोटी मध्यस्थ म्हणून महानगरपालिका रॉयल्टी आकारेल तसेच सदर कचऱ्याचे संकलन विल्हेवाट इत्यादी बाबींवर पुर्ण नियंत्रण ठेवेल. कोणत्याही परिस्थितीत नागरी संस्था संबंधित कचरा निर्मात्याकडून (दवाखाने) कोणतेही शुल्क आकारणार नाही असे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिकेने जाहीर निविदा मागवून ( सन 2006-07) प्राप्त तीन निविदांपैकी अटी व शर्ती पुर्ण करणारी श्री स्वामी समर्थ इंटरप्रायझेस, धुळे यांची निविदा रक्कम प्राप्त होणाऱ्या निव्वळ नफयावर 10% दराने रॉयल्टी दरमहा महानगरपालिकेस देण्याच्या अटीवर अभिकरण संस्था म्हणून पत्र क्र.धुमपा/आरोग्य/ सीएसआय /115/08-09 दिनांक. 02/06/2008 प्रमाणे पुढील 20 वर्षे कालावधीकरीता अटी व शर्तीसह कार्यादेश दिले आहेत.

इकडील अर्धसमास पत्र क्रमांक- 120 दिनांक- 15/01/2016 अन्वये जैविक कचरा गोळा करणे व विल्हेवाट लावणे याकरीता संबंधित संस्थेकडून अनुज्ञेय ठरणारी 10% इतकी रॉयल्टी रक्कम प्राप्त झाली किंवा कसे याबाबतची माहिती लेखापरीक्षणकामी उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीवरुन संबंधित अभिकरण संस्थेने सन 2008-09 पासून नियमितपणे अनुज्ञेय असणारी रॉयल्टी रक्कम महानगरपालिकेकडे भरणा केल्याचे अढळ होत नाही असे महानगरपालिकेने वेळोवेळी काढलेल्या कारणे दाखवा नोटीस वरुन आढळून आले आहे.

2) संबंधित संस्थेस उपरोक्त अधिनियम/ शासन निर्णय तसेच करारनामा अटी व शर्तीनुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे नाहरकत प्रमाणपत्राचे वेळोवेळी नुतणीकरण करणे आवश्यक असताना सदर संस्थेने मार्च - 2012 नंतर ना हरकत प्रमाणपत्र नुतणीकरण करुन महानगरपालिकेस सादर केलेले नाही. मात्र सन 2012-13 मध्ये ना हरकत प्रमाणपत्र नसतानाही जैविक कचरा उचलणे व विल्हेवाट लावणे सुरु ठेवलेली आहे. यामुळे सदरची संस्था सन 2012-13 करीता लायक होती किंवा कसे याची सत्यता पडताळता आलेली नाही. कार्यादेशातील अटी व शर्ती क्र.5 अन्वये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची मुदत असेपर्यंतच महानगरपालिकेची उक्त कार्यासाठी परवानगी राहणार असल्याने संस्थेने केलेली कार्यवाही नियमबाहय ठरली आहे.

3) संबंधित संस्थेने सन 2012-13 मध्ये जैविक कचरा विल्हेवाट लावणेकामी केलेला खर्च व प्राप्त झालेले शुल्क यांचा कोणताही तपशील आजपावेतो महानगरपालिकेस सादर केलेला नाही. यामुळे अनुज्ञेय असणारी रॉयल्टी रक्कम व प्राप्त रक्कम या महत्वपुर्ण बाबी पडताळता आलेल्या नाहीत.

DRAFT

4) संस्थेने कार्योदेश प्राप्त झाल्यापासून शहरातील एकूण खाजगी/ शासकीय दवाखाने यांचा नावनिहाय तसेच खाटनिहाय अनुज्ञेय ठरणारी रक्कम इत्यादी महत्वपुर्ण तपशिल महानगरपालिकेस सादर केलेला नाही किंवा महानगरपालिकेने तो प्राप्त करुन घेण्यात उदासीनता दाखविली आहे. यामुळे सन 2008-09 अखेर महानगरपालिकेकडे नोंदणीकृत असलेले एकूण 184 दवाखाने प्रमाणे रॉयल्टी प्राप्त झाली किंवा कसे हे पडताळता आलेली नाही.

5) जैविक कचरा विल्हेवाटकामी काम करणाऱ्या संस्थेवर संपुर्ण नियंत्रण महानगरपालिकेचे असल्याने विभागाने याबाबत कोणतेही उचित नियोजन जसे - नियमित प्राप्त होणाऱ्या जैविक कचरा विल्हेवाट पध्दत, नियमित कचरा गोळा होतो किंवा कसे, संस्थेकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवेबाबतचा वाहन तपशिल, संबंधित आरोग्य निरीक्षक यांचे अहवाल, रॉयल्टी रक्कम भरणा नियमित न होणे इत्यादी नसल्याचे लेखा परीक्षणात स्पष्ट झाले आहे. यामुळे उपरोक्त अधिनियम, शासन निर्णय प्रमाणे योजनेची फलश्रुती होऊ शकलेली नाही. तसेच यामुळे महानगरपालिकेस रॉयल्टी सारख्या बाबींपासून वंचित राहावे लागले आहे.

6) संस्थेने सन 2012-13 मध्ये रॉयल्टी भरणा केल्याच्या पावत्या आढळ होत नाही.

उपरोक्त अभिप्राय पाहाता श्री. स्वामी समर्थ इंटरप्रायझेस, धुळे या संस्थेने जैविक कचरा उचलणे व विल्हेवाट लावणे हे काम निविदेतील अटी व शर्ती, कार्योदेशातील अटी व शर्ती प्रमाणे समाधानकारक काम केलेले नाही या म्हणण्यास वाव निर्माण झाला असून संबंधित संस्थेवर अटी व शर्ती क्र.5, 8, 11 व 17 नुसार नमुद कार्यवाहीस पात्र असून महानगरपालिकेने संबंधित संस्थेकडून मार्च - 2013 अखेरपर्यंत अनुज्ञेय होणारी रॉयल्टी रक्कम प्राप्त करुन अट क्रमांक 18 (ना हरकत प्रमाणपत्र रद्द करणे) नुसर योग्य ती कार्यवाही करण्याचे प्रयोजन प्रस्तावित करणे उचित ठरेल से लेखापरीक्षणाचे स्पष्ट मत आहे.

DATDAWM6901 (Ref No : 120)

## *123 वार्ड क्रमांक 66 मोहाडी वरचे गाव श्री.संजय उचाळे ते ब्युटी पार्लर ते विक्रम पाटील रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 09**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1097131.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1028968.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 68163.00/-

***अधिनियमातील तरतूदी नुसार आयुक्त यांनी केलेल्या संविदा कामास मा. स्थायी समिती ची मान्यता तसेच याबाबतची माहीती महानगरपालिकेस न सादर करणे, 15 लक्षचे आतील कामे मजुर संस्था अथ्वा सुशिक्षित***

DRAFT

***बेरोजगार अभियंता यांना न देता जाहीर निविदा मागवून मक्तेदार निश्चित करणे, अंदाजपत्रकासोबत वाहातूक विवरणपत्र नसणे, कामात बदल/ वाढ करतांना सक्षम प्राधिकाराची पूर्व मंजुरी न घेणे, रॉयल्टी महसूलाचे नुकसान करणे, अनामत रक्कम विहीत दराने न घेणे इ. प्रकारच्या अनियमितता बाबत.***

<table>
<tr><td>1</td><td>लेखाशिर्ष</td><td colspan="4">मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक</td></tr>
<tr><td>2</td><td>प्रशासकीय मान्यता</td><td colspan="4">मा.आयुक्त, महानगरपालिका धुळे, पत्र क्रमांक –निरंक दि – 29/02/2012 रक्कम रुपये – 999973/-</td></tr>
<tr><td>3</td><td>तांत्रिक मंजुरी</td><td colspan="4">कार्यकारी अभियंता, मनपा धुळे, पत्र क्रमांक 615 दिनांक. 27/02/2012 रक्कम रुपये 999973/-</td></tr>
<tr><td>4</td><td>निविदा रक्कम</td><td colspan="4">999973/-</td></tr>
<tr><td>5</td><td>निविदा प्रकार</td><td colspan="4">जाहीर निविदा</td></tr>
<tr><td>6</td><td>निविदा प्रसिध्दी व कालावधी</td><td colspan="4">दै.देशोन्नती दिनांक – 08/03/2012</td></tr>
<tr><td>7</td><td>प्राप्त निविदा</td><td colspan="4">तीन</td></tr>
<tr><td>8</td><td>मंजूर निविदा तपशिल</td><td colspan="4">अंदाजपत्रकीय दराने. मक्तेदार- गायत्री कन्स्ट्रक्शन, धुळे</td></tr>
<tr><td>9</td><td>स्थायी समितीची मंजुरी</td><td colspan="4">निरंक</td></tr>
<tr><td>10</td><td>कार्योदेश</td><td colspan="4">मा.आयुक्त,महानगरपालिका धुळे पत्र क्रमांक 157 दिनांक.25/05/2012</td></tr>
<tr><td>11</td><td>कामाची मुदत</td><td colspan="4">चार महिने</td></tr>
<tr><td>12</td><td>काम पुर्ण दिनांक</td><td colspan="4">30/06/2012</td></tr>
<tr><td>13</td><td>काम मुदतीत पुर्ण</td><td colspan="4">आहे</td></tr>
<tr><td>14</td><td>करारनामा</td><td colspan="4">100/-</td></tr>
<tr><td>15</td><td>जिल्हा दर सुची वर्ष</td><td colspan="4">2011 - 2012</td></tr>
<tr><td>16</td><td>मो.मा.पु. / पा.क्र.</td><td colspan="4">2 / 138 ते 142</td></tr>
<tr><td rowspan="4">17</td><td rowspan="4">खर्च तपशिल</td><td>प्र.क्र.</td><td>दिनांक</td><td>रक्कम</td><td>तपशिल</td></tr>
<tr><td>1610</td><td>07/08/2012</td><td>106876</td><td>प्रथम धावते</td></tr>
<tr><td>1911</td><td>07/09/2012</td><td>961879</td><td>दुसरे व अंतिम</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>1068755</td><td></td></tr>
</table>

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) सदरचा रस्ता डांबरीकरणाचे कामास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली असून कामाची संविदा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 अन्वये करण्यात आलेली आहे. मात्र कलमातील

DRAFT

तरतुदीप्रमाणे रक्कम रुपये 10.00 लक्ष पर्यतची कामे मा.आयुक्त हे संविदा करतील मात्र अशा संविदा झालेल्या कामांची मान्यता व माहीती मा.स्थायी समितीकडे सादर करुन त्यास समितीने पुढील सभेपर्यंत कोणताही आक्षेप घेतला नसल्यास ती मान्य झाल्याचे समजण्यात येऊन त्यांची माहिती महानगरपालिकेस सादर करण्याचे निर्देश आहेत. तथापि उपरोक्त रस्ता कामाचे संविदा बाबत तशी नियमोचित कार्यवाही न करता प्रशासकीय मंजुरी देण्याची अनियमितता झालेली आहे.

2) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक –सीएटी-07/06/प्र.क्र.94 / इमा-2 दिनांक – 16/11/2006 नुसार तसेच महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचे परिपत्रक क्रमांक – जीईटीएन-1093/2365/प्र.क्र.126/93/नवि-4 दिनांक- 20/10/1993 नुसार रक्कम रुपये 15.00 लक्ष पर्यंतची कामे ही मजुर सहकारी संस्था / सुशिक्षित बेरोजगार यांचेकडून करावी व अशा संस्थांनी सदरची मंजुर कामे अंदाजपत्रकीय दराने करुन देणे बंधनकारक असल्याचे निर्देश् आहेत. मात्र महानगरपालिका तरतुदी विरुध्द जाऊन सदरचे काम जाहीर निविदा प्रक्रीया व्दारे प्राप्त निविदापैकी अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुर करुन मक्तेदार निश्चिती केलेली आहे.सदर बाब नियमबाहय असून यामुळे महानगरपालिकाचा काळ अपव्यय झालेला असून (जाहीर निविदा प्रक्रीया,निविदा अंतिम करणे, प्रसिध्दी खर्च, आस्थापना खर्च इत्यादी) बाबी टाळणे आवश्यक आहे.

3) मंजुर अंदाजपत्रकासोबत दर पृथ:करण व वाहतूक अंतर तपशिल दर्शविण्यात आलेला आहे. तथापि सदरचे विवरणपत्रास सक्षम तांत्रिक अधिकारी यांची मंजुरी घेण्यात आलेली नाही. मंजुरी अभावी दराचा समावेश नियमबाहयपणे करण्याची अनियमितता झालेली आहे.

4) मंजुर अंदाजपत्रकानुसार 265 मी लांबीचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करावयाचा असताना देयकासोबतची झालेल्या कामाची परिमाणे पाहाता मक्तेदाराने 284 मीटर लांबीचा रस्त्याचे काम केले आहे. वाढीव 19 मी चे कामाबाबत सक्षम तांत्रिक अधिकारी यांची पुर्व मान्यता घेण्यात आलेली नाही.यामुळे वाढीव कामाची प्रत्यक्षात गरज होती किंवा कसे याबाबींची सत्यता पडताळता आलेली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 167 नुसार व निविदा अटी व शर्तीप्रमाणे मक्तेदाराने मंजुर पत्रकातील नमुद बाब प्रमाणे काम करणे बंधनकारक असून कामातील कोणत्याही बदलास सक्षम तांत्रिक अधिकारी यांची पुर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे. यामुळे 94 मी लांबीच्या अतिरिक्त कामावरील खर्च रक्कम रुपये 39787/- अनावश्यक झाला असल्याचे लेखा परीक्षणाचे मत असून खर्च अमान्य करण्यात येत आहे.

(प्रस्तावित लांबी 265 मी. प्रत्यक्ष कामाची लांबी 284 मी.)

| बाब क्रमांक | तपशिल | परिमाण | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | खोदकाम | 1 x 19 x 0.30 = 5.70 घ.मी. | 204.40 | 1165.08 |
| 2 | 60 मी.मी.खडी आणणे | 1 x 19 x 0.20 = 3.80 घ.मी. | 371.71 | 1412.49 |
| 3 | 40 मी.मी.खडी आणणे | 1 x 19 x 0.10 = 1.90 घ.मी. | 397.96 | 756.12 |
| 4 | कठिण मुरुम आणणे | 3.80 /3 = 1.26 घ.मी. | 261.23 | 329.14 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | नरम मुरुम आणणे | 1.90 /3 = 0.63 घ.मी. | 249.68 | 157.29 |
| 6 | 60 मी.मी.खडी पसरविणे | 3.80 घ.मी. | 22.58 | 85.80 |
| 7 | 40 मी.मी.खडी पसरविणे | 1.90 घ.मी. | 21.00 | 39.90 |
| 8 | कठिण व नरम मुरुम पसरविणे | 1.89 घ.मी. | 12.60 | 23.81 |
| 9 | कॉम्पॅटींग काम | 1 x 19 x 5 = 95 चौ.मी. | 8.40 | 798.00 |
| 10 | कॉम्पॅटींग काम | 1 x 19 x 5 = 95 चौ.मी. | 8.40 | 798.00 |
| 11 | 75 मी.मी. BBM काम | 1 x 19 x 5 = 95 चौ.मी. | 175.00 | 16625.00 |
| 12 | प्रिमिक्स कारपेट काम | 1 x 19 x 5 = 95 चौ.मी. | 147.47 | 14009.65 |
| 13 | हॉट मिक्स काम | 1 x 19 x 5 x 0.025 = 0.475 घ.मी. | 7539.06 | 3581.05 |
| | | एकूण (अपुर्णांकात) | | 39781.33 |
| | | एकूण (पुर्णांकात) | | 39781 |

5) सदर कामाचे अंदाजपत्रक रॉयल्टी बाब वगळता रक्कम रुपये 971596.72 असून मक्तेदाराने केलेल्या कामाचे एकूण मुल्यांकन रक्कम रुपये 1075810.41 असताना निविदा रकमेत 10 टक्के वाढ दर्शवून कामाचे मुल्यांकन रक्कम रुपये 1068755/- करण्यात आले आहे. निविदा रकमेत 10 टक्के वाढ करुन कामाचे मुल्यांकन कोणत्या तांत्रिक निकषावर निश्चित करण्यात आले याबाबत लेखा परीक्षणात खात्री होऊ शकलेली नाही याप्रमाणे काम अंतिम करण्याच्या उद्देशाने अनुपालन दर्शवावे.

6) मंजुर अंदाजपत्रकात गौण खनिज साहित्य वापरासाठी अनुज्ञेय असलेली रक्कम रुपये 28376/- रॉयल्टी म्हणून तरतुद करण्यात आलेली आहे. मात्र मक्तेदारास अदा झालेले देयकांची पडताळणी अंती मक्तेदाराने उपरोक्त तरतुदी इतके गौण खनिज साहित्य वापरताना (किंवा त्यापेक्षा अधिक) रॉयल्टी हा महसूल शासन सदरी भरणा केल्याचे आढळून आलेले नाही. यामुळे देय रकमेतून किमान तरतुद रक्कम रुपये 28376/- कपात करुन घेऊन महानगरपालिकाने शासन सदरी भरणा करणे क्रमप्राप्त होते. मात्र नियमोचित कार्यवाही न केल्यामुळे संबंधितांकडून सदर रस्ता कामावर अवैध पध्दतीने गौण खनिज साहित्य वापरात आणले या म्हणण्यास वाव निर्माण झालेला आहे. रक्कम रुपये 28376/- इतके शासकीय महसूलाचे कायमस्वरुपी नुकसान झाले आहे. सदरचे नुकसान वसुल होणे आवश्यक आहे.

7) मंजुर निविदेतील अनुसुची 3 व 4 मध्ये माहिती निरंक दर्शविली आहे. यामुळे मक्तेदाराकडे निविदा अटी व शर्ती प्रमाणे रस्ता कामासाठी आवश्यक ती मशिनरी, प्लान्ट, तांत्रिक मनुष्यबळ, वाहन साहित्य इत्यादी महत्वपुर्ण बाबी उपलब्ध होत्या किंवा कसे या महत्वपुर्ण बाबींची सत्यता पडताळता आलेली नाही. निविदेत उपरोक्त स्वरुपाची त्रुटी असताना / निविदा सदोष असताना कोणत्या निकषावर निविदा अंतिम झाली याचे अनुपालन दर्शवावे.

8) निविदा अटी व शर्ती तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 169 (4) नुसार

DRAFT

मक्तेदाराकडून 10 टक्के या दराने सुरक्षा अनामत ठेव कपात / प्राप्त करणे बंधनकारक असताना मात्र प्रत्यक्षात अदा रकमेतून 4 टक्के या दराने अनामत ठेव रक्कम कपात करण्याची कार्यवाही झाली असून सदर बाब नियमबाहय आहे व मक्तेदाराची जोखीम कमी करुन आर्थिक हित जोपासणारी आहे.

9) कामातील इतर अनियमितता –

अ) रस्ता कामासाठी वापरलेल्या कोणत्याही साहीत्याची गुणवत्ता चाचणी मक्तेदार याने शासकीय यंत्रणेकडून करुन घेतलेली नसताना देयक मान्य करण्यात आले आहे.

ब) कामासाठी वापरलेले डांबर साहित्याचे बिजके, गेटपास इत्यादी दस्ताऐवज प्रमाणकासोबत सादर केलेले नाहीत.

उपरोक्त अनियमिततेमुळे कामावरील खर्च खालील प्रमाणे अमान्य करण्यात येत आहे व इतर शासकीय वसुली रक्कम संबंधितांकडून वसुल करुन शासन सदरी भरणा केल्याचे दर्शवावे.

म.न.पा.निधी

आक्षेपाधीन रक्कम रुपये 1028968/-

वसुलपात्र रक्कम रुपये 39787/-

एकूण रक्कम रुपये 1068755/-

शासकीय कपात रक्कम रुपये 28376/-

गुंतलेली रक्कम रुपये 1097131/-

DATDAWM6901 (Ref No : 159)

## *139 बांधकाम उपकर अदा देयकातून वसुली न करणे तसेच शासन सदरी भरणा न करणेची अनियमितताबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*शासकीय निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 922048.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 922048.00/-

***शासन निर्देशा नुसार बांधकामाचे प्रदानातून 1 टक्के या दराने बांधकाम उपकर रक्कम कपात करुन शासन निर्देर्शित सदरी भरणा करणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने त्यानुरुप रक्कम वसुलात आणलेली नाही.***

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्ती) अधिनियम तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 नुसार त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,



DRAFT

शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र.108/कामगार-7 अ दिनांक.17 जुन 2010 मध्ये नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक उपक्रमासाठी करण्यात येणारे बांधकामे यासाठी बांधकामाच्या एकूण मुल्यावर 1 टक्के या दराने बांधकाम कामगार उपकर म्हणून अनुज्ञेय होणारी रक्कम संबंधिताच्या देयकातून वसुल करुन ती महानगरपालिकाने अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांचेकडे भरणा करणेबाबतची तरतुद करण्यात आली आहे.

तथापि सन 2012-2013 या आर्थिक वर्षातील बांधकाम प्रदानाची प्रमाणके / प्रकरणे यांची पडताळणी केली असता महानगरपालिकाने संबंधिताच्या देय होणाऱ्या रकमेतून 1 टक्के या विहीत दराने बांधकाम कामगार उपकर रकमा वसुलात आणलेल्या नाहीत. यामुळे यासोबतचे परिशिष्ठ क्रमांक- 1 (2) मध्ये उदाहरणादाखल नमुद कामांचे संदर्भात एकूण रक्कम रुपये- 922048/- शासकीय महसुलाचे कायमस्वरुपी नुकसान झाले आहे. नुकसानीची रक्कम संबंधितांकडून वसुलात आणून याप्रमाणे सदर कालावधीतील प्रदान बांधकामे यांची प्रदाने पडताळणी करुन उपरोक्त निदर्शनाप्रमाणे 1 टक्का बांधकाम उपकराची परिगणना करुन रकमा वसुलात आणून संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे बांधकामांची प्रदाने करताना विहीत दराने बांधकाम उपकर वेळीच वसुल होऊन शासन सदरी भरणा होईल याची योग्य ती दक्षता घ्यावी.

शासकीय निधी

वसुलपात्र रक्कम रुपये- 922048/-

DATPBKM6701 (Ref No : 161)

### *143 वार्ड क्रमांक 15 नदी किनारी जुने शौचालयाचे नजीक नवीन 10 सीटचे शौचालय बांधणे कामातील अनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 08**

*शासकीय निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1001299.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 863115.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 138184.00/-

***शौचालय बांधकाम करतांना नियमबाहयपणे काम करणे, उपकामांची परिमाणे नोंद न करणे, शासकीय रकमांची कपात न करणे इ. प्रकारच्या अनियमितता बाबत.***

| | | |
|---|---|---|
| 1 | लेखाशिर्षे | मनपा निधी (म.बा.क. निधी) |



DRAFT

| | | |
|---|---|---|
| 2 | प्रशासकीय मंजुरी | मबाक स्थायी समिती ठराव क्रमांक - 17 दिनांक.08/07/2011<br>रक्कम रु.995490/- |
| 3 | तांत्रिक मंजुरी | शहर अ भि यंता, मनपा क्र.51 दिनांक. 13/08/2010<br>रक्कम रु. 995490/- |
| 4 | निविदा प्रकीया | जाहिर निविदा |
| 5 | प्राप्त निविदा संख्या | तीन |
| 6 | मंजुर निविदा दर | अंदाजपत्रकीय दराने |
| 7 | मक्तेदार | रफीक शेख इब्राहीम |
| 8 | निविदा मंजुर तपशिल | निविदा दराला मंजुरी नाही |
| 9 | कामाचे आदेश | मा.आयुक्त, क्रमांक 291 / दिनांक. 14/11/2011 |
| 10 | कामाचे मुदत | 04 महिने |
| 11 | काम पुर्ण दिनांक | 02/04/2012 |
| 12 | M.B. क्रमांक | 10/66 ते 71 |
| 13 | खर्च तपशिल | <u>प्र.क्र.</u> <u>दिनांक</u> <u>रक्कम रु.</u> <u>तपशिल</u><br>428 02/05/2012 981665/- प्रथम व अंतिम. |

DRAFT

याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 167 नुसार मक्तेदाराने मंजुर अंदाजपत्रकानुसार नमुद केलेल्या बाबीप्रमाणे काम करुन देणे बंधनकारक असुन कामात होणाऱ्या कोणत्याही बदलास सक्षम तांत्रिक अधिकारी यांची पुर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे. तथापी स्वच्छालयातील मंजुर अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 15 - आरसीसी स्लॅप साठी लोखंड, बाब क्रमांक - 19 नेरु फीनिशिंग, बाब क्रमांक - 28 शहाबादी फरशी, बाब क्रमांक - 34 110 M.M. पीव्हीसी पाईप इत्यादी महत्वपुर्ण उपअंगाचे काम केलेले नाही. अशा परिस्थितीत सक्षम तांत्रिक अधिकारी यांनी कोणत्या तांत्रिक निकषावर काम पुर्णत्वाचा दाखला मक्तेदारास देऊन देयक पारीत झाले याची सत्यता पडताळता येत नाही.

2) मक्तेदाराने सदर स्वच्छालयाचे बांधकामात बाब क्रमांक - 45 नुसार 150 M.M. पीव्हीसी पाईप असलेले व 1 HP क्षमतेचे इलेक्ट्रीक पंम्प असलेली बोअरवेल (नग -1) चे काम केले असून मोजमाप पुस्तकात सदर कामाचे तपशिलवार मापे जसे खोदकाम परीमाण, पाणी लागले किंवा कसे, वापर, पीव्हीसी पाईप संख्या व व्यास इत्यादी महत्वपुर्ण बाबी पडताळता आलेले नाहीत तसेच मक्तेदाराने देयकासोबत ईलेक्ट्रीक पंम्प खरेदीचे मुळ बीजक सादर केलेले नाही. यामुळे बोअरवेल वर लावण्यात आलेला पंप हा शासन मान्य उत्पादकाच्या व मागणी केलेल्या क्षमतेचा असून त्याबाबतची उत्पादकाने दिलेली वॉरेंटी / गॅरेंटी इत्यादी महत्वपुर्ण बाबी पडताळता आलेल्या नाहीत. यामुळे सदर बाबीवरील

खर्च रक्कम रुपये- 56750/- लेखा परीक्षणात मान्य करता येत नाही.

3) मक्तेदारास शौचालयासाठी इलेक्ट्रीक साहीत्य बसविणे इत्यादी कामासाठी रक्कम रुपये- 35000/- अदा करणेत आले आहे. तथापि मोजमाप पुस्तकात याबाबत कोणतीही स्वतंत्र परिमाणे नोंदविलेले नाहीत तसेच विद्युत कंपनीकडून नवीन मीटर प्राप्त झालेबाबतचे बीजके सादर केलेली नाहीत. तसेच देयक पारीत करीत असताना विद्युत विभागाकडील इलेक्ट्रीक कामाबाबतचा अहवाल प्राप्त केलेला नाही. यामुळे विद्युत जोडणीचे महत्वपुर्ण काम झाले किंवा कसे याची सत्यता पडताळता आलेली नाही.

4) मक्तेदाराने सदर कामात अतिरिक्त बाब म्हणून 2000 लीटर पाण्याची टाकी आणणे व लावणेचे काम केले असून त्यासाठी रक्कम रुपये 16800/- व तोडफोड करणे यासाठी ठोक रुपये. 10000/- याप्रमाणे रक्कम रुपये 26800/- अदा केले आहे. वास्तविकता सदर शौचालय बांधकाम हे पुर्वीच्या अस्तित्वातील शौचालयाच्या शेजारी करण्यात आले असून पाणी व्यवस्था यापुर्वीच अस्तित्वात असल्यानेच सदर बाबींचा मंजूर अंदाजपत्रकात समावेश करण्यात आला नाही. त्याचप्रमाणे अतिरिक्त बाब म्हणून महानगरपालिकेने मक्तेदाराकडे मागणी केल्याचे दिसून आलेले नाही. काम नवीन असल्याने तोडफोड या बाबीचा अतिरिक्त बाब म्हणून खर्च दर्शविणे नियमबाहय ठरते यामुळे अतिरिक्त बाबीवरील खर्च रक्कम रुपये 26800/- लेखा परीक्षणात मान्य करता येत नाही.

5) शासन निर्देशाप्रमाणे बांधकामावरील कामगारांचा विमा संचालनालय, शासन विमा निधी, मुंबई यांचेकडून घेणे क्रमप्राप्त असताना सदर कामात मक्तेदाराने खाजगी विमा संस्थेकडून घेतलेला कामगार विमा नियमबाहय असून संबंधितांकडून अनुज्ञेय दर 1 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 9817/- वसुल करुन शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

6) शासन निर्देशाप्रमाणे सदर कामाच्या देयकातून बांधकाम उपकर 1 टक्के रक्कम रुपये 9817/- वसुल करुन शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

7) उक्त प्रकरणी मक्तेदाराने देयकासोबत “स्वामीत्व धन” भरलेबाबतची कागदपत्रे सादर केलेली नाहीत. वास्तवीकता महसुल व वनविभागाचा शासन निर्णय क्र. गौखनि/10/1001/प्र.क्र.309/2 दिनांक.11/02/2010 अन्वये गौण खनिज स्वामीत्व धन भरलेबाबतची कागदपत्रे देयक सादर करताना सादर करणे आवश्यक आहे. नियमानुरुप कार्यवाही अभावी शासकीय महसुलाचे नुकसान झाले आहे. यास विभागाने तयार केलेले अंदाजपत्रकात रॉयल्टी सारखी महत्वपुर्ण बाबीवर तरतुद न करणे हि बाब कारणीभूत ठरली आहे.

8) कामातील इतर अनियमितता - अ) शौचालय बांधकामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याचे अभिलेखे अभावी खात्री होत नाही.

ब) कामावर वापरलेल्या साहीत्याची गुणवत्ता चाचणी शासकीय तांत्रिक संस्थेकडून न करता खाजगी संस्थेकडून करण्याची नियमबाहय कार्यवाही केली आहे.

क) मक्तेदाराने करारनामा सादर केला नसताना त्यास प्रथम कार्यादेश देऊन नंतर करारनामा करणेची

नियमबाहय कार्यवाही केली आहे.

ड) मक्तेदारास मुदतवाढ दिल्याचे दर्शविले आहे, परंतु मुदतवाढ आदेशावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही आहे.

उपरोक्त अभिप्रायानुसार कामावरील खर्च रक्कम रुपये- 981665/- खालीलप्रमाणे अमान्य करणेत येत आहे.

म.न.पा.निधी

आक्षेपाधीन रक्कम रुपये- 863115/-

(मुददा क्र. 2, 3, 4)वसुलपात्र रक्कम रुपये- 118550/-

एकूण रक्कम रुपये- 981665/-

मुददा क्र. 5व 6 नुसार वसुलपात्र रक्कम रुपये- 19634

एकूण गुंतलेली रक्कम रुपये- 1001299/-

DATDAWM6901 (Ref No : 163)

### *145 वरखेडी रोड ते सुभाष पुतळा पावेतो नाल्यास रिटेनिंग वॉल बांधणे कामातील अनियमितताबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 13**

*शासकीय निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 38313437.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 843873.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 36707696.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 761868.00/-

***सदर कामाचे प्रस्तावास मा. महासभेची मान्यता न घेणे, शासन निर्देशानुसार कामाची निविदा प्रसिध्दी शासनाचे संकेतस्थळावर न करणे, कामाचा कंत्राटी विमा खाजगी संस्थेकडे करणे, मंजुर दरसूची बाहेरील दर आकारुन अदा करणे, त्रयस्थ तांत्रिक संस्थेच्या तपासणी अहवालात नमुद त्रुटीची पूर्तता न करता मक्तेदारास देयक अदा करणे, बांधकाम उपकर कपात न करणे, मक्तेदाराशी वाटाघाटी केल्याचे पत्रावरील मक्तेदाराची स्वाक्षरी व निविदेमधील स्वाक्षरी यात तफावत असणे, मक्तेदाराने मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे काम न करणे, इ. प्रकाराच्या अनियमितता बाबत***

| | | |
|---|---|---|
| 1 | लेखाशिर्ष | BRGF (मागासक्षेत्र अनुदान निधी) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | प्रशासकीय मंजुरी | मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे पत्र क्रमांक नपाप्र/कावि/62<br>दिनांक. 24/01/2011 रक्कम रुपये.35291455/- | | | |
| 3 | तांत्रिक मंजुरी | कार्यकारी अभियंता, महानगरपालिका धुळे<br>पत्र क्रमांक 314 दिनांक. 28/12/2010<br>रक्कम रुपये 35291455/- | | | |
| 4 | निविदा प्रकीया | जाहीर निविदा (वृत्तपत्राद्वारे) | | | |
| 5 | निविदा प्रसिध्दी तपशिल | दै. लोकमत दिनांक.24/06/2011 (फेरनिविदा)<br>दिनांक.25/06/2011 ते दि.06/07/2011 (12 दिवस) | | | |
| 6 | प्राप्त निविदा | पाच | | | |
| 7 | मंजुर निविदा दर | अं.प.दरापेक्षा 6.50 टक्के जादा दराने | | | |
| 8 | मक्तेदार | मे.सुंदर माधव कन्स्ट्रक्शन, धुळे | | | |
| 9 | निविदा मंजूर तपशिल | मा.स्थायी समिती ठराव क्रमाक 72 दिनांक. 29/07/2011 | | | |
| 10 | कार्योदेश व कालावधी | आयुक्त, म.न.पा.धुळे पत्र क्रमांक2011-12/116 दिनांक.05/08/11<br>मुदत - 1 वर्ष | | | |
| 11 | काम पुर्ण दिनांक | 05/02/2013 | | | |
| 12 | काम मुदतीत पुर्ण | नाही. मुदतवाढ देण्यात आलेली नाही. | | | |
| 13 | करारनामा | रक्कम रुपये 34500/- चे मुद्राकावर | | | |
| 14 | प्रयस्थ यंत्रणेकडून तपासणी अहवाल | घेण्यात आलेला आहे.<br>शासकीय तंत्र निकेतन, धुळे पत्र क्रमांक 666 दिनांक.30/03/2013 | | | |
| 15 | मो.मा.पु. / पा.क्र. | 19 पा.क्र.12 ते 15 | | | |
| 16 | जिल्हा दरसुची | 2010-11 | | | |
| 17 | खर्च तपशील | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
| | | 02 | 25/01/2012 | 11817760 | प्रथम धावते. |
| | | 03 | 26/03/2012 | 6603516 | दुसरे धावते. |
| | | 01 | 16/05/2012 | 12782911 | तिसरे धावते |
| | | 06 | 30/03/2013 | 6265377 | चौथे व अंतिम |
| | एकूण | | | 37469564 | |

याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम नुसार बी.आर.जी.एफ (BRGF) या योजनेअंतर्गत उपरोक्त नमूद रिटेनिंग वॉल चे बांधकाम घेण्यास मा. महासभा यांची मंजुरी घेऊन विभागाने सदर कामाचे प्रस्ताव सादर केल्याचे आढळून आलेले नाही.

2) उपरोक्त तपशिलातील अ.क्र.3 प्रमाणे कामाचे अंदाजपत्रक तयार करुन रक्कम रुपये 35291455/- इतक्या रकमेस कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, धुळे यांनी तांत्रिक मंजुरी प्रदान केली आहे.

DRAFT

कार्यकारी अभियंता यांचे तांत्रिक मंजुरी देण्याचे अधिकार रक्कम रुपये 25.00 लक्ष इतके मर्यादित असल्याने सदरच्या कामास देण्यात आलेली तांत्रिक मंजुरी पुर्णत: नियमबाहय असुन सक्षम प्राधिकाराची तांत्रिक मंजुरी न घेता काम प्रस्तावित करणे अनुदान प्राप्त करणे व रकमांचे प्रदान करणे इत्यादी महानगरपालिकेने केलेली कार्यवाही नियमबाहय ठरते.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.सीएटी-01/05/प्र.क्र.26/इमारती - 2 दिनांक.31 मार्च 2005 तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 202 नुसार रक्कम रुपये 50.00 लक्ष पेक्षा जादा अंदाजपत्रके रकमांच्या कामाची निविदा सुचना वृत्तपत्रात प्रसिध्दीस देण्यापुर्वी महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी शासनास सादर करण्याचे निर्देश असून अशी कार्यवाही न झालेल्या बांधकामाच्या निविदा कोणत्याही परिस्थितीत उघडण्यात येऊ नयेत. जर अशा निविदा स्वीकृत करुन कामे हाती घेतली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी यांची असेल असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. तथापि उपरोक्त नमूद निर्देशानुसार महानगरपालिकेने सदर कामाची निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यापुर्वी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर निविदा प्रसिध्दी करण्याची कोणतीही कार्यवाही केल्याचे आढळून आलेले नाही. यामुळे सदर कामाची निविदा प्रसिध्दी उपरोक्त शासन निर्देशानुसार न करण्याची अनियमितता झाली आहे.

4) शासन निर्णय, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.विकास-1098/प्र.क्र.-2889/शासन हमी दिनांक.19/08/1998 तसेच नगर विकास विभाग ( उपसचिव) यांचे पत्र क्र.जेईएन-10981357/प्र.क्र.-166/98/नवी-24 दिनांक.03/11/2003 नुसार विविध योजनांतर्गत देण्यात येणाऱ्या कंत्राटी कामावरील कामगारांचा विमा हा फक्त शासकीय विमा निधी संचालनालय यांचेकडून काढणे बंधनकारक / अनिवार्य असून त्या व्यतिरिक्त अन्य विमा कंपनीकडून मक्तेदाराने घेतलेली विमापत्रे स्वीकारली जाणार नाहीत असे स्पष्ट निर्देश असून मक्तेदाराने इतर विमा कंपनीकडून संबंधित कामाचे विमापत्र घेतली असतील तरी विमा संचालनालय यांनी अनुज्ञेय केलेली विमा रक्कम मक्तेदाराच्या देय होणाऱ्या रकमेतून वसूल करावी किंवा अशी रक्कम कळविण्यात आली नसेल तर त्या कामाच्या मुल्याच्या 1 टक्के या दराने येणारी रक्कम परस्पर कपात करुन विमा संचालनालयाकडे वळती करणे आवश्यक असेल. तथापि उपरोक्त कामाचे संदर्भात मक्तेदाराने खाजगी विमा कंपनीचे कामगार विमापत्र घेतले असल्याने महानगरपालिकेने मक्तेदाराच्या देय प्रदानातून 1 टक्के दराने येणारी रक्कम रुपये 374696/- कपात न करण्याची अनियमितता केली आहे. सदरची विमा रक्कम संबंधितांकडून वसूल होऊन शासकीय विमा निधी संचालनालय यांचेकडे भरणा होणे आवश्यक आहे.

5) मंजूर अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 1 जागा स्वच्छ करणे व इतर बाबी याकरीता रक्कम रुपये 1065.55 प्रति रनिंग मीटर हा दर मंजूर करण्यात आला असून कामाचे परीमाण 715 रनिंग मीटर करीता रक्कम रुपये 761868/- अदा करण्यात आले आहेत. अंदाजपत्रक तयार करताना सन 2010-11 ची जिल्हा दर सूची वापरण्यात आली आहे. मात्र उपरोक्त मंजूर दर सदरच्या दरसूचीत आढळून आलेले नाहीत. या अर्थी सदर बाबीकरीता वापरण्यात आलेला दर जिल्हा दर सूची बाहेरील असून तो कोणत्या निकषाने अंतिम झाला याची सत्यता पडताळता आलेली नाही.

6) शासन निर्देशाप्रमाणे सदर कामाचे अंतिम देयक प्रदानापुर्वी मक्तेदाराने पुर्ण केलेल्या कामाचे त्रयस्थ संस्था (शासकीय तंत्रनिकेतन धुळे) यांचेकडून तांत्रिक बाबींचे लेखा परीक्षण अहवाल (Third Party Techincal Audit Report) क्र.666 दिनाकं. 30/03/2013 अन्वये प्राप्त असून संबंधित संस्थेने सदरच्या कामातील काही तांत्रिक उणीवा अहवालात स्पष्ट नमूद केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे –

अ) अंदाजपत्रकातील तरतुदीच्या बाबी हया बांधकाम विभागाच्या नमूद तांत्रिक मापदंडाप्रमाणे मक्तेदाराकडून पुर्ण करुन घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) बांधकामाचे खोदकाम या बाबींबाबत पुर्ण निराकरण होऊ शकलेले नाही.

क) अंदाजपत्रकात संरक्षक भिंतबाबत आवश्यक असणाऱ्या तांत्रिक बाबींचा परीपुर्ण समावेश करण्यात आलेला नाही.

ड) बांधकामासाठी वापरण्यात आलेले साहीत्य प्रकारचा दर्जा उचित असल्याचे उत्पादकाचे प्रमाणपत्र पडताळणीस सादर केलेले नाही.

ई) संरक्षक भिंत बांधकामाचा सिमेंट कॉंक्रीटचा दर्जा / मजबूती यांची चाचणी अहवाल सादर केलेले नाहीत.

फ) संरक्षक भिंतीचे सांधे एकसलग जोडलेले आढळले नाहीत.

उपरोक्त नमूद कामातील त्रुटी संबंधित संस्थेने निदर्शनास आणून दिले असता त्या अनुषंगाने मक्तेदाराकडून नमूद त्रुटींची पुर्तता करुन घेणे क्रमप्राप्त ठरत असताना किंवा निविदा / करारनामा अटी व शर्ती नुसार मक्तेदारावर नियमोचित कार्यवाही करणे अपेक्षित असताना विभागाने सदर बाबी दुर्लक्षित केल्याचे दिसून येते. यामुळे मक्तेदाराने भिंतबांधकाम उचित तांत्रिक मापदंडात झाले नसताना अंतिम देयक अदा करण्याची अनियमितता केली आहे तसेच सदर कामात विभागाकडूनही सदोष अंदाजपत्रक तयार करण्याची अनियमितता झालेली आहे.

7) प्रशासकीय मंजूरीतील अटी व शर्ती क्रमांक 5 नुसार त्रयस्थ यंत्रणेच्या तपासणी अहवाल प्राप्त करुन तो उचित असल्याचे निष्पन्न झालेवरच देयके पारीत करण्यात यावीत असे नमूद असताना उपरोक्त उपपरीच्छेद क्रमांक 6 नुसार अहवालातील त्रुटी स्पष्ट नमूद केल्यावरही देयके पारीत होण्याची अनियमितता झाली आहे.

8) सदर कामाचे देयकातून शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ दिनांक.17 जून 2010 अन्वये 1 टक्के या दराने बांधकाम उपकर वसूल करुन शासन सदरी भरण्याची करण्याची कार्यवाही झाली नसल्याने रक्कम रुपये 374696/- इतक्या शासकीय महसुलाचे नुकसान झाले आहे. संबंधितांकडून रक्कम वसुल करुन शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

9) प्राप्त निविदापैकी सुंदर माधव कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.5 टक्के जादा दर असलेली निविदा मंजूर करण्यापुर्वी मक्तेदारास वाटाघाटी करीता दिनांक 20/07/2011 रोजी बोलावून चर्चा केल्याचे दर्शविण्यात आले आहे व मक्तेदाराने सदरचे दर उचित असून त्याच दराने निविदा स्वीकृत व्हावी असे त्याच दिनांकास लेखी कळविलेले आहे. तथापि मक्तेदाराच्या लेखी अर्जावरील स्वाक्षरी पाहाता निविदा मधील मक्तेदाराची स्वाक्षरी यात तफावत दिसून येते. याअर्थी महानगरपालिकेने निविदा दरासंदर्भात मक्तेदाराशी प्रत्यक्षात वाटाघाटी केल्याचे स्पष्ट होत नाही. प्रत्यक्षात वाटाघाटी झाले नसल्याने नाहक महानगरपालिकेस

जादा दराचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागला आहे.

10) देयकासोबतचे जादा बचत प्रमाणपत्र पाहाता मक्तेदाराने बाब क्रमांक 6 - M-15 सिमेंट काँक्रीट काम, बाब क्रमांक 7 - CC M-15 काँक्रीट काम, बाब क्रमांक 9 - पीव्हीसी पाईप व्हीप होलचे काम इत्यादी मध्ये बचत दर्शविलेली आहे. तर बाब क्रमांक 1 - जागा सफाई, बाब क्रमांक 2 - खोदकाम, बाब क्रमांक 3 - साहीत्य उचलणे, बाब क्रमांक 4 - रबल स्टोन, बाब क्रमांक 5 - 1 :4:8 पीसीसी चे काम यात जादा कामाचा खर्च दर्शविला आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहीता 1971 चे नियम 167 नुसार मक्तेदाराने मंजूर अंदाजपत्रकातील बाबनिहाय काम करणे आवश्यक असताना तसेच कामात होणाऱ्या कोणत्याही बदलास सक्षम तांत्रिक अधिकारी यांची पुर्व मंजूरी आवश्यक असताना उपरोक्त कामात बदल करताना कामाची निकड व पुर्व मंजुरी इत्यादीची पुर्तता केल्याचे आढळ होत नाही.

11) मंजूर अंदाजपत्रकासोबत साहीत्य वाहतुक, दर विवरणपत्र, खदानीचे अंतर इत्यादी बाबतची सत्यता पडताळता आलेली नाही.

12) मंजूर अंदाजपत्रकात रॉयल्टी रक्कम रुपये 94481/- प्रस्तावित असून सदरची रक्कम मक्तेदाराच्या देयकातून वसुल करुन शासन सदरी भरणा केल्याचे आढळ होत नाही तसेच कामावर प्रत्यक्षात वापरण्यात आलेले गौण खनिज करीता मक्तेदाराने रॉयल्टी रक्कम शासन सदरी भरणा केल्याचे बीजके, चलन / परवाना इत्यादी महत्वपुर्ण शासकीय दस्ताऐवज देयकासोबत सादर केली नसल्याने रक्कम रुपये 94481/- इतकी शासकीय महसुलाचे कायमस्वरुपी आर्थिक नुकसान झालेले आहे. महसुलाची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

13) कामातील इतर अनियमितता –

अ) मोजमाप पुस्तकात प्रत्यक्ष काम सुरु दिनांक नोंदविण्यात आलेला नाही त्याचप्रमाणे सक्षम तांत्रिक अधिकारी महत्वपुर्ण बाबींची तांत्रिक तपासणी वेळोवेळी करुन दिनांकीत स्वाक्षरी नोंदविलेली नाही.

ब) मंजूर अंदाजपत्रकासोबत प्रस्तावित संरक्षक भिंतीचे नकाशे / आराखडे जोडलेले नाहीत तसेच अंतिम देयकासोबत मक्तेदाराने पुर्ण केलेल्या कामाचे नकाशे सादर केलेले नाहीत.

क) कामाच्या जागेवर साहीत्य चाचणी, प्राप्त साहीत्य, वापर साहीत्य इत्यादी बाबत नोंदवहया ठेवलेल्या नाहीत.

बीआरजीएफ

तात्पुरती अमान्य रक्कम रुपये- 36707696/-

अंतिम अमान्य रक्कम रुपये- 761868/-

वसुलपात्र रक्कम रुपये- 843873/-

गुंतलेली रक्कम रुपये- 38313437/-

DATPBKM6701 (Ref No : 166)

DRAFT

# कलम ९ क खालील आक्षेप

DRAFT

------------------- निरंक -------------------

DRAFT

# सर्वसाधारण अनियमितता

DRAFT

# कलम ९ ड खालील आक्षेप

DRAFT

## *3 रोख रक्कम पडताळणी न करणे व रोखवहीतील इतर अनियमितताबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 07**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***नियमानुसार सक्षम प्राधिकाराकडून रोखवहीतील शिल्लक रकमांची महिन्यातून एकदा प्रत्यक्ष पडताळणी न करणे, रोखवही वर नमुना क्रमांक चुकीचा नमूद करणे, दैनंदिन खर्च साक्षांकित न करणे, दैनंदिन व्यवहार समाप्तीनंतर स्वाक्षरी नसणे, सक्षम प्राधिकाराने महिन्यातून एकदा शिल्लक रक्कम पडताळणी न करणे, तफावत रकमांचा नियमित ताळमेळ न घेणे इत्यादी स्वरुपाच्या अनियमितताबाबत.***

DRAFT

सन 2012-2013 चे लेखापरीक्षणात महानगरपालिकेकडील सर्वसाधारण रोखवहीत (डे बुक) ची पडताळणी केली असता खालील प्रमाणे अपुर्णता / उणीवा आढळून आलेल्या आहेत.

1) सर्वसाधारण रोखवहीचा नमुना पाहाता त्यावर नियम 31 (1) अन्वये विहीत नमुना असल्याचे दर्शविण्यात आले आहे. (नमुना क्र.11 प्रमाणे) तथापि प्रत्यक्षात महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 32 (1) नुसार विहीत नमुन्यात रोखवही ठेवण्यात आलेली आहे. नमूद नियम क्र.31 (1) चुकीचा असल्याचे दिसून येते.

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 32 (2) नुसार रोखवहीत दैनंदिन प्रत्येक खर्च रकमेची नोंद सक्षम प्राधिकृत अधिकारी यांनी साक्षांकीत करणे आवश्यक असताना तशी नियमोचित कार्यवाही होत असल्याचे आढळत नाही.

3) नियम क्र. 32 (4) तसेच 51 (1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे रोखवहीतील दैनंदिन व्यवहार पुर्ण झाल्यानंतर संबंधित सक्षम अधिकारी यांनी व्यवहार समाप्ती करताना स्वाक्षरी नोंदविणे आवश्यक असताना त्यानुरुप कार्यवाही होत नसल्याचे दिसून आले आहे.

4) नियम 62 (2) मध्ये नमूद केलेली सक्षम अधिकारी यांनी महिन्यातून किमान एकदा तरी रोखवहीची पडताळणी करुन रोखवहीतील शिल्लक रकमा, बँक रकमांचा ताळमेळ इत्यादी बाबतचे अभिप्राय / निष्कर्ष त्या दिनांकास रोखवहीत नोंदविणेबाबतची कार्यवाही सातत्याने होत असल्याचे आढळून आलेले नाही.

5) नियम क्र.51 (3) प्रमाणे रोखवहीतील दरमहा शिल्लक असलेल्या रकमा हया बँक खात्यातील शिल्लक रकमांच्या सोबत ताळमेळ घेऊन तफावतीचा उचित तपशिल नोंदविणे आवश्यक आहे. नियमानुसार कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

6) सर्वसाधारण रोखवहीतील रकमांचे स्थानांतरण व समायोजन करणेबाबतची कार्यपध्दती ही नियम 53

अन्वये विषद करण्यात आली आहे. त्या कार्यपध्दती प्रमाणे रकमा समायोजित / स्थानांतरीत होत नसल्याचे दिसून येते. नियमानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 62 (2) नुसार रोखवहीतील नमूद शिल्लक रकमा संदर्भात सक्षम अधिकारी यांनी दर महिन्यात एकदा अचानकपणे नमूद केलेली शिल्लक रक्कम व प्रत्यक्ष शिल्लक रक्कम यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची कार्यवाही सदर कालावधीत झाले असल्याचे आढळून आलेले नाही. इकडील अर्धसमास पत्र क्रमांक 7 दिनांक 21/09/2015 अन्वये सदर बाब निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे. रोख रकमेची पडताळणी होत नसल्याने

दैनंदिन आर्थिक व्यवहार यावर संबंधितांचे कोणतेही नियंत्रण असल्याचे आढळून येत नाही. तरी नियमानुसार शिल्लक रकमांची वेळोवेळी पडताळणी होणे आवश्यक असून यामुळे आर्थिक व्यवहारात होणारी अनियमितता / गैरव्यवहार इत्यादी बाबी वेळीच लक्षात येऊन त्या रोखता येणे शक्य होणार आहे. तरी शिल्लक रकमांची सक्षम अधिकारी यांचेकडून नियमित पडताळणी होणे आवश्यक आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 07)

## *4 महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर रकमा उशिराने शासनाकडे भरणा करणेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***आर्थिक वर्ष समाप्तीनंतर लेखे बंद न केल्याने महाराष्ट्र शिक्षण कर, रोजगार हमी कर इत्यादी वसूल कर रकमा शासन सदरी भरणा करणेस विलंब झालेबाबतची अनियमितता.***

महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम 1962 मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शिक्षण कर, रोजगार हमी कर हे दोन्ही कर मालमत्ता धारकांकडून आकारणी होऊन महानगरपालिकेने सदरचे कर रकमा वेळोवेळी वसूल करुन 2 टक्के रिबीट रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम अधिनियमातील कलम 17 नुसार सत्वर शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

तथापि महानगरपालिकेने सन 2012-13 मध्ये वसूल केलेला महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर एकूण रक्कम रु. अनुक्रमे 20651937/- व रु.2597193/- चा शासकीय भरणा केलेल्या चलनांची पडताळणी केली असता खालील तपशीलात नमूद केलेल्या कालावधीतील वसूल कर रकमा यांचा भरणा उशीराने / विलंबाने केल्याचे आढळून आले आहे. वास्तविकता दि.31/03/2013 अखेर वसूल रकमा शासन सदरी भरणा होऊन लेखे

DRAFT

बंद होणे आवश्यक होते. मात्र माहे मार्च – 2013 अखेर वसूल कर रकमांचा विलंबाने केलेला भरणा पाहाता महानगरपालिकेने सन 2012-13 चे लेखे बंद झाल्यानंतर ही कर वसूली सुरु असल्याची बाब दर्शविते.

तरी याबाबत योग्य ती उपाययोजना होऊन सदर कराच्या रकमा विहित कालावधीत शासन सदरी भरणा होतील याबाबत दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | भरणा चलन दिनांक | कर प्रकार | भरणा रक्कम | विलंब दिवस | कर वसूली कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 26/05/2015 | महाराष्ट्र शिक्षण कर | 799569 | 21 दिवस | 14/04/2012 ते 05/05/2012 |
| | | रोजगार हमी कर | 126217 | | |
| | | एकूण | 925786 | | |
| 2 | 03/05/2013 | महाराष्ट्र शिक्षण कर | 3590591 | 34 दिवस | 30/03/2013 अखेर |
| | | रोजगार हमी कर | 495439 | | |
| | | एकूण | 4086030 | | |

FDSRKNM8201 (Ref No : 16)

DRAFT

## *6 वसूल भरणा किर्द व मागणी नोंदवही प्रमाणे वसूल रकमा यांचा ताळमेळ घेता येत नसलेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***शा मागणी नोंदवहीत नियमानुसार वार्षिक गोषवारे नोंदविण्यात आलेले नसल्याने वसूल भरणा किर्द प्रमाणे वसूलात आलेली रक्कम यांचा ताळमेळ घेता न येणे, पानवार बेरजा नमूद नसणे. मागणी नोंदवहीनिहाय गोषवारे नसणे इत्यादी प्रकारच्या अनियमिततेबाबत.***

सन 2012-13 आर्थिक वर्षाकरीता कर संकलन विभागाकडील एकत्रित मालमत्ता कर व इतर कर यांची वसुलात रकमांची भरणा किर्द ( नमुना क्रमांक -50) व मागणी नोंदवही यांची कर वसुल रकमांची पडताळणी केली असता, मागणी नोंदवहीत एकत्रित वार्षिक गोषवारे काढण्यात आले नसल्याने भरणा किर्द प्रमाणे वर्षभरातील कर बाबनिहाय एकूण वसुल रकमां व मागणी नोंदवहीत त्या अनुषंगाने दर्शविलेल्या वसुलांत रकमां यांची

अचूकता पडताळता आलेली नाही. तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर प्रकार | भरणा किर्द नुसार वसुल केलेली रक्कम | मागणी नोंदवहीप्रमाणे दर्शविलेली रक्कम | तफावत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एकत्रित मालमत्ता कर | 79496755 | निरंक | 79496755 | सन 2012-13 मागणी नोंदवहीत वार्षिक कर गोषवारे नोंदविलेले नाहीत. |
| 2 | विशेष पाणीपट्टी कर | 49586107 | निरंक | 49586107 | |
| 3 | विशेष स्वच्छता कर | 2845240 | निरंक | 2845240 | |
| 4 | शिक्षण कर | 811051 | निरंक | 811051 | |
| 5 | वृक्ष संवर्धन कर | 3074294 | निरंक | 3074294 | |
| 6 | अग्नीशमन कर | 2980110 | निरंक | 2980110 | |
| 7 | जललाभ कर | 1503626 | निरंक | 1503626 | |
| 8 | दिवाबत्ती कर | 1501356 | निरंक | 1501356 | |
| 9 | मल निस्सारण कर | 1503840 | निरंक | 1503840 | |
| 10 | पथकर | 1507134 | निरंक | 1507134 | |
| 11 | मलप्रवाह सुविधा कर | 3632901 | निरंक | 3632901 | |
| 12 | महाराष्ट्र शिक्षण कर | 20651937 | निरंक | 20651937 | |
| 13 | रोजगार हमी कर | 2597193 | निरंक | 2597193 | |
| 14 | मोठया निवासी जागा कर | 538740 | निरंक | 538740 | |
| 15 | मागणी नोटीस फी | 241483 | निरंक | 241483 | |
| 16 | वॉरंट फी | 81511 | निरंक | 81511 | |
| 17 | व्याज | 2324241 | निरंक | 2324241 | |
| | एकूण | 174877519 | | 174877519 | |

DRAFT

याबाबत अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगर पालिका लेखा सहिंता 1971 चे नियम 76(2) नुसार संबंधितांनी कर वसुल केलेल्या पावती नुसार किंवा भरणा किर्द निहाय नमूद वसुल पावतीच्या तपशिलावरुन जे सोयीचे असेल / ठरेल त्याप्रमाणे संबंधित करदात्याच्या नावानुसार मागणी नोंदवहीतील खात्यात वसुल रकमां नोंदवून एकूण मागणीतून रकमा कमी करुन थकीत रकमां असल्यास / राहील्यास त्याची थकबाकी सदरी नोंद घेऊन सक्षम प्राधिकाराची ( कर निरीक्षक / अधिक्षक) सत्वर / विनाविलंब स्वाक्षरी घेऊन करदात्याचे खाते अद्यावत नोंदीने प्रमाणित करावयाचे आहे.

मात्र, सन 2012-13 मधील मागणी नोंदवहीत वसुलात रकमांच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. परंतु त्या

सक्षम प्राधिकाराकडून प्रमाणित केलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे नियमातील तरतुदी प्रमाणे वसुल रकमांची वार्षिक बेरीज घेऊन वार्षिक गोषवारे काढलेले नाहीत. सबब नियमोचित कार्यवाही झाली नसल्यानेच आर्थिक वर्षात विभागाने भरणा किर्दीत नमूद कर वसुल रकमां व मागणी नोंदवहीत नमुद वसुल रकमा यांचा ताळमेळ लेखा परिक्षणात घेता आलेला नाही.

2) भरणा किर्द प्रमाणे एकूण वसूल कर रकमां अचूक मागणी नोंदवहीत नोंदविल्या किंवा कसे ही महत्वपुर्ण बाब मागणी नोंदवहीत वार्षिक तेरीज / बेरीज संबंधितांनी नोंदविल्या नसल्याने अचूकता पडताळता आलेली नाही.

3) मागणी नोंदवहीत नमुद केलेल्या कर वसुल रकमांत संबंधितांकडून फेरफार / कमी अधिक ने नोंद घेणे किंवा नोंद न घेणे इत्यादी प्रकारची अनियमितता बाबत वार्षिक गोषवारे नोंदविण्यात आले नसल्याने कोणतीही शक्यता लेखा परिक्षणात पडताळता आलेली नाही.

4) तरी सन 2012-13 चे मागणी नोंदवहयातील एकूण वसुल रकमांची वार्षिक बेरीज घेऊन भरणा किर्द मधील नमुद कर प्रकार नुसार वसुल रकमांशी ताळमेळ घेऊन मागणी नोंदवहीत कोणत्याही प्रकारची अनियमितता नसल्याचे सक्षम प्राधिकाराने प्रमाणित करणे आवश्यक आहे. व यापुढे अशा प्रकारची अनियमितता राहणार नाही. याबाबत नियमानुसार सत्वर नोंदी घेण्याची व वार्षिक लेखा घेऊन ताळमेळ घेण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.

DATDAWM6901 (Ref No : 36)

## *8 धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात नगर सचिव विभागातील पोट निवडणुक 2012 मधील उपलब्ध अभिलेख्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 1**

*लेखा शीर्ष : मनपा निवडणुक मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***पोट निवडणुक 2012 मध्ये अनामत रक्कमेसाठी वापरण्यात आलेले पावती पुस्तक प्रमाणीत नसलेबाबत***

पोट निवडणुक 2012 मध्ये अनामत रक्कमेसाठी पावती क्रं. 1 ते 50 छपाई करुन घेतलेले पावती पुस्तिक प्रमाणीत करण्यात आलेले नसताना त्याचा निवडणुक कामी पावती क्रं. 1 ते 3 दिनांक 23/7/2012 ते 24/7/2012 या कालावधीत अनामत रक्कम रुपये 7500 वसुलीसाठी वापर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 9 नुसार पावती पुस्तके यांचा हिशोब नमुना एक मध्ये ठेवण्यात येईल तसेच मुद्रणालयाकडुन पावती पुस्तक मिळाल्याबरोबर, प्राधिकृत अधिका-याकडुन प्रत्येक पुस्तकात असलेल्या पावत्यांच्या एकूण संख्येची तपासणी करण्यात येईल व पुस्तकाच्या शेवटच्या



DRAFT

पृष्ठावर त्यापप्रमाणे प्रमाणित करण्यात येईल. पावती पूस्तके देण्याच्या वेळेस परिषदेचा सामायिक शिक्का पावत्यांवर वठविण्यावत येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 24 दिनांक 15/10/2015 व 42 दिनांक 5/11/2015 देवुन अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी उक्त बाबतीत समर्पक अभिप्राय प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

REVSSSM5909 (Ref No : 42)

## *9 एकत्रित मालमत्ता कर व इतर कर वसुलीच्या भरणा किर्द मध्ये मासिक व वार्षिक गोषवारे नोंदविण्यात येत नसलेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***नियमानुसार भरणा किर्द मध्ये वसुल केलेल्या कर रकमांची महिना निहाय तसेच वार्षिक गोषवारा नोंदविण्यात येत नाही. यामुळे लेखा विभागाकडे जमा झालेल्या कर रकमांची अचूकता पडताळता येत नाही.***

कर संकलन विभागाकडील एकत्रित मालमत्ता कर व इतर कर हे वसुल लिपिकामार्फत भागनिहाय वसुलात आणण्यात येतात व त्यासाठी वसुल लिपिक निहाय भरणा किर्द (नमुना क्र.50) ठेवण्यात आले आहेत व कार्यालयात वसुल लिपिक निहाय भरणा करण्यात येणाऱ्या कर रकमांची मध्यवर्ती (सेंट्रल) भरणा किर्द असून त्यात दैनंदिन वसुलात रकमेची नोंद होऊन कर वसुल रकमांचा भरणा लेखा विभागाकडे करण्यात येतो.

महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 58 व 78 नुसार कर संकलन पुस्तकात (भरणा किर्द) कर निहाय एकूण वसुल रकमां व त्यांची चढती बेरीज घेऊन महिनानिहाय बेरीज नमूद करणे आवश्यक असून त्या अनुषंगाने वर्षा अखेरीस वार्षिक गोषवारा (महिनानिहाय वसूल रकमांचा तपशिल) काढणे आवश्यक आहे. तथापि सन 2012-13 करीता वसूल लिपिक निहाय तसेच एकत्रित भरणा किर्द मध्ये वसूल कर रकमांचा मासिक व वार्षिक गोषवारा नोंदविण्यात आलेला नाही. यामुळे सदर कालावधीत वसूल झालेल्या कर रकमा व लेखा विभागाकडे जमा झालेल्या कर रकमा यांच्याशी अचूकतेचा ताळमेळ पडताळता आलेला नाही. तरी नियमानुसार मासिक व वार्षिक गोषवारे नोंदवून प्राप्त व भरणा झालेल्या रकमा अचूक असल्याचे प्रमाणित करुन अनुपालन दर्शवावे.

DATDAWM6901 (Ref No : 46)

DRAFT

## *12 एकत्रित मालमत्ता कर व इतर कराच्या जमा रकमांच्या तफावतीबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***वसुलात कर रकमांची पडताळणी लेखा विभागाकडील जमा खतावणीशी घेतली असता, प्रत्यक्ष प्राप्त रकमां व जमा रकमां यात तफावत आढळून आलेली असून तफावती मुळे रकमांची सत्यता पडताळता येत नसले बाबत.***

DRAFT

कर संकलन विभागाकडील मालमत्ता कर व इतर कर वसूल रकमांचा एकत्रित भरणा किर्द (मध्यवर्ती) व लेखा विभागाकडील जमा खतावणी ( लेजर) शी ताळमेळ घेतला असता, खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष वसुल रकमा व प्रत्यक्ष जमा रकमा यात तफावत आढळून आलेली आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 58 नुसार लेखापालाने जमा पुस्तकात दर्शविलेली एकूण संकलन / जमा वर्गीकत पुस्तकात (जमा खतावणी) दर्शविलेल्या एकूण जमा रकमेशी मासिक लेखे बंद केल्यावर किंवा पूर्ण केल्यावर रकमांचा ताळमेळ पडताळून घेणे आवश्यक असून, त्यात काही विसंगती आढळल्यास ती सत्वर दूर करणे आवश्यक आहे. मात्र तपशिलात नमूद केलेल्या केलेल्या कर प्रकाराच्या जमा रकमांमध्ये तफावत असताना संबंधितांनी नियमातील तरतुदीप्रमाणे उचित कार्यवाही केली नसल्याने एकत्रित मालमत्ता कर व इतर कर वसुल रकमांच्याबाबत तफावत निर्माण होऊन ती कायम राहिली आहे तरी विसंगतीबाबत ताळमेळ घेऊन अनुपालन दर्शवावे तसेच जमा रकमांमधील तफावती नियमानुरुप सत्वर कार्यवाही होईल याची योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे

| अ.क्र. | कराचा प्रकार | मध्यवर्ती भरणा किर्द प्रमाणे प्रत्यक्ष वसुल रक्कम | जमा वर्गीकरण (लेजर) प्रमाणे दर्शविलेली जमा रक्कम | तफावत रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | एकत्रित मालमत्ता कर | 79496755 | 79421547 | 75208 |
| 2 | विशेष पाणीपट्टी कर | 49586107 | 49670541 | (+) 84434 |
| 3 | विशेष स्वच्छता कर | 2845240 | 2859506 | (+) 14266 |
| 4 | शिक्षण कर | 811051 | 810292 | 759 |
| 5 | वृक्ष संवर्धन कर | 3074294 | 3071399 | 2895 |
| 6 | अग्नीशमन कर | 2980110 | 2988315 | (+) 8205 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | जललाभ कर | 1503626 | 1502074 | 1552 |
| 8 | दिवाबत्ती कर | 1501356 | 1499905 | 1451 |
| 9 | मल निस्सारण कर | 1503840 | 1502790 | 1050 |
| 10 | पथकर | 1507134 | 1505683 | 1451 |
| 11 | मलप्रवाह सुविधा कर | 3632901 | 3620000 | 12901 |
| 12 | महाराष्ट्र शिक्षण कर | 20651937 | 20624347 | 27590 |
| 13 | रोजगार हमी कर | 2597193 | 2594526 | 2667 |
| 14 | मागणी नोटीस फी | 241483 | 241783 | (+) 300 |
| 15 | वॉरंट फी | 81511 | 84079 | (+) 2568 |
| 16 | व्याज | 2324241 | 0 | 2324241 |

DATDAWM6901 (Ref No : 49)

## *18 देयकासोबत आवश्यक तो तपशिल नमूद न करता देयके पारित करणेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***देयके अदायगी करतांना सर्वसाधारण वित्तीय तत्वे, तसेच देयक पारीत करतांना पाळावयाच्या नियमांचे पालन न केल्याने झालेली अनियमितता.***

सन 2012-13 करीता निवडक महिन्यांची प्रमाणके पडताळणी केली असता, खालील तपशिलात नमूद देयकान्वये रकमांचे प्रदान झाले आहे. मात्र देयके पारीत होताना संबंधित विभागाने व त्यानंतर लेखा विभागाने त्याबाबत उचित लेखा परीक्षा केली नसल्याचे खालील अभिप्रायावरुन नमूद करण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे परीशिष्ठ 1 भाग-अ सर्वसाधारण वित्तीय तत्वे भाग-ब नुसार देयकाची सर्वसाधारणा तपासणी यात नमूद केलेल्या प्रमाणे देयकावर पैसे प्राप्त करणा-या व्यक्तीचे नाव नोंदविण्यात आलेले नाही. ( तपशिलात नमूद केल्याप्रमाणे)

2) उपरोक्त नियमातील तरतूदीनुसार देयक प्रदानाचा खुलासेवार तपशिल खुलासावार नोंदविलेला नाही. उदा. प्रदानाचे कारण, मंजूरी आदेश, विभागाचे नांव, अंदाजपत्रकीय तरतूद खर्च व शिल्लक निधी इत्यादी (तपशिलतील नमूद प्रमाणाकाबाबत.)

3) देयकासोबत संबंधित विभागाकडून खर्चास त्या त्या विभाग प्रमुखांची तत्वत: मान्यता घेतल्याबाबतचे

कोणतेही अभिलेखे देयकां सोबत नाही. (मंजूर कार्यालयीन टिप्पणी / दिनांक/ आदेश/शासन निर्णय/परिपत्रक इत्यादी)

4) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 13 नुसार प्रदान देयकातील प्रदान रकमांचे संदर्भात सक्षम अधिका-याचे मंजूरीचे आदेश देयकासोबत जोडणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता देयके पारीत झलेली आहेत. नियम 16 अन्व्ये नमूद केल्याप्रमाणे देयकावर आवश्यक त्या ठिकाणी रिकाम्या जागा राहणार नाहीत. याबाबत काळजी घेण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियमत 17 अन्वये देयके पारीत करतानां सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षा-या आढळ होत नाहीत. देयके लेखापाल व आयुक्त यांच्या स्वाक्षरीने थेट पारीत झाल्याचे आढळून येते.

6) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियमत 19 प्रमाणे रकमा अदा झालेबाबत संबंधितांकडून मुद्रांकित पोच घेण्यात आलेली नसल्याने प्रदानाची सत्यता पडताळणी करता येत नाही.

उपरोक्त नमूद अनियमितता हया तपशिलात नमूद प्रमाणांकाबाबत उदाहरणादाखल असून लेखा विभागाकडून अदा झालेल्या बहुतांश देयकांबाबत या अनियमितता लागू आहेत.

तरी नियमातील तरतूदीप्रमाणे उचित लेखापरिक्षा होउन देयके पारीत होतील याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे तपशिलातील प्रमाणंकाबाबत अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

DATDAWM6901 (Ref No : 64)

## *19 व्यवसाय कर रकमा भरणा करणेबाबत शासनाकडून 5 टक्के रक्कम प्राप्त करुन न घेतले बाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| ***व्यवसाय कर कपातीच्या रक्कमेपैकी नियमानुसार 5 टक्के इतकी रक्कम शासनाकडून महानगरपालिकेस अनुज्ञेय ठरत असतांना विहीत टक्केवारीची रक्कम प्राप्त करुन न घेणे बाबतची अनियमितता*** |
|---|

शासन निर्णय विभाग क्रमांक पीसीबी /1176 / आईत/ 10 दि. 31/08/1978 मधील निर्देशानुसार सन 2012-13 करीता महानगरपालिकेने एकूण कपात केलेल्या व्यवसाय कर रकमेचा शासन सदरी भरणा केल्या नंतर त्या 5 टक्के इतकी रक्कम शासनाकडून महानगरपालिकेस देय ठरते. मात्र महानगरपालिकेकडून उक्त बाबी विषयी उचित कार्यवाही लेखा परिक्षण कालावधीत झाल्याचे दिसून येत नाही यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्नावर

DRAFT

एक स्त्रोत कमी झाला आहे. याचा विपरीत परिणाम एकुण उत्पन्न व ज्या प्रयोजनार्थ रक्कम देय होते त्या बाबीवर झाला आहे. तरी महानगरपालिकेने कोणत्या कालावधी पासून व्यवसाय कर रकमांचा शासन सदरी भरणा करुन शासनाकडे विहित दराने मागणी केली नाही याबाबत परिगणना करुन शासनाकडून अनुशेषासह रक्कम मागणी करणे आवश्यक आहे. याबाबत नियमोचित अनुपालन सादर करावे.

DATDAWM6901 (Ref No : 54)

## *20 जन्म मृत्यु फी वसुली व नोंदवहीबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***नियमातील तरतूदीनूसार विहीत नमुन्यात साठा नोंदवही परीरक्षीत नसणे, तसेच प्राप्त होणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त खर्च विभागाच्या आस्थापनेवर करणेची अनियमितता बाबत.***

सन 2012-13 या आर्थिक वर्षात जन्म मृत्यु फी करीता एकूण रक्कम रु.64987/- वर्षा अखेरपर्यंत जमा झाले आहेत. याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 9(1) नुसार अभिलेखे विभागाकडून प्राप्त केलेल्या सामान्य पावती नमूना क्र.1 ची साठा नोंदवही परीरक्षित केलेली नाही. यामुळे विभागाने वर्षभरात वापरलेली पावती पुस्तके, वापर करणारे कर्मचारी नाव, पद, वापर कालावधी, पुस्तक परत केल्याचा दिनांक, स्वाक्षरी इत्यादी महत्वपुर्ण बाबी पडताळता आलेल्या नाहीत.

2) माहे मार्च-13 करीता भरणा कीर्द नोंदवही पडताळता महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 9 नुसार दैनंदिन जमा होणाऱ्या फी रक्कम, पावती क्रमांक, दिनांक, तपशिल इत्यादी सक्षम प्राधिकारी यांचेकडून पडताळणी होऊन लेखा विभागाकडे सत्वर भरणा होणे आवश्यक आहे. तथापि विभागाकडे जमा झालेल्या फी च्या संदर्भात पडताळणीची नियमोचित कार्यवाही झालेली नाही.

3) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 9(8) नुसार वसुलात आलेल्या रकमांचे मासिक व वार्षिक गोषवारे भरणाकीर्द मध्ये नोंदवून सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित होणे आवश्यक आहे. मात्र नियमानुसार मासिक व वार्षिक गोषवारे नोंदविण्यात आलेले नाहीत.

4) जन्म मृत्यु फी एकूण वसुल रक्कम रु.64987/- इतकी असून सदर फी वसुली करीता महानगरपालिकेने आपल्या आस्थापनेवरील चार कर्मचारी नियुक्त केले आहेत. फी वसुल रक्कम पाहाता वसुली करीता आस्थापनेवर (वेतन व भत्ते) खर्च जादा झाल्याचे दिसून येते. या अर्थी

उत्पन्नापेक्षा सदर बाबींवर खर्च अधिक झालेला असून महानगरपालिकाचे आर्थिक नुकसान होत आहे. किमान आस्थापना खर्चाइतके फी उत्पन्न प्राप्त होईल अशी योग्य ती उपाययोजना जसे फी दर वाढविणे, आस्थापना खर्च कमी करणे, संगणकीकरण करणे इत्यादी तरतुदी करणे आवश्यक आहेत.

तरी उपरोक्त अभिप्रायानुसार अनुपालन दर्शवावे.

FDSRKNM8201 (Ref No : 59)

## *22 धनादेश साठा नोंदवही न ठेवणेबाबत*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***लेखा विभागाने विहीत नमुन्यातील धनादेश नोंदवही, साठा नोंदवही परिरक्षीत न केल्याने झालेल्या अनियमितता बाबत.***

महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 9 (1) नूसार पावती पुस्तक, धनादेश पुस्तक यांचा हिशेब हा नमुना क्रमांक 1 मध्ये विहीत केलेल्या नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे. तथापि, सन 2012-13 या आर्थिक वर्षात लेखा विभागाने उपरोक्त नमुद नियमाप्रमाणे विहीत नमुन्यातील धनादेश नोंदवही, साठा नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे सदर कालावधीत महानगर पालिकेच्या विविध बँक खात्यातील प्राप्त धनादेश पुस्तके, वापर पुस्तके, शिल्लक असलेली पुस्तके, या बाबींची अचूकता प्रमाणित करता आली नाही.

धनादेश पुस्तक हा वित्तीय बाबींचा महत्त्वाच्या अभिलेख्यांपैकी एक आहे, त्याच्या वापराबाबत नियमानूसार साठा नोंदवहीत नियमित नोंद घेवून धनादेश पुस्तके वापराबाबत सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक आहे.

तरी सन 2012-13 या आर्थीक वर्षात बँकनिहाय धनादेश पुस्तके व त्यांचा वापर इत्यादी महत्वपूर्ण नोंदी विहीत नमुन्यातील साठा नोंदवहीत नोंदवून प्रमाणित करावे, तसेच यापुढे नियमोचित कार्यवाही होईल, याची दक्षता घ्यावी.

CCFNKKM8401 (Ref No : 11)

## *24 साहित्य खरेदी अगोदर खर्च रक्कम अदा करणेबाबत*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**



DRAFT

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 30707.00/-

अंतिम अमान्य रक्कम रु. 30707.00/-

***पुढील वर्षामधील देयके सन 2012-2013 या आर्थिक वर्षामध्ये अदा केलेली असून प्रत्यक्षात खरेदी केलेली साहीत्य प्राप्त झालेली नसतांनाही सदर देयके अदा करणेत आल्याने झालेली अनियमितता.***

खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे महानगर पालिका कडील वाहन क्रमांक एमएच-18-एफ-1020 करीता साहित्य खरेदी करणेत आलेली असून रक्कम रुपये 30707/- संबंधितास अदा करणेत आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहीत्य प्रकार | प्रमाणक क्रमांक /दि. | देय रक्कम | नांवे |
|---|---|---|---|---|
| 1 | सोफा पट्टी बुस्टर, कव्हर, कुशन, कव्हर, नॅपकिन | 4266/ 08/3/2013 | 2802 | सजावट हॅण्डलूम, धुळे |
| 2 | स्थायी समिती सभापती विरोधी पक्ष नेते यांचे दालनासाठी परदे, खुर्ची कव्हर इ. | 4264/ 08/3/2013 | 25745 | |
| 3 | वाहन क्र.एमएच-18पी-11 साठी टर्कीस क्लॉथ खरेदी. | 4265/ 08/3/2013 | 2160 | |
| | | एकुण | 30707 | |

प्रमाणकाची तपासणी केली असता, सादर केलेले बीजक पाहता उपरोक्त नमुद साहित्याची खरेदीचा दिनांक 07/07/2013 नमुद आहे. याअर्थी सदर साहीत्य खरेदी पूर्वीच संबंधीतास जवळ जवळ दोन महीने अगोदर (दि.08/03/2013) रक्कम अदा करणेत आले आहे. महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहीता 1971 चे नियम 42 नूसार साहीत्य प्रत्यक्षात प्राप्त झालेनंतर खर्च रक्कम संबंधितास प्रदान करणे क्रमप्राप्त आहे.यामुळे उपरोक्तपणे खर्च रक्कम रुपये 30707/- चे प्रदान नियमबाहयपणे झाले आहे. यामुळे खर्च आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

CCFNKKM8401 (Ref No : 13)

## *29 सहावा वेतन आयोग फरकाची रक्कम भ्.निनि. खातेमध्ये जमा नसलेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सहावा वेतन आयोग फरकाची रक्कम भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा न केलेबाबत.***

धुळे महानगरपालिका, धुळे यांनी सहावा वेतन आयोगानुसर सुधारीत वेतनश्रेणी देण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार नियमित कर्मचा-यांना सहावा वेतन आयोगानुसार वेतन व भत्ते दिले जात आहेत.त्यामुळे शासन अधिसूचना क्रमांक वेपूर/1209/प्र.क्र.27/सेवा-9 दिनांक 22 एप्रिल 2009 नुसार पात्र कर्मचा-यांना सहावा वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी मधील फरकाची वेतन थकबाकी रकमा प्रदानाची पध्दत नमूद करण्यांत आलेली आहे. फरक रकमेचे पाच समान भाग करुन प्रत्येक वर्षाच्या मे पेड जुन चे वेतना सोबत हप्ता हा संबंधिताच्या भविष्य निर्वाहनिधी खाते मध्ये जमा करणेबाबत निर्देश दिले आहेत परंतू सन 2012-13 चे भविष्य निर्वाहनिधी खाते नोंदवही पडताळणी केली असता सदर हप्ता संबंधितांच्या खात्यात जमा असलेबाबत नोंद नाही तसेच यापूर्वीचे हप्ते जमा करुन स्वंतत्र नोंद घेतलेली आढळत नाही.
तरी याबाबत उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

DVERSKM7501 (Ref No : 33)

## *31 भविष्य निर्वाहनिधी शिल्लकेचे विवरणपत्र खातेदारास अदा न करण्यांची अनियमितता*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***भविष्य निर्वाहनिधी शिल्लके बाबतचे विवरणपत्र कर्मचा-यांना न दिलेबाबत.***

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 134(2) प्रमाणे प्रत्येक आर्थिक वर्ष समाप्ती नंतर शक्य तितक्या लवकर लेखाधिकारी यांनी प्रत्येक वर्गणीदारास त्याच्या भविष्य निर्वाहनिधी खात्यात वर्षभरात जमा वर्गणी व नावे टाकलेली रक्कम व्याजाची रक्कम वदिनांक 31 मार्च अखेर खात्यावर शिल्लक असलेली रक्कम इत्यादी बाबी दशविलेले विवरणपत्र ( खातेचिठ्ठी ) देवून विवरणपत्र अचुक असल्याची खात्री केल्याबाबत पोच घेणे आवश्यक आहे. मात्र विभागाकडून नियमातील तरतूदीप्रमाणे निधीची विवरणपत्रे दिली जात नाहीत



DRAFT

असे दिसते.

सदर बाब नियमोचित नसून भविष्य निर्वाहनिधी मधील रकमांना अचुकता प्राप्त होवू शकलेली नाही. तरी संबंधितांनी याबाबत उचित कार्यवाही करुन अहवाल त्वरीत सादर करावा.

DVERSKM7501 (Ref No : 32)

## *32 सेवानिवृत्त कर्मचा-यांची सहावे वेतन आयोग फरकांची रक्कम थकीत असलेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सेवानिवृत्त कर्मचा-यांची सहावे वेतन आयोगानुसार फरकाची थकीत रक्कम देणेबाबत.***

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन अधिसूचना क्र. वेपूर/1209/प्र.क्र.27/सेवा-9 दिनांक 22/04/2009 व शासन परिपत्रक क्रमांक वित्त विभाग क्रमांक वेपूर/1209/प्र.क्र.69/सेवा-9 दिनांक 29/04/2009 यानुसार सेवा निवृत्त कर्मचा-याच्या 6 वे वेतन आयोगाचा फरक पाच वर्षात पाच समान हप्त्यांत प्रत्येक वर्षाच्या माहे मे देय जुन या महिन्यांत रोखीने अदा करणे आवश्यक असतांना तसेचा सेवा निवृत्त होणा-या कर्मचा-याच्या बाबतीत सेवानिवृत्तीच्या इतर लाभांसोबत फरकाची अंतिम रक्कम देखील सत्वर व्याजासह अदा करणेबाबत स्पष्ठ निर्देश असतांनाही महानगरपालिकेने याबाबत उचित कार्यवाही न केल्याने मार्च 2013 अखेर लेखा परीक्षण कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना सहावे वेतन आयोग फरकाच्या रकमां अदा न करता अदत्त ठेवल्या आहेत. यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झाले असून सदर अनियमिततेस सदोष अर्थसंकल्प तयार करणे म्हणजेच प्रस्तावित सेवानिवृत्त कर्मचारी संख्या व त्यांना दयावयाच्या रकमा या आर्थिक वर्षात सुनिश्चीत असतांना त्या अनुषंगाने उचित रक्कमा अर्थसंकल्पात तरतूद करुन संबंधितांना वेळोवेळी प्रदान करणे आवश्यक होते. मात्र या आर्थिक वर्षात फरकापोटी दिनांक 31/07/2012 रोजी रक्कम रुपये 5000/- व दिनांक 09/11/2012 रोजी रक्कम रुपये 5000/- अनुक्रमे एवढी अदा केल्याचे डे बुक रजिस्टरवरुन समजते. मात्र आज अखेर किती रक्कम बाकी आहे याचा बोध होत नाही. मार्च 2013 अखेर थकबाकी किती आहे. सदर थकबाकी रक्कम अदा करणे प्रलंबित असल्याने महानगरपालिकेच्या दायित्वात वाढ करणारी बाबी आहे. तसेच सदर रक्कम जादा कालावधी पर्यत संबंधितांना अदा करणे प्रलंबित राहिल्यास व संबंधितांनी त्यावर शासन विहित दराने व्याजाची मागणी केल्यास त्याबाबत संबंधितांची जबाबदारी निशचित होणे आवश्यक असेल.

तरी रकमा स्तवर अदा करुन थकबाकी पोटी किती रक्कम देणे बाकी आहे याचे अनुपालन सादर करावे.

DVERSKM7501 (Ref No : 93)

DRAFT

## *33 सेवानिवृत्ती धारकांकडून हयातीचे दाखले वेळेत प्राप्त न केलेमुळे निवृत्तीवेतन चुकीचे अदा केलेबाबत*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***निवृत्ती वेतन धारकांकडून हयातीचे दाखले वेळेत न घेतल्यामुळे झालेल्या अनियमिततेबाबत***

निवृत्त वेतन विभागाकडील डे बुकची तपासणी केली असता संबंधित सेवानिवृत्त कर्मचा-यांकडून / कुंटूंबनिवृत्त वेतन धारकांकडून महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम136(4) (16) मध्ये नमूद केल्यानुसारनिवृत्त वेतन विभागाने संबंधित व्यक्तीचे हयात दाखले (आयु प्रमाणपत्र) प्राधिकृत आधिका-यांने प्रत्येक वर्षी नोव्हेंबर महिन्यात प्राप्त करुन घेवून त्यांच्या हयातीची खात्री करुन घेणे आवश्यक आहे.

मात्र लेखा परीक्षण कालावधीत संबंधित निवृत्त वेतन धारकांकडून विहित कालावधीत हयातीचे दाखले प्राप्त करुन घेतले नसल्याचे आढळते व त्यामुळे खालिल उदाहरणातील निवृत्त वेतन धारकांस मुत्यू नंतर सुध्दा निवृत्तीवेतन अदा केल्याचे निदर्शनास येते.

| अक्र | निवृत्ती वेतन धारकांचे नांव | धनादेश क्रमांक व दिनांक | धनादेश पारीत झाल्याचा दिनांक | रक्कम | परत करण्याचे कारण | मूत्यु दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | भिकूबाई धोंडू गवळी | 000105 / 02/02/2012 | 07/05/2012 | 1000 | मयत झाल्याने | नमूद नाही |
| 2 | शांताबाई पंडीत बडगुजर | 000040 / 18/04/2012 | 05/07/2012 | 1176 | मयत झाल्याने | नमूद नाही |
| 3 | पार्वतीबाई राजधर गरुड | 000132 / 17/05/2012 | 05/07/2012 | 12146 | मयत झाल्याने | नमूद नाही |
| 4 | अहिल्याबाई पौलाद बागुल | 01030 / नमूद नाही | 27/12/2012 | 1534 | मयत झाल्याने | नमूद नाही |
| 5 | शारदाबाई मोरेश्वर जळूकर | 522213/ 21/12/2012 | 27/12/2012 | 2500 | मयत झाल्याने | नमुद नाही |



DRAFT

## *35 भविष्य निर्वाहनिधी खात्यामध्ये असणा-या सर्व साधारण त्रुटी.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 05**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

| |
|---|
| ***भविष्य निर्वाहनिधी खात्यात असणा- या सर्वसाधारण त्रुटी*** |

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियमानुसार महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी नियम 1988 नुसार सन 2012-13 करीता भविष्य निर्वाहनिधी लेखे संबंधितांकडे तपासले असता त्यामध्ये खलिलप्रमाणे सर्वसाधारण त्रुटी आढळल्या आहेत.

1. भविष्य निर्वाहनिधी खाते अदयावत ठेवणेकरीता कायमस्वरुपी एकच खाते क्रमांक एखादया कर्मचा-यांस देणे आवश्यक आहे बहृतपत्रक तपासले असता तो ब-याच वेळा बदली झालेला आढळतो. असा क्रमांक बदली झालेमुळे पुढील वर्षात ज्यावेळी मागील शिल्लक ओढली जाईल त्यावेळी नजरचुकीने ती दुस-याच्या खाती जमा होण्याची शक्यता नाकरता येत नाही. सबब भ्.नि.नि. क्रमांक एकच ठेवण्यांबाबत सूचित करण्यांत येत आहे.

2. 0.50 पेक्षा जास्त असल्यास रकमेचा पूर्णाकांत रुपांतर करणे आवश्यक आहे. ब-याच ठिकाणी 0.50 पेक्षा जास्त असल्यावर सुध्दा तो कमी दर्शिविलेला आहे.

3. भविष्य निर्वाहनिधी खात्यातून अग्रिम काढणा-या व्यक्तीची नोंद ठेवणेकरीता वर्षाकरीता एक भ.नि.नि.अग्रिम रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे.

4.भविष्य निर्वाहनिधी देयकांवर परतफेड किती हप्त्यात होणार आहे हे नमूद केलेले नाही. ते करणे आवश्यक आहे.

5. संगणकीयकृतरित्या भविष्य निर्वाहनिधी लेखे ठेवणे आवश्यक आहे.

तरी वरील त्रुटी निवारण करुन भविष्य निर्वाहनिधी खाते अदयावत ठेवणे आवश्यक आहे.

6. तसेच भविष्य निर्वाहनिधी खाती विहीत दराने वर्गणी जमा केलेली नसल्याने अर्धसमास पत्र क्रं. 31 दि 16.10.2015 निर्गमित केलेले आहे. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी नियम 1988 मधील 6 ते 11 नुसार वर्गणीदाराच्या मूळ वेतनाच्या किमान 6 टक्के दराने वर्गणी त्याच्या मासिक वेतनातून नियमित कपात करणे आवश्यक आहे.

तथापि , सन 2012-2013 या आर्थिक वर्षातविभागाकडील भविष्य निर्वाहनिधी खाते नोंदवही पडताळणी केली असता वर्गणीदरांकडून सदर तरतूदीनुसार विहित दराप्रमाणे वर्गणी कपात केल्याचे दिसून येत नाही.

DRAFT

तसेच खाते नोंदवहीत मूळ वेतन व वेतनश्रेणी हया बाबी नोंदविलेल्या नसल्यामुळे वर्गणी दरानुसार अचुकता पडताळता आलेली नाही.

त्याचप्रमाणे काही कर्मचा-यांची सन 2012-13 करीता कोणत्याही प्रकारची रक्कम जमा नसलेबाबत आढळते. तरी नियमोचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

DVERSKM7501 (Ref No : 34)

## *36 मालमत्ता करात वाढ न करणेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सन 1992 पासून मालमत्ता करात कोणत्याही प्रकारची वाढ करण्यांत आलेली नसल्यामुळे महानगरपालिकेचे होत असलेल्या नुकसानाबाबत.***

महाराष्ट्र महानगरपालिका लेखा संहिता 1971 चे 74 व 75(7)नियमा नुसार मालमत्ता कर हा प्रत्येक 3 वर्षांनी फेरपस्तावित करणे अपेक्षित असताना सन 2003 पासून कोणत्याही प्रकारची वाढ करण्यांत आलेली नसल्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे सदर वाढ कोणत्या कारणांमुळे करण्यांत आलेली नाही. याबाबत त्वरीत खुलासा करण्यांत यावा.

तरी याबाबत उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

DVERSKM7501 (Ref No : 30)

## *37 मालमत्ता कररक्कम मुदतीत वसूल न झाल्याने अदत्त रकमांवर शास्तीची आकारणी न करणेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मालमत्ता कर वेळेत वसूल न झालेमुळे अदत्त रकमांवर शास्तीची आकारणी केलेली नसल्यामुळे झालेल्या अनियमिततेबाबत.***



DRAFT

मुंबई महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड मधील प्रकरण 8 कराधान नियम मधील कलम 41 चा 1 व 2 नुसार एकत्रित मालमत्ता कर मागणी केलेली बिले 2 सहामाही दिल्याच्या दिनांकापासून मालमत्ता धारकाने 3 महिन्याच्या आज व प्रत्येक वर्षाच्या 31 डिसेंबर पूर्वी कराच्या रकमांचा भरणा करणे आवश्यक आहे. अशी रक्कम पूर्णपणे भरणा केली असल्यास किंवा काही रक्कम अदत्त राहिल्यास विहित कालावधीनंतर (दिनांक 31डिसेंबर ) प्रत्येक महिन्यांसाठी थकीत रकमांवर 2 टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून भरण्यांस मालमत्ता धारक जबाबदार असेल व अशी रक्कम पूर्ण देई पर्यत शास्तीची आकारणी मनपाकडून केली जाईल व अशी शास्तीची आकारणी इमारती वरील कर अधिनियम सुधारणा 2009 अस्तित्वात येण्यापूर्वीची अदत्त रकमांकरीता सुध्दा लागू असेल असे नियमात स्पष्ठ करण्यांत आले आहे.

तथापि मनपाने स्थापना दि. 30 जुन 2003 पासून एकत्रित मालमत्ता करापोटी वसुली अभावि थकीत राहिलेल्या किंवा अदत्त राहिलेल्या रकमांवर कलमात नमूद केल्याप्रमाणे 2 टक्के इतकी शास्तीची रक्कम आकारणी न करण्यांची अनियमितता झालेली आहे.

तसेच या ठिकाणी असे नमूद करण्यांत येते की, सन 2003 पासून आज अखेर किती रक्कमा थकबाकी मध्ये आहेत त्याबाबत वर्षनिहाय माहिती उपलब्ध नसल्याने शास्तीची एकत्रित रक्कम किती होईल याबाबत बोध होत नाही. तरी सदर रक्कम वर्षनिहाय दर्शवावी तसेच शास्तीबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

DVERSKM7501 (Ref No : 29)

### *39 दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे अद्यावत न करणेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 00**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***शासन निर्देशानुसार महानगरपालिकेने सन- 2012-13 अखेर पर्यंतचे अभिलेखे व्दिनोंद पध्दतीने ठेवले नसले बाबतची अनियमितता.***

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.लेखांस-10/2004/71/प्र.क्र.5/04 नवी-3, दिनांक-06/07/2005 नुसार महानगरपालिका यांनी आपले लेखे हे दुहेरी (व्दिनोंद) **(DOUBLE ENTRY)** नोंद पध्दतीने अद्यावत ठेवण्याबाबतचे स्पष्ट निर्देश देण्यात आलेले असून, ड वर्ग दर्जाच्या महानगरपालिकांनी असे दुहेरी नोंद पध्दतीचे लेखे अद्यावत ठेवण्याबाबतची अंमलबजावणी ही सन 2006-07 चे आर्थिक वर्षापासून करणे अनिवार्य होते. मात्र धुळे महानगरपालिका धुळे यांनी सन



DRAFT

2012-13 या वित्तीय वर्षाच्या अखेरपर्यंत उपरोक्त शासन निर्देशाप्रमाणे आपले लेखे दुहेरी नोंद पध्दतीने अद्यावत ठेवले नसल्याची अनियमितता कायम असल्याचे आढळून आले आहे. याबाबत सन 2011-12 चे लेखा परीक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक 139 नुसार आक्षेप नोंदवून ही महानगरपालिकाने हेतूपुरस्कर शासन निर्देशाप्रमाणे दुहेरी नोंद पध्दतीत लेखे अद्यावत (सन 2006-07 पासूनचे) ठेवणेकामी विलंब/टाळाटाळ केली असल्याचे लेखा परीक्षणाचे स्पष्ट मत झाले आहे.

शासन निर्देशाप्रमाणे दुहेरी नोंद लेखापध्दतीची अंमलबजावणी होत नसल्याने सन 2012-13 अखेर महानगरपालिकाने वार्षिक अंदाजपत्रक ताळेबंध व उत्पन्न खर्च विवरण (Income & Expenditure Statement) इत्यादी महत्वपुर्ण बाबींची अचुकता लेखा परीक्षणात पडताळता आलेली नाही.

दुहेरी नोंद लेखा पध्दतीत महानगरपालिकेने लेखे ठेवण्यास सुरुवात केली आहे. तथापि सदरची पध्दत मा.आयुक्त तथा संचालक, नगर विकास संचालनालय यांच्या सहमतीने व उपरोक्त शासन निर्देशाप्रमाणे पुर्णपणे कार्यान्वित केली नसल्याने सदरच्या आर्थिक वर्षाकरीता पुर्वीच्या रोख तत्वावर लेखे ठेवण्याची पध्दत अनुसार लेखे पडताळणीचे काम लेखापरीक्षणात करण्यात आलेले आहे. यामुळे दुहेरी नोंद लेखा पध्दत ठेवण्याच्या मुळ उद्देशाची उचित फलश्रुती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही.

तरी महानगरपालिकाने उपरोक्त शासन निर्देशाप्रमणे तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या सहमतीने पुर्वलक्षी प्रभावाने आपले सर्व लेखे दुहेरी नोंद पध्दतीत अद्यावत करुन सदरची पध्दत सत्वर अस्तित्वात आणणे आवश्यक आहे.

DATPBKM6701 (Ref No : 81)

## *40 मुख्य लेखारीक्षक यांचा सन 2012-13 करीताचा लेख्यांवरील अहवाल सादर केले नसलेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 00**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***अधिनियमातील तरतूदी नुसार महानगरपालिकेचे मुख्य लेखा परिक्षक यांनी आपल्या अभिलेख्यांवरील सन- 2012-13 करिताचा अभिप्राय अहवाल मा.स्थायी समिती समोर आर्थिक वर्ष समाप्ती नंतर सादर न केलेबाबतची अनियमितता.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 (सुधारणा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम) चे



DRAFT

कलम 106 (3) नुसार प्रत्येक आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर महानगरपालिकेचे मुख्य लेखापरीक्षक यांनी सर्व लेख्यांवरील आपला अभिप्राय असलेला अहवाल तयार करुन मा.स्थायी समितीस सादर करावयाचा आहे. मात्र सन 2012-13 करीताचे लेखे वरील अहवाल मुख्य लेखापरीक्षक यांनी तयार करुन मा.स्थायी समिती समोर सादर केला नसल्याची अनियमितता झालेली आहे.

सदरच्या वित्तीय वर्षाचे लेख्यावरील आपले अभिप्राय असलेला अहवाल मुख्य लेखापरीक्षक यांनी सादर केला नसल्याने महानगरपालिकेच्या संपुर्ण लेख्यांमध्ये कोणत्या गंभीर उणीवा अथवा अनियमितता झाल्या होत्या किंवा कसे याबाबतची कोणतीही अचुकता अहवालाअभावी लेखा परीक्षणात पडताळता आलेली नाही.

मुख्य लेखापरीक्षक यांनी कलमातील तरतुदीनुसार लेख्यांवरील आपला अहवाल वेळीच सादर केला असता तर लेख्यातील असलेल्या किंवा झालेल्या अनियमितता या वेळीच संबंधितांच्या निदर्शनास आणून देऊन त्यांची नियमोचित पुर्तता होऊन लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले असते व या अहवालातील नमूद अनियमितता / उणीवाबाबत आक्षेप संख्या मर्यादित होऊ शकली असती असे लेखापरीक्षणाचे स्पष्ट मत आहे.

तरी उपरोक्त कलमातील नमूद तरतुदीनुसार प्रत्येक आर्थिक वर्ष समाप्तीनंतर मुख्य लेखापरीक्षक यांनी आपल्या लेख्यांवरील अहवाल वेळीच तयार करुन मा.स्थायी समिती समोर सत्वर सादर होईल याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

DATPBKM6701 (Ref No : 82)

## *41 अग्निशमन व्यवस्था तपासणी वार्षिक फी वसुल होत नसलेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 05**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : ९ड*

***अधिनियमातील तरतूदी नुसार शहरातील विविध दवाखाने, हॉटेल्स, शाळा, सिनेमागृह, व्यावसायिक जागा, मोठया इमारती इ. ठिकाणी असलेल्या अग्नीशमन व्यवस्थेची वार्षिक तपासणी होऊन फी वसुल करण्यात येत नसलेबाबतची अनियमितता.***

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील तरतुदीनुसार महानगरपालिका हद्दीतील विविध आस्थापनांकडील (सार्वजनिक/खाजगी दवाखाने, हॉटेल्स, शाळा, व्यावसायिक/उद्योगांच्या जागा, शासकीय इमारती, मोठया इमारती, बँक, सिनेमा हॉल/नाटयगृह व

DRAFT

मॅरेज हॉल्स इत्यादी) अग्निशामन व्यवस्था अस्तित्वात आणून त्या व्यवस्थेची प्रत्येक वर्षी अग्निशामन विभागाने नियमित तपासणी करुन त्यापोटी शासनाकडून मंजूर केलेल्या फी दराने वार्षिक फी वसुल करुन तपासणी अहवाल व वसुल फी इत्यादी बाबतचे अभिलेखे दप्तरी ठेवणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त अधिनियमातील तरतुदी प्रमाणे अग्निशामन विभागाने अहवाल न ठेवणे तसेच वार्षिक फी वसुली न करण्याची अनियमितता केली आहे.

याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) उपरोक्त अधिनियमातील कलम 12 व 13 नुसार शहरातील विविध आस्थापनांकडील असलेल्या (नियमानुसार) अग्निशामन व्यवस्थेची वार्षिक तपासणी करीता महानगरपालिकेने शासनाच्या पुर्व मान्यतेने दर निश्चित करुन तपासणी फी वसुल करावयाची असताना प्रत्यक्षात महानगरपालिकेने माहे मार्च-2013 अखेरपर्यंत अशी वार्षिक तपासणी फी वसुलात आणलेली नाही. सदरबाब नियमबाहय असून फी वसुली अभावी संबंधित आस्थापनांना देण्यात येणाऱ्या अग्निशमन सेवा वरील खर्चाचा नाहक भुर्दंड महानगरपालिकेस सोसवा लागत आहे.

2) उपरोक्त अधिनियमातील कलम 25 (1) नुसार महानगरपालिकेने आग सुरक्षा निधी या नावे विशेष निधी स्थापन करुन या अधिनियमान्वये वसुलात येणाऱ्या सर्व प्रकारच्या रकमा या निधीत जमा करावयाचे आहेत जेणेकरुन महानगरपालिकेकडून पुरविण्यात येणाऱ्या अग्निशमन सेवेवरील होणारा खर्च त्यातून भागविणे शक्य होईल. असे निर्देशित असताना सन 2012-13 अखेरपर्यंत अग्निशमन विभागाने वार्षिक तपासणी फी प्रत्यक्षात वसुलात आणलेली नसल्याने आग सुरक्षा निधी स्वतंत्र ठेवण्याच्या उद्देशाची फलश्रुती होऊ शकलेली नाही.

3) सन 2012-13 करीता तसेच त्यापुर्वीच्या कालावधीकरीता अग्निशामन विभागाकडून शहरातील नमूद आस्थापनांकडील अग्निशमन व्यवस्थेची तपासणी होत नसल्याने वार्षिक फी वसुलात आलेली नाही. त्यामुळे विभागाने महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 114 नुसार नमुना क्र.82 प्रमाणे वार्षिक फी मागणी व आकारणी नोंदवही अस्तित्वात आल्याचे आढळून आले नाही. नियमोचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

4) उपरोक्त प्रमाणे विभागाने मागणी व आकारणी नोंदवही परिरक्षित केली नसल्याने तसेच वार्षिक फी वसुल न केल्याने उपरोक्त अधिनियमातील कलम 36 (2) नुसार शास्ती रकमेस पात्र असणाऱ्या आस्थापनांची तपशिलवार बाब लेखा परीक्षणात पडताळता आलेली नाही.

5) महानगरपालिकेने आपल्या शहर हद्दीतील विविध आस्थापनांकडील अग्निशमन व्यवस्था इत्यादीची सन 2012-13 करीता वार्षिक फी वसुल केली नसल्याने संबंधितांनी त्यांच्याकडील आग सुरक्षा कामी ठेवलेल्या उपकरण/साहीत्य, प्रकार इत्यादीची उपयुक्तता सारखी महत्वपुर्ण बाब महानगरपालिकेकडून तपासणी झाली नसल्याने अधिनियमातील निकषाप्रमाणे संबंधितांकडे उपकरणे/साहीत्य होते कींवा कसे याबाबत तपासणी अहवालाअभावी सत्यता पडताळता आलेली नाही. यामुळे संबंधित आस्थापनांकडे अग्निशमन व्यवस्था नियमोचित कार्यान्वित असल्याचे लेखापरीक्षणात प्रमाणित होऊ शकलेले नाही.

DRAFT

तरी उपरोक्त अभिप्रायानुसार वार्षिक फी विहीत दराने वसूलात आणणेबाबत तसेच नियमानुरुप वार्षिक तपासणी करुन अभिलेखे अद्यावत होणे आवश्यक आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 91)

### *45 अभिन्यास मंजूर प्रकरणांची नोंद विहीत नोंदवहीत नसलेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मंजुर अभिन्यास प्रकरणांची नोंद विहीत नमुना नोंदवहीत न घेणे बाबतची अनियमितता.***

सन 2012-2013 मध्ये नगररचना विभागाने अभिन्यास प्रकरणांना विहीत दराने विकास शुल्क आकरणी करुन रहिवास/वाणिज्य प्रयोजनार्थ तात्पुरती मंजुरी वेळोवेळी प्रदान केलेली आहे. सदर कालावधीत विभागाने एकूण 17 अभिन्यास प्रकरणे मंजूर केल्याचे उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यावरुन दिसून येते.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहीता 1971 चे नियम 75(6) नुसार नमुना क्रमांक- 45 नुसार विहीत केलेल्या इमारत परवाना नोंदवहीत विभागाकडून मंजूरी देण्यात येणाऱ्या अभिन्यास, बांधकाम मंजूरी इत्यादीची मंजूर प्रकरणनिहाय मंजूरी क्रमांक, दिनांक, भागाचा तपशील, मालकाचे नाव, बांधकाम परवानगीचे स्वरुप (रहिवास/वाणिज्य/अभिन्यास इत्यादी) अर्ज दिनांक, कामाचे क्षेत्रफळ/परीमाण इत्यादी महत्वपुर्ण बाबींची नोंद होऊन नोंदी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. मात्र विभागाने उपरोक्त 17 मंजूर प्रकरणांची कोणतीही नोंद विहीत नमुन्यातील परवाना नोंदवहीत घेतलेली नाही. यामुळे सदरच्या आर्थिक वर्षात विभागाकडून किती अभिन्यास प्रस्तावांना तात्पुरती मंजूरी प्रत्यक्षात देण्यात आली किंवा कसे याबाबतची सत्यता पडताळता आलेली नाही.

तरी नियमानुसार नमुद केलेल्या नोंदवहीत अद्यावत नोंदी घेऊन मंजूर प्रकरणे उपलब्ध केलेल्या प्रकरणांप्रमाणे उचित असल्याचे लेखा परीक्षणास अनुपालन दर्शवावे व यापुढे नोंदवहीत आवश्यक त्या नोंदी घेणेबाबतची दक्षता घ्यावी.

DATDAWM6901 (Ref No : 100)

### *46 इमारत परवाना नोंदवहीबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***नोंदवहीत रकाना निहाय मंजुर प्रकरणांची माहीती न नोंदविणे, किती बांधकामे पूर्ण होऊन कर निर्धारण झाले किंवा कसे, तसेच नोंदवहीत नमुद परवानगी क्रमांकावर माहीती निरंक राहाणे इत्यादी प्रकारच्या अनियमितता बाबत.***

सन- 2012-2013 या वित्तीय वर्षासाठी नगररचना विभाग यांचेकडील नमुना क्रमांक- 45 मधील इमारत परवाना (बांधकाम परवानगी) नोंदवहीची पडताळणी केली असता, अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) सदर कालावधीत विभागाने मंजूर केलेल्या प्रकरणांचा तपशिल रकाना क्रमांक– 1 ते 7 यात योग्य त्या नोंदी प्रकरणनिहाय नोंदविलेल्या नाहीत. तथापि, बांधकाम परवानगी दिनांकानंतरच्या नोंदी जसे– काम पुर्ण दिनांक, ताबा दिनांक, कर संकलन विभागास कळविल्याचा दिनांक, कर आकारणी दिनांक, रक्कम, इत्यादी महत्वपुर्ण रकाने (क्रमांक 8 ते 13) यात नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. यावरुन नोंदवही अपुर्ण राहील्याचे दिसते.

2) बांधकाम परवानगी मंजूर प्रकरण निहाय दिनांक- 31/03/2013 अखेर एकूण मंजूर प्रकरण संख्या 1022 पैकी किती बांधकामे पुर्ण झाली व कर आकारणी होऊन कर रकमेत किती वाढ झाली किंवा कसे इत्यादी महत्वपुर्ण बाबी नोंदवहीतील नोंदी अभावी अचुकता पडताळता आलेली नाही.

3) नोंदवही पडताळता परवानगी क्रमांक - 92, 198, 223, 264, 281, 312, 376, 401, 448, 468, 592, 595, 605, 672, 679, 793 व 988 यावर मंजूर प्रकरणांचा कोणताही तपशिल रकाना निहाय नोंदविल्याचे आढळ होत नाही. यामुळे सदर क्रमांकाने कोणास कोणत्या प्रयोजनार्थ किती बांधकाम क्षेत्रास विभागाने प्रत्यक्षात मंजूरी दिली किंवा कसे, त्याचप्रमाणे उपरोक्त क्रमांकाने कोणत्या बांधकामास परवानगी मिळाली इत्यादी महत्वपुर्ण माहीती पडताळता आलेली नाही. परवानगी क्रमांक– निरंक ठेवण्याचे प्रयोजन विषद होणे आवश्यक आहे.

4) विभागाने परवानगी दिलेल्या मंजूर प्रकरणांपैकी दिनांक- 31/03/2013 अखेर संबंधितांनी मंजूर विकास शुल्क रकमेचा भरणा करुन परवानगी प्रमाणपत्र घेतले व किती नागरीकांनी प्रकरणे मंजूर होऊनही विकास शुल्क भरणा केले नाही. याबाबत कोणताही तपशिल (पावती क्रमांक, दिनांक, रक्कम परवाना प्राप्त केलेबाबत पोहोच इत्यादी) नोंदवहीत नोंदविण्यात आलेला नाही. यामुळे नोंदवही निहाय परवानगी प्राप्त परवाना प्रमाणे प्रत्यक्षात विकास शुल्क प्राप्त झाले किंवा कसे इत्यादी महत्वपुर्ण बाब पडताळता आलेली नाही.

DATDAWM6901 (Ref No : 101)

## *48 विवाह मंडळांची नोंदणी न करणे व त्यामुळे फी रकमेचे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**



DRAFT

*शासकीय निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिका क्षेत्रातील विवाह मंडळाची नोंदणी/नुतणीकरणे व विहीत दराने फी वसुली करुन शासकीय कोषागारात रक्कमा जमा करणे व नोंदवहया अद्यावत ठेवणे इत्यादी बाबत महानगरपालिकेने नियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही न केल्याने होत असलेल्या आर्थिक नुकसानीबाबतच्या अनियमितता.***

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 मधील नियम 3 नुसार निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रातील कार्यरत विवाह मंडळे यांची नोंदणी तसेच नुतणीकरण निबंधकाकडे अर्ज सादर होऊन व रक्कम रुपये 5000/- प्रति प्रकरण या विहीत दराने फी आकारुन संबंधित मंडळांना नमुना-अ मध्ये नोंदणी प्रमाणपत्र देऊन नमुना-ह या नोंदवहीत संबंधित विवाह मंडळांची नोंद घेण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. दिनांक.01/05/2008 पासून विवाह नोंदणीचे निबंधक म्हणून मा.आयुक्त, महानगरपालिका हे काम पाहणार असल्याचे शासनाचे निर्देश आहेत.

उपरोक्त बाब पाहाता सन 2012-13 करीता महानगरपालिकेकडील अभिलेखे यांची पडताळणी केली असता विभागाकडून महानगरपालिका क्षेत्रातील कार्यान्वित असलेल्या कोणत्याही विवाह मंडळाची विहीत दराने फी आकारणी करुन नोंदणी अथवा नुतणीकरण झाल्याचे आढळ होत नाही. नियमानुसार कार्यवाही झाली नसल्याने विभागाकडून सदर कालावधीत नियमात नमुद केल्याप्रमाणे नमुना-अ (प्रमाणपत्र) व नमुना-ह (नोंदवही) सारखे आवश्यक अभिलेखे परिरक्षित न होण्याची अनियमितता झाली आहे. त्याचप्रमाणे सदर कालावधीत विवाह मंडळाचे नोंदणी अथवा नुतणीकरण याचे काम न केल्याने शासकीय महसुलाचे आर्थिक नुकसान होण्याची अनियमितता झालेली आहे.

तरी महानगरपालिकेने नियमातील तरतुदीप्रमाणे आपल्या कार्यक्षेत्रातील कार्यान्वित विवाह मंडळे यांची नोंदणी/नुतणीकरण विहीत नमुन्यातील प्रपत्रात करुन संबंधितांकडून पुर्वलक्षी प्रभावाने (दिनांक.01/05/2008 पासुन) अनुज्ञेय होणारी विहीत दराने फी आकारणी करुन रक्कम वसुलात आणून सत्वर शासकीय कोषागारात भरणा करण्याची नियमोचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 111)

## *50 वकील फी / कायदेशीर सल्लागारास केलेल्या प्रदानाबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 448225.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 448225.00/-

***कायदेविषयक सल्लागाराची नेमणूक करणे व फी आकारणी करणे याबाबत शासन निर्देशानुसार कोणतीही प्रकीया न करता वकील नेमणे व फी रक्कमांचे प्रदान करणे बाबत तसेच याबाबत लेखा संहिता नुसार विहीत नमुन्यातील नोंदवहया दप्तरी न ठेवणे इ. स्वरुपाच्या अनियमितता बाबत.***

महानगरपालिकेच्या दाव्याबाबत खाजगी व्यक्ती/संस्था यांनी दाखल केलेल्या दाव्यांचे तसेच महानगरपालिकेने खाजगी व्यक्ती/संस्था यांचेवर केलेल्या न्यायालयीन दाव्यांबाबत महानगरपालिकेच्या व्यक्तीने दाव्यांचे कामकाज चालविणे, महानगरपालिकेची बाजू मांडणे विविध कागदपत्रे सादर करणेकामी सन- 2012-2013 करिता महानगरपालिकेने वकील फी/कायदेविषयक सल्लागार यांचे करिता एकूण रक्कम रुपये- 448225/- इतका खर्च केलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) कायदेविषयक सल्लागाराची नेमणूक फी अदाई ही बाब मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये अंतर्भुत नाही. तथापि महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय 1993101/15 दिनांक.16/08/1993 अन्वये जिल्हा शासकीय अभियोक्ता यांच्या सल्याने फी निश्‍चित करुन प्रदान करणे आवश्यक होते. यानुसार फी निश्‍चित केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेने केलेला खर्च प्रमाणशीर असल्याची अचुकता प्रमाणित करता येत नाही.

2) मुंबई प्रांतिक महानरपालिका अधिनियम 1949 चे नियम 73 नुसार निविदा दर मागवून संबंधित कायदेतज्ञाकडून देकार (कॉल) मागविणे आवश्यक होते. तरी नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस लाभ झालेला नाही.

3) महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 चे नियम 121 प्रमाणे विहीत नमुना क्र.90 मध्ये नोंदवही ठेवलेली नाही त्यामुळे दाव्याची रक्कम, स्वरुप, दावा कोणत्या अधिनियमाखाली केला गेला, महानगरपालिकेस समन्स केव्हा मिळाले, प्रकरण न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व प्रकरण निकाली निघाल्याचा दिनांक हे समजू शकलेले नाही.

4) प्रत्येक दाव्यासाठी शुल्क ठरविताना कोणते निकष लावलेत तसेच वकीलांना कोणत्या निकषावर देयके सादर केलीत याचाही तपशील नमूद नाही. त्यामुळे सदर खर्चाची अचुकता पडताळणी करता आली नाही. जिल्हा सरकारी वकीलांचे कार्यालयाकडून प्रदान केलेले शुल्क योग्य असल्याचे प्रमाणित करुन घ्यावे.

उपरोक्त अभिप्रायाची पुर्तता दाखवावी तो पावेतो खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रुपये- 448225/-

FDSRKNM8201 (Ref No : 141)

DRAFT

***54 धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 28 मध्ये चंपाबाग पत्रकार कॉलनी व जमनागीरी भीलारी भागात नविन 160 एमएम डी पाईप लाईन टाकणे, वार्ड क्रं. 53 मध्ये कैलास नगर भागात 160 व 110 एमएम एचडीपीई पाईप लाईन टाकणे व वार्ड क्रं. 56 गुरुकृपा नगर भागात 110 एमएम पाईप लाईन टाकणे, वार्डक्रं. 58 मध्ये (वार्डक्रं. 38 च्यायादीनुसार) कोळवले नगर भागात 160 व 110 एमएम एचडीपीइ पाईप लाईन टाकणे कामेचे संचिकेत आढळुन आलेल्या अनियमीतते बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 27**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1341685.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 276656.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 65029.00/-

***निविदा प्रसिध्दी व निविदा कार्यवाही नियमानुसार न करणे, प्रशासकीय आदेश न काढणे, ठराव मंजुरी प्रत संचिकेत न लावणे, निविदा मंजुरी विलंबाने करणे, अंदाजपत्रकीय दराचे 3 टक्के जादा दराने कामास मंजुरी देणे, दरसुची पडताळणीस उपलब्ध न करणे, पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध नसलेबाबत प्रमाणपत्र न घेणे, विहित नोंदवहयामध्ये नोंदी न घेणे, वसुली पावती व चलन पडताळणीस उपलब्ध न करणे, मोजमाप पुस्तीकेत योग्य नोंदी, सहया ई. न करणे, कामाचा विमा व कामगार उपकर रक्कम, जकात वसुली रक्कमा देयकातुन कपात न करणे, देयकावर नियमानुसार नोंदी व सहया न घेणे, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नसलेने काम पुर्ण झालेची खात्री न पटवीणे, ई.***

| | | |
|---|---|---|
| 1 | लेखा शिर्ष | मनपा निधी |
| 2 | प्रशासकीय मान्यता | आदेशाची प्रत संचिकेत उपलब्ध नाही |
| 3 | निविदा प्रकार | जाहिर निविदा |
| 4 | निविदा प्रसिध्दी व कालावधी | दि.22/07/11 ते 18/08/11 , जाहीर निवीदा झेरॉक्स प्रत दै. श्रमराज्य दि. 20/07/11 , वृत्तपत्र नाही. |
| 5 | प्राप्त निविदा | प्रत्येक कामासाठी तीन |
| 6 | स्थायी समीती मंजुरी | ठराव / आदेशाची प्रत उपलब्ध नाही. |
| 7 | जिल्हा दर सुची वर्ष | सन 2010-11 |

| | | |
|---|---|---|
| 8 | तांत्रीक मान्यता | का.अ. ,मनपा धुळे –वार्ड क्रं.28 अ.क्रं.118 दि.18/07/11 रु. 434388 , वार्ड क्रं. 53 अ.क्रं.231 दि.29/11/2010 रु.380344 , वार्ड क्रं. 56 अ.क्रं.237 दि.06/12/2010 रु.185411 , वार्ड क्रं. 58 अ.क्रं.315 दि.28/12/2010 रु. 773044 |
| 9 | निविदा रक्कम | वार्ड क्रं. 28 रु. 434388 , वार्ड क्रं. 53 रु. 357699 , वार्ड क्रं. 56 रु. 196674 , वार्ड क्रं. 58 रु. 773044 |
| 10 | मंजूर निविदा तपशील | वार्ड क्रं. 28 व 56 ठेकेदार संजय डी. गायकवाड धुळे , अंदाजपत्रकीय दराचे 3 टक्के जादा दराने , वार्ड क्रं. 53 ठेकेदार विजय माणीक गवळी धुळे अंदाजपत्रकीय दराचे 3 टक्के जादा दराने , हर्ष कन्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दराचे 3 टक्के जादा दराने |
| 11 | कार्यादेश | वार्ड क्रं. 28 क्रं.धुमपा/पापु 76/2011-12 दि. 26/12/11 , वार्ड क्रं. 53 क्रं.धुमपा/पापु 82/2011-12 दि. 26/12/11 , वार्ड क्रं. 56 क्रं.धुमपा/पापु 77/2011-12 दि. 26/12/11, वार्ड क्रं. 58 क्रं.धुमपा/पापु 78/2011-12 दि. 26/12/11 |
| 12 | कामाची मुदत | वार्ड क्रं. 28, 53 व 58 ची (4) महिणे , वार्ड क्रं. 56 (2) महिणे |
| 13 | काम पुर्ण दिनांक | वार्ड क्रं. 58 दि. 25/03/2012 |
| 14 | काम मुदतीत पुर्ण आहे | वार्ड क्रं. 28 नाही , वार्ड क्रं. 53, 56 व 58 ची मुदतीत आहे |
| 15 | करारनामा | वार्ड क्रं. 28 रु. 100 बॉडवर , दि. 16/12/11, वार्ड क्रं. 53 रु. 100 बॉडवर , दि. 19/12/11, वार्ड क्रं. 56 रु. 100 बॉडवर , दि. 16/12/11, वार्ड क्रं. 58 रु. 100 बॉडवर , दि. 16/12/11 |
| 16 | मोजमाप पुस्तक क्रमांक | वार्ड क्रं. 28 (13), वार्ड क्रं. 53, 28 व 58 ची उपलब्ध नाही |
| 12 | कामाची मुदत | वार्ड क्रं. 28, 53 व 58 ची (4) महिणे , वार्ड क्रं. 56 (2) महिणे |

(वार्ड क्रं. 28 प्रमाणक क्रंमांक 4383, दिनांक 15/03/2013 रक्कम 227234, वार्ड क्रं. 53 प्रमाणक क्रंमांक 1448, दिनांक 07/08/2012 रक्कम 40256 व प्रमाणक क्रंमांक 4245, दिनांक 28/03/2013 रक्कम 161024 वार्ड क्रं. 56 प्रमाणक क्रंमांक 4256, दिनांक 07/03/2013 रक्कम 80412 व प्रमाणक क्रंमांक 1425, दिनांक 07/08/2012 रक्कम 20103, वार्ड क्रं. 58 प्रमाणक क्रंमांक 436, दिनांक 03/05/2012 रक्कम 812656)

DRAFT

1. संचिकेत जाहीर निवीदा प्रसिध्दी एकाच वृतपत्रात दैनिक श्रमराज्य दिनांक 20/7/11 जाहीर निवीदा प्रसिध्दी झेरॉक्स प्रत जोडली आहे, वृत्तपत्राची प्रत जोडली नाही. सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. जाहिरात 2009/प्र.क्र. 137/का-34 दि. 31/08/2009 नुसार चक्रीय पध्द्तीने वितरण करणे व वितरणाचे अधिकार जिल्हा माहिती अधिकारी यांना असुन एक क-वर्ग दैनिक व एक साप्ताहिक मध्ये, आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी. चे प्रमाण लक्षात घेवुन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच निविदा प्रसिध्दी बाबतचे वृत्तवपत्रे संचिकेत जोडली नसल्याकने त्याबाबतची खात्री करता आली नाही.

2. निविदाकारांकडुन तांत्रिक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे माविण्यात आले नाहीत, निविदा दोन प्रतित मागवील्या नाहीत, निविदाकारांनी फक्त ठेकेदार नोंदणी / नुतणीकरण प्रमाणपत्राची प्रत जोडली आहे. तसेच तांत्रीक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे, निवीदा बाबतच्या अटी व शर्ती पुर्तता बाबत व्यापारी लिफाफा तुलनात्मक तक्ता व त्यानंतर व्यापारी लिफाफा निविदा निविदाकारांच्या उपस्थितीत किंवा त्यांच्या अधिकृत अभिकर्त्यांच्या उपस्थितीत मुख्य अधिका-याकडुन किंवा समितीच्या कोणत्या ही दोन सदस्यांकडुन उघडण्यात येईल, व तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. नगर परिषद संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 36 क्रं.नप्रस/ निविदा मागविणे/ 05/प्र.क्र.151 /05/9,दिनांक 29/12/05 अ.क्रं. 27 मध्ये पात्रता ठरविण्याचे निकष दिलेले आहेत. तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रं.भाखंस 2001/(2949)/ उद्योग-6 दि. 25/06/2002 नुसार "तांत्रिक निविदेचा लिफाफा" मध्ये अत्यावशक कागदपत्रात आयकर नोंदणी बाबतचे क्रमांक दर्शविणारे निविदाकाराने दिलेले साक्षांकित प्रमाणपत्र, विक्रीकर नोंदणीबाबतचा क्रमांक दर्शविणारे निविदाकाराने दिलेले साक्षांकीत प्रमाणपत्र, आयकर आणि विक्रीकर निपटारा प्रमाणपत्र मिळण्यासाठी सक्षम अधिका-याकडे केलेल्या अर्जाची पोहोंच पत्राची प्रमाणित प्रत, यापैकी कागदपत्रे तांत्रिक लिफाफयासोबत सादर करणे शक्य झाले नाही तर ती कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत व्यापारी लिफाफा उघडण्याणपुर्वी स्वतंत्ररित्या सादर करणे निविदाकारास बंधनकारक राहील अन्यथा निविदा अग्राहय दर्शविण्यात येवून त्याचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येवु नये, असे असताना ठेकेदारांची पात्रता पडताळुन न पहाता सर्वच निविदा धारकाचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आले मुळे सदरची कृती नियमबाहय ठरते.

3. प्रस्तावीत कामास प्रशासकीय मान्यता घेतल्याचे आदेशाची प्रत तसेच ठराव मंजुरीची प्रत सचिकेत नसल्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 162 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4. निविदा दि. 06/09/2011 ला उघडण्यात आल्या, आणि कामाचे आदेश दि.26/12/11 ला देण्यात आले, निविदा उघडल्यालनंतर तिन महिणे पेक्षा जादा विलंबाने कार्यवाही केली. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 171 (6) नुसार व स्थाई निदेश नियम 466 (4) परिशिष्ट तिन - निविदा मागविण्याची आणि स्विकृत करण्याची कार्यपध्दती (36) नुसार निविदा उघडल्यानंतर त्यांची

विल्हेवाट लावण्यामध्ये कोणताही टाळता येण्याजोगा विलंब करता येणार नाही. सामान्यपणे ते उघड केल्याच्यां दिनांकापासुन एका आठवडयाच्या आत त्यांची विल्हेवाट लावण्यात येईल आणि कोणत्याही परिस्थितीत एका महिण्यापेक्षा अधिक कालावधीत त्याची विल्हेवाट लावणार नाही असे नमुद असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5. वार्ड क्रं. 28 चे कामाची मुदत कार्यादेश दिनांक 26/12/2011 पासुन 4 महिण्याची असताना प्रकरणात दिनांक 14/06/2012 ला काम पुर्ण झाले आहे. प्रत्यक्षात दिनांक 25/04/2012 ला काम पुर्ण होणे आवश्यक असताना 1 महिणा 19 दिवस विलंबाने पुर्ण झाले आहे. त्यामुळे नियमानुसार प्रतिदिन दंड आकारणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही. तसेच ठेकेदारास टीपणी दीनांक 30/07/2012 नुसार अभीयंता, मनपा, धुळे यांनी दिनांक 16/06/2012 पर्यंत मुदतवाढ मंजूरी दिली आहे, परंतु त्याबाबतचे पत्रावर पत्र क्रमांक, दीनांक व सही केलेली नाही. दिनांक 30/07/2012 चे टिपणीत 16/06/2012 पर्यंत मुदतवाढ कशी देण्यात आली. कामास मुदतवाढीसाठी सबळ कारण नसताना सक्षम प्राधीकारी यांची मंजुरी घेतलेली नाही.

6. देयकातील दर पडताळणी करणेसाठी जिल्हा दरसुची सन 2010-11 उपलब्ध न केलेमुळे सदरचे दर जिल्हा दरसुचीप्रमाणे आहेत किंवा नाही याची खात्री करता आली नाही. मुंबई प्रांतिक अधीनियम 1949 चे अनुसुची ड चे प्रकरण 8 मधील 6(1) (2) अन्वये लेखारिक्षणास सर्व कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे हे कर्मचारी यांचे कर्तव्य आहे.

7. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

8. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही, त्यामुळे त्याच त्या प्रभागात एकच प्रकारची कामे पुन्हा पुन्हा केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

9. शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार वीभाग क्रं. भाखसं 1088/(2512)/ उदयोग 6 दिनांक 2/1/1992 मधील परिच्छेद 5 परिशीष्ट 3 व क्रं. भाखसं 2002/(2990)/ उदयोग 6 दिनांक 4/2/06 नुसार महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवण्यात आलेल्या वस्तुंची खरेदी करावी लागेल असे बंधनकारक असताना अशी सुचना निवीदेमध्ये अंतर्भुत केल्याचे दिसुन आले नसलेमुळे शासन निर्देशा नुसार कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

10. वार्ड क्रं. 28 चे अंदाजपत्रकासोबतचे Measurement Sheet मध्ये बाब क्रं. 7 नमुद नाही, तसेच त्यावर कार्यकारी अभीयंता यांची सही व शीकका नाही. प्राकलनात बाब क्रं. 7 मध्ये नमुद केलेनुसार पाईप किंमतीचे 5 टक्के रक्कम आकारणी रुपये 8274 आकारणी होत असताना मोजमाप पुस्तीकेत व

देयकात रुपये 11264 लावण्यात आलेमुळे रुपये 2990 रक्कम जादा प्रदान झाले आहे. सदरची रक्कम रुपये 2990 संबंधीत ठेकेदार यांचेकडुन वसुल करुन मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

11. वार्ड क्रं. 53 चे अंदाजपत्रकाची बेरीज रु. 380344 होत असताना रुपये 357699 चुकीची नमुद केली आहे, निविदा विक्री बाबत निविदांना क्रमांक दिलेले नाहीत, विक्रि निविदा व प्राप्त रक्केमा, निविदा विक्री, इसारा रक्कम, सुरक्षा रक्कम, लोकवर्गणी ई. बाबतची पावतीबुके, नोंदवही व इतिवृत लेखापरिक्षणास दर्शविण्यात आली नाही तसेच वृत्तपत्रे निविदा जाहिरात, वृत्तपत्रक जाहिरात देयके तपासणीस उपलब्ध केले नाहीत याशीवाय नियमानुसार देयकातील सर्व कपाती रकमाचा चलनव्दारे भरणा केलेले चलन लेखापरिक्षणास दर्शविण्यात आले नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 79 नुसार उक्त नमुद अभीलेख लेखापरिक्षणास दर्शविणे आवश्यक आहे.

12. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 135 सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिण्यातून किमान एकदा नगर अभियंत्या कडून तपासण्यात येतील आणि मोजमाप पुस्ताकामध्ये त्याची सही असेल. मोजमाप पुस्तकामतील वित्तीय हिशोबांची नगर अभियंत्यांच्या कार्यालयाकडुन आणि लेखा विभागाकडुन तपासणी करण्यात येईल.

13. सार्वजनीक बांधकाम विभाग परिपत्रक क्रं. 2004/प्र.क्र. 109/रा.म. 2 दि. 22/03/2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेंकडुन घेणे आवश्यक आहे तो घेणेत आलेला नाही.

14. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 138 मोजमाप पुस्तक् अनुक्रमांकीत करण्यात येईल व मोजमाप पुस्ततकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमुद करुन त्यावर लेखापाल व लेखापरिक्षक स्वाक्षरी करतील असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

15. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 139 काम पुर्ण होईल तेंव्हा नगर अभियंता नियम 210 मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार लेखा प्रमुखाकडे नमुना 62 मध्ये पूर्णतेचा अहवाल सादर करील किंवा तसे प्रमाणपत्र देईल. एखाद्या कामाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा अधिक रकमेचे काम झाले असल्यास नगर अभियंता अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष तरतुद व वाढीव काम यांचे प्रमाण, दर, कामाची किंमत यांच्यातील तफावतीची तुलना करुन त्याचे स्पष्टीकरण देईल.

16. महाराष्ट्र शासन सार्वजनीक बांधकाम विभाग शासन नीर्णय क्रं. सीएटी 07/2006/प्र.क्र. 94/इमारती-2 दिनांक 16/11/2006 नुसार रुपये 15 लक्ष पर्यंतची कामे वीनानीवीदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशीक्षीत बेराजगार अभीयंता यांना देणे, नीर्णय क्रं. सीएसटी 1097/प्र.क्र. 42/ इमारत-2 दि. 29/07/20025 नुसार नोंदणीकृत स्थापत्य सुशीक्षीत बेरोजगार अभीयंता यांना रुपये 25 लक्ष पर्यंतची कामे वीना नीवीदा अंदाजपत्रकीय दराने देणे आवश्यक आहे, व नीर्णय क्रं. सीएसटी/01/प्र.क्र. 26/इमारत-2दि.31/05/05 नुसार 5 लक्ष कींमती पर्यंतच्या कामाचे वाटप हे पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांना 34 टक्के, सुशीक्षीत बेराजगार अभीयंता यांना 33 टक्के व मजुर सहकारी संस्थांना 33 टक्के या प्रमाणात वाटप करणे आवश्यक आहे, असे असताना आवश्यक असताना नीवीदा प्रसीध्द करुन काम

देण्यात आले आहे. त्यामुळे वार्ड क्रं. 28 मध्ये रु. 6817, वार्ड क्रं. 53 मध्ये रु. 11725 एकुण रक्कम रु. 18542 आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

17. वार्ड क्रं. 28 चे प्राकलनात नमुद साहित्य / कामापेक्षा बाब क्रं. 8,10,12,13 व 15 मध्ये प्राकलनात नमुद कामापेक्षा 10 टक्के जादा काम केले आहे. वाढीव कामाबाबत नियमा प्रमाणे मान्य्ता घेण्यात आलेली नाही, वार्ड क्रं. 58 तांत्रीक मान्यता रु. 773044 घेण्यात आली असून कामावर रु. 812656 खर्च झाला आहे, त्यामुळे जास्तीची रक्कम रु. 39612 ला मंजुरी घेणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकासोबतचे मेजरमेंट शीट मध्ये बाब क्रं. 20 समावीष्ट. करण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकातील बाब क्रं. 3 चे काम अंदाजपत्रकापेक्षा जादा करण्यात आले असुन बाब क्रं. 15 मधील दर मंजूर रु. 2116.80 ची बाब अंदाजपत्रकात समावीष्ट नसताना सदरचे काम झाल्याचे व देयकात आकारणी केल्याचे दिसून येते. प्राकलनात नमुद साहित्य / कामापेक्षा बाब क्रं. 3 चे काम 10 टक्के पेक्षा जादा केले आहे. वाढीव कामाबाबत नियमा प्रमाणे मान्येता घेण्यात आलेली नाही, यामुळे जादा रक्कम प्रदानास व जास्तीचे कामास मुंबई मनपा कलम 68 ई नुसार स्थायी समीचीची मान्यता घेणे, सा.बां.विभाग नियम पुस्तीकानियम 227 व मनपा लेखासंहीता 1971नियम 162(1) व 167(4) नुसार सक्षम प्राधीका-याची पुर्व मान्यता घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

18. धुळे महानगरपालिका जकात नियम 2005 नुसार महानगरपालिका हद्दीत वापर, उपयोग व विक्री किंवा इतर कारणाकरीता आयात करण्यात येणा-या मालावर महानगरपालिका जकात आकारतील असे नमुद असताना जकात रक्कम देयकातुन वसुन केली नाही. जकात वसुल करुन मनपा निधीमध्ये भरणे आवश्यक आहे.

19. शासन निर्णण उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रं. बीसिए 2009/प्र.क्र.108/कामगार-7अ दिनांक नुसार देयकातुन बांधकाम मुल्याच्या 1 टक्का कामगार कल्याण उपकर वसुल करण्यात आलेला नाही, तरी वार्ड क्रं. 28 रु. 2272, वार्ड क्रं. 53 रु. 2013 व वार्ड क्रं. 56 रु. 2010, वार्ड क्रं. 58 रु. 8127 एकुण रुपये 14422 वसुली करुन शासन खाती रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

20. महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्रं. विमास-1098/प्र.क्र.28/98/ शासनहमी दि.19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडेच करावा, तसेच नगर विकास विभाग पत्रक क्रं. जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 दि. 03/11/2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा रक्कम वार्ड क्रं. 28 रु. 2272, वार्ड क्रं. 53 रु. 2013 व वार्ड क्रं. 56 रु. 2010, वार्ड क्रं. 58 रु. 8127 एकुण रुपये 14422 वसुली करुन शासन खाती रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

21. वार्ड क्रं. 53, 56 व 58 चे कामाची मोजमाप पुस्तीका तपासणीस उपलब्ध केली नाही, वार्ड क्रं. 28 चे मोजमाप पुस्तीकेत काम पुर्ण झालेवर प्रमाणपत्र नोंदवुन त्यावर सक्षम अधिका-यांच्या सहया व शिक्के घेतले नाहीत, मोजमापे प्रत्यदक्षात करणा-या अधिका-याने दिनांकीत सही केली पाहीजे आणि नोंद केलेल्या मोजमापाचा स्वीकार केल्याचे प्रतिक म्हणून कंत्राटदाराची सही मिळवीली पाहिजे.

महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम नियमावली मधील परिच्छेद 24(11) नुसार कामाचे मोजमाप उप अभीयंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभीयंता यांनी 5 टक्के प्रत्यक्ष बाबनिहाय तारखेसह करणे आवश्यक आहे.

22. निवीदे सोबत ठेकेदाराने व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र जोडले नसल्यामुळे शासन अधीसुचना दिनांक 4/4/2012 नुसार देयकातुन 5 टक्के व्हॅट रक्कम कपात करणे आवश्यक असताना वार्ड क्रं. 28 मध्ये 2 टक्के व्हॅट रक्कम कपात केली असलेमुळे उर्वरित 3 टक्के रक्कम रु. 6817, वार्ड क्रं. 56 मध्ये 4 टक्के व्हॅट रक्कम कपात केली असलेमुळे उर्वरित 1 टक्के रक्कम रु. 2010, वार्ड क्रं. 58 रु. 24378 ठेकेदाराकडुन वसुल करुन चलनव्दारे भरणा करणे आवश्यक आहे.

23. वार्ड क्रं. 28 व 56 चे देयकावर देयक मंजुरी सहया घेण्यात आल्या नाहीत, तसेच देयकावर कंत्राटदार यांची महसुल मुद्रांक लावुन सही घेण्यात आली नाही, वार्ड क्रं. 53 चे देयक प्रमाणक क्रं. 1448दि. 07/08/2012 रु. 40256 व प्रमाणक क्रं. 4245दि. 28/03/2013 रु. 402559 संचीकेतील देयकाचे प्रतीवर देयक मंजूरी सहया घेण्यात आल्या नाहीत, तसेच देयकावर कंत्राटदार यांची महसुल मुद्रांक लावुन सही घेण्यात आली नाही. वार्ड क्रं. 58 चे देयक प्रमाणक क्रं 436 दिनांक 03/05/12 रुपये 788986 प्रत संचिकेत आहे, देयकाचे प्रमाणकावर देयक मंजुरी सहया घेण्यात आल्या नाहीत, तसेच देयकावर कंत्राटदार यांना रक्कम प्रदानाबाबत सही घेतली नाही, महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 166 नुसार प्रदान देयकावर प्रदान केल्यानंतर "देण्यात आले व रद्द केले" अशी अक्षरे पृष्ठांकीत करुन नियम 182 नुसार देय प्रदानाची पावती घेण्यात येईल व पावतीवर दिनांक व यथोचीत मुद्रांक लावण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 147 नुसार नमुना 64 मध्ये प्रदान प्रमाणक तयार करतील आणि त्याच्या अचुकपणाबद्ल व खरेपणाबद्दल टोकन मध्ये सही करुन देयकांचे संपूर्ण तपशील, अनुज्ञेयता, वजाती व अर्थसंकल्पीय शीर्ष, दिनांकपर्यंत मंजूर करण्यात आलेली व वापरण्यात आलेली अर्थसंकल्पाची एकूण रक्कम, याची देखील प्रदान प्रमाणका मध्ये नोंद घेण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

24. वार्ड क्रं. 28 चे कार्यादेशात नमुद केलेनुसार वीहीत मुदतीत काम पुर्ण न करता जवळपास दीड महीना विलंबाने काम पुर्ण केले आहे. सचिंकेत मुदतवाढ देण्यात आले बाबत पत्र ठेकेदारास देण्यात आलेले नाही. वार्ड क्रं. 53 चे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नसलेमुळे काम मुदतीत झाले किंवा नाही याची खात्री करता आली नाही, विलंबाबाबत देयकातुन निवीदेतील अटी नुसार दंडाची रक्कम कपात करुन घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

25. वार्ड क्रं.56 चे प्राकलन / अंदाजपत्रकात बाब नीहाय बेरीज रुपये 196674 येत आहे व अंदाजपत्रक मंजुरी रु. 185411 देण्यात आलेली आहे, अंदाजपत्रकासोबतचे मेजरमेंटशीटमध्ये बाब क्रं. 15 ची क्वांटीटी 150 एमएम नमुद नसताना त्यासोबतचे गोषव-यात 1 बाब नमुद केली आहे, नीविदा जाहीरातीमध्ये अंदाजपत्रक रक्कम रु. 185411 न दर्शवीता रु.196674 नमुद केली आहे, अंदाजपत्रक

DRAFT

मंजुरीपेक्षा जादा खर्च रु. 15619 झाला आहे, जादा रक्कम प्रदानास व जास्तीचे कामास मुंबई मनपा कलम 68 ई नुसार स्थायी समीचीची मान्यता घेणे, सा.बां.विभाग नियम पुस्तीकानियम 227 व मनपा लेखासंहीता 1971नियम 162(1) व 167(4) नुसार सक्षम प्राधीका-याची पुर्व मान्यता घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

26. वार्ड क्रं. 56 चे संचीकेत क्वालीटी सर्व्हीसेस अँड सोल्यूशन यांचा अहवाल दि. 14/12/11 नुसार 110 एमएम एचडीपीई पाईप 23 (2300 मीटर) व 160 एमएम एचडीपीई पाईप 400 (2400 मीटर) नमुद केलेली झेरॉक्स प्रत आहे, प्रकरणातील कामाचे आदेश 26/12/11 असताना त्यापुर्वीच तपासणी केल्याचा अहवाल कसा घेण्यात आला व प्रकरणात फक्त 110 एमएम पाईप आवश्यकता असताना 160 एमएम पाईप कसा नमुद केला याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवीणे आवश्यक आहे.

27. वार्ड क्रं. 53 चे प्राकलनात नमुद साहित्य / कामापेक्षा बाब क्रं. 1,5,20 मध्ये प्राकलनात नमुद काम 10 टक्के पेक्षा जादा केले आहे. वाढीव कामाबाबत नियमा प्रमाणे मान्य्ता घेण्यात आलेली नाही, यामुळे जादा रक्कम प्रदानास व जास्तीचे कामास मुंबई मनपा कलम 68 ई नुसार स्थायी समीचीची मान्यता घेणे, सा.बां.विभाग नियम पुस्तीकानियम 227 व मनपा लेखासंहीता 1971 नियम 162(1) व 167(4) नुसार सक्षम प्राधीका-याची पुर्व मान्यता घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 55 दिनांक 10/11/2015, अर्धसमास पत्र क्रं. 80 दिनांक 30/11/2015, अर्धसमास पत्र क्रं. 90 दिनांक 05/12/2015 व अर्धसमास पत्र क्रं. 135दिनांक 22/01/2016देवुन अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी उक्त बाबतीत समर्पक अभिप्राय प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

REVSSSM5909 (Ref No : 55)

## *57 धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात देखभाल दुरुस्ती लेखाशिर्षात पाणी पुरवठा विभागाअंतर्गत केलेल्या खर्च विषयक अभिलेखे व निविदा संचिका लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 19209634.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 19209634.00/-

***देखभाल दुरुस्ती, नविनपाईपलाईन, पाणीखरेदी, पाईपलाईनदुरुस्ती, विंधनविहिरी, पाणी टाकी बांधणेचे कामासाठी खर्च केलेल्या लेखाशिर्षाअंतर्गत पाणी पुरवठा विभागाने केलेल्या खर्चाचे प्रमाणके, निविदा संचिका व अनुषंगीक अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न करणे***



DRAFT

धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात कामाच्या नस्त्या, खर्च प्रमाणके, दरसुची, दर, मुल्यांकन पृथकरण, मोजमाप पुस्तीका, निविदा नोंदवही, आवश्यक पावती पुस्तके / चलने ई. अभिलेखे वेळोवेळी तोंडी तसेच अर्धसमास पत्र क्रं. 18 दिनांक 12/10/2015 व अर्ध समास पत्र क्रं. 44 दिनांक 05/11/2015 अन्वये मागणी करुनही देखभाल दुरुस्ती, नविनपाईपलाईन, पाणीखरेदी, पाईपलाईनदुरुस्ती, विंधनविहिरी, पाणी टाकी बांधणेचे कामासाठी खर्च केलेल्या कामाचे खालील नमूद कामाचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध केलेले नाहीत.

| प्रमाणक क्रं. | दिनांक | रक्कम | विषय | कोणास प्रदान |
|---|---|---|---|---|
| 2900 | 17/11/2012 | 970509 | पाटबंधारे विभाग गतीमान कालवा साफसफाई उर्वरित | का.अ. पाटबंधारे |
| 4210 | 02/03/2013 | 440235 | पाणी पुरवठा वर्ग 3 व 4 कर्मचारी पुरविणे 12/12 | राजेसंभाजी मजूर कामगार सह.सं. म. |
| 4254 | 07/03/2013 | 360259 | बाभळी जलशुध्दीरकरण केंद्र येथील कॅल्सिफ क्यूटर गाळा काढणे बाबत | शिव व स्वंय रोजगार सह. संस्था |
| 4255 | 07/03/2013 | 445575 | तापी पाणी पुरवठा योजना सुकवर व बाभळी ते एमबीआर लिकेजेस काढणे | साईनाथ ईलेक्ट्रीक अँड इंजीनिअरींग वर्क्स |
| 4281 | 08/03/2013 | 500000 | पांझारा पंपीग स्टेशन येथील 125 एचपी पंप सेट 140 एचपी पंपसेट पार्ट पेमेंट | मे. अपेला इंजिनिअरींग कार्पो. |
| 4370 | 15/03/2013 | 187345 | बाभळी जलशुध्दीरकरण केंद्र येथील गाळा काढणे बाबत | स्वर्गीय गोपालाजी बेरो. स्वंय. रोज. सेवा. सह.संस्था |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4372 | 15/03/2013 | 50405 | डेडरगांव जलशुध्दीकरन केंद्र येथील साफसफाई कामी जेसीबी भाडे | दिलीप पुंडलिक पाटील |
| 4045 | 21/03/2013 | 224052 | तापी पाणी पुरवठा 1500 एमएम व इत्यादी वॉल पुरविणे | साईनाथ इलेक्ट्रीक अण्ड इंजि वर्क्स |
| 4047 | 21/03/2013 | 162754 | मालेगाव रोड 150 एचपी सेट दुरुस्ती बाबत | साईनाथ इलेक्ट्रीक ॲण्ड इंजि वर्क्स |
| 4046 | 21/03/2013 | 124456 | हनुमान टेकडी रॉ वाटर पंपिग स्टेशन वरील 300 एचपी मोटर दुरुस्ती | साईनाथ इलेक्ट्रीक ॲण्ड इंजि वर्क्स |
| 4049 | 21/03/2013 | 193326 | मालेगांव रोड पंपीग स्टेशन येथील वॉल दुरुस्ती बाबत | किसान केंद्र |
| 4048 | 21/03/2013 | 145580 | बडगुजर जलकुंभ पंपिग स्टेशन येथील 100 एचपी मोटर पंप दुरुस्ती बाबत | किसान केंद्र |
| 4125 | 22/03/2013 | 380000 | पाणीपूरठा साठीचे गाव कालावा देखभाल साठी | का.अ धुळे पाटबंधारे विभाग |
| 4126 | 22/03/2013 | 321300 | वाघा नाला ते राज पाळी मजूर लावणे | का.अ धुळे पाटबंधारे विभाग |
| 4127 | 22/03/2013 | 151200 | बंधारा कसारा येथे कालावा पोलिस बंदोबस्त बाबत | का.अ धुळे पाटबंधारे विभाग |
| 4139 | 25/03/2013 | 7735 | पाणी पुरवठा योजना पेट्रोलिंग | सुभाश दगा मराठे |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | साठी गाडी भाडे | |
| 4140 | 25/03/2013 | 47986 | पाणी पुरवठा योजना पेट्रोलिंग साठी गाडी भाडे | सुभाश दगा मराठे |
| 4141 | 25/03/2013 | 331310 | तापी पाणी पुरवठा पाईप लिकेज काढणे | महर्शि वाल्मिक आंबेडकर बहु.बे.से.सो |
| 4145 | 25/03/2013 | 500000 | बाभळे जलशुध्दी करण केंद्र येथील फिल्टर रिनोव्हेशन करणे पार्ट पेमेंट | ए.एस.सांळुके कन्ट्रक्शन नाशिक |
| 4146 | 25/03/2013 | 500000 | बाभळे जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर रिनोव्हेशन करणे पार्ट पेमेंट | ए.एस.सांळुके कन्ट्रक्शन नाशिक |
| 4147 | 25/03/2013 | 433920 | पाणी पुरवठा योजना वर्ग 3 व 4 कर्मचारी फेबुवारी 2013 बिलाबाबत | राजे संभाजी सह.सो.म.धुळे |
| 4148 | 25/03/2013 | 47825 | पाणी टंचाई परिस्थितीत सोडलेले पेट्रोलियम गाडी भाडे | विजय किसनराव लहानगे |
| 4149 | 25/03/2013 | 13391 | पाणी टंचाई परिस्थिती सोडलेले पेट्रोलियम गाडी भाडे | विजय किसनराव लहानगे |
| 4150 | 25/03/2013 | 47986 | पाणी पुरवठा पापईप लाईन वर पेट्रोलियम वाहन भाडे | सुभाश दगा मराठे |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4152 | 25/03/2013 | 2990 | नकाशे तलाव दरवाजा दुरुस्ती करुन बसविणे | पी डी चव्हाण ओव्हीरसिअर |
| 4177 | 28/03/2013 | 2900 | कुमार नगर टाकी आवारात प्रक्सेकस बोर्ड लावणे | मे. टकली कार्यालय |
| 4247 | 28/03/2013 | 500000 | पांझरा पंपिंग स्टेशन 125 एचपी व 140 एचपी पंपसेट पुरवणि | मे. अपल इंजि. कॉपो. इले. |
| 4282 | 30/03/2013 | 205235 | बडगबुर प्लॉट येथील टान्सफॉर्मर दुरुस्ती | मे.किसान केंद्र धुळे |
| 4283 | 30/03/2013 | 128350 | मालेगाव रोड स्टेशन येथील 150 एच.पी पंप सेट दुरुस्ती | मे.किसान केंद्र धुळे |
| 4284 | 30/03/2013 | 151671 | हनुमान टेकडी जलशुध्दीकरण ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती | मे.किसान केंद्र धुळे |
| 4285 | 30/03/2013 | 260560 | मालेगाव रोड पंपींग येथील 200 केएमए ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती | मे.किसान केंद्र धुळे |
| 4310 | 12/03/2013 | 200821 | वार्ड क्रं. 33 मध्ये डि.पी. रोड पाईपलाईन पार्ट पेमेंट | -हषीकेश ही. पाटील |
| 4382 | 15/03/2013 | 102683 | वार्ड क्रं. 15 मध्ये आंबेडकर भागात पाण्याची टाकी बांधने | जितेंद्र व्ही. पाटील |
| 4394 | 16/03/2013 | 45794 | वार्ड क्रं. 22 व 20 ( 1 ते 5) कामाचे तांत्रीक मंजुरी | का.अ.महा.जि.प्रा. जळगांव |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | बाबत | |
| 5059 | 21/03/2012 | 500000 | वॉड क्रमांक 6<br>प्रभात नगर<br>देवपुर भागात<br>पाईपलाईन टाकणे<br>पार्ट पेंमेट | जितेंद पाटील |
| 4060 | 21/03/2012 | 500000 | वॉड क्रमांक 6<br>प्रभात नगर<br>देवपुर भागात<br>पाईपलाईन टाकणे<br>पार्ट पेंमेट | जितेंद पाटील |
| 4043 | 21/03/2012 | 432550 | वॅाड क्रमांक<br>62 मध्ये नविन<br>पाईपलाईन टकाणे<br>पार्ट पेमेंट | जितेंद<br>वसंतराव पाटील |
| 4123 | 22/03/2012 | 5696 | वॉड कमांक 59<br>मध्येध पाईप<br>लाईन टाकणे<br>तांत्रिक<br>मंजूरीबाबत | का.अ |
| 4124 | 22/03/2012 | 12529 | वॉड कमांक 59<br>मध्ये 1 ते 2 काम<br>तांत्रिक<br>मंजूरीबाबत | का.अ |
| 4130 | 22/03/2012 | 226937 | बडगुजर प्लॉट<br>येथे 25 लक्ष<br>लिटर क्षमतेचे<br>जल कंभ बांधणे<br>पार्ट पेमेंट | एम.आर.जाधव |
| 4132 | 22/03/2012 | 9529 | वॉड क्र. 39 पाच<br>मंजीला येथील<br>कामचे तां.क<br>मंजूरीबाबत | का.अ महा.जि.प्रा.<br>जळगाव |
| 4280 | 30/03/2012 | 261754 | वार्ड क्रं. 6<br>प्रभात नगर<br>पाईप लाईन<br>टाकणे पार्ट<br>पेमेंट | जितेंद पाटील |
| 4281 | 30/03/2012 | 148274 | वार्ड क्रं. 6<br>देवपूर भागात<br>डी.आय पाईप लाईन | जितेंद पाटील |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | टाकणे पार्टपेमेंट | |
| 435 | 03/05/2012 | 1427155 | हरमाळसाठी सन 2011 वर्षासाठी 100 एमएफटी पाणी आरक्षीत करणे | का.अ. पाटबंधारे |
| 1298 | 26/07/2012 | 1700000 | धुळे पाटबंधारे विभागाकडील पाणीपटटी | का.अ. पाटबंधारे |
| 3906 | 05/02/2013 | 2500000 | पाणी टंचाई संदर्भात मालनगांव पाणी आरक्षीत साठी पाणीपटटी | का.अ. पाटबंधारे |
| 4406 | 16/03/2013 | 2500000 | पाणी टंचाई संदर्भात आरक्षित पाणी पट्टी भरणे | का.अ. धुळे पाटबंधारे विभाग |
| 4253 | 28/03/2013 | 250000 | पाणी टंचाई संदर्भात मालानगाव पांझरा धरणातील पाणी उर्वरित रक्कंम | का.अ पाटबंधारे विभाग धुळे |
| 4109 | 22.3.2013 | 2920 | जे.बी. रोड ठाकरे गार्डन पाईप लाईन रिपेअर बाबत | एस.बी. विसपुते ओव्हअरसिअर |
| 4110 | 22.3.2013 | 2916 | कला मंदीर समोर 2 इंची पाईप लाईन दुरुस्ती बाबत | एस.बी. विसपुते ओव्हरसिअर |
| 4111 | 22.3.2013 | 3000 | कला मंदीर समोर खडडे बुजविणे दुरुस्ती बाबत | एस.बी. विसपुते ओव्हसरसिअर |
| 4112 | 22.3.2013 | 3000 | मनपा हद्द विविध 1 ते 5 पाईप लाईन रिपेअर बाबत | एस.बी. विसपुते ओव्हरसिअर |
| 4113 | 22.3.2013 | 2600 | तुळशीराम नगर बगीचा नळ | एस.बी. विसपुते |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | रिपेअर बाबत | ओव्हरसिअर |
| 4114 | 22.3.2013 | 3000 | सुभाष नगर भागात 6 इंची पाईप रिपेअरबाबत | एस.बी. विसपुते ओव्हरसिअर |
| 4115 | 22.3.2013 | 3000 | 1 ते 6 ठिकाणी रिपेअर बाबत | एस.बी. विसपुते ओव्हरसिअर |
| 4116 | 22.3.2013 | 2261 | सुंगध हाट मायक्रो बरील वॉल रिपेअर बाबत | सी सी बागुल ओव्हीरसिअर |
| 4117 | 22.3.2013 | 2312 | बेडगर गाव रस्ता पाईप लाईन लिकेज | सी सी बागुल ओव्हीरसिअर |
| 4118 | 22.3.2013 | 2520 | मोहाडी येथील होले चॉक रेल्वे स्टेशन जवळ पाईप रिपेअर | सी सी बागुल ओव्हीरसिअर |
| 4119 | 22.3.2013 | 16113 | पाणी पुरवठा झेरॉक्स खर्च | सी सी बागुल ओव्हीरसिअर |
| 4120 | 22.3.2013 | 2737 | वॉर्ड क्र. 65 सुगमा नगर 4 इंची ,6 इंची पाईप रिपेअर | सी सी बागुल ओव्हीरसिअर |
| 4129 | 22.3.2013 | 47288 | अहिल्या देवी नगर भडला चाळ येथील पाईप लाईन क्रास करणे | संजय डी गायकवाड |
| 4142 | 25.3.2013 | 43469 | कुमार नगर मोइलाई येथे ब्लॉक एचटु पाईप लाईन क्रास करणे | संजय डी गायकवाड |
| 4153 | 25.3.2013 | 2950 | वॉड क्रमांक 21 8 इंची वॉल दुरुस्ती करणे | पी डी चव्हाण ओव्हीरसिअर |
| 4154 | 25.3.2013 | 2900 | बोरखडी रोड | पी डी चव्हाण |



DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | वरील पाईप लाईन दुरुस्ती | ओव्हीरसिअर |
| 4156 | 25.3.2013 | 1907 | अलंकार सोसायटी 10 इंच पाईप लाईन वार्ड क्र. 19 ते 24 व 39 ते 45 कामाचे झेरॉक्स खर्च | पी डी चव्हाण ओव्हीरसिअर |
| 4158 | 25.3.2013 | 2950 | प्रभाग कार्यालय 3 अंतर्गत वॉल दुरुस्ती बाबत | पी डी चव्हाण ओव्हीरसिअर |
| 4160 | 25.3.2013 | 2950 | वॉड क्रमांक 21 वॉल दुरुस्ती | पी डी चव्हाण ओव्हीरसिअर |
| 4161 | 25.3.2013 | 2650 | वॉर्ड क्रमांक 24 बगीचा पाईप लाईन लिकेज काढणे | पी डी चव्हाण ओव्हीरसिअर |
| 4162 | 25.3.2013 | 2900 | चाळीसगाव रोडवरील सहा इंच पाईप लाईन दुरुस्ती | वसंत विक्रम मोरे |
| 4162 | 25.3.2013 | 2900 | मालेगाव रोड शिवाजी पुतळा आवारातील पाईप लाईन दुरुस्ती | वसंत विक्रम मोरे |
| 4175 | 28.3.2013 | 2300 | पुर्व हुडको कॉलनी भागातील 4 इंची पाईपलाईन वाल दुरुस्ती | मे. टकली कार्यालय |
| 4176 | 28.3.2013 | 2900 | साक्री रोड वाल दुरुस्ती बाबत | मे. टकली कार्यालय |
| 4178 | 28.3.2013 | 2800 | जमनागिरी रोड 8 इंची वाल दुरुस्ती बाबत | मे. टकली कार्यालय |
| 4179 | 28.3.2013 | 3000 | जुना आग्रा रोड भागात 450 एमएम पाईपलाईन दुरुस्ती | मे. टकली कार्यालय |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4180 | 28.3.2013 | 2900 | साक्री रोड मोहन मेडीकल्स येथील 6 इंची वाल दुरुस्ती | मे. टकली कार्यालय |
| 4182 | 28.3.2013 | 2900 | वरकाई रोड येथील 6 इंची वाल दुरुस्ती | मे. टकली कार्यालय |
| 4212 | 28.3.2013 | 47970 | वार्ड क्रं. 19 ते 27, 43,44,45 वाल दुरुस्ती | संजय डी गायकवाड |
| 4409 | 16/03/2013 | 233978 | वॉर्ड क्रमांक 58 प्रतापनगर दिपनगर भागात वृक्ष संवर्धनासाठी पंप सेट बसविणे | मे.हर्श कन्ट्रकशन |
| 4241 | 28/03/2013 | 89066 | वॉर्ड क्र. 41 मध्ये माधवपुरा चांदतारा चाळ चौक भागात पिण्याच्या पाणी टाकी बांधणे पार्ट बांधणे | मे. अहसान बदलु लतीफ |
| | | 19209634 | | |

DRAFT

उपरोक्त कामाच्या नस्या व अनुषंगीक अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने वरील कामावर सन 2012-13 मध्ये केलेला खर्च रुपये 19209634 ची पडताळणी करता आली नाही. सदरचे खर्चाची रक्कम रुपये 19209634 आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

मुंबई प्रांतिक महा. अधिनियम 1949 चे अनूसूची ड चे प्रकरण 3 मधील 6 अन्व्ये व महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 नुसार स्थानिक प्राधिकरणाने लेखापरिक्षणास अभिलेखे सादर करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 18 दिनांक 12/10/2015 व अर्धसमास पत्र क्रं. 44 दिनांक 05/11/2015 देवुन अभिलेख मागविण्यात आले होते तथापी अभिलेखे प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 44)

## *68 धुळे महानगरपालिकेचे सन 2012-13 चे लेखापरिक्षणामध्ये हनुमान टेकडी पाणी पुरवठा केंद्र येथे 630 केव्हीए स्टँडबाय आऊटडोअर ट्रान्सफार्मर व त्यासाठी लागणारे साहित्य पुरवठा व उभारणी करणे, बाभळे जलशुध्दीकरणे केंद येथील 3000 केव्ही/3एमव्ही, 33 केव्ही व सुखवद रॉवॉटर पंपीग स्टेशन येथील 4000 केव्ही/4 अएमव्ही /33 केव्ही स्टँडबाय ट्रान्सफार्मर व त्यासाठीचे सुरक्षा उपकरणे कामेचे संचिकेत आढळुन आलेल्या अनियमीतते बाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 09**

*लेखा शीर्ष : देखभाल दुरुस्ती मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***निविदा प्रक्रीया नियमानुसार न करणे, प्रशासकीय मान्यता घेतल्याचे आदेशाची प्रत तसेच ठराव मंजुरीची प्रत संचिकेत न लावणे, निविदा मंजुरी विलंबाने करणे, करारनाम्यावर दिनांक व महानगरपालीकेची मोहेर न वठविणे, करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध नसलेचे प्रमाणपत्र न घेणे, अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा दराने मंजुरी, व आवश्यक अभीलेखे उपलब्ध न करणे ई.***

DRAFT

महानगरपालिकेचे सन 2012-13 चे लेखापरिक्षणामध्ये (1) हनुमान टेकडी पाणी पुरवठा केंद्र येथे 630 केव्हीए स्टँडबाय आऊटडोअर ट्रान्सफार्मर व त्यासाठी लागणारे साहित्य पुरवठा व उभारणी करणे, (2) बाभळे जलशुध्दीकरणे केंद येथील 3000 केव्ही/3एमव्ही, 33 केव्ही व ( 3) सुखवद रॉवॉटर पंपीग स्टेशन येथील 4000 केव्ही/4 अएमव्ही / 33 केव्ही स्टँडबाय ट्रान्सफार्मर व त्यासाठीचे सुरक्षा उपकरणे कामा बाबत खालील प्रमाणे अभीप्राय आहेत.

1. उक्त कामे कामाचे टुकडे पाडुन कामे करण्यात आली आहेत, उक्त कामाची जाहीरात प्रसीध्दी केल्याचे संचीकेतील कागदपत्रावरुन आढळुन येत नाही, क्रं. 2 व 3 चे कामाची जाहीर टेंडर नोटीस क्रं. धुमपा/पापुवी/761दि. 04/12/12 काढल्याचे दिसुन येते , परंतु संचीकेत प्रसीध्दी जाहीरात वृत्तपत्र जोडलेले नसलेने जाहीरात प्रसीध्दी बाबत खात्री करता येत नाही , कामासाठी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच इतर ठिकाणी कामाबाबत योग्य प्रकारे प्रसिध्दी करण्यात आलेली नाही , त्यामुळे काम करणेसाठी पुरेसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे दिसून येते , नियमानुसार टुकडे पाडुन कामे देता येत नसताना तशी कार्यवाही केली आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. जाहिरात 2009/प्र.क्र. 137/का-34 दि. 31/08/2009 नुसार जाहिरातीचे वितरण शासनमान्य दराने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत चक्रीय पध्द्तीने (रोटेशन) करणे बंधनकारक आहे. तसेच जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्यब रु. 20 लक्षापर्यंत आहे त्याचे वितरणाचे अधिकार जिल्हा माहिती अधिकारी यांना

असुन एक क-वर्ग दैनिक व एक साप्ताहिक मध्ये , आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी. चे प्रमाण लक्षात घेवुन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2. प्राप्त दरपत्रकाचे तांत्रीक बाबींचा तक्ता व प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता त्या -त्या संचिकेत तयार करुन जोडण्यात आलेला नाही. केवळ टिपणीमध्येच प्राप्त दरपत्रके व दर नमुद करुन मंजुर घेण्यात आल्याचे दिसुन येते , प्राप्त नीविदाकारांच्या नीविदा पाकीटे अ.क्रं. 1 चे पाच नीविदा दि. 11/09/12 ला 17.30 वाजता, अ.क्रं. 2 व 3 चे प्रत्येकी चार नीविदा दि. 18/12/12 ला प्रत्येकी दोन निवीदा 17.15 व प्रत्येकी दोन नीवीदा 17.00 वाजता पाकीट क्रं.1 व पाकीट क्रं. 2 दोन्ही संचीकेतील आठ नीवीदांचे लीफाफे 17.30 वाजता एकाच वेळी उघडण्यात आले आहेत, प्रथम पाकीट क्रं.1 उघडुन पात्र निवीदाधारकांचे पाकीट क्रं. 2 उघडणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. यावरुन पहील्यावेळी पाकीट क्रं. 1 व त्यानंतर पाकीट क्रं. 2 उघडण्यात आले नसल्याचे स्पष्ट होते , निविदाकारांकडुन तांत्रिक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे माविण्यात आले नाहीत , निविदा दोन प्रतित मागवील्या नाहीत, निविदाकारांनी फक्त ठेकेदार नोंदणी / नुतणीकरण प्रमाणपत्राची प्रत जोडली आहे. तसेच तांत्रीक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे , निवीदा बाबतच्या अटी व शर्ती पुर्तता बाबत व्यापारी लिफाफा तुलनात्मक तक्ता व त्यानंतर व्यापारी लिफाफा उघडुन तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर निविदा समीतीच्या अधीकारी यांच्या सहया घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. नगर परिषद संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 36 क्रं.नप्रस/ निविदा मागविणे/ 05/प्र.क्र.151 /05/9,दिनांक 29/12/05 अ.क्रं. 27 मध्ये पात्रता ठरविण्याचे निकष दिलेले आहेत. तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रं.भाखंस 2001/(2949)/ उद्योग-6 दि. 25/06/2002 नुसार “तांत्रिक निविदेचा लिफाफा” मध्ये अत्यावशक कागदपत्रात आयकर नोंदणी बाबतचे क्रमांक दर्शविणारे निविदाकाराने दिलेले साक्षांकित प्रमाणपत्र, विक्रीकर नोंदणीबाबतचा क्रमांक दर्शविणारे निविदाकाराने दिलेले साक्षांकीत प्रमाणपत्र, आयकर आणि विक्रीकर निपटारा प्रमाणपत्र मिळण्यासाठी सक्षम अधिका-याकडे केलेल्या अर्जाची पोहोंच पत्राची प्रमाणित प्रत , यापैकी कागदपत्रे तांत्रिक लिफाफयासोबत सादर करणे शक्य झाले नाही तर ती कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत व्यापारी लिफाफा उघडण्याणपुर्वी स्वतंत्ररित्या सादर करणे निविदाकारास बंधनकारक राहील अन्यथा निविदा अग्राहय दर्शविण्यात येवून त्याचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येवु नये , असे असताना ठेकेदारांची पात्रता पडताळुन न पहाता सर्वच निविदा धारकाचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आले मुळे सदरची कृती नियमबाहय ठरते.

3. प्रस्तावीत कामास प्रशासकीय मान्यता घेतल्याचे आदेशाची प्रत तसेच ठराव मंजुरीची प्रत संचिकेत नसल्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही. सार्वजनीक बांधकाम विभाग परिच्छेद 132 व 133 नुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम अभीयंत्याची तांत्रीक मान्यता घेणे आवश्यक आहे, तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 160 व 162 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4. निविदा अ.क्रं. 1 ची दि. 19/09/2012 ला उघडण्यात आली व 10 टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमीने दर प्राप्त होवुनही करारनामा दि. 01/12/12 रोजी केला व कामाचे आदेशदि. 01/12/12 रोजी देण्यात आले. अ.क्रं. 2 व 3 चे कामाच्या नीवीदा दिनांक 18/12/12 ला उघडण्यात आल्या अ.क्रं. 2 चे निवीदाकारास वाटाघाटीसाठी दिनांक 29/12/12 चे पत्रानुसार दिनांक 01/01/2013 ला बोलावले, असता ठेकेदाराने दिनांक 31/12/12 ला अंदाजपत्रकीय दराचे 3 टक्के जादा दराने काम करण्यात

DRAFT

DRAFT

तयार असल्याचे पत्र दिले व कामाचे आदेश दि. 30/03/13 ला देण्यात आले तसेच अ.क्रं. 3 चे कामासाठी अंदाजपत्रकीय दराचे 3 टक्के जादा दराने काम करणे बाबत दि. 31/12/12 ला पत्र दिले व कामाचे आदेश दि. 30/3/13 ला देण्यात आले. म्हणजे निविदा उघडल्यालनंतर त्वरीत कार्यवाही न करता जादा विलंबाने कार्यवाही केली. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 171 (6) नुसार व स्थाई निदेश नियम 466 (4) परिशिष्ट तिन - निविदा मागविण्याची आणि स्विकृत करण्याची कार्यपध्दती ( 36) नुसार निविदा उघडल्यानंतर त्यांची विल्हेवाट लावण्यामध्ये कोणताही टाळता येण्याजोगा विलंब करता येणार नाही. सामान्यपणे ते उघड केल्याच्यां दिनांकापासुन एका आठवडयाच्या आत त्यांची विल्हेवाट लावण्यात येईल आणि कोणत्याही परिस्थितीत एका महिण्यापेक्षा अधिक कालावधीत त्याची विल्हेवाट लावणार नाही असे नमुद असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5. करारनाम्यावर दिनांक नमुद नाही व महानगरपालीकेची माहेर वठविण्यात आली नाही. नगर परिषद संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 36 क्रं.नप्रस/ निविदा मागविणे/ 05/प्र.क्र.151 /05/9,दिनांक 29/12/05 परिशीष्ट क (15) मध्ये नमुद केलेनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

6. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर , महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल , अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

7. अंदाजपत्रकातील दर जिल्हा दरसुचीप्रमाणे आहेत किंवा नाही याची खात्री करता आली नाही. मुंबई प्रातिंक अधीनियम 1949 चे अनुसुची ड चे प्रकरण 8 मधील 6(1) (2) अन्वये लेखारिक्षणास सर्व कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे हे कर्मचारी यांचे कर्तव्य आहे.

8. निविदा विक्री बाबत निविदांना क्रमांक दिलेले नाहीत, विक्रि निविदा व प्राप्त रकमा , निविदा विक्री, इसारा रक्कम , सुरक्षा रक्कम , लोकवर्गणी ई. बाबतची पावतीबुके , नोंदवही व इतिवृत लेखापरिक्षणास दर्शविण्यात आली नाही तसेच वृत्तपत्रे निविदा जाहिरात , वृत्तपत्रक जाहिरात देयके तपासणीस उपलब्ध केले नाहीत याशीवाय नियमानुसार देयकातील सर्व कपाती रकमाचा चलनव्दारे भरणा केलेले चलन लेखापरिक्षणास दर्शविण्यात आले नाहीत. महाराष्ट्रत नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 79 नुसार उक्त नमुद अभीलेख लेखापरिक्षणास दर्शविणे आवश्यक आहे.

9. महाराष्ट्र शासन सार्वजनीक बांधकाम विभाग शासन नीर्णय क्रं. सीएटी 07/2006/प्र.क्र. 94/इमारती-2 दिनांक 16/11/2006 नुसार रुपये 15 लक्ष पर्यंतची कामे वीनानीवीदा मजूर सहकारी संस्था किंवा सुशीक्षीत बेराजगार अभीयंता यांना देणे , नीर्णय क्रं. सीएसटी 1097/प्र.क्र. 42/ इमारत-2दि. 29/07/20025 नुसार नोंदणीकृत स्थापत्य सुशीक्षीत बेरोजगार अभीयंता यांना रुपये 25 लक्ष पर्यंतची कामे वीना नीवीदा अंदाजपत्रकीय दराने देणे आवश्यक आहे , व नीर्णय क्रं. सीएसटी/01/प्र.क्र. 26/इमारत-2दि.31/05/05 नुसार 5 लक्ष कींमती पर्यंतच्या कामाचे वाटप हे पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांना 34 टक्के, सुशीक्षीत बेराजगार अभीयंता यांना 33 टक्के व मजुर सहकारी संस्थांना 33 टक्के या प्रमाणात वाटप करणे आवश्यक आहे , असे असताना आवश्यक असताना नीवीदा प्रसीध्द करुन काम देण्यात आले आहे. त्यामुळे बाभळे जलशुध्दीकरणे केंद येथील 3000 केव्ही/3एमव्ही, 33 केव्ही व सुखवद रॉवॉटर पंपीग स्टेशन येथील 4000 केव्ही/4 अएमव्ही /33 केव्ही स्टँडबाय ट्रान्सफार्मर व

त्यासाठीचे सुरक्षा उपकरणे कामे अंदाजपत्रक रकमेपेक्षा 3 टक्के जादा दराने दिलेमुळे देयकाची 3 टक्के जास्तीची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 89 दिनांक 05/12/2015 देवुन अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी अभिप्राय प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 89)

## *72 निवृत्ती वेतनाच्या रकमा निवृत्ती वेतन निधीत जमा न करता आवश्यकतेप्रमाणे सर्वसाधारण निधीतून थेट देण्याची अनियमितता.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***निवृत्ती वेतनाच्या रकमा निवृत्ती वेतन निधीत जमा न करता आवश्यकतेप्रमाणे सर्वसाधारण निधीतून थेट देण्याची अनियमितता केली आहे.***

सन 2012-13 चे लेखा परीक्षणात निवृत्ती वेतन विभागाची लेखा परीक्षा करता , महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 136 (5) नुसार निवृत्ती कर्मचा-यांना देय असलेले निवृत्ती वेतन रकमेची तरतुद करुन निवृत्ती वेतन निधीच्या नावे जमा होणे आवश्यक आहे. सदरची रक्कम कोणत्याही परिस्थितीत सर्वसाधारण निधीच्या खाती महानगरपालिकेस ठेवता येणार नाही. तसेच त्या निधीतून कोणतीही रक्कम राज्य शासनाच्या पूर्व मंजूरी शिवाय इतर कोणत्याही हेतूसाठी खर्च करता येणार नाही अशी स्पष्ठ तरतूद असतांनाही सन 2012-13 अखेर पावेतो महानगरपालिकेने उपरोक्त नियमानुसार निवृत्ती वेतन निधी खाती देय असलेले सेवानिवृत्ती वेतन रकमा जमा केलेल्या आढळत नाही. यामुळे निवृत्ती वेतन निधी स्वतंत्र ठेवण्याचा मुळ हेतू सफल होत नाही. तरी निधी बाबत नियमोचित कार्यवाही करण्यांत यावी.

DVERSKM7501 (Ref No : 96)

## *73 निवृत्ती वेतन निधी खाती मनपा निधी जमा करणेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*



DRAFT

***निवृत्ती वेतन निधी खाती, सेवा निवृत्त कर्मचा-याची वर्गणी जमा करण्यांसाठी देयकांसोबत कार्यालयीन मंजूरी आदेश सेवा निवृत्ती कर्मचा-यांचे नावे देय रक्कम इ. बाबतचा तपशिल न जोडण्याची अनियमिततेमुळे उपरोक्त खाती जमा केलेली वर्गणी व रक्कम ती कोणत्या कालावधीची आहे याचा ताळमेळ लेखा परीक्षणात घेता आलेली नाही.***

खालिल तपशिलात दाखविलेल्या प्रमाणे महानगरपालिका सेवानिवृत्त कर्मचा-याच्या निवृत्ती वेतन निधी खात्यात वर्गणी जमा करण्यांत आलेली आहे. कॅशबुक (डे बुक) पडताळणी करतांना कार्यालयीन मंजूर आदेश क्रमांक किंवा कर्मचा-यांची नावे अथवा संख्या याबाबतचा तपशिल कोठेही नमूद करण्यांत आलेला नाही. यामुळे वर्ग करण्यांत आलेली रक्कम व त्यांना देय असणारी रक्कम याबाबत ताळमेळ घेता आलेला नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे 2 ( अ) नुसार परिशिष्ठ एक मध्ये नमूद केलेल्या सर्वसाधारण वित्तीय नियम यांत नमूद केलेल्या सुचनांप्रमाणे लेखा विभागाकडून देयकांची उचित लेखा परीक्षा होत नसल्याने सदरची अनियमितता आढळत आहे. तरी नियमोचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

| धनादेश क्रमांक | दिनांक | रक्कम | नावे | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 381601 | 30/07/2012 | 4500000 | निवृत्ती वेतन निधी करीता | 6 वा वेतन आयोगानुसार निवृत्ती वेतन धारकांच्या फरकापोटी अदा करावयाची रकमेसाठी प्रत्येकी रक्कम रुपये 5000 प्रमाणे |
| 39780 | 08/11/2012 | 3000000 | निवृत्ती वेतन निधी करीता | ----"---- |
| 380393 | 08/11/2012 | 1040000 | निवृत्ती वेतन निधी करीता | |

DVERSKM7501 (Ref No : 97)

## *74 अभिलेखे विभागातील सर्वसाधारण असणा-या त्रुटी*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

***अभिलेखे विभागात लेखा परीक्षणात आढळलेल्या सर्वसाधारण असणा-या त्रुटीबाबत.***

अभिलेखे विभागातील लेखा परीक्षण करताना खालीलप्रमाणे सर्वसाधारण असणा-या त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1.महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 142(2) मध्ये विभागाकडून येणा-या वस्तू मागणीची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतू सदर विभागाने अशी ठेवलेली आढळत नाही. तसेच साठा नोंदवही मधूनच विविध विभागाना छपाई करण्यांत आलेल्या वस्तू वाटप करण्यांत आलेले असून त्यामध्ये संबंधितांची स्वाक्षरी आढळत नाही.

2.विभागामार्फत कोणत्या प्रकारचे छपाई कागदपत्रे व रजिस्टर यांचे वाटप करण्यांत येते याची स्वंतत्र यादी ठेवलेली नाही. त्यामुळे किती प्रकारचे कागदपत्रे , बुके, अर्ज इत्यादी छपाई करुन घेतले जातात हे समजू शकत नाही.

3.ब-याच प्रकारचे छापील फॉर्म्स, रजिस्टर , इत्यादी वस्तू कालबाहय झाल्यामुळे विनावापर पडून राहिलेले आहे. सदर साहीत्याची मागणी नसताना छपाई करुन घेतलेमुळे ते वर्षानूवर्ष पडून असल्याचे दिसते. सबब महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान हे ज्या त्या विभागाकडून केवळ मागणीपत्रक न घेतल्याने छपाई केलेली असल्यामुळे झालेले आढळते.

4.महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 145 (3) ,146,150(4) ,153 नुसार साठा नोंदवही ठेवलेले दिसत नाही.

5.एखादया पुरवठादाराचे देयक अदा केले किंवा नाही याबाबतची नोंद अथवा दुसरी देयक प्रत ठेवलेली आढळत नाही. त्यामुळे संबंधित पुरवठादाराचे देयक लेखा विभागाकडून अदा करण्यांत आले किंवा नाही याबाबत माहिती मिळू शकत नाही.

6.अभिलेखे विभागामधील कामकाज हे आजच्या काळातसुध्दा हस्तलिखीत सुरु असून तो संगणकीयकृतरित्या असणे गरजेचे आहे.

DVERSKM7501 (Ref No : 106)

## *75 अभिलेखे विभागाकडील सन 2012-13 मधील छपाईबाबतच्या निविदेमधील असणा-या अनियमिततेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 08**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सन 2012-13 मधील छपाई बाबतच्या दिलेल्या कामाच्या निविदेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.***

अभिलेखे विभागामधील छपाई बाबतच्या 2012-13 च्या उपलब्ध कागदपत्रावरुन लेखा परीक्षण करण्यांत आलेले आहे.

1.सदर निविदा क्रमांक 13 मध्ये जाहिरातीद्वारे प्रसिध्द करताना फक्त एकाच दैनिक लोकमत मध्ये केलेली आहे. सामान्य् प्रशासन विभाग निर्णय क्र. जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दिनांक 31 ऑगस्ट 2009 नुसार जाहिरातीचे वितरण शासनमान्य् दराने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे चक्रीय पध्दतीने करणे बंधनकारक असताना ते तसे केल्याबाबतचे आढळत नाही. तसेच एकुण किती रक्कमेचे छपाई करुन घेतली जाणार आहे याबाबत उल्लेख करण्यांत आलेला नाही.

2.निविदा पाकिटे उघडण्यासाठी ते प्रथम आवक वही मध्ये नोंदविणे आवश्यक आहे तसेच निविदा पाकीटे उघडण्यासाठी असणारी समिती गठीत केल्याचे आढळत नाही.किंवा त्याबाबतचे कार्यालयीन आदेशदेखील नस्तीमध्ये दिसत नाहीत.

3.सदर एकुण 4 निविदा उघडण्याआधी पाकीटांवर समिती सदस्यांच्या स्वाक्षरी असणे आवश्यक होते परंतू त्यावर फक्त मा.आयुक्त यांच्या स्वाक्षरी आढळत आहेत.

4.दर तुलनात्मक तक्ता तयार केल्यावर त्यामध्ये मा.आयुक्त किंवा समिती सदस्यांच्या स्वाक्षरी अथवा निविदा उघडल्याचा दिनांक नमूद केलेला नाही.

5.ब-याच वस्तू करीता फक्त 2 च पुरवठादारांनी दर दिलेले आहेत तरीसुध्दा त्यांना कार्यादेश देण्यांत आलेले आहेत.

6.कार्यादेश देतांना त्यामध्ये किती रक्कमेचे आदेश आहेत याबाबत उल्लेख आढळत नाही.

7.सदर निविदेमधुन कार्यादेश दिलेनंतर छपाई केलेले वस्तू मिळाल्यावर किती देयके खर्ची पडली आहेत हे केवळ देयकांची दुसरी प्रत अभिलेखे विभाग ठेवत नसल्यामुळे समजू शकलेले नाही.सबब एखादया पुरवठादारांचे देयक लेखा विभागाकडून अदा करण्यांत आलेले आहे किंवा नाही याबाबत माहिती समजू शकलेली नाही.

8. निविदा मागवितांना एकुण किती रक्कमेकरीता पुरवठा आदेश दिला जाणार आहे याबाबत उल्लेख नसल्यामुळे अनामत रक्कम ही या रक्कमेच्या 5 टक्के घेणे गरजेचे होते मात्र याठिकाणी सदर अनामत रक्कम फक्त रुपये 5000/- घेतली असल्याचे आढळत आहे.

तरी याबाबत नियमोचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

DRAFT

## *76 सेवा निवृत्ती वेतन विभागात आढळलेल्या इतर अनियमितता.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 08**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***निवृत्ती वेतन विभागात आढळलेल्या इतर सर्वसाधारण त्रुटी.***

सन 2012-13 चे लेखा परीक्षणात निवृत्ती वेतन विभागाची लेखा परीक्षा करतांना खालिलप्रमाणे त्रुटी व अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 136 ( 13) नुसार स्त्री निवृत्ती वेतन धारक / कुंटूंबनिवृत्ती वेतन धारकांकडून पुर्नविवाह न केल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र घेतल्याबाबत आढळत नाही किंवा त्यांची स्वंतत्र नस्ती ठेवलेली नाही.

2.सेवानिवृत्त् कर्मचारी व निवृत्ती वेतन धारकांकडून वेळीच हयात दाखले घेतले जात नसल्याबाबत आढळत आहे. त्याची स्वंतत्र एकत्रित नस्ती ठेवणे गरजेचे आहे.

3.2012-13 मध्ये एकुण 49 कर्मचारी स्वेच्छानिवृत्ती /नियत सेवानिवृत्ती व मुत्यू मुळे सेवानिवृत्त् झालेचे त्यांचे प्रकरणावरुन समजते मात्र महाराष्ट् नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 135 (2) नुसार ठेवण्यांत आलेल्या निवृत्त्वेतन नोंदवही (पीपीओ रजिस्टर ) मध्ये फक्त 33 जणाची नोंद करण्यांत आलेली आहे. तसेच सदर नोंदवही मध्ये कोणत्याही कर्मचा-यांची व अधिका-यांची तपासणी अथवा नोंद घेतलेबाबतची स्वाक्षरी नाही.

4.सेवानिवृत्ती झालेल्या कर्मचा-यांची मुळ सेवापुस्तके तपासणीकरीता मिळालेली नाहीत सबब त्यांना सेवानिवृत्त झालेवर देण्यांत आलेले लाभ देवून झालेबाबतचे नोंदी तपासता आलेल्या नाहीत.

5.सेवानिवृत्ती विभागाकडील डे बुक (कॅश बुक) तपासले असता त्यामध्ये ब-याच ठिकाणी लेखापाल व लेखा अधिका-यांची स्वाक्षरी आढळलेली नाही.

6.डे बुक मध्ये मासिक व वार्षिक गोषवारे नोंदविण्यांत आलेले नाहीत. तसेच डे बुकचे ताळमेळ बॅक स्टेटमेंट बरोबर घेणेसाठी ते उपलब्ध् नसल्यामुळे तपासता आलेले नाही.

7.मासिक निवृत्ती वेतन संबंधीतांना अदा करताना कॅश बुक मध्ये निवृत्ती वेतन धारकांची संख्या बॅकेचे तप्शिलवार लिहिले जाणे गरजेचे आहे मात्र तसे केल्याचे आढळत नाही. एकुण निवृत्ती वेतन धारकांची संख्या सुध्दा त्याठिकाणी असणे गरजेचे आहे.

8.कुंटूंब निवृत्ती वेतन धारक क्र. 27/2012-13 श्रीमती सुलोचना भिवसेन बोराळे यांचे पती

DRAFT

कै.बोराळे भिवसेन भोजा , सफाई कामगार यांचे वय वर्षे 45 पूर्ण झालेवर मनपा सेवेत आल्याचे निदर्शनास येत आहे.

तरी याबाबत नियमोचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

DVERSKM7501 (Ref No : 108)

## *78 धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षासाठी ॲलम, ब्लीचींग पावडर, क्लोरीन गॅस टनर खरेदीबाबतचे निविदा व देयका बाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 10**

*लेखा शीर्ष :देखभाल दुरुस्ती मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 2858785.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2858785.00/-

***निविदा प्रसिध्दी नियमानुसार न करणे, प्रस्तावीत कामाचे प्रशासकीय व अंदाजपत्रक मंजूरी आदेश प्रत संचिकेत न ठेवणे, निविदा कार्यवाही नियमानुसार न करणे, निविदा उघडून विलंबाने मंजूरी आदेश देणे, निविदाकाराकडुन करारात पालिका सदस्य अथवा भागीदाराचा प्रत्यक्षे किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध नसलेचे प्रमाणपत्र न घेणे, लेखापरिक्षणास संपुर्ण अभिलेखे तपासणीस उपलब्ध न करणे, खरेदी, मंजुरी बाबत तफावती, निविदा मंजुरी नसताना पुरवठा प्राप्त नोंदी, चाचणी अहवाल न घेणे, देयकातुन आयकर, विक्रीकर, जकात ई. वसुली न करणे ई.***

| प्रमाणक क्रं. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 4200 | 02/03/13 | 140250 |
| 4201 | 02/03/13 | 140250 |
| 4202 | 02/03/13 | 76500 |
| 4270 | 30/03/13 | 140250 |
| 4271 | 30/03/13 | 140250 |
| 4272 | 30/03/13 | 76500 |
| 4207 | 02/03/13 | 354000 |
| 4199 | 02/03/13 | 276971 |
| 4203 | 02/03/13 | 100000 |
| 4204 | 02/03/13 | 100000 |
| 4205 | 02/03/13 | 100000 |
| 4206 | 02/03/13 | 100000 |
| 4208 | 02/03/13 | 100000 |
| 4267 | 30/03/13 | 150999 |
| 4268 | 30/03/13 | 313315 |
| 4269 | 30/03/13 | 250750 |

| | | |
|---|---|---|
| 4273 | 30/03/13 | 300000 |

| अ. क्रं. | बाब | तपशील |
|---|---|---|
| 1 | लेखा शिर्ष | मनपा निधी |
| 2 | प्रशासकीय मान्यता | आदेशाची प्रत संचिकेत उपलब्ध नाही |
| 3 | तांत्रीक मान्यता | उपलब्ध नाही |
| 4 | निविदा रक्कयम | रु. 3190000 |
| 5 | निविदा प्रकार | जाहिर निविदा |
| 6 | निविदा प्रसिध्दी व कालावधी | 30/04/12 ते 08/05/12 निविदा स्विकारणे 09/05/12 दै. पुण्यधनगरी दि. 28/04/12 |
| 7 | प्राप्त निविदा | तिन |
| 8 | मंजूर निविदा तपशील | ब्लीलचींग पावडर-महाराष्ट्रo लघु उदयोग महामंडळ रु.14750 प्रतिटन दराने,<br>क्लोरीन गॅस टनर-मे.जी.एस.कमर्शीअल मुंबई रु. 12750 |
| 9 | स्थायी समीती मंजुरी | ठराव / आदेशाची प्रत उपलब्ध नाही. |
| 10 | कार्यादेश | क्रं.धुमपा/पापुवी-7/2012-13 दि. 11/09/12 |
| 11 | करारनामा | रु. 100 बॉडवर, दि. 11/09/12 |

धूळे महानगरपालिकेचे सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात ब्लीचींग पावडर, क्लोरीन गॅस टनर, ॲलम खरेदी निविदा बाबतचे संचिकेतील उपलब्ध अभिलेख्यात व माहे मार्च 2013 चे देयकात आढळुन आलेल्या त्रुटी / उणीवा बाबत खालील प्रमाणे अभीप्राय आहेत.

1. संचिकेत जाहीर निवीदा प्रसिध्दी दैनिक पुण्य नगरी या एकाच वृत्तपत्रात कार्यालयाने प्रसिध्दी केली आहे. जाहिर निविदा दि. 27/04/2012 चे पत्रान्वये प्रसिध्दीस देवून दि. 28/04/2012 चे वृत्तपत्रात प्रसिध्द करुन दिनांक 08/05/12 पर्यंत निविदा भरणे व दि. 09/05/12 पर्यंत स्वीकारणेची मुदत देण्यात आली, यावरुन निविदाकारांस निविदा भरण्यास पुरेसा कालावधी देण्यात आला नसल्याचे व स्पर्धात्मक दर प्राप्त न झाल्याचे स्पष्ट होते. सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दि.31/08/2009 नुसार जाहिरातीचे वितरण शासनमान्य दराने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत चक्रीय पद्धतीने (रोटेशन) करणे बंधनकारक आहे. तसेच जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु. 20 लक्षापर्यंत आहे त्याचे वितरणाचे अधिकार जिल्हा माहिती अधिकारी यांना असुन एक क-वर्ग दैनिक व एक साप्ताहिक मध्ये, आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी.चे प्रमाण लक्षात घेवुन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2. प्रस्तावीत कामास प्रशासकीय मान्यता घेतल्याचे आदेशाची प्रत तसेच अंदाजपत्रक मंजुरीची प्रत संचिकेत नसल्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही. सार्वजनीक बांधकाम विभाग परिच्छेद 132 व 133 नुसार

DRAFT

कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम अभीयंत्याची तांत्रीक मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 162 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3. निविदा दोन प्रतित मागवील्या नाहीत, तांत्रीक लिफाफयातील आवश्यक कागदपत्रे, निवीदा बाबतच्या अटी व शर्ती पुर्तता बाबत व्यापारी लिफाफा तुलनात्मक तक्ता व त्यानंतर व्यापारी लिफाफा उघडुन तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर निविदा समीतीच्या अधीकारी यांच्या सहया घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच संचिकेतील टीपणीत डीएसआर दर नमुद केले परंतु शासन दरकरार प्रत संचिकेत व लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध केली नाही, त्यामुळे दराबाबत खात्री करता आली नाही. नगर परिषद संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 36 क्रं.नप्रस/ निविदा मागविणे/ 05/प्र.क्र.151/05/9,दिनांक 29/12/05 अ.क्रं. 27 मध्ये पात्रता ठरविण्याचे निकष दिलेले आहेत त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4. निविदा दि. 16/05/2012 ला उघडण्यात आल्या, व वाटाघाटी नुसार ब्लीचींग पावडर रुपये 14750 प्रतिटन दर मंजुर करण्यात आले, करारनामा दिनांक 11/09/2012 ला केला व पुरवठा बाबतचे आदेश दिनांक 11/09/12 ला देण्यात आले, यावरुन निविदा उघडल्यालनंतर चार महिण्यानंतर विलंबाने करारनामा केल्याची कार्यवाही केली. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 171 (6) नुसार व स्थाई निदेश नियम 466 (4) परिशिष्ट तिन - निविदा मागविण्याची आणि स्विकृत करण्याची कार्यपध्दती (36) नुसार निविदा उघडल्यानंतर त्यांची विल्हेवाट लावण्यामध्ये कोणताही टाळता येण्याजोगा विलंब करता येणार नाही. सामान्यपणे ते उघड केल्याच्या दिनांकापासुन एका आठवडयाच्या आत त्यांची विल्हेवाट लावण्यात येईल आणि कोणत्याही परिस्थितीत एका महिण्यापेक्षा अधिक कालावधीत त्याची विल्हेवाट लावणार नाही असे नमुद असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

6. ॲलम खरेदी बाबत दोनच निविदा प्राप्त झालेमुळे फेर निविदा मागविण्याचे संचिकेत नमुद केले आहे परंतु फेर निविदा मागविण्यात आल्याची संचिका अथवा अभीलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध करण्यात आलेली नाहीत. संचिकेतील टीपणी दिनांक 06/09/12 नुसार ॲलम साठा कमी असल्याने सन 2011-12 चे मंजुर दराने मे. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांचेकडुन 450 मे.टन खरेदी करणेस उपआयुक्त यांनी दिनांक 13/09/12 ला मंजुरी दिली, परंतु पुरवठयाबाबतचे पत्र संचिकेत नाही, तसेच समर्थ एंटरप्रायझेस यांचेकडुन दिनांक 13/09/12 ला करारनामा घेवुन ॲलम ग्रेड 1 प्रति मे. टन रुपये 5490 दराने 450 मे. टन पुरवठा करणेस पत्र दिले आहे. संचीकेत सन 2011-12 चे मंजुर दर पडताळणीस उपलब्ध नाहीत. जलशुध्दीकरण केंद्रावरील नोंदवहयावरुन सन 2012-13 मध्ये ॲलम खरेदी 2808.600 मे.टन करण्यात आलेचे

DRAFT

दिसुन येते, मंजुरी नसताना 2362.600 मे.टन खरेदी करण्यात आलेचे आढळुन आले आहे. सदरची कार्यवाही नियमबाहय झालेली आहे. त्यामुळे माहे मार्च मधील रोखपुस्तीकेनुसार खर्च रक्केम रुपये 1792035 आक्षेपाधीन आहे.

7. सन 2012-13 मध्ये ब्लीचींग पावडर, क्लोरिन गॅस टनर व ॲलम खरेदी बाबत निविदा दर मंजुरी नुसार दिनांक 11/09/2012 ला पुरवठा आदेश निविदाधारकास देण्यात आले आहेत, परंतु जलशुध्दीकरण केंद्रावरील सामग्री प्राप्त, वापर व शिल्लक बाबतचे नोंदवहया तपासणी केल्या असता माहे एप्रिल 2012 महिण्यापासुन दरमहा ब्लीचींग पावडर, क्लोरिन गॅस टनर व ॲलम सामग्री प्राप्त नोंदी घेण्यात आलेल्या आहेत, यावरुन निविदा मंजुर नसताना ब्लीचींग पावडर, क्लोरिन गॅस टनर व ॲलम खरेदी करण्यात आलेली आहे असे आढळुन आले आहे. तसेच खरेदी प्रमाणके लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध नसलेमुळे खरेदी दर, पुरवठादार ई. बाबत खात्री करता आली नाही. सन 2011-12 चे महानगरपालिकेचे मंजूर दर ब्लीचींग पावडर प्रति मे. टन रु. 11999 असल्याचे दिनांक 22/05/12 चे टिपणीत नमुद करण्यात आले आहे, त्यामुळे सन 2012-13 चे दर मंजुर होणेपुर्वी माहे एप्रिल 12 ते सप्टेंबर 12 या कालावधीतील खरेदी जुने दर रु.11999 ने खरेदी करण्यात आली किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही, जर नविन दराने देयके मंजूर करण्यात आली असतील तर सदर कालावधीतील दराचे फरकाची रक्कम निविदाकारांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

8. निविदेतील अटी व शर्ती नुसार ब्लीचींग पावडर व ॲलम ची मान्यता प्राप्त शासकीय प्रयोगशाळेतुन चाचणी घेतल्याचे अहवाल संचिकेत उपलब्ध नसल्याने पुरवठयाप्रमाणे सामग्री प्राप्त झाला किंवा कसे याबाबत खात्री नसताना देयके मंजुर केल्याचे आढळुन येते.

9. कार्यालयीन पत्र नुसार दिनांक 11/09/2012 नुसार 380 टन ब्लीचींग पावडर व 200 नग क्लोरीन गॅस कटर पुरवठा करणे बाबत निविदाकारांस कळविण्यात आले आहे, परंतु सदर खरेदीचे देयके, निविदाकारांकडुन प्रत्यक्ष सामग्री पुरवठा झाल्याचे व देयक मंजुरीस सादर केल्याचे अभीलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध केले नसलेमुळे तपासणी करता आली नाही, सन 2012-13 मध्ये सदरचे उक्त कामावर एकुण किती खर्च / खरेदी करण्यात आली याबाबतची माहिती उपलब्ध करण्यात आली नाही. रोखपुस्तीकेवरुन खालील प्रमाणे माहे मार्च 13 मध्ये खर्च झाल्याचे दिसुन आले आहे.

| प्रमाणक क्रं. | दिनांक | रक्कम | सामग्री | पुरवठादार |
|---|---|---|---|---|
| 4200 | 02/03/13 | 140250 | क्लोरीन गॅस टर्नर | मे.जी.एस.कमर्शीअल को.मुंबई |
| 4201 | 02/03/13 | 140250 | क्लोरीन गॅस टर्नर | मे.जी.एस.कमर्शीअल को.मुंबई |
| 4202 | 02/03/13 | 76500 | क्लोरीन गॅस टर्नर | मे.जी.एस.कमर्शीअल को.मुंबई |
| 4270 | 30/03/13 | 140250 | क्लोरीन गॅस टर्नर | मे.जी.एस.कमर्शीअल को.मुंबई |
| 4271 | 30/03/13 | 140250 | क्लोरीन गॅस कटर | मे.जी.एस.कमर्शीअल को.मुंबई |
| 4272 | 30/03/13 | 76500 | क्लोरीन गॅस टर्नर | मे.जी.एस.कमर्शीअल को.मुंबई |
| 4207 | 02/03/13 | 354000 | ब्लीचींग पावडर | महा.लघु उद्योग महामंडळ |
| 4199 | 02/03/13 | 276971 | ॲलम (तुरटी) | मे.समर्थ एंटरप्राईजेस |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4203 | 02/03/13 | 100000 | ॲलम (तुरटी) | महा.लघु उद्योग महामंडळ |
| 4204 | 02/03/13 | 100000 | ॲलम (तुरटी) | महा.लघु उद्योग महामंडळ |
| 4205 | 02/03/13 | 100000 | ॲलम (तुरटी) | महा.लघु उद्योग महामंडळ |
| 4206 | 02/03/13 | 100000 | ॲलम (तुरटी) | महा.लघु उद्योग महामंडळ |
| 4208 | 02/03/13 | 100000 | ॲलम (तुरटी) | महा.लघु उद्योग महामंडळ |
| 4267 | 30/03/13 | 150999 | ॲलम (तुरटी) | महा.लघु उद्योग महामंडळ |
| 4268 | 30/03/13 | 313315 | ॲलम (तुरटी) | महा.लघु उद्योग महामंडळ |
| 4269 | 30/03/13 | 250750 | ॲलम (तुरटी) | महा.लघु उद्योग महामंडळ |
| 4273 | 30/03/13 | 300000 | ॲलम (तुरटी) | मे. समर्थ एंटरप्रायजेस |

सन 2012-13 मधील खरेदी संचिका लेखा परिक्षणास न दर्शविल्यामुळे खर्चाची रक्कम 2859785 आक्षेपाधीन ठेवण्यात आली व उक्त प्रमाणका व्यतिरिक्त सन 2012-13 मध्ये झालेल्या एकुण खर्चाची माहिती उपलब्ध न केलेमुळे अशाप्रकारे केलेला एकुण खर्चही आक्षेपाधीत ठेवण्यात आला आहे.

10. खरेदी देयकातुन नियमानुसार आयकर, विक्रीकर, जकात ई. रकमा वसुल करुन त्या-त्या लेखाशिर्षात भरणा करुन लेखापरिक्षणानास दर्शविणे आवश्याक आहे.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 127 दिनांक 19/01/2016 देवुन अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी अभिप्राय प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 127)

## *79 धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात हातपंप, जेटपंप दुरुस्ती बाबतचे निविदा काढुन केलेल्या कामाबाबतच्या आढळुन आलेल्या अनियमीतता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष : देखभाल दुरुस्ती मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***निविदा प्रसिध्दी नियमानुसार न करणे, प्रस्तावीत कामाचे प्रशासकीय व अंदाजपत्रक मंजूरी आदेश, अर्थसंकल्पीय तरतुद ई. प्रत संचिकेत न ठेवणे, निविदा कार्यवाही नियमानुसार न करणे, निविदा उघडून विलंबाने मंजूरी आदेश देणे, निविदाकाराकडुन करारात पालिका सदस्य अथवा भागीदाराचा प्रत्यवक्ष किंवा अप्रत्येक्ष हितसंबंध नसलेचे प्रमाणपत्र न घेणे, लेखापरिक्षणास संपुर्ण अभिलेखे तपासणीस उपलब्ध न करणे, कार्यादेशानुसार मुदतीत कामे न करणे, मुदतवाढ देणे, दंड रक्कम वसुल न करणे, खरेदी प्रमाणके व देयके तपासणीस उपलब्ध न करणे ई.***

DRAFT

| अ. क्रं. | बाब | तपशील |
|---|---|---|
| 1 | लेखा शिर्ष | मनपा निधी |
| 2 | प्रशासकीय मान्यता | आदेशाची प्रत संचिकेत उपलब्ध नाही |
| 3 | तांत्रीक मान्यता | प्रत उपलब्ध नाही |
| 4 | निविदा रक्कम | 500000 |
| 5 | निविदा प्रकार | जाहिर निविदा |
| 6 | निविदा प्रसिध्दी व कालावधी | 19/03/12 ते 27/03/12 निविदा स्विकारणे 28/03/12 पथयात्री दि. 18/03/12 |
| 7 | प्राप्त निविदा | तिन |
| 8 | मंजूर निविदा तपशील | मुख्यार बोअरवेल |
| 9 | स्थायी समीती मंजुरी | ठराव / आदेशाची प्रत उपलब्ध नाही. |
| 10 | कार्यादेश | क्रं.धुमपा/पापुवी-29 दि. 22/10/12 |
| 11 | करारनामा | रु. 100 बॉडवर, दि. 22/10/12 |
| 12 | कामाची मुदत | 12 महिणे |
| 13 | काम पुर्ण दिनांक | नमुद नाही |
| 14 | मोजमाप पुस्तीका | नमुद नाही |
| 15 | जिल्हा दर सुची वर्ष | नमुद नाही |

DRAFT

महानगरपालिकेचे सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात हातपंप, जेटपंप दुरुस्ती बाबतचे निविदा काढुन केलेल्या कामा बाबतचे संचिकेतील उपलब्ध अभिलेख्यात आढळुन आलेल्या त्रुटी / उणीवा बाबत खालील प्रमाणे अभीप्राय आहेत.

1. संचिकेत जाहीर निवीदा एकाच वृत्तपत्रात दैनिक पथयात्री दि.18/03/2012 मध्ये प्रसिध्द केली असुन निविदा विक्री दि. 19/03/2012 ते 27/03/2012 व निविदा स्विकारणे दिनांक 28/03/12 नमुद आहे. त्यामुळे निविदाकारांस निविदा भरण्यास पुरेसा कालावधी देण्यात आला नसल्याचे व स्पर्धात्मक दर प्राप्त न झाल्याचे स्पष्ट होते. सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दि.31/08/2009 नुसार जाहिरातीचे वितरण शासनमान्य दराने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत चक्रीय पध्दतीने (रोटेशन) करणे बंधनकारक आहे. तसेच जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु. 20 लक्षापर्यंत आहे त्याचे वितरणाचे अधिकार जिल्हा माहिती अधिकारी यांना असुन एक क-वर्ग दैनिक व एक साप्ताहिक मध्ये, आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी.चे प्रमाण लक्षात घेवुन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2. प्रस्तावीत कामास प्रशासकीय मान्यता घेतल्याचे आदेशाची प्रत सचिकेत, तांत्रीक मान्यता, अर्थसंकल्पीय तरतुद बाबतची माहिती संचिकेत नसल्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही. सार्वजनीक बांधकाम विभाग परिच्छेद 132 व 133 नुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम अभीयंत्याची तांत्रीक मान्यता घेणे

आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 162 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3. प्राप्त तिन निविदा दि. 27/04/2012 ला उघडण्यात आल्या, व वाटाघाटीसाठी न्युनतम निविदाकारास दि. 29/05/12 ला बोलावण्यात आले, प्राप्त निविदा तुलनात्मक तक्ता दि. 07/06/2012 रोजी अभीयंता यांचे सहीखालील तारखेचा आहे, करारनामा करणेस दिनांक 04/10/2012 चे पत्रान्वये कळविण्यात आले नुसार निविदाकाराने दि. 22/10/2012 रोजी करारनामा केला, त्यावर कार्यालयाची मोहर लावण्यात आली नाही. निविदा दि.27/04/12 ला उघडण्यात आल्या असता तुलनात्मक तक्त्यावर अभीयंता यांनी 07/06/12 केली असल्याने केलेली कार्यवाही संशंयास्पद असल्याचे स्पष्ट होते. निविदा उघडल्यानंतर सहा महिण्यानंतर विलंबाने दिनांक 22/10/12 ला आदेश निर्गमीत केले आहेत. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 171 (6) नुसार व स्थाई निदेश नियम 466 (4) परिशिष्ट तिन - निविदा मागविण्याची आणि स्विकृत करण्याची कार्यपध्दती (36) नुसार निविदा उघडल्यानंतर त्यांची विल्हेवाट लावण्यामध्ये कोणताही टाळता येण्याजोगा विलंब करता येणार नाही. सामान्यपणे ते उघड केल्याच्यां दिनांकापासुन एका आठवडयाच्या आत त्यांची विल्हेवाट लावण्यात येईल आणि कोणत्याही परिस्थितीत एका महिण्यापेक्षा अधिक कालावधीत त्याची विल्हेवाट लावणार नाही असे नमुद असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

4. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

5. सदर कामाचे आदेश दि. 22/10/2012 ला देण्यात आले असता ज्यामध्ये अंदाजीत कामे रु. 500000, कामाची मुदत 12 महिने व काम वेळेत काम पुर्ण न झाल्यास 100 रुपये प्रति दिवस दंड नमुद केलेला आहे, संचिकेतील टीपणी दि. 16/05/2014 मध्ये जवळपास रुपये 125000 ची कामाचे बील जमा केले आहे व रक्कम न दिलेमुळे ठेकेदाराने कामे केले नसल्याचे नमुद करुन दि. 21/5/2014 अन्वये 21/10/2013 ते 20/10/2014 या कालावधीत मुदतवाढ देण्यात आली आहे. नियमानुसार विलंबाबाबत प्रतिदिन रु. 100 प्रमाणे दंड आकारणी करुन वसुली करणे, कामे विहीत मुदतीत न केलेबाबत अनामत जप्त करुन निविदाकारास अपात्र ठरवुन नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6. सन 2012-13 मध्ये सदरचे उक्त कामावर एकुण किती खर्च झाला, एकुण किती खरेदी करण्यात आली याबाबतची माहिती प्रमाणक क्रं., दिनांक, रक्कम, दुरुस्तीचे तपशीलासह उपलब्ध करण्यात आली नाही त्यामुळे लेखापरिक्षणास तपासणी करता आली नाही. त्यामुळे सदर प्रकरणातील कार्यवाही नियमबाहय असल्याचे व त्यावरील झालेला खर्चा बाबत खात्री पटवीणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 128 दिनांक 20/01/2016 देवुन अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी अभिप्राय प्राप्त् न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 128)

DRAFT

***80 धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात महानगरपालिका हद्दीतील व हद्दीबाहेरील महानगरपालिकेने टाकलेल्या जलवाहीनीवर ज्या नागरीकांनी अनधीकृत नळ कनेक्शन घेतले आहेत त्यांच्यासाठीचे शोधमोहीमेचे कामा बाबतचे निविदा काढुन केलेल्या कामा बाबत.***

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष :देखभाल दुरुस्ती मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***निविदा प्रसिध्दी नियमानुसार न करणे, प्रस्तातवीत कामाचे प्रशासकीय व अंदाजपत्रक मंजूरी आदेश, अर्थसंकल्पीय तरतुद ई. प्रत संचिकेत न ठेवणे, निविदा कार्यवाही नियमानुसार न करणे, निविदा उघडून विलंबाने मंजूरी आदेश देणे, निविदाकाराकडुन करारात पालिका सदस्यव अथवा भागीदाराचा प्रत्यनक्ष किंवा अप्रत्येक्ष हितसंबंध नसलेचे प्रमाणपत्र न घेणे, लेखापरिक्षणास संपुर्ण अभिलेखे तपासणीस उपलब्धव न करणे, खरेदी प्रमाणके व देयके तपासणीस उपलब्धप न करणे ई.***

| अ. क्रं. | बाब | तपशील |
|---|---|---|
| 1 | लेखा शिर्ष | मनपा निधी |
| 2 | प्रशासकीय मान्यता | आदेशाची प्रत संचिकेत उपलब्ध नाही |
| 3 | तांञीक मान्यता | प्रत उपलब्ध नाही |
| 4 | निविदा रक्कम | -- |
| 5 | निविदा प्रकार | जाहिर निविदा |
| 6 | निविदा प्रसिध्दी व कालावधी | 29/08/11 ते 05/09/11, राजरंग टाईम्से दि. 27/08/11 |
| 7 | प्राप्त निविदा | तिन |
| 8 | मंजूर निविदा तपशील | मे. ग्लो बल एंटरप्रायजेस, 34 टक्केन |
| 9 | स्थायी समीती मंजुरी | ठराव / आदेशाची प्रत उपलब्ध नाही. |
| 10 | कार्यादेश | क्रं.धुमपा/पापुवी-117 दि. 22/03/12 |
| 11 | करारनामा | रु. 100 बॉडवर, दि. 17/03/12 |
| 12 | कामाची मुदत | 12 महिणे |
| 13 | काम पुर्ण दिनांक | नमुद नाही |

| | | |
|---|---|---|
| 14 | काम मुदतीत पुर्ण आहे | -- |
| 15 | मोजमाप पुस्तीरका | नमुद नाही |
| 16 | जिल्हा दर सुची वर्ष | नमुद नाही |

महानगरपालिकेचे सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात महानगरपालिका हद्दीतील व हद्दीबाहेरील महानगरपालिकेने टाकलेल्या जलवाहीनीवर ज्या नागरीकांनी अनधीकृत नळ कनेक्शन घेतले आहेत त्यांच्यासाठी शोधमोहीमेचे कामा बाबतचे निविदा काढुन केलेल्या कामाबाबतचे संचिकेतील उपलब्ध अभिलेख्यात आढळुन आलेल्या त्रुटी / उणीवा बाबत खालील प्रमाणे अभीप्राय आहेत.

1. संचिकेत जाहीर निवीदा एकाच वृत्तपत्रात दैनिक राजरंग टाईम्स दि. 27/08/2011 मध्ये प्रसिध्द केली असुन निविदा विक्री दि. 29/08/2011 ते 05/09/2011 नमुद आहे. त्यामुळे निविदाकारांस निविदा भरण्यास पुरेसा कालावधी देण्यात आला नसल्याचे व स्पर्धात्मक दर प्राप्त न झाल्याचे स्पष्ट होते. सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दि.31/08/2009 नुसार जाहिरातीचे वितरण शासनमान्य दराने माहिती व जनसंपर्क महासंचालनालया मार्फत चक्रीय पध्द्तीने (रोटेशन) करणे बंधनकारक आहे. तसेच जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु. 20 लक्षापर्यंत आहे त्याचे वितरणाचे अधिकार जिल्हा माहिती अधिकारी यांना असुन एक क-वर्ग दैनिक व एक साप्ताहिक मध्ये, आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी.चे प्रमाण लक्षात घेवुन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2. प्रस्तावीत कामास प्रशासकीय मान्यता घेतल्याचे आदेशाची प्रत सचिकेत नाही व तांत्रीक मान्यता, अर्थसंकल्पीय तरतुद बाबतची माहिती संचिकेत नसल्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिंता 1971 मधील नियम 162 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3. संचीकेत कपील रामेश्वर शर्मा, मे.ग्लोबल एंटरप्रायजेस व देवेंद्र साहेबराव पाटील यांचे पत्रावर एक वर्षाची पाणीपटटी व एक वर्ष दंड आकारुन येणा-या रकमेवर अनुक्रमे 30, 33 व 28 टक्के दराने काम करण्यास तयार आहोत असे नमुद केलेले आहे व वाटाघाटीनुसार दि. 17/03/2012 ला 34 टक्के दर मंजुर केलेचे नमुद आहे. करारनाम्यावर कार्यालयाची मोहर लावण्यात आलेली नाही, करारनाम्यावरील सही खालील तारीख 17/03/2012 ची असुन 12 महिणेसाठी कार्यादेश क्रं. 117 दिनांक 22/03/12 निर्गमीत करण्यात आलेला आहे. प्राप्त निविदामध्ये आर.एस. हातपंप यांचे रिपेअर दर अ.क्रं.8,9,10,13,14,18,22,23,24,25, जेटपंप दुरुस्ती दर अ.क्रं. 26, आर.एस.पी. टयूबवेल हातपंप दर अ.क्रं. 20,22,24 व जेटपंप दर अ.क्रं. 26 मध्ये खाडाखोड व उपरिलिखान केलेले असुन तुलनात्मक तक्यात आर.एस.हातपंप यांचे हातपंप दर अ.क्रं.13 चे हॅंडलचेन दरात रु. 130 खोडुन रु. 430,

आरएसपी टयुबवेल यांचे अ.क्रं. 13 चे हँडलचेन चे दरात रु. 135 खोडुन 435 केल्यानचे दिसुन येते. खाडाखोडी व उपरिलिखान बाबत निविदा समिती अथवा सक्षम प्राधीकारी यांनी तुलनात्मक तक्यावर याबाबत उल्लेख केला नाही. त्यामुळे केलेली कार्यवाही संशयास्पद असल्याचे स्पष्ट होते.

4. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महापालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

5. ठेकेदारास उक्त कामासाठी पुरवीण्यात आलेली पावती पुस्तके, केलेली वसुली व भरणा ई. अभीलेखे लेखापरीक्षणास तपासणीस उपलब्ध करण्यात आले नाहीत, निविदा अटी व शर्ती नुसार दर आठवडयाला किती अनधीकृत नळ कनेक्शन शोधली व पाणीपटटी वसुल केली याची माहिती कार्यालयास सादर करणे, आठवडयाला वसुली भरणे, मुदतीत काम सोडल्यास सुरक्षा अनामत व बँक गॅरंटी जप्त करणे ई. बाबतचे अभिलेखे तसेच सन 2012-13 मध्ये सदरचे उक्त कामावर एकुण किती खर्च झाला व किती खरेदी करण्यात आली याबाबतची माहिती प्रमाणक क्रं., दिनांक, रक्कम, दुरुस्तीचे तपशीलासह उपलब्ध करण्यात आले नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 अन्वये लेखापरिक्षणास अभीलेखे तपासणीस उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 129 दिनांक 20/01/2016 देवुन अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी अभिप्राय प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 129)

## *81 धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात नगर सचिव विभागाकडील सदस्य मानधन, बैठक भत्ता, अतिथी भत्ता बाबतचे उपलब्ध अभिलेख्यांची पडताळणीत आढळुन आलेल्या अनियमीतता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष : मानधन व मीटींग भत्ता मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1662312.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1592500.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 69812.00/-

***धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात नगर सचिव विभागाकडील***



DRAFT

**सदस्या मानधन, बैठक भत्ता देयकात देयके मंजुरीचे रकमेतील तफावती, सभागृह नेता व विरोधी पक्षनेता यांना अतिथी भत्ता वाटपाबाबतचे निर्देश नसताना वाटप बाबत अनियमीतता**

(प्रमाणक क्रंमांक 952, दिनांक 29/6/12 रक्कम 527300, प्रमाणक क्रं. 953 दि. 29/6/2012 रक्कम 533100, प्रमाणक क्रं. 39 दि. 4/4/2012 रक्कम 49100, 804 दि. 31/5/12 रुपये 379000, प्रमाणक क्रं. 3378 दिनांक 21/12/12 रुपये 9000, प्रमाणक क्रं. 3850 दि. 2/2/13 रुपये 9000, व प्रमाणक क्रं. 3851 दि. 2/2/13 रुपये 9000) याबाबत खालील प्रमाणे अभीप्राय आहेत.

1. प्रमाणक क्रं. 952 दि. 29/6/2012 माहे जानेवारी 2012 सदस्यांचे मानधन रुपये 525000 व स्थायी समिति मिटींग भत्ता रु. 2300 एकुण 527300 व प्रमाणक क्रं. 953 दि. 29/6/2012 माहे फेब्रुवारी 2012 सदस्यांचे मानधन रुपये 533100 देयक मंजुर करण्यात आलेले आहे. परंतु प्रमाणक क्रं. 39 दि. 4/4/2012 माहे जानेवारी 2012 मध्ये सदस्यांचे मानधन रु. 37500 व बैठक भत्ता रु. 300 एकुण 37700 व माहे फेब्रुवारी 12 चे सदस्यांचे मानधन रु. 48000 व बैठक भत्ता 1100 एकुण 49100 यापुर्विच काढले असताना सदरची रक्कम वजा जाता देयक मंजुर करणे आवश्यक असताना देयक जादा रकमेचे मंजुर करण्यात आले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 10 व 13 नुसार कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे रुपये 527300 तात्पुरती आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2. प्रमाणक क्रं. 953 दि. 29/6/2012 माहे फेब्रुवारी 2012 सदस्यांचे मानधन रुपये 533100 देयक मंजुर करण्यात आलेले आहे. देयकात सदस्यांना रुपये 428100 चे मानधन व धुळे मनपा ठराव क्रं. 81 दि. 17/2/12 नुसार पत्रकार कै. चंद्रकांत कुलकर्णी यांच्या कुटूंबियांना रुपये 105000 सानुग्रह मदत रक्कम दर्शविण्यात आली आहे. मनपा ठराव क्रं. 81 नुसार सदस्यांच्या माहे 2/12 चे मानधनातुन प्रत्येकी 1500 कपात करुन देणेस मंजुरी नुसार पत्रकार कै. चंद्रकांत कुलकर्णी यांच्या परिवारास निधी रुपये 105000 देयकावर नमुद करण्यात आला आहे. प्रत्याक्षात माहे 2/12 चे सदस्य मानधनापैकी माहे फेब्रुवारी 12 चे सदस्यांचे मानधन रु. 48000 व बैठक भत्ता 1100 एकुण 49100 यापुर्विच काढले असताना सदरची रक्कम वजा जाता देयक मंजुर करणे आवश्यक असताना देयक जादा रकमेचे मंजुर करण्यात आले आहे. तसेच सर्व देयक सदस्यांना मानधन मंजूरी देवून तदनंतर सदस्यांकडुन मदतनिधी जमा करुन वितरीत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 10 व 13 नुसार कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे रुपये 533100 रक्कम तात्पुरती आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3. प्रमाणक क्रं. 804 दि. 31/5/12 रुपये 379000 वजा करुन रुपये 105000 दर्शविले आहेत परंतु रुपये 105000 चे प्रमाणक उपलब्ध झाले नाही.

4. महासभा दिनांक 29/4/2012 प्रोसिडींग बुक मध्ये दिनांक 29/4/2012 तारीख खोडुन दि. 29/3/2012 नमुद केली आहे. त्यामुळे 29 मार्च 2012 ला महासभा झाली किंवा नाही याबाबत संधिग्धता आढळुन येते, त्यामुळे दि. 29/3/2012 बैठक झाली नसल्यास माहे 3/2012 चा मिटींग भत्ता देयकाची रक्कम बैठक नसताना प्रदान झाली नसल्याबाबत लेखापरिक्षणाची खात्री पटविण्यात आली नसलेमुळे रुपये 532100 तात्पुरती आक्षेपाधीन

DRAFT

ठेवण्यात येत आहे.

5. प्रमाणक क्रं. 3378 दिनांक 21/12/12 रुपये 9000 विरोधी पक्षनेता यांना दिनांक 1/7/12 ते 30/9/12, प्रमाणक क्रं.त्र 3850 दि. 2/2/13 रुपये 9000 सभागृह नेता यांना अतिथी भत्ता दि.1/10/12 ते 31/12/12, व प्रमाणक क्रं. 3851 दि. 2/2/13 रुपये 9000 विरोधी पक्षनेता अतिथी भत्ता दि. 10/12 ते 12/12 कालावधीची रक्कम प्रदानाबाबत संबंधिताची देयकावर स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 12 नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

6. प्रमाणक क्रं. 1092 दिनांक 11/07/12 रुपये 6928, प्रमाणक क्रं. 1132 दिनांक 11/08/12 रुपये 9000, प्रमाणक क्रं. 3379 दिनांक 21/12/12 रुपये 9000, प्रमाणक क्रं. 3350 दिनांक 02/02/13 रुपये 9000 सभागृह नेता व प्रमाणक क्रं. 1027 दिनांक 04/07/12 रुपये 8884, प्रमाणक क्रं. 1132 दिनांक 11/07/12 रुपये 9000, प्रमाणक क्रं. 3378 दिनांक 21/12/12 रुपये 9000, प्रमाणक क्रं. 3851 दिनांक 02/02/13 रुपये 9000 विरोधी पक्षनेता यांचे सन 2012-13 वित्तीय वर्षात अतिथी भत्ता माहे जानेवारी 2012 ते डिसेंबर 12 कालावधीचा अनुक्रमे रुपये 33928 व रुपये 35884 प्रदान करण्यात आलेला आहे. सदर भत्ता कोणत्या शासन निर्णयानुसार मंजुर करुन प्रदान करण्यात आला त्या आदेशाची प्रत लेखापरिक्षणास दर्शविण्यात आली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 19 अ (2) अन्वये राज्य शासन निर्धारीत करील एवढी रक्कम दरवर्षी अतिथी भत्ता देय आहे, शासन आदेशाची प्रत लेखापरिक्षणास दर्शविण्यात आली नाही. त्यामुळे सदरची रक्कम 69812 तात्पुरती अमान्य दर्शविण्यावत येत आहे.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 41 दिनांक 05/11/2015 देवुन अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी अभिप्राय प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 41)

## *85 बीओटी तत्वावर शहरातील बगीचे देखभालसह चालविण्यास देणेबाबतचे निविदेतील अटी व शर्ती मधील त्रुटी बाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 90000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 90000.00/-

***बीओटी तत्वावर शहरातील बगीचे देखभालसह चालविण्यास देणेबाबतचे निविदेतील अटी व शर्ती मधील त्रुटी बाबत.***

महानगरपालिकेचे संभाजी उदयान व टॉवर बगीचा ही दोन उदयाने तीन वर्ष कालावधीकरीता (सन 2010-11 ते



DRAFT

2012-13) बीओटी तत्वावर जाहीर निविदा मागवून जादा वार्षिक मूल्य नोंदविलेली श्री.ओमप्रकाश शर्मा यांची अनुक्रमे रुपये 51000/- व 45000/- दरांची निविदा प्राप्त पाच निविदेमधुन अंतिम करण्यांत आली होती. (महापालिका ठराव क्र. 17 दिनांक 24 फेब्रुवारी 2011)

याबाबत खालिलप्रमाणे आभिप्राय देण्यांत येत आहेत.

1.प्राप्त निविदा पडताळता वरील ठेकेदारांने जादा दर दिलेला असल्यामुळे त्यांना सदर उदयाने (संभाजी उदयान व टॉवर गार्डन तथा सरदार वल्लभभाई पटेल गार्डन ) बीओटी तत्वावर चालविण्यासाठी अटी व शर्तीवर दिनांक 8 मार्च 2011 ला कार्यादेश देवून प्रत्यक्ष निविदा रक्कम दिनांक 25 मार्च 2011 रोजी रक्कम रुपये 51000/- भरलेनंतर दिनांक 1 एप्रिल 2011 रोजी ठेकेदारांच्या ताब्यात दिल्याचे आढळत आहे. त्याचप्रमाणे टॉवर गार्डन ( सरदार वल्लभभाई पटेल उदयान) देखील दिनांक 8 मार्च 2011 रोजी कार्यादेश देवून प्रत्यक्ष निविदा रक्कम दिनांक 2 ऑगस्ट 2011 रोजी रक्कम रुपये 45000/- भरलेनंतर दिनांक 1 जानेवारी 2012 रोजी ठेकेदाराने सदर उदयानाचा ताबा घेतलेला आहे व सदर उदयान ताबा सोडणेबाबत दिनांक 13 जुलै 2012 रोजी विनंती अर्ज केलेला आहे. म्हणजेच ठेकेदाराने ताबा 3 वर्षाकरीता दिलेला असताना तो सहा महिन्यातच सोडून देणेबाबत विनंती अर्ज अभियंता, बांधकाम विभाग, महानगरपालिका धुळे यांचेकडे दिल्याचे नस्तीवरुन दिसून येत आहे. परंतू महानगरपालिकेने प्रत्यक्ष उदयानाचा पुन्हा ताबा घेतल्याबाबत आढळत नाही. सबब निविदामधील अटी व शर्तीचा भंग केलेला आढळून येत असून महानगरपालिकेचे रक्कम रुपये 45000/- वर्षिक प्रमाणे 2 वर्षाचे एकुण रक्कम रुपये 90000/- चे आर्थिक नुकसान केल्याचे निर्दशनास येत आहे. सदर रक्कम संबंधित ठेकेदाराकडून पूर्णता वसूल करण्यांबाबत आक्षेप ठेवण्यांत येत आहे. त्याचप्रमाणे सदर ठेकेदारांने एकाच निविदेनुसार दोन उदयाने बीओटी तत्वावर चालविण्यास घेतले असल्याने नियमानुसार दोन्ही उदयाने त्याने महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे आपेक्षित असून तसे केल्याचे दिसत नाही. (त्याने फक्त एकच टॉवर गार्डन हस्तांतरीत करुन घेणेबाबत अर्ज दिल्याचे आढळत आहे.)

2.सदर ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्याने संबंधित ठेकेदाराचे नाव काळा यादीत टाकणे आभिप्रेत आहे.

3.सदर निविदेमधील अटी व शर्ती मध्ये ठेकेदारांकडून बयाणा रक्कम घेणेबाबत उल्लेख केलेला नाही व अशी कुठलीही बयाणा रक्कम सुध्दा घेतल्याचे दिसत नाही. सबब ठेकेदारांने कराराप्रमाणे 3 वर्ष पूर्ण होण्याच्या अगोदरच ठेका सोडल्यामुळे व बयाणा रक्कम घेतलेली नसल्यामुळे बयाणा रक्कम जप्त करता आलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

4.सदर निविदेमध्ये ठेकेदारांकडून उदयान ताबा हा 3 वर्षापेक्षा कमी कालावधीत सोडण्यांकरीता कोणतीही अट व शर्त दिलेली नव्हती म्हणजेच त्याने निविदा कालावधी 3 वर्ष पूर्ण करणे आपेक्षित होते. तरी याबाबत उचित कार्यवाही करुन अहवाल त्वरीत सादर करावा.

DVERSKM7501 (Ref No : 136)

## *92 धुळे महानगरपालीकेचे सन 2012-13 या वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध सेवापुस्तकांची तपासणीत आढळुन आलेल्या त्रुटी / उणीवा, अधिकारी कर्मचारी यांचा मंजुर आकृतीबंध ई. बाबत.*

DRAFT

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 12**

*लेखा शीर्ष :आस्थापना मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सेवा पुस्तीकेचे पहिले पानावरील वैद्दकीय तपासणी नोंद, जन्म तारखेची नोंद, जात प्रवर्ग व पडताळणी नोंदी घेवुन प्रमाणीत न करणे, सेवा पुस्तीकेत भविष्य निर्वाह निधी, मृत्यू- नि- सेवा उपदान, निवृत्ती वेतन ई. नामनिर्देशन प्रपत्रे न जाडणे, सेवापुस्तीकेत मराठी/ हिंदी भाषा परिक्षा तसेच संगणक परिक्षा, मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा, सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा/ अहर्ताकारी विभागीय परिक्षा विहीत संधीमध्ये ऊत्तीर्ण किंवा ऊत्तीर्ण होणेपासुन सूट मिळालेचे प्रमाणपत्र, स्थायीकरण आदेश ई. नोंदी न घेणे, सेवा पुस्तके / सेवापट घेण्यात आलेल्या नोंदीची वार्षिक तपासणी न करणे, सेवा पुस्तके दोन प्रतित न ठेवणे, गट ड मधील स्थायी / अस्थायी वा स्थानापन्न कर्मचा- यांसाठी सेवापट (सर्व्हिस रोल) न ठेवणे, रजेच्या खात्यात प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी जमा न करणे, सेवेशी संबंधीत महत्वाच्या गोष्टींच्या नोंदी सेवा पुस्तकात न घेणे तसेच मंजूर आकृतीबंध न दर्शविणे ई.***

महानगरपालीकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध सेवा पुस्तकांची पहाणी केली असता कर्मचा-यांचे सेवा अभीलेखे सुस्थितीत ठेवण्यात आली नसल्याचे आढळुन आले, कार्यालयीन कर्मचा-यांच्या वैयक्तीक संचिका सेवापुस्तीलकेसोबत तपासणीस उपलब्ध करण्यात आल्या नाहीत, त्यामुळे वेतन आयोगाचे वेतन निश्चीती आदेश, पदोन्नेती/ कालबध्द पदोन्नती आदेश, वेतनवाढी, वेतन निश्चीती, रजा लेखे, सेवा पडताळणी ई. बाबतची केलेल्या कार्यवाहीची खात्री करता आली नाही. सेवा पुस्तीकेत वेळोवेळी घ्यावयाच्या नोंदी अद्दावत करण्यात आलेल्या नाहीत, याबाबत परिशिष्ट 1 मध्ये रकानानिहाय त्रुटी / उणीवा बाबतची माहिती दर्शविण्यात आली आहे.

याबाबत खालील प्रमाणे अभीप्राय आहेत.

1. सेवा पुस्तीकेचे पहिले पानावरील वैद्दकीय तपासणी नोंद घेवुन प्रमाणीत करणे आवश्यक असताना अशा नोंदी घेवुन प्रमाणीत करण्यात आलेल्या नसल्याचे दिसुन आले. महाराष्ट्र महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2008 नियम 11 नुसार शारीरीक पात्रता प्रमाणपत्र आणी चारिञ्य पडताळणी अहवाल घेणे, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सर्वसाधारण शर्ती सेवेच्या) 1981 नियम क नुसार शारीरिक पात्रतेसंबंधी (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) 1981 - नियम 11 शारीरिक पाञतेसंबंधी वैद्दकीय प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच नियम 15(2) व 16 वैद्दकीय तपासणीची सेवा पुस्तकात नोंद घेवून असे प्रमाणपत्र सेवासंबंधीच्या अन्य कागदपञासोबत सुरक्षित ठेवले पाहिजे.

2. सेवा पुस्तीकेचे पहिले पानावर जन्म तारखेची नोंद घेवुन प्रमाणीत करणेत आलेल्या नाहीत. महाराष्ट्र

DRAFT

नागरी सेवा (सर्वसाधारण शर्ती सेवेच्या) 1981 नियम 38 व सामान्य प्रशासन परिपत्रक क्रं.जन्म दि.1092/प्र.क्र.62/92/2/13 अ, दिनांक 27/09/1994 अन्वये घेणे आवश्यक आहे. नियम 38(1)(2) नुसार जन्म तारखेची नोंद सेवापुस्तकात कागदोपत्री पुराव्यावरुन पडताळुन त्याची नोंद घेणे आवश्यक आहे.

3. सेवा पुस्तीकेचे पहिले पानावर जात प्रवर्ग व पडताळणी नोंद घेवुन प्रमाणीत करण्यात आलेले नाही. शासन सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग पत्र क्रं. सीबीसी 10/2011/प्र.क्र.281/मावक 5, दिनांक 10 जुन 2011 नुसार जात प्रमाणपत्र पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे.

4. बहुतांश कर्मचा-यांचे सेवा पुस्तीकेत भविष्य निर्वाह निधी, मृत्यू-नि-सेवा उपदान, निवृत्ती वेतन ई. नामनिर्देशन प्रपत्रे जाडणेत आलेले नाहीत. महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1982, महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी नियम योजनेतील तरतुदीनुसार नामनिर्देशन पत्रे सेवापुस्तीकेत जोडणे आवश्यक आहे.

5. मराठी/हिंदी भाषा परिक्षा तसेच संगणक परिक्षा उत्तीर्ण झालेचे अथवा सुट मिळालेबाबतच्या नोंदी सेवापुस्तीकेत घेतल्याचे आढळुन आले नाही. राजपत्रीत अधिका-यांसाठी व अराजपत्रित कर्मचा-यांसाठी मराठी भाषा परीक्षा सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. मभाप-1092/1570 (प्र.क्र.143/92) /20, दिनांक 1 जानेवारी 1993 मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण झाले नाहीत अथवा विहित नियमानुसार त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिल्याचे आदेश निर्गमित केलेले नाहीत अशा कर्मचा-यांच्या वेतनवाढीची दिलेली सर्व रक्कम वसूल करण्यात यावी असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच संगणक अर्हता परीक्षेतुन सूट बाबत शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. सेप्रवि1098/प्रक्र 7/98/बारा दि. 25/01/1999, क्रं. सेप्रवि 2002/प्रक्र 14/02/बारा दि. 02/09/2003, क्रं. मातंस/ नस्ती5 04/224/39 दि. 26/05/2004 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1999 1(3) नुसार टंकलेखनाची प्रति मिनिट 30 शब्द वेगाची परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसेच स्वग्राम बाबतचे घोषणापत्र सेवापुस्तीकेत जोडण्यात आलेले नाहीत.

6. सेवापुस्तीकेत स्थायीकरण आदेशाच्या नोंदी आढळुन आल्या नाहीत. शासन सामान्य प्रशासन विभाग क्रं.एसआरव्ही 1075/एक्स दिनांक 19/09/1975 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

7. तपासणी करण्यात आलेल्या कर्मचा-यांचे सेवापुस्तीकेत सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा / अहर्ताकारी विभागीय परिक्षा विहीत संधीमध्ये ऊत्तीर्ण किंवा ऊत्तीर्ण होणेपासुन सूट मिळालेचे प्रमाणपत्र बाबतच्या नोंदी आढळुन आल्या नाहीत. सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रं. परीक्षा 2012/ प्र.क्र.3/16, दि. 13/09/2012 तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 नियम 8 नुसार भाषा परिक्षा, विभागीय परिक्षा विहीत संधीमध्ये ऊत्तीर्ण होणे अनिवार्य आहे किंवा ऊत्तीर्ण होणेपासुन सूट मिळालेचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे, अन्यथा नियम 9 नुसार परिक्षा ऊत्तीर्ण होईपर्यंत किंवा परिक्षा उत्तीर्ण होणेपासून सुट मिळेपर्यंत त्याला त्याच्या पदावर कायम करण्यात येणार नाही, किंवा त्याच्या पदाच्या वेतनमानातील पुढील वेतनवाढ देण्यात येणार नाही तसेच त्या संवर्गातील जेष्ठता गमवावी लागेल असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8. राजपत्रीत/अराजपत्रीत कर्मचा-याचे सेवाभीलेख नियम 36 व 37 आणी शासन निर्णय दिनांक 18/10/1989



DRAFT

नुसार ठेवणे आवश्यक आहे. नियम 36 ते 45 नुसार सेवा पुस्तके/सेवापट घेण्यात आलेल्या नोंदीची वार्षिक तपासणी दरवर्षी मे महिण्यात कार्यालय प्रमुखाकडुन करण्यात यावी, कर्मचा-याची सेवा अखंडता ई. बाबींची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.वेपुर 1299/प्र.क्र.5/सेवा 10, दि. 20 जानेवारी 2001 नुसार वेतन निश्चितीची पडताळणी शीघ्रगतीने करण्यासाठी सेवापुस्तके अद्यावत करणे व सेवापुस्तकांची पडताळणी करणेचे निर्देश निर्गमीत केले आहेत. अराजपत्रीत कर्मचा-यांची सेवा पुस्तके दोन प्रतित ठेवण्यात आलेली नाहीत. महाराष्ट्र नागरी सेवा (सर्वसाधारण शर्ती सेवेच्या) 1981नियम 36 स्थायी/अस्थायी पदावर नेमणुक अराजपत्रीत कर्मचा-यांची दोन प्रतीत सेवा पुस्तक ठेवण्यात येईल. नियम 46 नुसार सेवापुस्तकाच्या दोन प्रतीपैकी एक प्रत कार्यालयात व दुसरी प्रत संबंधीत कर्मचा-याजवळ राहील, सेवापुस्तीकेची दुसरी प्रत वित्त विभाग क्रं. सेवापु/1097/प्र.क्र.10/97/सेवा 6, दि. 11/11/1997 नुसार प्रमाणीत करणे आवश्यक आहे. सेवा पुस्ताकात सेवेसंबंधीची नोंद करुन ती प्रमाणित करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची आहे. तसेच सेवेच्या सर्वसाधारण शर्ती नियम 37 गट ड मधील स्थायी / अस्थायी वा स्थानापन्न कर्मचा-यांसाठी नियम 46 मध्ये नमूद केल्याप्रमाणे सेवापट (सर्व्हिस रोल) ठेवण्यात येईल. राजपत्रीत कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात वेतनाची नोंद घेताना मुळ वेतन व महागाई वेतन (50 टक्के महागाई भत्ता) यांच्या नोंदी स्वतंत्र घेण्यात याव्यात असे निर्देश असताना तशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. महाराष्ट्र नागरी सेवा (सर्वसाधारण शर्ती सेवेच्या) 1981 नियम 35 राजपत्रीत कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात वित्त विभाग क्रं. संकिर्ण 1005/प्र.क्र.2/सेवा/6 दि. 1/9/2005 अन्वये वेतनाची नोंद घेताना मुळ वेतन व महागाई वेतन (50 टक्के महागाई भत्ता) यांच्या नोंदी स्वतंत्र घेण्यात याव्यात असे निर्देश असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

9. नियम 38(1)(4) नुसार सेवेशी संबंधीत महत्वाच्या गोष्टींच्या नोंदी सेवा पुस्तकात घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नागरी सेवा पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी यांच्या काळातील प्रदाने नियम, 1981 नुसार निलंबन काळाचे रजेत परिवर्तन, निलंबन कालावधीतील वेतन व भत्याविषयी निर्णय, निलंबन कालावधी कर्तव्या कालावधी धरावा वा नाही याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे निर्णय/आदेश नोंदी घेणे आवश्यक असताना अशा नोंदी घेण्यात आले नसल्याचेदिसुन आले आहे.

10. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 नियम 50 नुसार कर्मचा-याच्या अर्जित रजेच्या खात्यावर प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी 15 दिवस याप्रमाणे दोन हप्यात अर्जित रजा आगाऊ जमा होते, त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

11. मुंबई वित्तीय नियम, 1959 मधील नियम 52 खालील परिशिष्ट 17 नुसार सेवा पुस्तक / सेवा पट हे प्रदीर्घ कालावधीपर्यंत जतन करुन ठेवणे आवश्यक असल्याने ते सुस्थितीत ठेवण्याची वेळीच दक्षता घेण्यात यावी. सेवा पुस्तक / सेवा पटातील नोंदी अद्यावत करुन देणे व सुस्थितीत ठेवण्याबाबत सेवेच्या सर्वसाधारण शर्ती नियम, 1981 मधील नियम 35 ते 49 मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे, अन्यथा अशा प्रकारे कार्यवाही झाली नाही तर त्यासाठी संबंधित प्रशासकीय व पर्यवेक्षीय अधिकारी यांना जबाबदार धरुन नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, असे शासनाचे धोरण आहे.

12. महानगरपालीकेतील कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या पदांचा आकृतीबंध मंजूरी

DRAFT

संवर्गनिहाय पदांची संख्या, त्याबाबत शासन निर्णय व परिपत्रक ई. माहिती लेखापरिक्षणास दर्शविण्यात आली नाही. मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम 1949 चे कलम 45 ते 54 नूसार कार्यरत सर्वच स्थायी पदांचा आकृतीबंध शासनाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -1005/वर्गीकरण/प्र.क्र. 379/05/वि-24 दिनांक 04/05/2006 नुसार फक्त 38 अधिकारी पदांसाठी आकृतीबंध मंजुर करण्यात आलेला आहे. तसेच अर्ध समास पत्र क्रं. 28 दिनांक 16/10/2015 नुसार मंजुर आकृतीबंधाची मागणी केली असता विभागाने कोणतीही माहिती उपलब्ध केली नाही. तरी उपरोक्त अधिनियमातील तरतूदी नुसार सर्व स्थायी पदांचा आकृतीबंध मंजूर असल्यास दर्शविणे आवश्यक आहे, आकृतीबंध मंजूर नसल्यास सत्वर शासनाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक आहे

उपरोक्त अभिलेख्याबाबत अर्धसमास पत्र क्रं. 28 दिनांक 16/10/2015 देवुन अभिलेखे मागविण्यात आले होते तथापी विभागाने सेवापुस्तीका संबंधित अभिलेखे, संचिका, ई. सादर केल्या नाहीत, फक्त सेवापुस्तीका सादर केलेनुसार पडताळणी केली असता उक्त नमुद त्रुटी / अनियमीतता आढळुन आलेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 28)

## *94 धुळे महानगरपालीकेचे सन 2012-13 या वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध सेवापुस्तकांची तपासणीत कालबध्द व सेवाअंतर्गत आश्वासीत प्रगती योजनेतील वेतन निश्चींती बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष :आस्थापना मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***कालबध्द व सेवाअंतर्गत आश्वासीत प्रगती योजनेतील वेतन निश्चीती योजनेचा लाभ संबंधित पदावरील 12 वर्षाच्या नियमित सेवेनंतरच अनुज्ञेय असताना सदरचे पदावर 12 वर्ष पुर्ण होण्यापुर्विच तारखेस त्या महिण्याचे एक तारखेपासून मंजूरी देण्यात आल्याने वेतन निश्चीती व प्रदानाबाबत, कर्मचारीनिहाय नस्या व आवश्यक अभिलेखे विभागाने उपलब्ध न केलेमुळे सेवेत दोन किंवा त्याहून अधिक वेळा पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांना वरीष्ठ पदाची वेतनश्रेणी मंजूर केली किंवा कसे, योजनेअंतर्गत पदोन्नीतीच्या पदाची वेतनश्रेणी मंजूर केली काय, वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीच्या पदाकरिता विहित केलेली अर्हता, पात्रता, जेष्ठता, अर्हता परिक्षा, विभागीय परिक्षा, गोपनिय अहवालच्या आधारे पात्रता तपासणी या सर्व बाबींची पूर्तता नुसार कार्यपध्दती अनुसरली किंवा नाही, केलेली वेतननिश्चीती, कर्मचा-यांनी यापुर्वि पदोन्नती नाकारलेली आहे काय ई. बाबत लेखापरिक्षणास खात्री न करता आले बाबत.***

महानगरपालीकेचे सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात सेवापुस्तकांची तपासणी याबाबत खालील प्रमाणे अभीप्राय आहेत.

1. महानगरपालीकेचे सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात सेवापुस्तकांची तपासणी केली असता गट क व ड मधील पदधारकांना 12 वर्षाच्या नियमित सेवेनंतर पदांचे पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देय आहे, शासन सामान्या प्रशासन विभाग निर्णय क्रं. एसआरव्ही 1095/प्र.क्र.1/95/बारा, दिनांक 08 जुन 1995 नुसार योजनेची प्रमुख वैशिष्टय व अंमलबजावणीची कार्यपध्दती विषद केलेली आहे. तसेच सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना वित्त विभाग, निर्णय क्रं. वेतन 1199/प्र.क्र.2/99/सेवा-3, दि. 20 जुलै 2001 नुसार लागू करण्यात आलेली आहे. सदरची पडताळणी करणेसाठी कालबध्द पदोन्नती व सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत देण्यात आलेल्या कर्मचारीनिहाय नस्या, त्या-त्या पदास पदोन्नती वेतीन श्रेणीतील अनुज्ञेय वेतनश्रेणी बाबत अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आले नाहीत. सेवापुस्तीकेतील पदावर रुजु दिनांकानुसार कर्मचा-यांना या योजनेचा लाभ संबंधीत पदावरील 12 वर्षाच्या नियमीत सेवेनंतरच अनुज्ञेय असताना 12 वर्ष पुर्ण होणेपुर्विचे दिनांकास कालबध्द / आश्वासीत वेतनश्रेणी मंजुरी देण्यात आलेल्या आहेत.

कर्मचारी निहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | कर्मचा-याचे नांव | पदनाम | पदोन्नती पुर्विचे पदावर रुजु दिनांक | पदोन्नती मंजुरी दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | जी.एम.मंडगीणकर | वाहनचालक | 07/02/1986 | 01/02/1998 |
| 2 | वाय.वी.मोगल | मुकादम | 19/01/1993 | 01/01/2005 |
| 3 | आर.डी. विसपुते | मुकादम | 10/01/1994 | 01/01/2006 |
| 4 | एस.जी.सरोदे | लिपिक | 07/10/1993 | 01/10/2005 |
| 5 | श्रीम.ए.एन.नाईक | लिपिक | 15/06/1998 | 01/06/2010 |
| 6 | एस. एन. शेवदा | लिपिक | 26/12/1988 | 01/12/2000 |
| 7 | डी.एस.चौरसिया | लिपिक | 11/01/1994 | 01/01/2006 |
| 8 | ए.एम.दामोदर. | लिपिक | 06/05/1989 | 01/05/2001 |
| 9 | श्रीमती विद्या करकठ | लिपिक | 16/10/1992 | 01/12/2004 |
| 10 | के.बी.पिजारी | शिपाई | 17/04/1993 | 01/04/2005 |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | एम.एन.अग्रवाल | लिपिक | 16/10/1992 | 01/06/2004 |
| 12 | एस.डी.ढोले | लिपिक | 29/10/1985 | 01/10/1997 |
| 13 | ए. जी. देवरे. | लिपिक | 16/10/1992 | 01/10/2004 |
| 14 | आर.आर.बावीस्कवर | आ.सेवक | 11/08/1986 | 01/08/1998 |
| 15 | एम.बी.सुर्यवंशी | आ.सेवक | 20/06/1990 | 01/01/2002 |
| 16 | डी.एन.कल्यावणकर | अटेंडन | 18/03/1992 | 01/03/2004 |
| 17 | एस.आर.बावीस्कशर | लिपीक | 27/07/1987 | 01/09/1999 |
| 18 | डी.एन.पिंगळे | लिपीक | 14/03/1986 | 01/03/1998 |
| 19 | एम.बी.शिरपुरकर | लिपीक | 14/03/1986 | 01/03/1998 |
| 20 | सौ.यु.एस.वानखेडकर | लिपीक | 17/10/1984 | 01/10/1996 |
| 21 | व्ही/.एन.थोरात | लिपीक | 17/12/1991 | 01/12/2003 |
| 22 | एम.जे.वडनेरे | लिपीक | 11/01/1994 | 01/01/2006 |
| 23 | एस.के.गवळी | शिपाई | 30/12/1987 | 01/12/1999 |
| 24 | श्रीमती आर.एम. पटाईत | शिपाई | 15/06/1995 | 01/06/1907 |

DRAFT

2. योजनेचा लाभ संबंधित पदावरील 12 वर्षाच्या नियमित सेवेनंतरच अनुज्ञेय असताना सदरचे पदावर 12 वर्ष पुर्ण होण्यापुर्विचे तारखेस त्या महिण्याचे एक तारखेपासून मंजूरी देण्यात आल्याने सदर कालावधीतील सुधारीत वेतनश्रेणीतील वेतनानुसार काढलेले वेतन जादा प्रदान झाले आहे. अशाप्रकारे सर्व कर्मचारीनिहाय अभिलेख्यासह पुनश्चः तपासणी करुन जादा प्रदानाची रक्कम वसुली व पदोन्नतीची सुधारीत तारीख बाबत आदेश पारीत करुन सेवापुस्तीणकेत नोंदी घेणे आवश्यक आहे.

3. कर्मचारी निहाय नस्या व आवश्यक अभिलेखे विभागाने उपलब्ध न केलेमुळे सेवेत दोन किंवा त्याहून अधिक वेळा पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांना वरीष्ठ पदाची वेतनश्रेणी मंजूर केली किंवा कसे, योजनेअंतर्गत पदोन्नीतीच्या पदाची वेतनश्रेणी मंजूर केली काय, वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नंतीच्या पदाकरिता विहित केलेली अर्हता, पात्रता, जेष्ठता, अर्हता परिक्षा, विभागीय परिक्षा, गोपनिय अहवालच्या आधारे पात्रता तपासणी या सर्व बाबींची पूर्तता नुसार कार्यपध्दती अनुसरली किंवा नाही, केलेली वेतननिश्चीती, कर्मचा-यांनी यापुर्वि पदोन्नती नाकारलेली आहे काय ई. नुसार कार्यवाही करुन केलेली वेतन निश्चीती बाबत लेखापरिक्षणास

खात्री करता आली नाही. तसेच लेखापरिक्षणास पदोन्नती, सरळसेवा भरती बाबतचे अभीलेखे तपासणीस उपलब्ध केले नाही.

उपरोक्त अभिलेख्याबाबत अर्धसमास पत्र क्रं. 28 दिनांक 16/10/2015 देवुन अभिलेखे मागविण्यात आले होते तथापी विभागाने पदोन्नती, सरळसेवा भरती बाबतचे अभीलेखे, सेवापुस्तीका संबंधित अभिलेखे, संचिका, ई. सादर केल्या नाहीत, फक्त सेवापुस्तीका सादर केलेनुसार पडताळणी केली असता उक्त नमुद त्रुटी / अनियमीतता आढळुन आलेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 28)

## *96 निवत्ती वेतन निधीबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेने सेवानिवृत्त् कर्मचा- यांना निवृत्ती वेतन देण्यांकरीता निवृत्ती वेतन निधीत तरतूद न केल्याने झालेल्या अनियमिततेबाबत.***

महानगरपालिकेने कर्मचा-यांना सेवानिवृत्त् नंतर शासकीय कर्मचा-यांप्रमाणे निवृत्तीवेतन संबंधी तत्कालीन नगरपालिका कालावधीत उपविधी मंजूर करण्यांत आलेले आहेत. तथापि, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 458 नुसार सदर उपविधी अदयाप पर्यत सुधारित करुन घेण्यांत आलेली नाही.

सन 2012-13 या आर्थिक वर्षाकरीता निवृत्ती वेतननिधी पडताळता दिनांक 31 मार्च 2013 अखेर सदर निधीत रुपये 21537395.37 शिल्लक आढळून आलेली आहे. वास्ताविकता महापालिकेकडील सेवानिवृत्तीधारकांची संख्या 1200 इतकी असून त्यांच्या निवृत्तीवेतनाचा दरमहा खर्च रुपये 6000000 इतका आहे. सदरची बाब विचारात घेता महाराष्ट् नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 136(1) व मा.संचालक, नगरपालिका प्रशासन, यांचे परिपत्रक क्रमांक - आस्था/ 1084/सीआर/167/8416,दिनांक 15 मे 1995 अन्वये प्रत्येक पदाचे सरासरी वेतन खर्चाच्या 1/9 (एक नवांश) रक्कमे इतके अशंदान निवृत्तीवेतन दरवर्षी निवृत्तीवेतन निधीत जमा होणे गरजेचे होते. मात्र नियमातील तरतुदी व आदेशाप्रमाणे महानगरपालिकेने निवृत्तीवेतन निधीत रकमा जमा न करण्यांची नियमोचित कार्यवाही केलेली आढळून येत नाही.

DVERSKM7501 (Ref No : 139)



DRAFT

## *97 भविष्यनिर्वाह निधी विभागाकडील रोख वही व बॅंक स्टेटमेंट मधील तफावतीबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***भविष्यनिर्वाह निधी विभागाकडील रोख वही व बॅंक स्टेटमेंट मधील तफावतीबाबत.***

सन 2012-13 या वित्तीय लेखा परीक्षणात सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी लेखे तपासता रोखवही व बॅंक खात्याच्या स्टेंटमेंट दिनांक 31 मार्च 2012 अखेर शिल्लक रकमेत खालिलप्रमाणे तफावत आढळून आलेली आहे.

1.सर्वसाधारण रोखवही प्रमाणे शिल्लक रुपये 20253046.08

2.बॅंक स्टेंटमेंट प्रमाणे शिल्लक रुपये 21213477.08

3.तफावत रुपये 960431.00

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51(1)(3)(4) नुसार सर्वसाधारण रोखवहीचे लेखे रोजच्या रोज बंद करुन समतोलित केले पाहिजे आणि त्यावर प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी केली पाहिजे. तसेच प्रत्येक माहिन्याच्या शेवटी रोखवहीतील जमा व खर्चाच्या रकमा पासबुकातील रकमांबरोबर ताळमेळ घेणे आवश्यक आहे. मात्र तशी नियमोचित कार्यवाही न झाल्याने उपरोक्त रुपये 960431.00 इतकी तफावतीची अचुकता पडताळता आलेली नाही.

DVERSKM7501 (Ref No : 133)

## *99 भविष्य निर्वाह निधी रोखवही व बहृतपत्रक मधील शिल्लक रकमेतील तफावतीबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***रोखवही व बृहतपत्रक मधील शिल्लक रकमा पडताळता रकमेत मोठया प्रमाणात तफावत असलेबाबत.***

सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे भविष्य निर्वाह निधी बृहतपत्रक व रोखवही यांची पडताळणी केली असता मार्च 2013 अखेर नमूद शिल्लक असलेल्या रकमांची खालिलप्रमाणे तफावत आढळून आलेली आहे.

| अ.क्र. | बाब | दिनांक 31 मार्च 2013 अखेर शिल्लक | |
|---|---|---|---|
| 01 | बृहतपत्रकानुसार | रुपये | 137763494.00 |
| 02 | रोखवहीनुसार | रुपये | 20253046.08 |
| 03 | तफावत | रुपये | 117510447.92 |

उपरोक्त तप्शिल पाहता भविष्य निर्वाह निधी तुटीत असल्याचे आढळून आले आहे.

1.सदर खाती तुट निर्माण होण्याचे कारण म्हणजे या निधी अंतर्गत गुंतवणूकीतून प्राप्त होणारे व्याज व कर्मचा-यांना त्यांच्या वर्गणीवर दिले जाणारे व्याज यांच्या दरात भिन्नता असल्याने तुटी सारखी अनियमितता झाली आहे.

2.सदरची तुट भरुन काढणेकामी विभागाने वेळीच निधीची जास्तीत जास्त गुंतवणूक न करणे तसेच जादा व्याजदर देणा-या वित्तीय संस्था (राष्ट्रीयकृत बॅक) यांचा शोध न घेणे इत्यादी कारणांमुळे तुटीची रक्कम दिवसेंदिवस वाढत असून निधीच्या गुंतवणूकीचा पुर्नविचार होणे आवश्यक आहे.

3.कर्मचा-यांचा वर्गणी कमी असतांना अनावश्यक कारणांने परतावा अग्रिम मंजूर करणे तसेच विहित मर्यादेपेक्षा जादा अग्रिम अदा करणे.

4.वर्गणीदारांमध्ये गुंतवणूकीची प्रवृत्ती न जोपसली गेल्यामुळे

5.ना-परतावा अग्रिम प्रमाणापेक्षा जादा देवून निधीतून रकमा कायमस्वरुपी कमी होत असल्यामुळे

उपरोक्त नमूद बाबीमुळे भविष्य निर्वाह निधीच्या शिल्लक तुटीत वाढ झाली असून तूट भरुन काढण्यासाठी उचित उपाय योजना हाती घेण्यांत याव्यात.

DVERSKM7501 (Ref No : 139)

## *100 धुळे महानगरपालीकेचे सन 2012-13 या वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध सेवापुस्तकांची तपासणीत वार्षिक वेतनवाढ मंजूरीत रुपये 10 जादा मंजूरी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : आस्थापना मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***वार्षिक वेतनवाढ मुळ वेतनाच्या 3 टक्के प्रमाणे (येणारी रक्कम आवश्यकतेनुसार 10 च्यात पटीत विचारात घेवून) परिगणीत न केल्यावमुळे रुपये 10 जादा मंजूरी***

महानगरपालीकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध सेवा पुस्तकांची पहाणी केली असता कर्मचा-यांचे सेवा पुस्तीकेनुसार वार्षिक वेतनवाढ मंजूरीत रुपये 10 जादा मंजूरी देण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्रं. | कर्मचा-यांचे नांव | पदनाम | वार्षीक वेतनवाढ दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | आर.ई. घोडके | वाहनचालक | 01/07/2012 |
| 2 | जी.एम. मंगीडकर | वाहनचालक | 01/07/2012 |
| 3 | एस.बी. सैंदाने | वाहनचालक | 01/07/2012 |
| 4 | यु.आर. चौरे | वाहनचालक | 01/07/2012 |
| 5 | एस.डी. दिवसे | वाहनचालक | 01/07/2012 |
| 6 | वाय.वी. मोगल | मुकदम | 01/07/2012 |
| 7 | आर.डी. विसपुते | मुकदम | 01/07/2012 |

वरील कर्मचा-यांचे सेवापुस्तकांची पहाणी केली असता सदर कर्मचा-यांना वार्षिक वेतनवाढ मंजुर करताना रुपये 10 जादा मंजूरी देण्यात आलेली आहे. शासन निर्णय वित्त विभाग क्रं. वेपुर-1209/प्र.क्र.20/सेवा-9, दिनांक 27/02/2009 मधील 3.23.1 नुसार कर्मचा-यांना देय असलेली वार्षिक वेतनवाढ मुळ वेतनाच्या 3 टक्के प्रमाणे (येणारी रक्कम आवश्यकतेनुसार 10 च्या पटीत विचारात घेवून) परिगणीत करुन दरवर्षी 1 जुलै रोजी देण्यात यावी, सदर वेतनवाढीची रक्कम वेतन बँडमधील विद्दमान मुळ वेतनात मिळविण्यात यावी असे निर्देशीत असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. उक्त कर्मचा-यांना वार्षिक वेतनवाढ मुळ वेतनाच्या 3 टक्के प्रमाणे (येणारी रक्कम आवश्यतेनुसार 10 च्या पटीत विचारात न घेता) परिगणीत केली असल्याने रुपये 10 जादा मंजूर झाले आहेत. अशा प्रकारे सेवापुस्तीका व वार्षीक वेतनवाढ तक्ता सर्व कर्मचा-यांची पडताळणी करुन जादा प्रदानाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अभिलेख्याबाबत अर्धसमास पत्र क्रं. 28 दिनांक 16/10/2015 देवुन अभिलेखे मागविण्यात आले होते तथापी विभागाने सेवापुस्तीका संबंधित अभिलेखे, संचिका, ई. सादर केल्या नाहीत, फक्त सेवापुस्तीका सादर केलेनुसार पडताळणी केली असता उक्त नमुद त्रुटी / अनियमीतता आढळुन आलेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 28)

## *102 धुळे महानगरपालीकेतील नळ जोडणी व तोडणीचे विहित नमुण्यातील नोंदवहया परिरक्षित न केल्यामुळे शहरातील एकूण नळ संयोजन व तोडणीची संख्या, तसेच पाणी वापर प्रकार, कालावधी व इतर महत्वपूर्ण बाबींचा ताळमेळ घेता आलेला नाही.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***नळ जोडणी व तोडणीचे विहित नमुण्यातील नोंदवहया परिरक्षित न केल्यामुळे शहरातील एकूण नळ संयोजन व तोडणीची संख्या, तसेच पाणी वापर प्रकार, कालावधी व इतर महत्व पूर्ण बाबींचा ताळमेळा बाबत***

DRAFT

महानगरपालीकेतील नळ जोडणी व तोडणीचे विहित नमुण्यातील नोंदवहया परिरक्षित न केल्यामुळे शहरातील एकूण नळ संयोजन व तोडणीची संख्या , तसेच पाणी वापर प्रकार, कालावधी व इतर महत्वहपूर्ण बाबींचा ताळमेळ घेता आलेला नाही.

महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 88 नुसार नमुना क्रमांक 61 ( अ) व 62 ( क) मध्ये विहित नमुण्यात नळ जोडणी व नळ तोडणी नोंदवही ठेवणे आवश्यक असून नियम 93 नूसार वर्षातून एक ते दोन वेळा शहरातील नळ जोणी संख्येची गणना करणे आवश्यक आहे. तथापि, विभागाने सन 2012-13 अखेर पर्यंत विहीत नमुण्यातील नोंदवहया परिरक्षित केले नाहीत. विभागाकडील सन 2012-13 मध्ये नळ कनेक्शन ठराव रजिष्टर नोंदवहीत 529 नळ कनेक्शन मंजुरी नोंदी नोंदविण्यात आलेल्या असून सदर नोंदवहीतील नोंदी प्रमाणीत केलेल्या नाहीत.

शहरातील नळ संयोजन संख्या, पाणी वापराचा प्रकार (घरघुती / व्यावसायीक), नळ तोडणीचे कारण, कालावधी ई. महत्व पूर्ण बाबींची सत्यता, घरपटटी व पाणीपटटी मागणी नोंदवहीशी पडताळता आलेली नाही, तसेच नवीन नळ संयोजन व तोडणी संख्या यांचा योग्य तो ताळमेळ घेता आलेला नाही. नियमानुसार नोंदवही परिरक्षित करुन नोंदी अद्यावत घेवून नोंदवही अनूपालनकामी सादर होण आवश्यक आहे.

अर्ध समास पत्र क्रं. 18 दिनांक 12/10/2015 नुसार विभागास मागणी केली असता विभागाने विहित नोंदवहया ठेवल्या नसल्याचे आढळुन आहे सबब परिच्छेद अंतिम करण्यात आला.

REVSSSM5909 (Ref No : 18)

## *103 धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात अधिकारी व कर्मचारी यांचे कडुन तारण पत्र न घेणे व नोंदवही परिरक्षीत नसलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : आस्थापना मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांचेकडुन नियमानुसार तारणपत्र व दरवर्षी त्यांचे जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले प्राप्त करणे तसेच सदर तारणपत्र व दाखले यांची नोंद विहीत नमुण्यातील नोंदवही परिरक्षीत न करणे बाबत***

DRAFT

धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांचेकडुन नियमानुसार तारणपत्र घेण्यात आले नसल्याचे आढळुन आले. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे कलम 138 नुसार कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचेकडुन तारणपत्र घेणे आवश्यक आहे, मात्र नियमोचित कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच उपरोक्त नियमानुसार नमुना क्रमांक 106 मध्ये संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेकडून प्राप्त करुन घ्यावयाच्या तारण पत्राची नोंद घेणे आवश्यक आहे. मात्र महानगरपालिकेने तारणपत्रेच प्राप्त करुन घेतली नसल्याने नोंदवही परिरक्षित केलेली नाही. सदर बाब नियमबाहय आहे. महाराष्ट्र शासनाचे रापपत्र दिनांक 16 जुलै 1992 चे भाग 1(अ) नुसार तारणपत्र देण्यास लायक असलेल्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचेकडुन दरवर्षी दिनांक 31 डिसेंबर पूर्वि ते व त्यांचे जामीनदार हे लायक व हयात असल्याचे दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तथापि निर्देशानुसार महानगरपालिकेने नियमोचित कार्यवाही केलेली नाही. तरी उपरोक्त नमूद नियम व राजपत्र निर्देशानुसार महानगरपालिकेने आपल्या आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचेकडुन तारणपत्र प्राप्त करुन विहित नमुण्यातील नोंदवहीत योग्य त्या नोंदी घेवून दरवर्षी दिनांक 31 डिसेंबर पूर्वि हे सर्व अधिकारी व कर्मचारी व त्यांचे जामीनदार लायक व हयात असल्याचे दाखले प्राप्त करुन अनुपालन कामी सादर करावेत व तारणपत्रे वेळीच घेण्यात येतील याची योग्य ती दक्षता घ्यावी.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 25 दिनांक 15/10/2015 अर्धसमास पत्र क्रं. 28 दिनांक 16/10/2015 देवुन अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी अभिप्राय प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 28)

## *104 सन 2012-13 या वर्षात महानगरपालिकेने क्रिडा विषयक खर्चअभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्धा न केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : क्रिडा मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सन 2012-13 या वर्षात महानगरपालिकेने क्रिडा विषयक खर्चाचे प्रमाणके, संचिका व अनुषंगीक अभिलेखे अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न केले बाबत***

धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात क्रिडा विषयक खर्चाचे प्रमाणके, संचिका व अनुषंगीक अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध करणे बाबत मागणी करुनही कोणतेही अभिलेखे तपासणीस उपलब्ध केले नाहीत.

मुंबई प्रांतिक महा. अधिनियम 1949 चे अनूसूची ड चे प्रकरण 3 मधील 6 अन्वये व महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 नुसार स्थानिक प्राधिकरणाने लेखापरिक्षणास अभिलेखे सादर करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमीततेे बाबत अर्धसमास पत्र क्रं. 23 दिनांक 15/10/2015 देवुन अभिलेख मागविण्यात आले होते तथापी अभिलेखे प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 23)

## *105 धुळे महानगरपालीकेत सन 2012-13 या वर्षात शासकीय आरोग्य संस्थेत कुटूंब नियोजन शस्त्र क्रिया केल्यावर देण्यात येणा-या मोबदल्यात दयावयाचे आर्थिक लाभाचे देयकातील आढळुन आलेल्या अनियमीतता व इतर अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न केलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : कुटूंब कल्याबण राज्यब शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 33550.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 33550.00/-

***धुळे महानगरपालिकेने शासकीय आरोग्य संस्थेत कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यावर देण्यात येणा-या मोबदल्यात दयावयाचे आर्थिक लाभाचे देयकात आढळून आलेल्याय अनियमीतता व इतर अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्धथ न केलेबाबत***

DRAFT

धुळे महानगरपालिकेतील सन 2012-13 या वित्तीय वर्षाचे शासकीय आरोग्य संस्थेत कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यावर देण्यात येणा-या मोबदल्यात दयावयाचे आर्थिक लाभाचे देयकात माहे मार्च 2013 मधील आढळुन आलेल्या अनियमीततेे बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. शासकीय आरोग्य संस्थेत कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यावर दयावयाचे आर्थिक लाभ देयक प्रमाणक माहे 2013 मध्ये स्त्री शस्त्रक्रिया (50) केल्याचे खर्च देयक तयार करण्यात आलेले असून देयकात 50 लाभार्थ्यांना मोबदला प्रदान केला आहे. परंतु तज्ञाची फी (सर्जन चार्जेस) 49 केसेसचे दर्शविण्यात आले असून 49 केसेस प्रत्येकी 75 प्रमाणे रुपये 3675 देय असताना खर्च रुपये 3750 दर्शविला त्यामुळे रुपये 75 जादा प्रदान झालेचे दिसून येते, देयकासोबतचे स्टॉफ नर्स यांना प्रदान रुपये 750 बाबत सही घेण्यात आलेली नाही, देयकात साबन, ब्लेड, निरमा, स्पिरिट, ऑक्सी्जन ई. साठी केलेला खर्च श्रमपरिहार चार्जेस व शिबीर व्यवस्थापन खर्च मध्ये प्रत्येकी रुपये 500 प्रमाणे रुपये 1000 खर्च दर्शविण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रं. कुनिश-2007/प्र.क्र.197/07/कु.क.1, दिनांक 13 डिसेंबर 2007 नुसार शासकीय आरोग्य संस्थेत कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यावर द्यावयाचे आर्थिक लाभ बाब निहाय रक्कम निश्चीत करण्यात आलेली असताना श्रमपरिहार व शिबीर व्यवस्थापन बाबतची रक्कम इतरत्र खर्च करण्यात आली आहे, तसेच देयकासोबत सदर परिपत्रकातील निर्देशानुसार अनुदान प्रदान करण्याची कार्यवाही केली किंवा कसे याबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध केले नाही.

2. कुटूंब कल्याण विभागाकडील डे बुक नोंदवहीत जमा रकमेचा तपशील तारीख निहाय जमा, खर्च, शिल्लक, एकुण बेरीज अशाप्रकारे लिहीण्यात येत नाही, तसेच सदर नमुना नं.11 मध्ये माहे नोव्हेंबर 12 पेज क्रं. 103 ते मार्च 2013 पेज क्रं. 149 पर्यंत वैद्दकीय अधिकारी यांच्या सहया घेण्यात आलेल्या नाहीत.

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 32 (1)(2) नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3. कुटूंब कल्याण विभागाने उक्त अभिलेख्या व्यितिरिक्त कोणतेही अभिलेखे पावती पुस्तके, संचिका, नोंदवहया, व त्याअनुषंगीक अभिलेखे तपासणीस उपलब्ध केले नाहीत, तसेच सदरचे खर्च रकमेचे मुळ प्रमाणक, प्रमाणक क्रमांक, दिनांक तपशील उपलब्ध करण्यात आला नाही.

मुंबई प्रांतिक महा. अधिनियम 1949 चे अनूसूची ड चे प्रकरण 3 मधील 6 अन्व्ये व महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 अन्वये सर्व अभिलेख लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमीततेे बाबत अर्धसमास पत्र क्रं. 26 दिनांक 15/10/2015 देवुन अभिलेख मागविण्यात आले होते तथापी अभिलेखे प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

REVSSSM5909 (Ref No : 26)

DRAFT

***108 सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विभागाकडील जमा पावती पुस्तके व त्या अनुषंगीक उपलब्ध केलेले अभिलेख्याचे तपासणीत आढळुन आलेल्या अनियमीतता बाबत***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विभागाकडील जमा पावती पुस्तके व त्याअनुषंगीक उपलब्ध केलेले अभिलेख्याचे तपासणीत आढळुन आलेल्या अनियमीतता***

DRAFT

सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विभागाकडील जमा पावती पुस्तके व त्या अनुषंगीक उपलब्ध केलेले अभिलेख्यातचे तपासणीत आढळुन आलेल्या अनियमीतता बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. अनामत रकमा पावती पुस्ताकातील रक्कम अंकात व अक्षरी वेगवेगळी लिहीण्यात आली असलेमुळे प्रत्यक्ष किती रक्कम वसुली केली व भरणा केली याची खात्री करता आली नाही याबाबत अचुक रकमेची खात्री पटविणे आवश्यक आहे.

| जमेचा तपशील | | भरणा तपशील | | रक्कम अक्षरी | रक्कम अंकात |
|---|---|---|---|---|---|
| पावती क्रमांक | दिनांक | पावती क्रमांक | दिनांक | | |
| 9501 ते 9600 | 22 ते 25 मार्च 13 | 9581 | 25/3/13 | 7200 | 7229 |
| 12784 | 25/3/13 | | | 1900 | 1975 |
| 12795 | 25/3/13 | | | 3940 | 3945 |
| 12312 | 25/3/13 | | | 3085 | 30085 |
| 13001 | 25/3/13 | | | 7794 | 7494 |

मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील सर्वसाधारण तत्वे व नियमानुसार कार्यकारी अभियंता किंवा उपविभागीय अधिकारी यांचे त्यांचे दुय्यम सेवकास दिलेली पावती पुस्तके सोईनुसार प्रत्येक वेळी संधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे व महिण्यातुन किमान एकदा तपासली पाहीजे व तपासणी केल्याची स्वाक्षरी नोंदवीली पाहीजे असे निर्देश असताना तशी कार्यवाही केलेली नाही , तसेच महाराष्ट्र नगरपालिका

लेखासंहिता 1971 नियम 10 नुसार लेख्यातील दुरुस्त्या अथवा फेरबदल लालशाईने चांगल्या प्रकारे करणे आणि प्राधिकृत अधिका-याकडुन दिनांकासह आद्याक्षरी करुन तो साक्षां कीत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत खात्री करुन अनुपालन सादर करणे आव श्यक आहे , अन्यथा फरकाची रक्कम रुपये 27409 मनपा निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे.

2. पावती पुस्तक व जमा रकमांच्या नोंदवहीत खालील पावत्यामध्ये तफावत आढळुन आली आहे.

| पावती क्रमांक | दिनांक | पावतीनुसार जमा रक्कम | दुय्यम नोंदवहीनुसार रक्कम |
|---|---|---|---|
| 13207 | 28/03/13 | 9825 | 9895 |
| 13208 | 28/03/13 | 9825 | 9895 |

मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील सर्वसाधारण तत्वे व नियमानुसार कार्यकारी अभियंता किंवा उपविभागीय अधिकारी यांचे त्यांचे दुय्यम सेवकास दिलेली पावती पुस्तके सोईनुसार प्रत्येक वेळी संधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे व महिण्यातुन किमान एकदा तपासली पाहीजे व तपासणी के ल्याची स्वाक्षरी नोंदवीली पाहीजे असे निर्देश असताना तशी कार्यवाही केलेली नाही , तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 10 नुसार लेख्यातील दुरुस्त्या अथवा फेरबदल लालशाईने चांगल्या प्रकारे करणे आणि प्राधिकृत अधिका-याकडुन दिनांकासह आद्याक्षरी करुन तो सा क्षांकीत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत खात्री करुन अनुपालन सादर करणे आव श्यक आहे , अन्यथा फरकाची रक्कम रुपये 140 मनपा निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे.

3. पावत्यावर खाडाखोड करुन रकमेत बदल, वसुली दिनांक नमुद न करणेत आलेली आहे.

| पावती क्रमांक | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| 13216 | 28/03/13 | रक्कम रुपये 9825 खोडुन रुपये 3905 केली आहे |
| 13223 | निरंक | वसुली रु. 3905 वसुली दिनांक नमुद केला नाही |

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 10 नुसार लेख्यातील दुरुस्त्या अथवा फेरबदल लालशाईने चांगल्या प्रकारे करणे आणि प्राधिकृत अधिका -याकडुन दिनांकासह आद्याक्षरी करुन तो साक्षांकीत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही अशी कार्यवाही वेळीच करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत खात्री करुन अनुपालन सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा फरकाची रक्कम रुपये 5920 मनपा निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे.

4. जमा रकमांची दुय्यम नोंदवहीमध्ये पावती पुस्तकानुसार जमा रकमांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

| पावती क्र. | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|
| 13253 | 28/03/13 | 6736 | वसुली नोंद नोंदवहीत घेण्यात आली नाही |
| 13254 | 28/03/13 | 8400 | वसुली नोंद नोंदवहीत घेण्यात आली नाही |

DRAFT

| | | | |
|---|---|---|---|
| 13261 | -- | 8400 | नोंदवहीतील नोंद रद्द केली परंतु पावती पुस्तकातील पावत्या रद्द केलेल्या नाहीत. |

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 34 नुसार वसुलीच्या वेळी देण्यात आलेल्या मुळ पावत्यातुन नोंद घेणे आवश्यक आहे तसेच , 36 नुसार वसुल झालेल्या रकमांचा भरणा नोंदी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत खात्री करुन अनुपालन सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा फरकाची रक्कम रुपये 23536 मनपा निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 116 दिनांक 07/01/2016, देवून अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी उक्त विषयी अभिप्राय समर्पक नसलेमुळे झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

REVSSSM5909 (Ref No : 116)

## *109 सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील जकात विभागाने तपासणीस उपलब्ध केलेली पावती पुस्तके व अभिलेख्याची तपासणीत आढळुन आलेल्या अनियमीतता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 07**

*लेखा शीर्ष : जकात मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 63775.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 63675.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 100.00/-

***सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील जकात विभागाने तपासणीस उपलब्ध केलेली पावती पुस्तके व अभिलेख्याची तपासणीत आढळुन आलेल्या अनियमीतता***

सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील जकात वसुली बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. जकात वसुलीसाठी वापरण्यात येणारी (अ) सर्व साधारण पावती नमुना नं. 2, (ब) पारगमन पास प्रति पावती रु. 100, (क) जकात माफीचा दाखला प्रति पावती रु. 15, (ड) जकात नमुना नं. 5 अ (नियम 25(4)(क) प्रति पावती रु. 2 व (इ) जकातपात्र माल / वाहन घेवुन जाण्याच्या प्रतिज्ञापत्र वाहनाचा ड्रायव्हर अगर वाहन ताब्यात असणारे इसमाने भरुन दयावयाचे करारपत्र प्रति फॉर्म रु. 2 चे पावती पुस्तके आणि अनामत परत बाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध करण्यात आली नाहीत. महापालीकेची जकात वसुली (20) ठिकाणी होत असल्याचे जमा नोंदवहीवरुन आढळुन आले, त्यापैकी 5 ठिकाणचे माहे मार्च 2013 मधील कांही



DRAFT

जकात पावती परिशिष्ट अ पावती पुस्तके लेखापरिक्षण तपासणीस उपलब्ध करण्यात आली, त्यापैकी जकात मालेगाव नाका येथील दिनांक 1 ते 18 मार्च पर्यंतची तपासणीस उपलब्ध करण्यात आली नाहीत, एस.टी. स्टँड नाका येथील पावती क्रं. 44401 ते 44500 वापर दिनांक 25/03/13 ते 30/03/13 तपासणीस उपलब्ध केले नाही, तसेच साक्री नाका येथील पावती क्रं. 27701 ते 27800, 39801 ते 39900, 44501 ते 44600 व 44601 ते 44700 लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध केली नाहीत.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 अन्वये सर्व अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

2. पावती पुस्तकावर छापील पावती बुक क्रमांक छापण्यात आलेले नाहीत, जकात वसुली नोंदवही पेजींग करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 8 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3. तपासणी केलेल्या पावती पुस्तकात खाली नमुद केलेनुसार अनियमिता आढळुन आल्या आहेत.

अ) पारोळा नाका जकात वसुली नोंदवहीत रकाना 7 मध्ये जकातीचा दर दिनांक 1/3/13 ते 10/3/13, 18/3/13 ते 19/3/13 व 21/3/13 ते 25/3/13 व त्यापुढील तारखेत जकात मालाचे दर नमुद केले नाहीत. ब. पावती क्रं. 43432 दिनांक 31/3/13 सिध्दीत विनायक हॉस्पिटल आयातक वस्तू सिमेंट पाईप किंमत 9000 वर 4 टक्के शेकडा नुसार रु. 360 ऐवजी रुपये 270 वसुल केले मुळे रु. 90 कमी वसुली करण्यात आली, सदरची रक्कम रु. 90 वसुल करणे आवश्यक आहे. ब) एस.टी. स्टँवड नाका पावती क्रं. 15541 ते 15554 वरील छापील पावती क्रमांकात हाताने खाडाखोडी करुन क्रमांक लिहीण्यात आले आहेत, बुक क्रं. 2046 पावती क्रं. 15544 पुढील पावत्या को-या असताना नविन पावती बुक क्रं. 2055 वापर करुन परत बुक क्रं. 2046 चा वापर करण्यात आलेला आहे, पावती बुक क्रं. 2541 मध्ये पावती क्रं. 25099 कोरी पावती कॅन्सल केली व पावतीची दुसरी प्रत रु. 40 दि. 8/3/13 व 25099 ची एक प्रत कॅन्सल लिहुन 25100 ची एक दुसरी प्रत रु. 40 लिहीलेची नाका कारकुन यांची सहीची आहे परंतु सदरची रक्कम जमा नोंदवहीत जमा केली नाही याबाबत लेखापरिक्षणाची खात्री पटविणे आवश्यक आहे, पावती क्रं. 25089 दिनांक 8/3/13 रु. 1000 पापड 3 टक्के प्रमाणे रु. 30 वसुली केली प्रत्यक्षात 4 टक्के प्रमाणे रु. 40 वसुली करणे आवश्यक होते, तसेच बुक क्रं. 2352 पावती क्रं. 46113 पासुन 46200 पर्यंतच्या को-या आहेत, सदर पावत्या रद्द करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही. क) साक्री नाका पावती क्रं. 27402 व 27403 कॅन्सल लिहुन त्यावर सही केली नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 8,10 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4. नमुना 13 पैसे भरणा चलन पावती क्रं. 23976 दिनांक 28/8/12 रुपये 2500, पावती क्रं. 23978 दिनांक 29/8/12 रु. 3900, पावती क्रं. 23979 दिनांक 30/8/12 रुपये 5000, पावती क्रं. 23983 दि. 31/8/12 रु. 1740 एकुण रुपये 13140 जकात ऑफीस पुरवणी भरणा कीर्द मध्ये नोंद आढळुन आले नाहीत. याबाबत लेखापरिक्षणाची खात्री पटवीणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

5. सामान्य पावती क्रं. 93193 ची रक्कम रु. 7250000 नमुद असून चलन भरणा पावती क्रं. 23981 वर रु. 72500000 नमुद असलेमुळे रकमेतील तफावतीची खात्री पटविणे आवश्यक आहे.

DRAFT

6. नमुना 13 नाका पैसे भरणा चलन खालील प्रमाणे जमा नोंदी चलन पा.क्रं 23994 दिनांक 12/9/12 रक्कम 3900 1/9/12 ते 11/9/12 अखेर रक्कम मार्गस्थ अनामत रोख भरणा किर्दमध्ये घेण्यात आलेली नाहीत. त्यामुळे सदर रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

7. चलन पावती क्र. 23995 दिनांक 10/9/12 रुपये 891040 लिहून त्यावर रुपये 454765 लिहीण्यात आले आहेत, चलन क्रं. 23996 दिनांक 10/9/12 रुपये 115623 लिहून त्यावर रुपये 46635 लिहीण्यात आले आहेत, या खाडाखोडी बाबत सही केलेली नाही. लेखापरिक्षणास रकमेची खात्री पटविणे आवश्यक आहे. तसेच उक्त रु. 46635 रक्कम जकात भरणा किर्द मध्ये जमा नोंद नाही. याबाबत लेखा परिक्षणाची खात्री पटविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्रं. 27 दिनांक 15/10/2015, अर्धसमास पत्र क्रं. 113 दिनांक 30/12/2015, अर्धसमास पत्र क्रं. 137 दिनांक 28/01/2016 देवून अभिप्राय मागविण्यात आले होते तथापी अभिप्राय प्राप्त न झालेमुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला.

REVSSSM5909 (Ref No : 113)

## *111 आय.डी.बी.आय. बॅक खाते क्रमांक 1030 मध्ये शिल्लकत पडून असणा-या रक्कमेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकाचे भविष्य निर्वाह निधी विभागाकडील आय.डी.बी.आय. बॅक खाते क्रमांक 1030 मध्ये पडून असणा- या रक्कमेबाबत.***

महानगरपालिकेचे युनायटेड वेस्टर्न बॅक लि. शाखा धुळे, पूर्वी कार्यरत असणारी व सध्याची आय.डी.बी.आय. या बॅकेत बचत खाते क्रमांक 1030 भविष्य निर्वाह निधी विभागा मार्फत कार्यरत असून सदर खातेबाबत लेखा परीक्षण केले असता त्यामध्ये सन 2012-13 जी शिल्लक रक्कम रुपये 56956.31 दर्शविण्यांत आलेली आहे तीच शिल्लक रक्कम आजअखेर रोख वही मध्ये पुढे ओढून घेतल्याचे आढळून आलेले आहे.

तसेच सदर रक्कम ही नेमकी कोणत्या वर्षापासून बॅक खात्यात शिल्लक पडून आहे हे तपासणी करुन स्वंयस्पष्ठ अहवाल सादर करावा. सदर रक्कम ही विनाकारण बचत खात्यात गुंतवून ठेवल्यामूळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येत आहे. सबब याप्रकरणी झालेल्या

नुकसानाबाबत संबधिंतांवर जबाबदारी निश्चीत करुन वसुल करण्यांत यावी.

DVERSKM7501 (Ref No : 131)

## *112 विहीत नमुन्यात आवश्यक त्या नोंदवहया परिरक्षित नसलेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपानिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***लेखा संहिता 1971 मधील तरतूदी नुसार विहीत केलेल्या नमुन्यातील विविध नोंदवहया परिरक्षित न करण्याची अनियमितता झालेली आहे.***

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम नुसार विविध नियमांन्वये संबंधित विभागांनी प्रत्येक आर्थिक वर्षासाठी आपल्या अधिनस्त विहीत नमुन्यात नोंदवहया परिरक्षित करुन त्यात अद्यावत नोंदी नोंदविणे क्रमप्राप्त आहे. मात्र सन 2012-13 चे लेखा परीक्षणात संबंधित विभागांनी विहीत नमुन्यातील नोंदवहया दप्तरी परिरक्षित केले नसल्याचे आढळून आले आहेत. यामुळे आवश्यकतेप्रमाणे आवश्यक त्या बाबींची योग्य ती लेखा परीक्षा करता आलेली नाही. तरी नोंदवहया परिरक्षित नसलेबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे तसेच नोंदवहया दप्तरी परीरक्षित करुन आवश्यक तया नोंदी अद्यावत ठेवून नोंदवहया अनुपालन कामी उपलब्ध व्हाव्यात.

नोंदवही / विवरणपत्र परिरक्षित नसल्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नोंदवही प्रकार | लेखा संहिता नियम क्रमांक | नोंदवहीचा विहीत नमुना क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | सिनेमा कर आकारणी नोंदवही | 84 (1) | 55 |
| 2 | सिनेमा कर मागणी नोंदवही | 84 (2) | 56 |
| 3 | कर वाढ / घट नोंदवही | 75 (7) | 46 |
| 4 | खाजगी नळ जोडणी नोंदवही | 88 | 62 अ |
| 5 | घरगुती नळ जोडणी नोंदवही | 88 | 62 ब |
| 6 | तारण नोंदवही | 138 | 106 |
| 7 | मोजणी पुस्तकाचे नोंदवही | 180 (5) | 137 |
| 8 | किरकोळ बांधकाम नोंदवही | 181 | 138 |
| 9 | बांधकाम नोंदवही | 181 (1) | 139 |

DRAFT

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | सामानाचा लेखा | 183 (3) | 140 |
| 11 | शासनाकडून मिळालेले कर्जमधून भागविण्याचा अंदाजित खर्च | 25 (2) (क) | 7 |
| 12 | बील नोंदवही | 42 (1) (2) | 20 |
| 13 | पाणी पुरवठा राखीव निधी | 100 (1) | 72 |
| 14 | वेतन राखीव निधी | 101 (1) | 73 व 74 |
| 15 | आस्थापना वेतन बील | 125 (1) | 93 |
| 16 | जमीनीची नोंदवही | 155 | 129 |
| 17 | हत्यार व सयंत्र नोंदवही | 184 | 141 |
| 18 | आस्थापना लेखा परीक्षा नोंदवही | परिशिष्ठ भाग - 1 व (परि.क्र.4(2)) | 150 |
| 19 | आकस्मिक खर्च लेखा परीक्षा नोंदवही | परिशिष्ठ भाग- 1 व (परि क्र.16(ब)) | 152 |
| 20 | पुनर्वियोजन विवरणपत्र | 30 (3) | 10 |
| 21 | मिटर नोंदवही | 89 | 63 |

FDSRKNM8201 (Ref No : 140)

## *114 बांधकाम मोजमाप पुस्तके विहीत नमुन्यात न ठेवणेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***लेखा संहिता 1971 मधील तरतूदी नुसार विहीत नमुन्यातील मोजमाप पुस्तकात झालेल्या बांधकामाची परिमाणे न नोंदविण्याची अनियमितता झालेली आहे.***

सन 2012-13 या आर्थिक वर्षाकरीता बांधकाम विभाग अंतर्गत बांधकामे यांची मोजमाप पुस्तक यांची पडताळणी केली असता, सदरची मोजमाप पुस्तके महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 180 नुसार विहीत नमुना क्र.136 प्रमाणे वापरात आणलेली नसून ती नियमबाहय नमुन्यात परिरक्षित करण्यात आलेली आहेत. सदर बाब नियमाचे उल्लंघन करणारी आहे.

DRAFT

वापरात आणलेली मोजमाप पुस्तके सक्षम प्राधिकाराकडून प्राप्त झालेबाबतचे प्रमाणपत्र शेवटच्या पृष्ठावर नोंदविण्यात आलेले नाही. विभागाने विहीत नमुन्याव्यतिरिक्त इतर नमुन्यातील मोजमाप पुस्तके कोणत्या निकषावर वापरात आणली याबाबतचे अनुपालन दर्शवावे तसेच उपरोक्त नियमाप्रमाणे नमुना क्र.136 प्रमाणे विहीत नमुन्यातील मोजमाप पुस्तकात बांधकामाच्या परिमाणांची नोंद घेण्याची दक्षता घ्यावी.

FDSRKNM8201 (Ref No : 144)

### *115 महानगरपालिका हद्दीत पाळीव जनावरे मंजुरी परवानगी शिवाय ठेवणेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***अधिनियमातील तरतूदीनुसार मनपा हददीतील पाळीव जनावरे यांचे साठी मा. आयुक्त याची संख्या मर्यादेसह लेखी परवानगी घेणे आवश्यक असून अशी माहीती विभागाने लेखा परिक्षणकालावधी पर्यंत ठेवलेली आहे किंवा कसे याबाबतची माहीती लेखा परिक्षणास उपलब्ध न करणेची अनियमितता.***

इकडील अर्धसमास पत्र क्रमांक- 150 दिनाक- 28/01/2016 नुसार महानगरपालिका हद्दीतील पाळीव जनावरे (वरहा, घोडे, गुरे-ढोरे, बकऱ्या, मेंढया, गाढव व अन्य चतुष्पाद जनावरे इत्यादी) बाबत परवानगी आदेश, संख्या, ठिकाण इत्यादी माहिती मागणी केली असता लेखा परीक्षण कालावधी सन 2012-13 करीता अशी परवानगी देण्यात आली किंवा कसे याबाबतची माहिती उपलब्ध झालेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसुची ड मधील प्रकरण 14 चे कलम 22 ते 24 नुसार महानगरपालिका हद्दीत मा.आयुक्त यांच्या लेखी परवानगी व संख्येची मर्यादा निश्चित करुन जनावरांचा उपद्रव, धोका होणार नाही. अशी जनावरे पाळता येतील असे नियमात स्पष्ट करण्यात आले आहे. तथापि महानगरपालिकाने किती व्यक्तिंना कोणत्या प्रकारची जनावरे किती, किती संख्येच्या मर्यादेत पाळण्यास लेखी परवानगी दिली इत्यादी बाबत कोणतेही अभिलेखे लेखा परीक्षणात आढळून आलेले नाही.

विनापरवानगीने जनावरे महानगरपालिका हद्दीत पाळण्यात येत असल्याने नागरीकांच्या आरोग्यास व शहराच्या स्वच्छतेस धोका संभवतो. तरी उपरोक्त नियमान्वये महानगरपालिकाने सत्वर कार्यवाही करणे आवश्यक आहे.

DATDAWM6901 (Ref No : 156)

DRAFT

## *117 नागरी सुविधा केंद्रामार्फत वसुलात होणाऱ्या विविध फी रकमांचा तपशील सादर न करणेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 29870.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 29870.00/-

***लेखा संहिता 1971 मधील तरतूदी प्रमाणे महानगरपालिकेच्या महसूलाची रक्कम नागरी सुविधा केंद्रा कडून विहीत पध्दतीने करण्यात आलेली नाही. वसुल रकमांचा सविस्तर तपशिल सादर झालेला नसल्याने वसुल रकमांची सत्यता पडताळता न येण्याची अनियमितता झालेली आहे.***

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 33, 34, 35 व 36 मधील नमूद तरतुदीनुसार महानगरपालिकाचे महसूल वसुलीचे काम सोपविण्यात आलेल्या प्रत्येक सेवकाला रकमा वसुल करुन महानगरपालिका निधीत भरणा करणेबाबतची कार्यपध्दती विषद करण्यात आलेली आहे.

तथापि सन 2012-13 करीता महानगरपालिकाच्या विविध विभागांकडून जसे जन्म मृत्यु प्रमाणपत्र फी, नगररचना विभागाकडील बांधकाम परवानगी, लायसन्स / परवाना फी, निविदा खरेदी फी तसेच इतर विभागाकडील कीरकोळ वसुली इत्यादी महसुलाकरीता महानगरपालिकाने नागरी सुविधा केंद्रामार्फत रकमा वसुलात आणण्याची कार्यवाही करण्यात येते. सदर कालावधीतील विविध विभागाकडील वसुलात रकमांचे भरणाकीर्द पडताळणी केली असता संबंधित सुविधा केंद्राने वसुलात प्रयोजनार्थ रकमांचा भरणा सत्वर संबंधित विभागाकडे न करता चार ते पाच दिवसानंतर एकत्रित भरणा केल्याचे आढळून आले आहे. तसेच सदरच्या रकमा वसुलात आणताना कोणत्या दराने, कोणत्या प्रयोजनार्थ रकमा वसुल केल्या आहेत. याबाबतचा सविस्तर तपशील सादर केलेला नाही. उदाहरण नगररचना विभागाकडे एकूण रक्कम रुपये 29870/- रकमेचा एकूण वर्षात भरणा केला आहे. तथापि त्याबाबतचा दिनांकीत प्रकरण संख्येसह तपशिल सादर केलेला नाही. सदरबाब उपरोक्त नियमास अनुसरुन नसल्याचे स्पष्ट होते तसेच सदरच्या अनियमिततेवरुन नागरी सुविधा केंद्रावर सक्षम प्राधिकाराचे कोणतेही नियंत्रण नसल्याने उपरोक्त प्रमाणे अनियमित कार्यवाही होत आहे.

तरी नियमानुसार रकमा वसुलात आणताना संबंधितांकडून विहीत नमुन्यातील महानगरपालिकाने दिलेल्या पावती पुस्तकाप्रमाणे प्रकरणनिहाय महसुल वसुल करुन संबंधितांना प्राप्त रकमांची पोहोच देणे आवश्यक असेल व रकमा वेळीच महानगरपालिका निधीत भरणा होतील याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

सदर कालावधीतील वसुलात महसुल रकमा नागरी सुविधा केंद्राने उचित प्राप्त केल्याचे प्रमाणित करुन तसे अनुपालन दर्शवावे.



DRAFT

### *127 शासकीय वाहनांचा विमा शासकीय विमा निधी यांचेकडूनन उतरविणे बाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 00**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***शासकीय वाहनांचा विमा शासकीय विमा निधी, मुंबई यांचेकडूनन उतरविणे बाबतची अनियमितता झालेली आहे.***

धुळे महानगरपालिकेने सन 2012-13 मध्ये वापरात असलेल्या शासकीय सर्व वाहनांचा मे. युनाईटेड इन्शुरन्स, धुळे यांचेकडून विमा काढणेत आला असल्याचे उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यावरून दिसून येते. सदर प्रकरणी खालिलप्रमाणे अभिप्रायदेण्यांत येत आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शा. नि. AIF- 1970/MISC.XXI, मुंबई. दिनांक 5 मे 1970 अन्वये सर्वशासकीय, निमशासकीय आणि जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, संसथा इ. यांनी त्यांचेकडील मालमत्तेच्या सर्व साधारण विमा हा फक्त शासकीय विमानिधी, मुंबई यांचेकडेच उतरविणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने शासन निर्णयानूसार नियमोचीत कार्यवाही न करता, खाजगी सेवा पुरवठादार यांचेकडून शासकीय वाहनांचा विमा उतरविला आहे. त्यामुळे शासकीय वाहनांचा विमा शासकीय विमा निधी, मुंबई यांचेकडूनन उतरविणे बाबतची अनियमितता झालेली आहे.

CCFNKKM8401 (Ref No : 147)

DRAFT

### *128 शासकीय वाहन क्रमांक एमएच 18 जी 1007 (जे.सी.बी.) च्या दुरुस्ती करतांना झालेली अनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपानिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 20000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 20000.00/-

***दरपत्रकांवर क्रमांक व दिनांक नमुद नसणे, दरपत्रके आवक न करणे, सुटया भागांची नोंदवहीत नोंद न घेणे, नादुरूस्त स्पेअर पार्टची अंतिम विल्हेवाट न लावणे. दरपत्रकांवर ती स्वीकारण्या-या अधिका-याची दिनांकीत***

***स्वाक्षरी नसणे.***

धुळे महानगरपालिकेच्यावापरात असलेले शासकीय वाहन जे.सी.बी. क्रमांक एमएच 18 1007 ची सन 2012-13 मध्ये किरकोळ/मध्यम दुरुस्तीची कामांवर खर्च करणेत आलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | कामाचेनांव | प्रमाणकक्रमांक /दि. | देयकक्रमांकवदिनांक | देयरक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | किरकोळ/मध्यम दुरुस्ती | उपलब्धकरुनदिलेलेनाही | 567 23/12/2012 | 20000.00 |

उक्त प्रकरणाची तपासणी केली असता खालिल प्रमाणे त्रुटया आढळून आल्या आहेत.

1. दुरुस्तीच्या कामासाठीखालिल पुरवठादारांनीदरपत्रके सादर केलीत परंतु सदर दरपत्रकावर दिनांक व क्रमांक नमुद नाही.

   1) राजकमल एन्टरप्रायजेस धुळे
   2) टी.एस.शार्दुल धुळे
   3) एकनाथ गोकुळ मिस्त्री धुळे

2. दरपत्रके आवक केलेली नाहीत. त्यामुळे दुरूस्तीचे काम वर्कऑर्डर देण्याची पूर्वी केले किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते.

3. दरपत्रकाच्या लखोटयावर दरपत्रक स्वीकारण्या-याअधिका-यांची / कर्मचा-यांची दिनांकीत स्वाक्षरी नाही. त्यामुळे दरपत्रके कधी मिळाली आहेत याचा बोध होत नाही.

4.दुरुस्तीची कामे केल्यानंतर खरेदी केलेल्या (स्पेअर पार्टस) सुटया भागांची नोंद सुटे भाग नोंदवहीत घेण्यांत आलेली नाही.

5.नवीन स्पेअर पार्ट खरेदी केले नंतर जून्या स्पेअर पार्टसची अंतिम विल्हेवाट वित्त विभाग शासन निर्णय डीएफपी 1091/ विनियम दिनांक 18/06/1991 अन्वये लावण्यात आली किंवा कसे याबाबत केलेली कार्यवाही, उपलब्ध लेख्यावरून कळून येत नाही.

6. मंजूर दरपत्रकामध्ये नमुद केलेले दरांमध्ये मजूरीची रक्कम समाविष्ठ असल्याचे दिसूनयेते, त्यामुळे खरेदी केलेल्या स्पेअर पार्टवर व्हॅटची अनुज्ञेय रक्कम अदा झालेली नाही. त्यामुळे उपरोक्त मुद्यांनूसार सदर वाहनावर करणेत आलेला खर्च आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे

आक्षेपाधिन निधी

20000.00

CCFNKKM8401 (Ref No : 148)

## *129 भांडार विभागातील कर्मचा-यांकडून प्रतिभूती बंधपत्र न घेतल्याबाबत.*

**NA**



DRAFT

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***भांडार विभागातीलकर्मचा-यांकडूनप्रतिभूती बंधपत्र न घेतल्याबाबत.***

धुळे महानगरपालिकेमधील भांडार विभागामध्ये काम करीत असलेल्या कर्मचा-यांकडून सन 2012-13 साठी प्रतिभूती बंधपत्र घेण्यांत आलेले नाही. महाराष्ट्र आकस्मीकखर्च नियम - 1965 मधील नियम क्रमांक 51 नुसार , शासकीय कार्यालयातील भांडारपाल, उपभांडारपाल, भांडार लिपीककिंवा असे कर्मचारीकी ज्यांचेवर मालमत्ता खरेदी करणेची किंवा सांभाळण्याची जबाबदारी सोपविण्यांत आलेली असते, अशा कर्मचा-यांकडून खालिल प्रकारांपैकी एकामध्ये प्रतिभूती बंधपत्र सिक्यूरीटी बॉड) घेणे आवश्यक असते. अशा प्रतिभूतीच्या रकमेबाबत सक्षमअधिका-याने, प्रत्येक प्रकरणी , स्थानिक परिस्थिती पाहून योग्य तो निर्णय घ्यावयाचा असतो.

प्रतिभूतीचे प्रकार -

1) प्रतिभूती बंधपत्र - दोनजामिनदार
2) कोणत्याहीशासनमान्यविमा संस्थेचा "इमान हमी योजना" (फिडीलीटी गॅरंटी पॉलिसी)
3) रोख स्वरुपातकिंवामासिक वेतन देयकातुन कपात
4) पोस्टाची विमा पॉलिसी किंवा सावधी विमापॉलिसी
5) पोस्टाच्या बचत बॅंकेतील ठेवी.

तरी उक्त त्रुटीबाबत अनुपालन अहवाल सादर करण्यांत यावा.

CCFNKKM8401 (Ref No : 146)

## *130 शासकीय वाहन जे.सी.बी. एम.एच 18 जी. 1007 चे करीतानविन टायर्स खरेदी करताना झालेलीअनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 80000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 80000.00/-

DRAFT

***शासन निर्णयदिनांक 2.1.1992 अन्वये खरेदी कार्यपध्दतीने न अवलंबिने, मुळ दरपत्रके न घेणे, सुटया / जून्या स्पेअर पार्टची नोंदवहीत नोंद न घेणे.***

धुळे महानगरपालिका यांचे वापरात असलेल्या शासकीय वाहन क्र. एम.एच 18 जी 1007 ( जे.सी.बी) चेमागील 2 टायर्सखराबझाल्याने, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, धुळे यांचे कडीलपत्र क्र. 144 दिनांक 9 मे 2012 अन्वये सदरचीटायर्स डॅमेजझालेले असून ते बदलविण्याबाबतचेप्रमाणपत्र दिलेले आहे. सदर प्रमाणपत्राच्या अनुषंगाने महानगरपालिकेनेमे. राम टायर्स, धुळे यांचेकडून (देयक क्र. 1717 दिनांक 28 डिसेंबर 2012) 2टायर्स (प्रत्येकीरुपये 40000 प्रमाणे) रु.80000.00 चे खरेदी केले आहेत. सदर प्रकरणांची छाननी केली असता खालिल त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत :-

1) शासन निर्णय उदयोग विभाग मंत्रालय क्रमांक भांसस-1088 (2512) / उदयोग-6 दिनांक 2 जानेवारी 1992 अन्वये खरेदीची एका प्रकरणी अथवावार्षिक गरजरुपये 50000 पेक्षाअधिकअसेल तरजाहिर निविदामागविणे आवश्यक असतांनादेखील महानगरपालिकेने सदरचीसदरचीखरेदी ही रुपये 50000 पेक्षा जास्त रकमेची असूनही, खरेदी निविदा पद्धतीने न मागविता दरपत्रक पध्दतीने केलेली आहे.

2)महानगर पालिकेने प्रथम निविदा दिनांक 17 मे 2012 रोजी दै.मर्डर (धुळे) मध्ये प्रसिध्द केली परंतु निविदा कालावधीत निविदा प्राप्त न झाल्याने उक्त प्रकरणी दिनांक 4 डिसेंबर 2012 रोजी दै. वार्ता (धुळे) या वृत्तपत्रात प्रसिध्द केली असल्याचे नस्तीवरून दिसून येते. शासन निर्णयदिनांक 2 जानेवारी 1992 नुसार फेर निविदा मागवितानां प्रसिध्द केलेल्या निविदेस मुदतवाढ देणे आवश्यक होते, वाढीव कालावधी मध्ये सुध्दा निविदा प्राप्त न झाल्यास दुबार फेर निविदा वृत्तपत्र प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तसेच दिनांक 2.1.1991 च्या शासन निर्णयनुसार निविदा एक स्थानिक वृत्तपत्र व एक राज्यस्तरीय वृत्तपत्रां मध्ये प्रसिध्द करणे आवश्यक असताना महानगर पालिकेने केवळ स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द केलेली आहे, त्यामुळे दरपत्रकांमध्ये स्पर्धा निर्माण न झाल्याने, महानगरपालिकेला स्पर्धात्मक दरांचा लाभ घेता आलेला नाही.

3) दोन वेळेस निविदा प्रसिध्दीस दिल्या नंतर प्रतिसाद न मिळाल्याने दरपत्रक मागविण्यांबाबत दिनांक 11 डिसेंबर 2012 रोजीमा. आयुक्तांकडे टिप्पणी सादर करुन दरपत्रक मागवून खरेदी करणे बाबत परवानगी प्राप्त करुन घेतली. परंतु दरपत्रके मागवितानां सुचना दिनांक 17 डिसेंबर 2012 रोजी प्रसिध्द केली प्रत्याक्षात दरपत्रकांवर दिनांक 10 डिसेंबर 2012 म्हणजेच दरपत्रक सुचना प्रसिध्द करणेपूर्वीची दिनांक नमुद आहे. (पुरवठादाररामटार्य, धुळे, दरपत्रकक्र. 179 दिनांक 10 डिसेंबर 2012) त्यामुळे सदर काम पुरवठादाराच्या मर्जीनूसार केले असल्याचे लेखापरीक्षाणाचे स्पष्ट मत आहे.

4) प्राप्त झालेल्या 3 दरपत्रकांपैकी 1. कापसे ऑटोमोबाई, धुळे 2. ताराट्रेडर्स, धुळे यांचे दरपत्रके मुळ नसून ती झेरॉक्स काढून नस्तीमध्ये लावण्यात आलेली आहेत. तसेच सदरची दरपत्रकेही संचिकेमधील (भांडार विभागसं. क्र. 17) दिनांक 25 मे 2012 रोजीच्या मुळ दरपत्रकांच्या छायाकिंत प्रती असल्याचे दिसून आले.

5) टायर्स खरेदी झाल्या नंतर नविन टायर्सची नोंद इतिहास पुस्तीका मध्ये नोंद घेतली असून जुन्या टायर्सची

DRAFT

सुटे भाग संयत्र नोंदवहीमध्ये नोंद घेणेत आलेलीनाही. वित्तविभागशासननिर्णयडीएफपी 1091/ विनियम दिनांक 18.06.1991 अन्वये लावण्यात आली किंवा कसे याबाबत केलेली कार्यवाही, उपलब्ध लेख्या वरून कळून येत नाही.

तथापि, वरील प्रकरणी नियमोचीत कार्यवाही न केल्याने अनियमितता झालेची दिसून येते, त्यामुळे सदरचा रुपये 80000.00 खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येतआहे.

आक्षेपाधीनरक्कम

रु. 80000.00

CCFNKKM8401 (Ref No : 143)

### *131 भांडार विभागाने जंगम मालमत्ता नोंदवही परिरक्षित केले नसले बाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***भांडार विभाग कार्यकक्षेतील जंगम मालमत्तांची नोंद असलेली व नियमान्वये विहीत केलेली नोंदवही परिरक्षित केलेली नसल्याने विभागाकडील जंगममालमत्तेची अचुकता पडताळता न येण्याची अनियमितता बाबत.***

सन 2012-13 करीताचे लेखापरीक्षण करतांना भांडार विभागाकडील जंगम मालमत्ता नोंदवहीची तपासणी करून त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे :-

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम144 नुसार विभागाने आपल्या कार्यक्षेत्रातील महानगर पालिकेच्या मालकीच्या सर्व चल-अचल साधन सामुग्री / साहीत्य/वस्तू इ.ची (उदा. जसे- पाईपलाईन,पोल, इलेक्ट्रीक स्पेअर पार्टस्, स्ल्यूज व्हॉल, विदयुत पंपसेट, विविध मशनरी, फर्निचर, जनरेटर, पंखे, संगणक, कपाटे, इ. विविध प्रकारचे जंगम साहित्य) नोंद नमुना क्रमांक- 114 मधील विहीत नमुन्यातील जंगम मालमत्ता नोंदवहीत रकाना निहाय नियमित /वेळोवेळी नोंदविणे आवश्यक असतांना, विभागाने अशी नियमोचित नोंदवही ठेवलेली नसल्याचे आढळून आलेले आहे.

यामुळे सन 2012-2013 अखेर विभागाकडे असलेल्या जंगम मालमत्तेतील साहीत्य प्रकार , नग संख्या, खरेदी कालावधी , वापर करणारी यंत्रणा /अधिकारी/कर्मचारी, साहीत्याची सदयस्थितीची नोंद , वापर ठिकाण , खरेदीची किंमत , इ. महत्वपूर्ण बाबींची अचुकता नोंदवही अभावी पडताळता आले ली नाही.



DRAFT

तरी, उपरोक्त नमुद नियमानुसार विहीत नमुन्यात जंगम मालमत्ता नोंदवही विभागाने परिरक्षित करणे आवश्यक असून आपल्या कार्यकक्षेतील विविध जंगम मालमत्तेची प्रकार निहाय पानवार नोंदी घेऊन नियमातील तरतूदी प्रमाणे नियमित आर्थिक वर्ष समाप्ती नंतर सदरची मालमत्ता सुस्थितीत व वापर योग्य असल्याची सक्षम प्राधिकाराने पडताळणी केलेले प्रमाणपत्र नोंदवहीत नोंदविणे आवश्यक असेल.

2) नोंदवहीमध्ये सन 1992-1993 पासूनच्या नोंदी घेणेत आलेल्या असून , तसेच सद्यस्थितीमध्ये सदर वस्तू वापरात आहेत किंवा कसे याबाबतची सत्यता पडताळता येत नाही.

3) शासन निर्णय क्रमांक डीएफसी -1091/प्रक्र.4/विननिमय, दिनांक 18/06/1991 अन्वये निरुपयोगी, दुरूस्ती न होण्यायोग्य अथवा गरजपेक्षा जास्त असलेल्या शासकीय भांडार वस्तू , यंत्रसामुग्री, वाहने इत्यादींची निर्लेखनाची कार्यवाही करून त्यांचा लिलाव करणे अपेक्षि त आहे. परंतू, सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही केली नसल्याचे दिसून आले.

4) शासन निर्णय , साप्रवि, क्रमांक मातस/नस्ती/प्रक्र.89/39 दिनांक 01/08/2011 अन्वये संगणक, प्रिंटर्स, झेरॉक्स मशीन, सर्वर किंवा ईलेक्ट्रानीक साहीत्य यांचे सरासरी आर्यमान ठरवून देण्यात आलेले असून सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करून कालबाहय झालेल्या उपकरणांची अंतिम विल्हेवाट लावली नसल्याचे दिसून आले . वास्तविकता महानगर पालिकेने सदर निर्णयाच्या अनूसार कालबाहय झालेल्या उपकरणे निर्लेखित करून , त्याऐवजी नवीन कार्यक्षम उपकर णांचा वापर करून प्रशासकीय कामकाजामध्ये गतीमानता आणता आली असती, परंतू तसे न केल्याने महानगरपालिकेची याबाबतची उदासीनता दिसून येते.

जंगम मालमत्ता नोंदवही अद्ययावत करून तसेच त्रुटींची पुर्तता करून अनुपालन सादर करावा.

CCFNKKM8401 (Ref No : 126)

## *132 सुकवद व बाभळे या पाणी पुरवठा केंद्राचे विद्युत देयके थकीत असणेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 15241773.90 /-

***विद्यूत विभागाने सुकवद व बाभळे या उच्च दाब पाणी पुरवठा केद्राचे विद्यूत देयकांची थकबाकी प्रलंबित ठेवल्याने महानगरपालिकेवर दायित्व निर्माण झालेले आहे.***

धुळे शहरासाठी एकुण सहा पाणी पुरवठा केंद्र असून सर्व केंद्र हे उच्च दाबाची जोडणी केलेले आहेत.

DRAFT

त्यापैकी सुकवद व बाभळे या केंद्राव्यतिरीक्त इतर केंद्राची मार्च 2013 अखेरीस निरंक असून सुकवद व बाभळे या केंद्रावर असलेली थकबाकीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. -

| पाणी पुरवठा केंद्राचे नांव | चालू माहचे देयक रक्कम रु.(मार्च 13) | थकीत रकमेचा तपशिल | एकुण देयक रक्कम रु | एकूण देयकात समावीष्ठ असलेली व्याजाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| सुकवद 097589000602 (ग्राहक क्रमांक) | 3375120.00 | 61387630.72 | 74764040.00 | 9162828.74 |
| बाभळे 097669000647 (ग्राहक क्रमांक) | 2255140.00 | 40404600.00 | 49297960.00 | 6078945.15 |
| एकुण | 5630260.00 | 101792231.00 | 124062000.00 | 15241773.90 |

उक्त प्रकरणी खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे :-

1) सन 2012-13 मध्ये अर्थसंकल्पामध्ये महानगरपालिकेने रुपये 84000000.00 केल्याचे दिसून येते. परंतू माहे मार्च 2012 अखेरची प्रलंबित थकबाकी प्रचंड असूनही केलेली तरतूद ही अपूरी दिसून येते. म्हणजेच अर्थसंकल्प सदोष असून, दायित्वाच्या प्रती महानगरपालिकेची उदासिनता दिसून येते. तरी. महानगर पालिकेने उदासीनता / निष्काळाजी दाखविल्यानेचे थकीत असलेल्या रकमेमध्ये दिवसेंदिवस वाढ होवून दायित्वामध्ये प्रचंड वाढ झालेचे दिसून येते.

2) महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिकामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार अंदाजपत्रक तयार करतांना ती नित्याचीच बाब समजून त्याकडे दुर्लक्ष न करता, अंदाजपत्रक तयार करणा-या अधिका-याने सदर कामाकडे वैयक्तिक व काळपूर्वक लक्ष देणे आवश्यक असते. परंतू तसे न केल्याने सदोष अंदाजपत्रक तयार करणेत आले असल्याचे, लेखापरीक्षणाचे स्पष्ट मत आहे.

3) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम क्रमांक 147 नूसार विभागाने संबंधित पाणी पूरवठा केंद्र निहाय नमूना क्रमांक 120 नूसार विद्यूत मीटर नोंदवही परिरक्षित केलेली नाही. यामुळे मार्च 2013 अखेर नमुद दोन्ही पाणी पुरवठा केंद्रावरील थकबाकीचा कालावधी पडताळता आलेला नसून, रकमा व वापर युनिट, रकमा थकबाकी राहण्याची कारणे इत्यादी महत्वपूर्ण बाबींची सत्यता पडताळता आलेली नाही.

4) विद्यूत देयकाच्या थकीत रकमांबाबत महानगरपालिकने संबंधित संस्थेसोबत तडजोडीचे किंवा रकमा देण्याबाबतचे उचित नियोजन केले नसल्याचे दिसून येते. वास्तविकता महानगरपालिकेने

DRAFT

शासनाने वेळोवेळी राबविलेल्या विविध योजना (उदा. अभय योजना) मध्ये सहभाग घेवून थकीत रकमा कमी करणेबाबत कार्यवाही करणे अपेक्षित होते, परंतू महानगरपालिकेने तसे केले नाही. तसेच अर्थसंकल्पामध्ये सुधारीत तरतूद करणे, शासकीय अनूदानातून देय ठरीत असलेल्या बाबती विद्यूत देयेके प्रदाने अंतर्गत थकीत रकमा भरणेची कार्यवाही न करणे इत्यादी कारणांमुळे विद्युत देयकाच्या मुद्दल व व्याजाच्या रकमेत वाढ झाल्याचे दिसून येते. सदरची बाब महानगरपालिकेच्या आर्थिक हितात दिसून येत नाही.

उपरोक्त अनियमितता पाहता थकबाकी रक्कम रुपये 101792231.00 चे इतके प्रचंड दायित्व महानगरपालिकेवर असून याबाबत आवश्यक व उचित कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

CCFNKKM8401 (Ref No : 153)

## *134 वॉर्ड क्रमांक 50 मधील भागात नवीन पथदिवे सुविधा करणे*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 189727.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 189727.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3796.00/-

***1 टक्का कामगार कल्याण उपकर वसूल करणेत आलेला नाही, मोजमाप पुस्तीकेचे साक्षाकन न करणे, विहीत मानांकनाचे उपकरणे न वापरणेबाबत, नकाशा न जोडणे, शिल्लक तरतूद नसतांना केलेला खर्च याबाबत झालेली अनियमितता.***

| अ.क्र. | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| 1 | कामाचे नांव | वॉर्ड क्रमांक 50 मधील भागात नवीन पथदिवे सुविधा करणे |
| 2 | प्रशासकीय मंजूरी | मा. आयुक्त यांचे मंजूरीने दिनांक 24/1/2011 |
| 3 | तांत्रीक मंजूरी | शहर अभियंता धुळे क्र. 100 दि.7/2/2011 |
| 4 | मक्तेदाराचे नांव | नॅशनल इलेक्ट्रीकल्स धुळे |
| 5 | निविदा कालावधी | 16/9/2011 ते 23/9/2011 |
| 6 | मंजूर निविदा दर | अंदाजपत्रकीय दराने |
| 7 | डीएसआर | नमुद नाही |
| 8 | अंदाजपत्रकीय तरतुद | रुपये 500000.00 |
| 9 | शिल्लक तरतूद | रुपये 100000.00 |

| | | |
|---|---|---|
| 10 | कामाचा कालावधी | 02 महीने |
| 11 | कार्यादेश क्रमांक | धुमपा क्रमांक 32 दिनांक 16/12/2011 |
| 12 | काम पूर्ण झालाचा दिनांक | दिनांक 28/12/2011 |
| 13 | अदा रक्कमेचा तपशिल | प्रमाणक क्र.4148 / दिनांक 189727.00<br>अदा रक्कम 174434.00 |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत :-

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक बीसीए/2009/प्रक्र.108/कामगार-7/अ, दिनांक 17/6/2010 नुसार देयकामधून कामाच्या कामाच्या मुल्यांच्या 1 टक्का कामगार कल्याण उपकर रुपये 1892.00 वसूल करणे आवश्यक असूनही तशी वसूली करणेत आली नसून, सदरची रक्कम रुपये 1898.00 वसूली करून शासन खाती जमा करून अनूपालन दर्शवावा.

2) नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक जीईएएन/1098/1357/प्र.क्र.166/98 मवी 24, दिनांक 3/11/2003 नूसार कामगारांचा विमा शासकीय विमा निधी, मुंबई यांचेकडेच उतरविणे बंधनकारक असतांना, मक्तेदाराने सदर विमा खाजगी विमा संस्थेकडून उतरविल्याचे दिसून येते. तरी सदरची 1टक्के विम्याची रक्कम रु.1898.00 मक्तेदाराकडून वसूल करून शासन सदरी जमा करावा.

3) कामासाठी वापरण्यात आलेली नवीन उपकरणे ही ब्यूरो ऑफ एनर्जी ईफिशिएन्सी, भारत सरकार यांनी Standard & Labelling या कार्याक्रमांतर्गत चार किंवा पाच स्तर नामांकन असलेली उपकरणे लावण्याची अट असतांना अशी उपकरणे लावल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही किंवा त्याबाबत सक्षम तांत्रीक अधिकारी यांनी प्रमाणित केले नाही.

3) उपलब्ध करून देण्यात आलेल्या नस्तीची तपासणी केली असता, कार्यालयीन टिप्पणीनूसार अर्थसंकल्पीय तरतूद रुपये 5 लक्ष करणेत आलेली असून, शिल्लक तरतूद ही रु.1 लक्षची होती. तरीही रुपये 194754.00 चे काम का प्रस्तावित केले याची पडताळणी होवू शकली नाही.

4) कामाच्या अंदाजपत्रकासोबत स्थळदर्शक नकाशा जोडण्यात आलेला नाही. तसेच मापन पुस्तकामध्ये उभारणी केलेल्या विद्यूत संचाचे स्थळदर्शक नकाशे नमूद केल्याचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील परिशिष्ठ 24 नियम क्रमांक 11 नूसार मोजमाप उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के प्रत्यक्ष बाबनिहाय तारखेसह करणे आवश्यक असतांना तसे केल्याचे दिसून येत नाही.

6) सदर कामासाठी कार्यादेश दिनांक 16/12/2011 रोजी देण्यात आलेले असून, काम पुर्णत्वाचा दाखला दिनांक 28/12/2011 रोजी देण्यात आलेला आहे. निविदा पूर्ण करण्याचा कालावधी 2 महिने असतांना 12 दिवसांत काम कसे काय पूर्ण होवू शकते, याची सत्यता पडताळता करता आली नाही.

तरी याबाबत पुर्तता करून अनुपालन सादर करावा.

मनपा निधी

आक्षेपाधीन रक्कम रु.189727.00

DRAFT

वसूलपात्र रक्कम रु.3736.00

CCFNKKM8401 (Ref No : 155)

***135 वॉर्ड क्रमांक 2 शिवाजीनगर कॉलनी, ओसवाल नगर, भूजल क्रांती, आरती, तिरूपती इ. भागात गर्डर पोल टाकणे व पथदिवे बसविणेबाबतच्या कामात झालेल्या अनियमितते बाबत.***

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 592169.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 592169.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 11842.00/-

***1 टक्का कामगार कल्याण उपकर वसूल करणेत आलेला नाही, मोजमाप पुस्तीकेचे साक्षाकन न करणे, विहीत मानांकनाचे उपकरणे न वापरणेबाबत, नकाशा न जोडणे, शिल्लक तरतूद नसतांना केलेला खर्च याबाबत झालेली अनियमितता.***

| अ.क्र. | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| 1 | कामाचे नांव | वॉर्ड क्रमांक 2 शिवाजीनगर कॉलनी, ओसवाल नगर, भूजल क्रांती, आरती, तिरूपती इ. भागात गर्डर पोल टाकणे व पथदिवे बसविणेबाबत |
| 2 | प्रशासकीय मंजूरी | मा. आयुक्त यांचे मंजूरीने |
| 3 | तांत्रीक मंजूरी | पत्र क्रमांक 51 दिनांक 24/9/2010 |
| 4 | मक्तेदाराचे नांव | श्री स्वामी समर्थ इलेक्टीकल्स, धुळे |
| 5 | मंजूर निविदा दर | अंदाजपत्रकीय दराने |
| 6 | डीएसआर | 2009-2010 |
| 7 | अंदाजपत्रकीय तरतुद | 630589.00 |
| 8 | कामाचा कालावधी | 02 महिने |
| 9 | कार्यादेश दिनांक | 18/2/2011 |
| 10 | काम पूर्ण झालाचा दिनांक | 25/10/2011 |
| 11 | अदा रक्कमेचा तपशिल | रुपये 592169.00 प्रत्यक्ष अदा रु.544441.00 |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत :-

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक बीसीए/2009/प्रक्र.108/कामगार-7/अ,

DRAFT

दिनांक 17/6/2010 नुसार देयकामधून कामाच्या कामाच्या मुल्यांच्या 1 टक्का कामगार कल्याण उपकर रुपये 5922.00 वसूल करणे आवश्यक असूनही तशी वसूली करणेत आली नसून, सदरची रक्कम रुपये 5922.00 वसूली करून शासन खाती जमा करून अनूपालन दर्शवावा.

2) नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक जीईएएन/1098/1357/प्र.क्र.166/98 मवी 24, दिनांक 3/11/2003 नूसार कामगारांचा विमा शासकीय विमा निधी, मुंबई यांचेकडेच उतरविणे बंधनकारक असतांना, मक्तेदाराने सदर विमा खाजगी विमा संस्थेकडून उतरविल्याचे दिसून येते. तरी सदरची 1टक्के विम्याची रक्कम रु.5922.00 मक्तेदाराकडून वसूल करून शासन सदरी जमा करावा.

3) कामासाठी वापरण्यात आलेली नवीन उपकरणे ही ब्यूरो ऑफ एनर्जी ईफिशिएन्सी, भारत सरकार यांनी Standard & Labelling या कार्याक्रमांतर्गत चार किंवा पाच स्तर नामांकन असलेली उपकरणे लावण्याची अट असतांना अशी उपकरणे लावल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही किंवा त्याबाबत सक्षम तांत्रीक अधिकारी यांनी प्रमाणित केले नाही.

3) उपलब्ध करून देण्यात आलेल्या नस्तीची तपासणी केली असता, कार्यालयीन टिप्पणीनूसार अर्थसंकल्पीय तरतूद रुपये 5 लक्ष करणेत आलेली असून, शिल्लक तरतूद ही रु.1 लक्षची होती. तरीही रुपये 194754.00 चे काम का प्रस्तावित केले याची पडताळणी होवू शकली नाही.

4) कामाच्या अंदाजपत्रकासोबत स्थळदर्शक नकाशा जोडण्यात आलेला नाही. तसेच मापन पुस्तकामध्ये उभारणी केलेल्या विद्यूत संचाचे स्थळदर्शक नकाशे नमूद केल्याचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील परिशिष्ठ 24 नियम क्रमांक 11 नूसार मोजमाप उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के प्रत्यक्ष बाबनिहाय तारखेसह करणे आवश्यक असतांना तसे केल्याचे दिसून येत नाही.

6) करार नाम्यामधील अट क्रमांक 5 नूसार दिलेले काम दोन महिन्यात पूर्ण न केल्यास योग्य तो दंड आकारण्यात येईल, असे नमूद असतांना देखिल काम विहीत मुदतीत पूर्ण न झाल्याने सदर मक्तेदाराकडून दंड न आकरण्याची अनियमितता झालेली आहे.

7) शासन निर्णय उदयोग विभाग मंत्रालय क्रमांक भांसस-1088 (2512) / उदयोग-6 दिनांक 2 जानेवारी 1992 अन्वये तसेच दिनांक 16/7/1993 च्या शासन निर्णयानूसार रुपये 50000 पेक्षा जास्त रकमेची निविदा महाराष्ट्र शासन राजपत्र पुरवणी भाग 2 मध्ये व राज्यस्तरीय वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करून मागविण्यात यावे, असे असूनही सदर शासन निर्णयानूसार कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा महानगर पालिकेला लाभ झाला किंवा कसे याची अचुकता पडताळता आलेली नाही.

तरी उपरोक्त अनियमिततेमुळे एकूण खर्च रुपये 592169.00 आक्षेपाधीन ठेवणेत येत असून, रुपये 11844.00 रक्कम वसूल करून शासन सदरी जमा करणेची कार्यवाही योजून अनुपालन दर्शवावा.

मनपा निधी

आक्षेपाधीन रक्कम रु.592169.00

वसूलपात्र रक्कम रु.11844.00

CCFNKKM8401 (Ref No : 154)

## *136 सन 2012-13 मध्ये विद्युत विभागाने पथदिवे देखभाल, दुरूस्ती, निगा यावर नियमबाहय केलेल्या खर्चाबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***1 टक्का कामगार कल्याण उपकर वसूल करणेत आलेला नाही, मोजमाप पुस्तीकेचे साक्षाकन न करणे, विहीत मानांकनाचे उपकरणे न वापरणेबाबत, नकाशा न जोडणे, शिल्लक तरतूद नसतांना केलेला खर्च याबाबत झालेली अनियमितता.***

| अ.क्र. | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| 1 | कामाचे नांव | सन 2012-13 मध्ये विद्युत विभागाने पथदिवे देखभाल, दुरूस्ती, निगा यावर नियमबाहय केलेल्या खर्चाबाबत. |
| 2 | प्रशासकीय मंजूरी | स्थायी समिती ठराव क्रमांक 65 दि.29/7/2011 |
| 3 | तांत्रीक मंजूरी | घेण्यात आलेली नाही. |
| 4 | मक्तेदाराचे नांव | अल्सन इलेक्टीकल्स, नाशिक |
| 5 | मंजूर निविदा दर | अंदाजपत्रकीय दराने |
| 6 | डीएसआर | नमुद नाही |
| 7 | अंदाजपत्रकीय तरतुद | 13300000.00 |
| 8 | कामाचा कालावधी | दि.2/11/2011 ते 30/9/2011 (पुढे मार्च 13 पर्यंत सुरू) |
| 9 | कार्यादेश दिनांक | 03/11/2011 |
| 10 | कार्यक्षेत्र | धुळे शहर (3 विभागात कामाचे वाटप) |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत :-

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक बीसीए/2009/प्रक्र.108/कामगार-7/अ, दिनांक 17/6/2010 नुसार देयकामधून कामाच्या कामाच्या मुल्यांच्या 1 टक्का कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक असूनही तशी वसूली करणेत आली नसून, सदरची रक्कमेची परीगणना करून त्याची वसूली करून शासन खाती जमा करून अनूपालन दर्शवावा.

2) नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक जीईएएन/1098/1357/प्र.क्र.166/98 मवी 24, दिनांक 3/11/2003 नूसार कामगारांचा विमा शासकीय विमा निधी, मुंबई यांचेकडेच उतरविणे बंधनकारक

असतांना, मक्तेदाराने सदर विमा खाजगी विमा संस्थेकडून उतरविल्याचे दिसून येते. तरी सदरची 1टक्के रक्कमेची परीगणना करून त्याची वसूली करून शासन खाती जमा करून अनूपालन दर्शवावा.

3) कामासाठी वापरण्यात आलेली नवीन उपकरणे ही ब्यूरो ऑफ एनर्जी ईफिशिएन्सी, भारत सरकार यांनी Standard & Labelling या कार्याक्रमांतर्गत चार किंवा पाच स्तर नामांकन असलेली उपकरणे लावण्याची अट असतांना अशी उपकरणे लावल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही किंवा त्याबाबत सक्षम तांत्रीक अधिकारी यांनी प्रमाणित केले नाही.

3) सन 2012-13 या कालावधीकरीता संपूर्ण धुळे शहराचे पथदिवे निगा व दुरूस्तीसाठी कार्यादेश दिलेला असून याप्रमाणे शहराचे तीन विभागात कामची विभागणी करून कार्यादेश दिलेला आहे, ही बाब नियमबाहय आहे.

4) करार नाम्यामधील अट क्रमांक 5 नूसार दिलेले काम दोन महिन्यात पूर्ण न केल्यास योग्य तो दंड आकारण्यात येईल, असे नमूद आहे. सदर अटीमध्ये दंडाची रक्कम नमुद करणेत आलेली नसून करार नाम्यातील अटी व शर्तींचा भंग केल्यास दंडाची परीगणना कोणत्या नियमानूसार करणेत येईल याबाबत करारनाम्यात कोठेही उल्लेख नाही. त्यामुळे करारामध्ये संदिग्धता निर्माण झालेली आहे.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील परिशिष्ठ 24 नियम क्रमांक 11 नूसार मोजमाप उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के प्रत्यक्ष बाबनिहाय तारखेसह करणे आवश्यक असतांना तसे केल्याचे दिसून येत नाही.

6) शासन निर्णय उदयोग विभाग मंत्रालय क्रमांक भांसस-1088 (2512) / उदयोग-6 दिनांक 2 जानेवारी 1992 अन्वये तसेच दिनांक 16/7/1993 च्या शासन निर्णयानूसार रुपये 50000 पेक्षा जास्त रकमेची निविदा महाराष्ट्र शासन राजपत्र पुरवणी भाग 2 मध्ये व राज्यस्तरीय वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करून मागविण्यात यावे, असे असूनही सदर शासन निर्णयानूसार कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा महानगर पालिकेला लाभ झाला किंवा कसे याची अचुकता पडताळता आलेली नाही.

तरी उपरोक्त अनियमिततेमुळे रकमेची परिगणना करून रकमा वसूल करून शासन सदरी जमा करणेची कार्यवाही योजून अनुपालन दर्शवावा.

CCFNKKM8401 (Ref No : 153)

## *138 मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मंजुरी दिलेल्या बांधकामांची संविदा नियमबाहयपणे करणेची अनियमितता.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 11317566.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 11317566.00/-

***अधिनियमातील कलम 73 मधील तरतूदी प्रमाणे रक्कम रुपये- 10.00 लक्ष मर्यादेपर्यंतच्या बांधकामांची संविदा करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असून तरतूदी नुसार त्यांनी संविदा केलेल्या कामांबाबतची माहीती मा. स्थायी समितीस व पर्यायाने महापालिकेस कळवून त्यांचे त्याबाबत कोणतेही आक्षेप नसल्याची मान्यता प्राप्त करावयाची असतांना तशी उचित कार्यवाही न करता कामे अंतिम करण्याची अनियमितता झालेली आहे.***

सन 2012-2013 या आर्थिक वर्षातील महानगरपालिका निधी अंतर्गत पुर्ण झालेल्या बांधकामाची व अदा झालेल्या प्रमाणकांची पडताळणी केली असता मा.आयुक्त, महानगरपालिका यांनी त्यांच्या अधिकार मर्यादेत रक्कम रुपये 10.00 लक्ष पर्यंतच्या बांधकामांना प्रशासकीय व आर्थिक खर्चास मंजुरी प्रदान करुन कामे हाती घेण्यात आलेली होती. निवडक कामांचा उदाहरणादाखल तपशिल खाली नमूद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणांची पडताळणी केली असता, त्या बांधकामाचे मंजुर अंदाजपत्रक रक्कम रुपये 10.00 लक्ष पर्यतची असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 अन्वये मा.आयुक्त यांनी मंजुर केलेली आहेत. तथापि सदर कलमातील तरतुदीप्रमाणे अशा कामांची संविदा केलेबाबतचा अहवाल मा.स्थायी समिती पुढे सादर करावयाची असून त्या प्रस्तावित कामांबाबत समितीने कोणतीही प्रतिकुल कार्यवाही प्रस्तावित केली नसल्यास 15 दिवसाचे कालावधी नंतरच त्या कामांची संविदा करण्यास मंजुरी असल्याचे निश्चित करुन मा.आयुक्त यांनी तसा अहवाल महानगरपालिकेस सादर करणेबाबतचे स्पष्ट निर्देश आहेत. तथापि प्रस्तुत प्रकरणी नमुद कामांच्या मंजुरीबाबतचे कोणतेही अभिलेखे नस्ती सोबत आढळ झालेले नाहीत. यामुळे अधिनियमातील निर्देशाप्रमाणे मा.स्थायी समिती व पर्यायाने महानगरपालिकेची तत्वत: मान्यता प्राप्त झाली होती किंवा कसे याबाबत लेखा परीक्षणाची खात्री होऊ शकलेली नाही.

तरी नमुद उदाहरणादाखल तसेच सन- 2012-2013 याकालावधीतील रक्कम रुपये- 10.00 लक्ष पर्यंतची झालेली बांधकामे सक्षम प्रक्रीयेने मंजुर होऊन हाती घेण्यात येऊन केल्याबाबतचे अनुपालन सादर होणे आवश्यक आहे. तुर्तास नमुद कामांवरील एकूण खर्च रक्कम रुपये- 11317566/- लेखा परीक्षणात खालीप्रमाणे अमान्य करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | कामावरील खर्च |
|---|---|---|---|
| 1 | वा.क्र.62 मध्ये मिल्लत नगर भागात रस्ता डांबरीकरण करणे | 499740 | 487858 |
| 2 | वा.क्र. 2 आरती कॉलनी भुजल सोसा. भागात रस्ता डांबरीकरण करणे | 993121 | 993121 |
| 3 | वा.क्र. 63 दाता सरकार नगर दाना चक्की जवळ शकील ते मिल्लत नगर गरीब नवाज नगर पावेतो सिमेंट कॉंक्रीट | 997419 | 990262 |

| | | | |
|---|---|---|---|
| | गटार बांधणे | | |
| 4 | वा.क्र. 13 मध्ये किरण हौ. सोसा. श्री. खंडू पाटील यांचे घरापासून ते इंद्रप्रस्थ कॉलनी पर्यंत अंडरग्राऊंड ड्रेनेज लाईन टाकणे | 724000 | 692712 |
| 5 | वा.क्र. 57 मध्ये साईदर्शन कॉलनी व वाणी मंगल कार्यालय येथे सिमेंट कॉक्रीट रोड करणे | 527320 | 418824 |
| 6 | वा.क्र. 56 शिवशक्ती कॉलनी भागात रस्ता डांबरीकरण करणे | 997925 | 961433 |
| 7 | वा.क्र. 66 मध्ये मोहाडी संजु भाऊ नगर श्री. मोतीलाल शिंदे ते परमेश्वर शिंदे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 499343 | 518151 |
| 8 | वा.क्र. 28 विकास कॉलनी रिटेनिंग वॉल व कॉँक्रीट रस्ता करणे. | 526512 | 467651 |
| 9 | वा.क्र. 12 जयगुरूदेव नगर जनार्दन बंगला ते जानकी बंगला रस्ता डांबरी करण करणे | 997463 | 924938 |
| 10 | वा.क्र. 23 म्हसोबा मंदीर ते पवन नगर पावेतो रस्ता तयार करणेसाठी नाल्यावर भराव करणे | 999231 | 983263 |
| 11 | वा.क्र. 15 स.नं. 20/2 मधील मयुर कॉलनी खुल्या जागेत वॉल कंपाऊंड बांधणे | 961974 | 961974 |
| 12 | वा.क्र. 8 लाला सरदार नगर अबुल हल मास्तर ते सुशिनाला गटार करणे | 442998 | 399952 |
| 13 | वा.क्र. 46 कबीर गंज भागात कॉँक्रीट गटार बांधणे | 949492 | 618306 |
| 14 | वा.क्र. 13 शिवप्रताप कॉलनी श्री. दुसाने ते अमृतकर व सांळुके यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण | 970508 | 938668 |
| 15 | वा.क्र. 18 जवाहर स्टेडीयम भागात रस्ता खडीकरण व कॉँक्रीट करणे | 999925 | 960453 |
| | | एकूण- | 11317566 |

मनपा निधी

आक्षेपाधीन रक्कम रुपये- 11317566/-

DATDAWM6901 (Ref No : 164)

## ***140 अनामत नोंदवही व प्रलंबित रकमांबाबत.***

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**



DRAFT

**No. of Irregularities : 07**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***प्रलंबित अनामत नोंदवहीत नियमानुसार अनामत प्रकार, वर्ष निहाय रकमांचा तपशिल न ठेवणे, वार्षिक गोषवारा नसणे, नियमानुसार तीन वर्षापेक्षा जादा कालावधीच्या अनामत रकमां व्यपगत करुन मनपा निधीत जमा नसणे, तीन वर्षापेक्षा जादा कालावधीच्या प्रलंबित रकमां प्रदान करतांना सक्षम प्राधिकाराची मंजुरी न घेता प्रदान होत असल्याची अनियमितता बाबत.***

सन 2012-2013 या आर्थिक वर्षाकरीताची अनामत नोंदवही पडताळणी केली असता, तसेच अहवालासोबतचे विवरणपत्र क्रमांक 6 ब मध्ये विषयांकीत आकडेवारी पाहाता माहे- मार्च 2013 अखेर अनामत/ठेव सदरी एकूण रक्कम रुपये- 208614539/- प्रदाना अभावी प्रलंबित राहीले आहेत.

याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 190(2) नुसार प्रत्येक आर्थिक वर्षानंतर प्रलंबित राहीलेली अनामत रक्कम ही अनामत प्रकार निहाय पुढील आर्थिक वर्षाचे अनामत नोंदवहीत प्रलंबित वर्षा प्रमाणे सविस्तर नोंदविणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक आर्थिक वर्षात प्रदान होणा-या प्रलंबित अनामत रकमां हया त्या तपशिलात नोंदवून सदरच्या वर्षाचे एकूण दायित्वातून त्या रकमा कमी करुन वर्ष अखेरीस प्रलंबित राहीलेल्या अनामत रकमांचा गोषवारा (वर्ष निहाय जमा व खर्च) एकत्रित नोंदवून ताळमेळ घेणे आवश्यक आहे. मात्र सन 2012-2013 ची नोंदवही पडताळता सन 2011-2012 अखेर प्रलंबित राहीलेल्या व आर्थिक वर्ष सन 2012-2013 मध्ये मागील अदा अनामत रकमांचा तपशिल नोंदविण्यात आलेला नाही किंवा नियमानुरुप नोंदी न घेण्याची अनियमितता झालेली आहे. यामुळे वर्षनिहाय अनामत प्रकार व रकमांचा ताळमेळ घेता आलेला नाही.

2) नोंदवहीत गोषवारे तसेच वर्षनिहाय अनामत रकमांचा तपशिल उपलब्ध झाला नसल्याने महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 190 (3) नुसार तीन वर्षापेक्षा जादा कालावधीच्या रकमा हया सदरच्या लेखा शिर्षातून व्यपगत करुन महानगरपालिका निधीत जमा करणेबाबत सुचित केले आहे. तथापि नोंदवहीत वर्षनिहाय नोंदी तसेच वार्षिक गोषवारे नोंदविण्यात आले नसल्याने याबाबतची कार्यवाही झाली किंवा कसे ही बाब पडताळता आलेली नाही. मुदतबाहय रकमां वेळीच व्यपगत न केल्यामुळे महानगरपालिकाचे दायित्व हे उत्पन्नापेक्षा जादा होऊन त्याचा विपरीत परीणाम महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवर होत आहे.

3) नियम 190 नुसार नमुना क्रमांक 147 मध्ये निरनिराळया प्रकारच्या अनामत / ठेवी व इतर संकीर्ण ठेवी अशा स्वतंत्र विषयांकीत नोंदी नोंदवहीत घ्यावयाच्या असताना सन 2012-2013 करीता प्राप्त अनामत रकमांच्या नोंदी एकत्रित व सरसकट नोंदविण्यात आलेल्या आहेत. यामुळे कोणत्या प्रकारच्या किती रकमेच्या अनामती /

DRAFT

ठेवी महानगरपालिकास प्राप्त होऊन कोणत्या अनामतींचे दायित्व वाढले याबाबतची आकडेवारी स्पष्ट नोंदविता आलेली नाही.

4) तीन वर्ष कालावधी पेक्षा जादा कालावधीच्या रकमां नियमानुसार वेळीच व्यपगत करण्यात आलेल्या नसल्याने सक्षम प्राधिकाराची मंजुरी नसतांना नियमबाहयपणे अनामत सदरातून त्यांचे प्रदान होण्याची अनियमितता होत आहे.

5) सर्वसाधारण रोखवही (डे बुक) नुसार दिनांक 31/03/2013 अखेर शिल्लक रक्कम रुपये- ......./- इतकी असून, प्रलंबित अनामत रकमेचे दायित्व एकूण रक्कम रुपये 208614539/- इतके आहे. याअर्थी, शिल्लक रकमेपेक्षा दायित्व जादा असून, सदर बाब महानगरपालिकेची आर्थिकस्थिती असाधारण असल्याचे दर्शविते. अनामत सदरी प्राप्त होणा-या रकमांचा वापर महानगरपालिकेने वेळोवेळी गुंतवणूक कामी करणे आवश्यक होते. तथापि, तशी कार्यवाही न होता सदर रकमांचा वापर हा दैनंदिन महसूल खर्चाकरीता नियमबाहयपणे करण्यात आल्याचे उपरोक्त बाबीवरून स्पष्ट होते. सदर बाब महानगरपालिकेच्या आर्थिकहिता विरुध्दची ठरते.

6) सन 2012-13 चे अनामत नोंदवहीत मार्च – 2013 अखेरच्या शिल्लक रकमा नोंदविण्यात आलेले नाही.

7) नोंदवहीत पानवार बेरजा घेण्यात आलेल्या नाहीत, नोंदी घेणाऱ्या कर्मचारी / अधिकारी यांनी सदरचा तपशिल साक्षांकित केलेला नाही.

सबब अनामत नोंदवहीबाबत नमूद अभिप्रायानुसार सन 2012-13 अखेर प्रलंबित अनामत रकमा प्रमाणित करुन नियमोचित कार्यवाही करुन तसे अनुपालन दर्शवावे.

DATPBKM6701 (Ref No : 151)

## *141 कामे पुर्ण झालेनंतर मक्तेदारांना अनुज्ञेय रक्कमेपैकी अंशत: रकमा प्रदान करणेबाबत.*

**NA**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities : 06**

*मनपानिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 15008300.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 15008300.00/-

***मक्तेदाराने बांधकामे पूर्ण करुन देयके सादर केलेली असतांना, तसेच सदर कामावरिल खर्चाची पुरेशी तरतूद मंजुर अर्थसंकल्पात असतांना, संबंधितांस अंशत: रकमांचे प्रदान करण्यात आले आहे. रकमां अंशंत: प्रदान होण्यास कारणीभूत बाबी नमुद नसणे, अहवाल नसणे इ. प्रकारची अनियमितता बाबत.***

सन 2012-13 चे लेखा परीक्षणात बांधकाम विभागाकडील अदा प्रमाणकांची पडताळणी केली असता, संबंधित मक्तेदारांनी केलेल्या कामाच्या मुल्या इतकी मागणी देयके प्रदानासाठी विभागाकडे सादर केली असता,



DRAFT

विभागाने अनुज्ञेय ठरणाऱ्या रकमेचे प्रदान न करता अंशत: रकमा अदा केलेल्या आहेत. याबाबतचा तपशिल (उदाहरणादाखल) खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 25 नुसार सदर कामाच्या बाबत आर्थिक तरतुदी मंजुर अर्थसंकल्पात मान्य झाले नंतरच सदरची बांधकामे प्रस्तावित झाली असून संबंधित मक्तेदाराने नियम 174 नुसार केलेल्या कामांची मागणी केली असल्याने व विभागाने त्यानुसार देयके अदा करणे आवश्यक असताना कोणत्या निकषावर अंशत: रकमांचे प्रदान केले याबाबतची सत्यता पडताळता आलेली नाही.

2) अंशत: रकमा प्रदान करताना नियम 174 (1) नुसार नमुना क्रमांक 131 मध्ये सदर देयके सादर केलेली नसतांना नमुना क्रमांक 22 मध्ये देयके पारीत करण्याची अनियमितता झालेली आहे.

3) देयके नमुना क्रमांक – 131 मध्ये सादर केलेली नसल्याने अंशत: प्रदान केलेल्या रकमां हया झालेल्या कोणत्या कामाच्या परिमाणाशी निगडीत होत्या व ती परिमाणे मोजमाप पुस्तकात नोंदविण्यात आली होती किंवा कसे इत्यादी महत्वपूर्ण बाबी पडताळता आलेल्या नाहीत.

4) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील परिशिष्ठ 1 नियम 16 व 17 नुसार लेखा विभागाने नियमोचित लेखा परीक्षा न करता देयके पारीत केली आहेत.

5) सन 2012-2013 मध्ये मंजूर अर्थसंकल्पानुसार तरतुद केलेल्या कामाव्यतिरिक्त दायित्व असल्यानेच व उचित आर्थिक नियोजन न केल्यानेच अंशत: रकमा प्रदानाची नियमबाहय कार्यवाही झाली असल्याचे लेखा परीक्षणाचे स्पष्ट मत आहे. याबाबत नियमोचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) देयकांचे प्रदान अंशत: होण्यास कामातील काही अपूर्णता, गुणवत्ता इ. महत्वपूर्ण बाबी कारणीभूत होत्या किंवा कसे याबाबत सक्षम तांत्रिक अधिकारी यांच्या अहवाला अभावी उचित खात्री होऊ शकलेली नाही.

सबब, मक्तेदाराकडून कामे पूर्ण होऊन तसेच त्याबाबतची पुरेशी आर्थिक तरतूद ही मंजुर अर्थसंकल्पान्वये उपलब्ध असतांना, कामाची प्रदाने कोणत्या कारणान्वये अशंत: रक्कमेने करणेत आली व त्यास कारणीभूत बाबी इ. बाबत लेखा परिक्षणाची खात्री होणे आवश्यक आहे. यामुळे प्रदान रक्कम रुपये- 15008300/- लेखा परिक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

| प्र.क्र. | दिनांक | मक्तेदार | कामाचे नाव | अंशत: प्रदान रक्कम |
|---|---|---|---|---|
| 4251 | 28/03/2013 | मे.सिध्दी कन्स्ट्रक्शन | पोलिस क्वार्टर भाग रस्ते डांबरीकरण | 200000 |
| 4250 | 28/03/2013 | मे.सिध्दी कन्स्ट्रक्शन | पोलिस क्वार्टर भाग रस्ते डांबरीकरण | 200000 |
| 4246 | 28/03/2013 | साद कन्स्ट्रक्शन | नवरंग जलकुंभ संरक्षक भिंत | 251800 |
| 4243 | 28/03/2013 | फारुक शेख खलील | अरुणवैद्य ते झुलेलाल सोसायटी रस्ता खडीकरण व डांबरीकरण | 193470 |



DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4240 | 28/03/2013 | किरण अहीरराव | जवाहर स्टेडीअम भाग रस्ता डांबरीकरण | 384181 |
| 4239 | 28/03/2013 | एल.जी.सोमवंशी | विट्टाभट्टी भागात रस्ता कॉक्रीट | 394102 |
| 4234 | 28/03/2013 | आशिष पटवारी | गोपालनगर भागात रस्ता डांबरीकरण | 128031 |
| 4233 | 28/03/2013 | पंकज बागूल | गाळनकर नगर भागात रस्ता कॉक्रीट | 114446 |
| 4232 | 28/03/2013 | सिध्दी कन्स्ट्रक्शन | पोलिस मुख्यालय अंतर्गत रस्ते डांबरीकरण | 259265 |
| 4231 | 28/03/2013 | मिलिंद मुडावतकर | गौरी हौसिंग रस्ता डांबरीकरण | 88591 |
| 4230 | 28/03/2013 | रिलायबल बिल्डर्स | हजारखोली भागात क्रॉक्रीट व गटार | 452243 |
| 4228 | 28/03/2013 | कल्याणी कन्स्ट्रक्शन | चाळीसगाव रस्ता शिवाजी पुतळा शोभिकरण | 246875 |
| 4227 | 28/03/2013 | शेख मेहबुब | महिलांसाठी शौचालय – वार्ड क्रमांक – 25 | 305664 |
| 4226 | 28/03/2013 | रुषीकेश पाटील | अहिरे ते वाघ रस्ता डांबरीकरण – वार्ड क्रमांक – 54 | 405723 |
| 4225 | 28/03/2013 | राधे कन्स्ट्रक्शन | वार्ड क्रमांक – 24 फुले कॉलनी रस्ता डांबरीकरण | 457886 |
| 4224 | 28/03/2013 | आरिफ शेख | वार्ड क्रमांक 39 – आर.सी.सी.गटार | 74090 |
| 4223 | 28/03/2013 | पी.एस.कोतकर | पाटील नगर ते नेताजी सोसायटी डांबरीकरण | 398863 |
| 4222 | 28/03/2013 | सलीम शेख | वार्ड क्रमांक – 3 अध्यापक नगर खुली जागा वॉल कंम्पाउंड | 191290 |
| 4221 | 28/03/2013 | सलीम शेख | वार्ड क्रमांक – 3 भगवती नगर खुली जागा वॉल कंम्पाउंड | 278670 |
| 4220 | 28/03/2013 | सलीम शेख | वार्ड क्रमांक – 58 तुळजाभवानी मदिर वॉल कंम्पाउंड | 340782 |
| 4058 | 21/03/2013 | गायत्री कन्स्ट्रक्शन | शनिमंदिर ते सुझुकी शोरुम – पारोळा रोड रस्ता दुरुस्ती | 433835 |
| 4057 | 21/03/2013 | गायत्री कन्स्ट्रक्शन | नटराज टॉकीज ते सुभाष पुतळा रस्ता दुरुस्ती | 444381 |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4056 | 21/03/2013 | राजनंदिनी कन्स्ट्रक्शन | वार्ड क्रमांक – 62 रफीकसर ते शाळा रस्ता डांबरीकरण | 411358 |
| 4055 | 21/03/2013 | भाविक कन्स्ट्रक्शन | वार्ड क्रमांक – 36 अशोक नगर डॉ. अभय कुलकर्णी पासून गटार काँक्रीट | 180546 |
| 4054 | 21/03/2013 | हर्ष कन्स्ट्रक्शन | वार्ड क्रमांक – 55 भाईजी नगर खुली जागा वॉल कंम्पाउंड | 387355 |
| 4053 | 21/03/2013 | हर्ष कन्स्ट्रक्शन | वार्ड क्रमांक – 55 भाईजी नगर खुली जागा वॉल कंम्पाउंड | 421596 |
| 4044 | 21/03/2013 | पंकज पाटील | वार्ड क्रमांक – 5 सत्संग कॉलनी वॉल कंम्पाउंड | 271685 |
| 4412 | 18/03/2013 | हर्ष कन्स्ट्रक्शन | वार्ड क्रमांक – 33 रस्ते डांबरीकरण | 395803 |
| 4386 | 15/03/2013 | आशिष पटवारी | वार्ड क्रमांक – 57 जयमल्हार वॉल कंम्पाउंड बगीचा खेळणी | 222458 |
| 4385 | 15/03/2013 | अमित शिंपी | वार्ड क्रमांक – 64 100 फुट रोड, 33 फुट रोड | 430431 |
| 4384 | 15/03/2013 | सचिन दिक्षीत | वार्ड क्रमांक – 22 जुने धुळे रस्ता कॉक्रीट | 394115 |
| 4381 | 15/03/2013 | किरण अहीरराव | वार्ड क्रमांक – 2 आरती कॉलनी स्लॅप क्लॉवॉटर | 340257 |
| 4313 | 12/03/2013 | हर्ष कन्स्ट्रक्शन | वार्ड क्रमांक – 50 अमर नगर रस्ता डांबरीकरण | 270532 |
| 4312 | 12/03/2013 | हर्ष कन्स्ट्रक्शन | वार्ड क्रमांक – 58 सुनिल पाटील ते पंजाबी कॉलनी रस्ता डांबरीकरण | 367384 |
| 4311 | 12/03/2013 | कीशोर पाटील | वार्ड क्रमांक – 20 खुनी गणपती मंदिर सभामंडप | 79836 |
| 4307 | 12/03/2013 | राजनंदीनी कन्स्ट्रक्शन | वार्ड क्रमांक – 23 मायाक्रोटॉवर ते मेनरोड रस्ता डांबरीकरण | 391015 |
| 4306 | 12/03/2013 | कमलेश पाटील | वार्ड क्रमांक – 54 करुणाविहार रस्ता डांबरीकरण | 386522 |
| 4305 | 12/03/2013 | फारुक खलील | वार्ड क्रमांक – 15 जयहिंद कॉलनी गटार | 320794 |
| 4304 | 12/03/2013 | किरण अहीरराव | वार्ड क्रमांक – 54 कृषि नगर विवेक | 465254 |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | जोशी रस्ता डांबरीकरण | |
| 4237 | 05/03/2015 | मिलिंद मुडावतकर | वार्ड क्रमांक – 21 श्रीराम कॉलनी रस्ता डांबरीकरण | 115003 |
| 4236 | 05/03/2015 | अंबादास म्हसके | पोलिस लाईन रस्ता डांबरीकरण | 189959 |
| 4219 | 05/03/2015 | प्रमिला सहकारी सोसायटी | वार्ड क्रमांक – 59 निलकमल सोसायटी रस्ता डांबरीकरण | 384969 |
| 4217 | 05/03/2015 | चंदन पलहानी | वार्ड क्रमांक – 32 शितल कॉलनी रस्ता डांबरीकरण | 480321 |
| 4212 | 02/03/2015 | गायत्री कन्स्ट्रक्शन | वार्ड क्रमांक – 49 मौलवी गंज कॉक्रीट गटार | 219073 |
| 4211 | 02/03/2015 | कमलेश पाटील | वार्ड क्रमांक – 54 सिंहस्थ नगर रस्ता डांबरीकरण | 388539 |
| 2 | 03/08/2012 | पृथ्वी डेव्हलपर्स | वाडीभोकर रोड ते आग्रा रोड (डॉ.व्ही.एस.पाटील यांच्या घरापर्यंत) रस्ता डांबरीकरण व डीव्हायडर टाकणे | 834620 |
| 3 | 03/08/2012 | खलिदारशेक | वार्ड क्रमांक 12 मध्ये यु.आर.रेहमान ते नंदी रोड रस्ता डांबरीकरण | 414687 |
| | | | एकूण- | 15008300 |

FDSRKNM8201 (Ref No : 162)

## *142 मालमत्ता कर मागणी नोंदवही मधील गंभीर अनियमिततांबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 07**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***कर मागणी नोंदवही यात नियमानुसार आवश्यक त्या नोंदी जसे- पानवार बेरजा नसणे, गोषवारे न नोंदविणे, रकमां सक्षम प्राधिकाराकडून प्रमाणित न करणे, कर आकारणी नोंदवही अभावी नमुद आकारणी बाबत सत्यता न पटणे, सुट व शास्ती च्या रकमां यांची अचूकता पडताळता न येणे. इ. प्रकारच्या अनियमितता बाबत.***

सन 2012-2013 करीता एकत्रित मालमत्ता कर व इतर कर यांचे मागणी नोंदवही यांची पडताळणी केली असता



DRAFT

खालील प्रमाणे दर्शविलेल्या अपुर्णत:/अनियमितता आढळून आलेले आहेत.

1) प्रत्येक मागणी नोंदवहीत सन 2011-2012 पूर्वीच्या नमूद असलेल्या थकबाकीच्या रकमांसंबंधीत मालमत्ता धारकाच्या एकूण मागणी रकमेतून कमी करुन पूर्वलक्षी पावतीचा प्रभाव देऊन सुट सदरी दर्शविण्यात आलेले आहेत. वास्तविकता नियम 76 (4) नुसार मागणी नोंदवहीतील नोंदी किंवा मागणी रक्कम सक्षम अधिकारी यांचे पूर्व मंजूरीशिवाय दुरुस्ती अथवा फेरबदल करता येत नाही किंवा केलेल्या दुरुस्तीस (आवश्यकतेनुसार) ही संबंधिताने साक्षांकीत करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे नियम 75 (7) नुसार मागणी नोंदवहीतील प्रत्येक बदलाची नोंद वाढ-घट नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. तथापि तशी कोणतीही नियमोचित कार्यवाही न करता नियमबाहयपणे एकूण मागणी कर रकमेतून सुट दर्शवून मागणी रकमा परस्पर कमी करण्यात येवून पर्यायाने महानगर पालिकाच्या आर्थिक उत्पन्नाचे नुकसान झाले आहे.

2) सन- 2012-2013 चे प्रत्येक मागणी नोंदवहीत पृष्ठ संख्या सक्षम प्राधिकाराकडून प्रमाणित करुन नोंदविण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र नगरपालिका लेख संहिता 1971 चे नियम 76 मधील तरतूदी नुसार मागणी नोंदवहीत मालमत्ताधारक निहाय विविध नोंदी जसे- वसुल पावतीचा क्रमांक, रक्कम मागणी, थकबाकी रक्कम इ. ची कर निरिक्षक, अधिक्षक, तथा सहायक आयुक्त इ.नी वेळोवेळी तपासणी करुन प्रमाणित केल्याचे आढळ होत नाही. यामुळे नोंदींची अचुकता पडताळता आलेली नाही.

4) उपरोक्त नियम 76 मधील तरतूदी नुसार मागणी नोंदवही निहाय नोंदी अचूक असल्या बाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र मागणी नोंदवहीत नोंदविण्यात आलेले नाही.

5) नियम 76 मधील तरतुदी प्रमाणे मागणी नोंदवहीत संबंधितांकडून पाननिहाय बेरजा घेऊन एकत्रित गोषवारे नोंदविण्यात आलेले नाहीत. यामुळे सन 2011-12 अखेरच्या थकीत राहीलेल्या कर मागणी रकमा अचूकपणे सन 2012-13 चे मागणी नोंदवहीत नोंदविण्यात आले किंवा कसे याची तसेच सन- 2012-13 मध्ये वसुल पावती व वसुल किर्द प्रमाणे प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या रकामां नोंदवून वर्ष अखेरीस अचूक थकबाकी नोंदविली किंवा कसे या अत्यंत महत्वपूर्ण बाबींची सत्यता गोषवारे अभावी पडताळता आलेली नाही. या अनियमिततेमुळे सन- 2012-2013 मध्ये संबंधितांकडून मालमत्ता कर व इतर कर मागणी, वसुल रकमां, व थकबाकी रकमाच्या अचुकतेची कोणतीही बाब प्रमाणित करता आलेली नाही.

6) विभागाकडील कर आकारणी नोंदवही (सन- 2003 अखेर व त्यानंतरच्या मालमत्ता कर आकारणी केल्या प्रमाणे) हया दिनांक- 17/06/2011 रोजी विभागास लागलेल्या आगीत जळून नष्ट झालेल्या असल्याने तसेच त्या नंतर आजपावेतो कोणतीही सुधारित कर आकारणी झालेली नसल्याने मागणी नोंदवहीत नमुद मालमत्ताधारक निहाय व निर्धारण सूची नोंदी नुसार क्रमवार नोंदी व थकबाकीच्या अचुक रकमां अग्रेषित करण्यात आल्यात व चालु मागणी सदरी कर निर्धारण नुसार अग्रीम केलेलीच कर मागणी रक्कम नोंदविली किंवा कसे इ. नियम 76 (2) नुसार नमुद बाबींची अचूकता पडताळता आलेली नाही.

7) कर संकलन विभागाकडून प्रभाग निहाय मालमत्ताधारकांना कर वसुली कामी अदा केलेल्या देयकांची नोंद मागणी नोंदवहीत केली नसल्याने देयके दिल्याची तारीख व शासतीची आकारणी केली किंवा कसे याची

अचुकता लेखापरिक्षणात पडताळता आलेली नाही.

उपरोक्त प्रमाणे मागणी नोंदवहीत गंभीर स्वरुपाच्या अनियमितता आढळून आलेल्या असून, याबाबत मागील लेखा परिक्षण अहवालात आक्षेप क्रमांक-177 नोंदवूनही विभागाने याबाबत कोणतीही नियमोचीत कार्यवाही केली नसल्याने अनियमिततेत सातत्य राहीले असून, याबाबत नियमातील तरतूदी नुसार सत्वर कार्यवाही होणे आवश्यक आहे. व ही बाब महानगरपालिकेच्या आर्थिकहिताची असेल.

DATPBKM6701 (Ref No : 38)

## *147 मौ.महिंदळे सं.न.92/पै 2 अ 4 चे अभिन्यास मंजुरीतील अनियमिततेबाबत.*

**NA**
**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities : 04**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***नियमानुसार मंजुर कालावधी संपल्यावर मंजुरी देण्यात आलेली आहे. विकसकाने नियमानुसार अभिन्यासातील अनुज्ञेय रस्ते, गटार इतर सुविधा प्रथम करुन दिलेल्या नाहीत. किंवा त्याचे कडून बँक गॅरंटी घेण्यात आलेली नाही. तसेच खुली जागा महानगरपालिकेच्या नांवे करुन दिलेली नाही.***

विकसक श्रीमती चंद्रकला दिलीप जगताप, धुळे यांचे मौ.महिंदळे सं.न.12/पै-2 अ 4 येथील जमीन रहिवास प्रयोजनार्थ अभिन्यासास तात्पुरती मंजुरी पत्र क्रमांक – 675 दिनांक – 25/10/2012 अन्वये देण्यात आलेली असून पावती क्रमांक – 99660 दिनांक – 16/10/2012 अन्वये रक्कम रुपये 20200/- विकास शुल्क भरणा केले आहे.

याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) विकसकाने प्रकरण सादर केल्याचा दिनांक – 29/09/2007 असून मंजुरी दिनांक – 16/10/2012 आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार मंजुरी कालावधी हा संपल्यानंतर मंजुरी देण्याची अनियमितता झालेली आहे.

2) नस्तीची पडताळणी केली असता, नगर रचना विभाग, धुळे महानगरपालिका यांनी पत्र क्रमांक 996 दिनांक 16/10/2008 अन्वये प्रस्तावित अभिन्यास जमीनीतील अनुज्ञेय रस्ता, गटारी इत्यादी मुलभूत सुविधा विकसकाने प्रथम करुन दयाव्यात किंवा त्यासाठी अंदाजित रक्कम रुपये 386182/- महानगरपालिका निधीत भरणे किंवा 100 टक्के बँक गॅरेंटी व हमीपत्र देणे इत्यादी मागणी करण्यात आली होती. मात्र यापैकी कोणतीही पुर्तता विकसकाने करुन दिल्याचे आढळ होत नाही. म्हणजेच विकसकने नियमानुसार अभिन्यासातील रस्ता, गटार इत्यादी मुलभूत सुविधा करुन दिलेल्या नसताना अभिन्यासास नियमबाहय मंजुरी देण्याची

अनियमितता झालेली आहे.

3) शहराचा मंजुर विकास आराखडा अंतर्गत सं.न.92/पै.2 अ.4 चे जमीन क्षेत्र रहिवास प्रयोजनार्थ संजुर आहे किंवा कसे इत्यादी महत्वपुर्ण बाब नस्तीसोबत अभिलेखे नसल्याने पडताळता आलेली नाही.

4) अभिन्यास मंजुरीतील शर्त क्रमांक -9 नुसार विकसकाने रस्ता व खुली जागा ही परवानगी दिनांकापासून 1 वर्षाचे आत महानगरपालिकेकडे वर्ग केलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत नियमोचित अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

DATPBKM6701 (Ref No : 143)

DRAFT

## लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र

| नाव | परिच्छेद क्रमांक |
| --- | --- |
| प्रभाकर बाबुराव काळदाते, सहाय्यक संचालक | 110, 120, 121, 139, 140, 142, 145, 146, 147, 39, 40 |
| सुरेश शंकरराव सावंत, लेखापरिक्षा अधिकारी | 100, 102, 103, 104, 105, 106, 107, 108, 109, 21, 51, 52, 53, 54, 55, 57, 59, 61, 62, 65, 66, 67, 68, 70, 71, 78, 79, 8, 80, 81, 92, 94, 98 |
| निलेश कमलाकर केदारे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 127, 128, 129, 130, 131, 132, 133, 134, 135, 136, 22, 23, 24 |
| दिपकांत आनंद वाघ, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 10, 11, 113, 115, 116, 117, 118, 119, 12, 122, 123, 124, 125, 126, 13, 137, 138, 14, 143, 144, 16, 17, 18, 19, 25, 26, 27, 28, 43, 44, 45, 46, 5, 6, 7, 9 |
| रुपेश श्रीकांत काळे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 111, 29, 31, 32, 33, 34, 35, 36, 37, 38, 72, 73, 74, 75, 76, 77, 83, 84, 85, 95, 96, 97, 99 |
| रविंद्र कामान्ना नाईक, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 112, 114, 141, 15, 2, 20, 3, 4, 41, 42, 47, 48, 49, 50, 82 |

DRAFT

## *परिच्छेदनिहाय अनुक्रमणिका*


| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 2 | रोखवही व बँक पासबुकमधील शिल्लक रकमेतील तफावतीबाबत. | (9अ) | 4 |
| 3 | रोख रक्कम पडताळणी न करणे व रोखवहीतील इतर अनियमितताबाबत. | (9ड) | 155 |
| 4 | महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर रकमा उशिराने शासनाकडे भरणा करणेबाबत. | (9ड) | 156 |
| 5 | जल व मल प्रवाह निधीची स्थापना न करणे व कलमात नमूद बाबींवर खर्च न होणेबाबत. | (9अ) | 5 |
| 6 | वसूल भरणा किर्द व मागणी नोंदवही प्रमाणे वसूल रकमा यांचा ताळमेळ घेता येत नसलेबाबत. | (9ड) | 157 |
| 7 | विशेष स्वच्छता कर निर्धारित दरापेक्षा निम्म्या दराने आकारणी केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. | (9अ) | 6 |
| 8 | धुळे महानगरपालिकेच्यान सन 2012-13 या वित्तीलय वर्षाचे लेखापरिक्षणात नग सचिव विभागातील पोट निवडणुक 2012 मधील उपलब्धा अभिलेख्यायबाबत | (9ड) | 159 |
| 9 | एकत्रित मालमत्ता कर व इतर कर वसुलीच्या भरणा किर्द मध्ये मासिक व वार्षिक गोषवारे  नोंदविण्यात येत नसलेबाबत. | (9ड) | 160 |
| 10 | मालमत्ता कर, थकीत रकमा मागणी नोंदवहीतून कमी करणे, कमी रकमेने नोंदविणे इत्यादी अनियमितताबाबत. | (9ब) | 57 |
| 11 | रस्ता अनुदान निधीतून नियमानुसार 10 टक्के इतका निधी वाहतूक नियंत्रण व्यवस्था कामी खर्च न करणेबाबत. | (9अ) | 7 |
| 12 | एकत्रित मालमत्ता कर व इतर कराच्या जमा रकमांच्या तफावतीबाबत. | (9ड) | 161 |
| 13 | दैनंदिन बाजार लिलाव थकीत रकमांबाबत. | (9ब) | 58 |
| 14 | नळ जोडणी नसलेल्या मालमत्ता धारकांकडून पाणीपटटी कर आकारणी करुन वसुलीची कार्यवाही करणेबाबत. | (9अ) | 8 |
| 15 | धनादेशाद्वारे प्राप्त मालमत्ता कर रक्कम परस्पर नगरोत्थान अभियान रोखवहीत जमा करणेची अनियमितता. | (9अ) | 9 |
| 16 | कॅबीन जागा भाडे नोंदवही व थकबाकी बाबत. | (9ब) | 59 |
| 17 | महानगरपालिका मालकीची शेतजमीनीचा नियमबाहयपणे वापर होत असलेबाबत. | (9अ) | 10 |
| 18 | देयकासोबत आवश्यक तो तपशिल नमूद न करता देयके पारित करणेबाबत. | (9ड) | 162 |
| 19 | व्यवसाय कर रकमा भरणा करणेबाबत शासनाकडून 5 टक्के रक्कम प्राप्त करुन न घेतले बाबत. | (9ड) | 163 |
| 20 | जन्म मृत्यु फी वसुली व नोंदवहीबाबत. | (9ड) | 164 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 21 | महानगरलिका धुळे कर वसुली बाबतचे पावती पुस्तके, जमा रकमेच्या दैनिक भरणा नोंदवहया, ईत्यादी अभीलेखे तपासणी करताना आढळुन आलेल्या त्रुटी / उणीवा बाबत | (9ब) | 61 |
| 22 | धनादेश साठा नोंदवही न ठेवणेबाबत | (9ड) | 165 |
| 23 | मंजूरीशिवाय देयक अदायगी करणेची अनियमितता. | (9ब) | 63 |
| 24 | साहित्य खरेदी अगोदर खर्च रक्कम अदा करणेबाबत | (9ड) | 165 |
| 25 | सर्व्हे खोली व स्लम जागा भाडे कर रकमा थकीत राहणेबाबत. | (9ब) | 64 |
| 26 | दैनंदिन बाजार फी वसुलीचा मक्ता अयशस्वी होऊन झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. | (9ब) | 66 |
| 27 | शासन घोषित गलिच्छ वस्ती मधील मालमत्तांवर कर मागणी व्यतिरिक्त भुईभाडे, सेवा आकार व प्रशासकीय आकार इत्यादीची आकारणी होऊन रकमा वसुल होत नसलेबाबत. | (9अ) | 12 |
| 28 | दुकान भाडे थकबाकी वसुलीबाबत. | (9ब) | 69 |
| 29 | सहावा वेतन आयोग फरकाची रक्कम भ्.निनि. खातेमध्ये जमा नसलेबाबत. | (9ड) | 166 |
| 31 | भविष्य निर्वाहनिधी शिल्लकेचे विवरणपत्र खातेदारास अदा न करण्यांची अनियमितता | (9ड) | 167 |
| 32 | सेवानिवृत्त कर्मचा-यांची सहावे वेतन आयोग फरकांची रक्कम थकीत असलेबाबत. | (9ड) | 168 |
| 33 | सेवानिवृत्ती धारकांकडून हयातीचे दाखले वेळेत प्राप्त न केलेमुळे निवृत्तीवेतन चुकीचे अदा केलेबाबत | (9ड) | 169 |
| 34 | महानगरपालिकेने शासन निर्देशानुसार महिला व बाल कल्याण करीता 5 टक्के इतकी तरतूद करुन सुध्दा त्यानुसार कोणतीही योजना राबविली नाही. यामुळे गरजू व पात्र लाभार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवण्याची अनियमितता. | (9अ) | 13 |
| 35 | भविष्य निर्वाहनिधी खात्यामध्ये असणा-या सर्व साधारण त्रुटी. | (9ड) | 170 |
| 36 | मालमत्ता करात वाढ न करणेबाबत. | (9ड) | 171 |
| 37 | मालमत्ता कररक्कम मुदतीत वसूल न झाल्याने अदत्त रकमांवर शास्तीची आकारणी न करणेबाबत. | (9ड) | 171 |
| 38 | बोर्ड व बॅनर्स खरेदी मधील निविदेत असणा-या त्रुटीबाबत. | (9अ) | 14 |
| 39 | दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे अद्यावत न करणेबाबत. | (9ड) | 172 |
| 40 | मुख्य लेखारीक्षक यांचा सन 2012-13 करीताचा लेख्यांवरील अहवाल सादर केले नसलेबाबत. | (9ड) | 173 |
| 41 | अग्निशमन व्यवस्था तपासणी वार्षिक फी वसुल होत नसलेबाबत. | (9ड) | 174 |
| 42 | आग विझविणे कामी पुरविलेल्या सेवेच्या खर्चाची रक्कम थकीत राहण्याची अनियमितता. | (9ब) | 70 |
| 43 | मंजूर अभिन्यासातील अनुज्ञेय असलेले रस्ता व खुली जागा इत्यादी महानगर | (9अ) | 15 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | पालिकेच्या नावे न करण्याची अनियमितता. | | |
| 44 | बांधकाम परवानगी प्रकरणे मंजूर करताना अनुज्ञेय अग्निशमन सेवा फी आकारणी करुन वसुल होत नसलेबाबत. | (9अ) | 16 |
| 45 | अभिन्यास मंजूर प्रकरणांची नोंद विहीत नोंदवहीत नसलेबाबत. | (9ड) | 176 |
| 46 | इमारत परवाना नोंदवहीबाबत. | (9ड) | 176 |
| 47 | विवाह नोंदणी फी व शास्ती रक्कम शासनाकडे जमा न करण्याची अनियमितता. | (9ब) | 71 |
| 48 | विवाह मंडळांची नोंदणी न करणे व त्यामुळे फी रकमेचे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. | (9ड) | 177 |
| 49 | अनुज्ञेय नसलेल्या सण व उत्सवासाठी नियमबाहयपणे सण अग्रिम रकमांचे प्रदानाबाबत. | (9ब) | 72 |
| 50 | वकील फी / कायदेशीर सल्लागारास केलेल्या प्रदानाबाबत. | (9ड) | 178 |
| 51 | दलितवस्ती योजने अंतर्गत वार्ड क्रं.36 मध्ये श्री मोरे ते सिध्दार्थ नगर चितोड रोड पावेतो व वार्ड क्रं. 34 मध्ये यशवंत नगर मध्ये नवीन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणे, वार्ड क्र. 35 भीम नगर भागामध्ये नविन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणे आणी वार्ड क्रं. 17 नागसेनवाडी ते रमाबाई आंबेडकर नगर पावेतो नविन 6 इंची एसी प्रेशर पाईप लाईन टाकणे बाबत | (9ब) | 74 |
| 52 | धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 21 जुने धुळे हनुमान मंदीराजवळ 100 एमएम डीइपीइ पाईप लाईन टाकणे व वार्ड क्रं. 12 शिवाजी नगर, वाडीभोकर रोड भागात नवीन 150 व 100 एमएम व्यासाची एचडीपीई असी प्रेशरपाईप लाईन टाकणे व वार्ड क्रं. 2 मधील ओसपालनगर, तिरुपती नगर, न्यु एकतानगर ई. भागात नवीन 100, 150 व 300 एमएम पाईप लाईन टाकणे बाबत. | (9ब) | 82 |
| 53 | धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 12 जुना प्रभाग शिवाजी नगर भागात नवीन असी प्रेशन पाईप लाईन टाकणे बाबत. | (9ब) | 88 |
| 54 | धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 28 मध्ये चंपाबाग पत्रकार कॉलनी व जमनागीरी भीलारी भागात नविन 160 एमएम डी पाईप लाईन टाकणे, वार्ड क्रं. 53 मध्ये कैलास नगर भागात 160 व 110 एमएम एचडीपीई पाईप लाईन टाकणे व वार्ड क्रं. 56 गुरुकृपा नगर भागात 110 एमएम पाईप लाईन टाकणे, वार्डक्रं. 58 मध्ये (वार्डक्रं. 38 च्यायादीनुसार) कोळवले नगर भागात 160 व 110 एमएम एचडीपीइ पाईप लाईन टाकणे कामेचे संचिकेत आढळुन आलेल्या अनियमीतते बाबत. | (9ड) | 180 |
| 55 | महानगरपालिका धुळे येथील सन 2012-13 चे लेखापरिक्षणात दलित वस्ती योजने अंतर्गत वार्ड क्रं. 16 भागात सहा ठिकाणी विंधन विहीरी करणे व जेटपंप बसवीणे बाबतचे कामातील अनियमीतता बाबत. | (9ब) | 93 |
| 57 | धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात देखभाल दुरुस्ती लेखाशिर्षात पाणी पुरवठा विभागाअंतर्गत केलेल्या खर्च विषयक अभिलेखे व निविदा संचिका | (9ड) | 187 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न केले बाबत. | | |
| 59 | आग्रारोड पश्चीम भागातील गळती (पाईप लाईन, व्हॉल्व, नळ कनेक्शन ई) बंद करणे बाबत. | (9ब) | 96 |
| 61 | संपुर्ण देवपुर भागातील गळती (पाईप लाईन, व्हॉल्व, नळ कनेक्शन ई) बंद करणे बाबत. | (9ब) | 100 |
| 62 | धुळे महानगरपालीका वार्ड क्रं. 30 मधील ग.न. 7 मधील भागात पाईप लाईन दुरुस्ती बाबत. | (9ब) | 104 |
| 65 | सुवर्ण जयंती रोजगार योजना अंतर्गत वार्ड क्रं. 33 एकता नगर, शीवम नगर, वीद्यावर्धीनी मागील भागात गटार बांधकाम करणेसाठी, पी.सी.सी. फरशी बविणे, परदी, मजुरीचे बील ई. बाबत. | (9ब) | 109 |
| 66 | सुवर्ण जयंती रोजगार योजना अंतर्गत वार्ड क्रं. 13 मधील एकवीरा नगर रस्ता खडीकरण व गटार बांधकाम, इंद्रप्रस्थ नगर, जितेंद्र नगर, श्रध्दा नगर भागात गटार बांधकाम करणेसाठी चे अभीलेखे उपलब्ध होणे बाबत. | (9ब) | 114 |
| 67 | धुळे महानगरपालीका अंतर्गत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे सन 2012-13 मधील उपलब्ध निधी खर्च ई. बाबत | (9ब) | 119 |
| 68 | धुळे महानगरपालिकेचे सन 2012-13 चे लेखापरिक्षणामध्ये हनुमान टेकडी पाणी पुरवठा केंद्र येथे 630 केव्हीए स्टँडबाय आऊटडोअर ट्रान्सफार्मर व त्यासाठी लागणारे साहित्य पुरवठा व उभारणी करणे, बाभळे जलशुध्दीकरणे केंद येथील 3000 केव्ही/3एमव्ही, 33 केव्ही व सुखवद रॉवॉटर पंपीग स्टेशन येथील 4000 केव्ही/4 अएमव्ही /33 केव्ही स्टँडबाय ट्रान्सफार्मर व त्यासाठीचे सुरक्षा उपकरणे कामेचे संचिकेत आढळुन आलेल्याभ अनियमीतते बाबत. | (9ड) | 197 |
| 70 | धुळे महानगरपालीका अंतर्गत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे सन 2012-13 मधील उपलब्ध ( निधी खर्च ई. बाबत ) | (9ब) | 121 |
| 71 | धुळे महानगरपालिका सन 2012-13 मध्ये लाईन गळती, व्हॉल बदलणे, पाईप टाकने, पाईप लाईन टाकणे, लिकेज जवळ कॉक्रीट करणे, पाईपलाईन क्रॉस कनेक्शन करणे, आरसीसी पाईप टाकणे ई. कामाचे संचिकेत आढळुन आलेल्या अनियमीतते बाबत. | (9ब) | 125 |
| 72 | निवृत्ती वेतनाच्या रकमा निवृत्ती वेतन निधीत जमा न करता आवश्यकतेप्रमाणे सर्वसाधारण निधीतून थेट देण्याची अनियमितता. | (9ड) | 200 |
| 73 | निवृत्ती वेतन निधी खाती मनपा निधी जमा करणेबाबत. | (9ड) | 200 |
| 74 | अभिलेखे विभागातील सर्वसाधारण असणा-या त्रुटी | (9ड) | 201 |
| 75 | अभिलेखे विभागाकडील सन 2012-13 मधील छपाईबाबतच्या निविदेमधील असणा-या अनियमिततेबाबत. | (9ड) | 202 |
| 76 | सेवा निवृत्ती वेतन विभागात आढळलेल्या इतर अनियमितता. | (9ड) | 204 |
| 77 | महानगरपालिका हायस्कूलसाठी देण्यांत आलेल्या सादील खर्चाबाबत. | (9अ) | 17 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 78 | धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षासाठी ॲलम, ब्लीचींग पावडर, क्लोरीन गॅस टनर खरेदीबाबतचे निविदा व देयका बाबत. | (9ड) | 205 |
| 79 | धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात हातपंप, जेटपंप दुरुस्ती बाबतचे निविदा काढुन केलेल्या कामाबाबतच्या आढळुन आलेल्या अनियमीतता बाबत. | (9ड) | 209 |
| 80 | धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात महानगरपालिका हद्दीतील व हद्दीबाहेरील महानगरपालिकेने टाकलेल्या जलवाहीनीवर ज्या नागरीकांनी अनधीकृत नळ कनेक्शन घेतले आहेत त्यांच्यासाठीचे शोधमोहीमेचे कामा बाबतचे निविदा काढुन केलेल्या कामा बाबत. | (9ड) | 212 |
| 81 | धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात नगर सचिव विभागाकडील सदस्य मानधन, बैठक भत्ता, अतिथी भत्ता बाबतचे उपलब्ध अभिलेख्यांची पडताळणीत आढळुन आलेल्या अनियमीतता. | (9ड) | 214 |
| 82 | नियमबाहयपणे रोजंदारी कर्मचारी/सेवानिवृत्त कर्मचारी यांना सण अग्रिम देणेबाबत. | (9ब) | 129 |
| 83 | पदाधिका-यांसाठी लेटर पॅड व व्हीजीटींग कार्ड इत्यादी छपाईसाठी नियम बाहय खर्च केलेबाबत. | (9अ) | 18 |
| 84 | महिला व बालकल्याण विभागाची सन 2012-13 मधील खर्ची टाकण्यात आलेल्या देयकांची नस्ती तपासणी करण्यांस न मिळालेबाबत. | (9अ) | 19 |
| 85 | बीओटी तत्वावर शहरातील बगीचे देखभालसह चालविण्यास देणेबाबतचे निविदेतील अटी व शर्ती मधील त्रुटी बाबत. | (9ड) | 216 |
| 92 | धुळे महानगरपालीकेचे सन 2012-13 या वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध सेवापुस्तकांची तपासणीत आढळुन आलेल्या त्रुटी / उणीवा, अधिकारी कर्मचारी यांचा मंजुर आकृतीबंध ई. बाबत. | (9ड) | 217 |
| 94 | धुळे महानगरपालीकेचे सन 2012-13 या वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध सेवापुस्तकांची तपासणीत कालबध्द व सेवाअंतर्गत आश्वासीत प्रगती योजनेतील वेतन निश्चींती बाबत | (9ड) | 221 |
| 95 | महिला व बाल कल्याण विभागांतर्गत 5 टक्के इतकी तरतूद करुनसुध्दा महिला करीता कोणत्याही योजना राबविली नसल्यामुळे गरजू व पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांपासून वचिंत ठेवण्याची अनियमितता झालेबाबत. | (9अ) | 20 |
| 96 | निवत्ती वेतन निधीबाबत. | (9ड) | 224 |
| 97 | भविष्यनिर्वाह निधी विभागाकडील रोख वही व बॅक स्टेटमेंट मधील तफावतीबाबत. | (9ड) | 225 |
| 98 | धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 58 मध्ये दुध डेअरी चौक लक्ष्मी वाडी भागात नविन 160 व 200 एमएम एचडीपीई पाईप लाईन टाकणे बाबतचे कामातील अनियमीतता | (9ब) | 130 |
| 99 | भविष्य निर्वाह निधी रोखवही व बहृतपत्रक मधील शिल्लक रकमेतील | (9ड) | 225 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | तफावतीबाबत. | | |
| 100 | धुळे महानगरपालीकेचे सन 2012-13 या वर्षाचे लेखापरिक्षणात उपलब्ध सेवापुस्तकांची तपासणीत वार्षिक वेतनवाढ मंजूरीत रुपये 10 जादा मंजूरी बाबत. | (9ड) | 226 |
| 102 | धुळे महानगरपालीकेतील नळ जोडणी व तोडणीचे विहित नमुण्यातील नोंदवहया परिरक्षित न केल्यामुळे शहरातील एकूण नळ संयोजन व तोडणीची संख्या, तसेच पाणी वापर प्रकार, कालावधी व इतर महत्वपूर्ण बाबींचा ताळमेळ घेता आलेला नाही. | (9ड) | 228 |
| 103 | धुळे महानगरपालिकेच्या सन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात अधिकारी व कर्मचारी यांचे कडुन तारण पत्र न घेणे व नोंदवही परिरक्षीत नसलेबाबत | (9ड) | 228 |
| 104 | सन 2012-13 या वर्षात महानगरपालिकेने क्रिडा विषयक खर्चअभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्धा न केले बाबत. | (9ड) | 229 |
| 105 | धुळे महानगरपालीकेत सन 2012-13 या वर्षात शासकीय आरोग्य संस्थेत कुटूंब नियोजन शस्त्र क्रिया केल्यावर देण्यात येणा-या मोबदल्यात दयावयाचे आर्थिक लाभाचे देयकातील आढळुन आलेल्या अनियमीतता व इतर अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न केलेबाबत | (9ड) | 230 |
| 106 | धुळे महानगरपालिका सन 2012-13 महानगरलिका हददीतील नाल्याचा गाळ काढणेसाठी खोदकाम करणे, खोदकामातुन निघालेले मटेरीयल उचलनेसाठी व डेडरगांव जलशुध्दीकरण केंद्र येथील आजुबाजुचे परिसरातील साफसफाई करणेसाठी जेसीबी मशीन भाडयाने लावणेचे कामेचे संचिकेत आढळुन आलेल्या अनियमीतते बाबत. | (9अ) | 21 |
| 107 | सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील जकात संकलनाचे कराराचे कार्यक्षम पालन न करणे व हप्त्याची रक्कम वसुली बाबत | (9अ) | 24 |
| 108 | सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विभागाकडील जमा पावती पुस्तके व त्या अनुषंगीक उपलब्ध केलेले अभिलेख्याचे तपासणीत आढळुन आलेल्या अनियमीतता बाबत | (9ड) | 232 |
| 109 | सन 2012-13 चे लेखापरिक्षणात धुळे महानगरपालिकेतील जकात विभागाने तपासणीस उपलब्ध केलेली पावती पुस्तके व अभिलेख्याची तपासणीत आढळुन आलेल्या अनियमीतता | (9ड) | 234 |
| 110 | समुह भ्रमणध्वनी सेवा करीता झालेल्या नियमबाहय खर्चाबाबत. | (9अ) | 26 |
| 111 | आय.डी.बी.आय. बॅक खाते क्रमांक 1030 मध्ये शिल्लका पडून असणा-या रक्कमेबाबत. | (9ड) | 236 |
| 112 | विहीत नमुन्यात आवश्यक त्या नोंदवहया परिरक्षित नसलेबाबत. | (9ड) | 237 |
| 113 | जैविक कचरा गोळा करणे व त्याची विल्हेवाट लावणे याकामासाठी अभिकरण | (9ब) | 136 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | संस्था नेमून रॉयल्टी प्राप्त करणे या कामातील अनियमिततावाबत. | | |
| 114 | बांधकाम मोजमाप पुस्तके विहीत नमुन्यात न ठेवणेबाबत. | (9ड) | 238 |
| 115 | महानगरपालिका हद्दीत पाळीव जनावरे मंजुरी परवानगी शिवाय ठेवणेबाबत. | (9ड) | 239 |
| 116 | भोगवटा प्रमाणपत्र न घेता इमारत बांधकामांचा रहिवास / वाणिज्य वापर सुरु करण्याची अनियमितताबाबत. | (9अ) | 27 |
| 117 | नागरी सुविधा केंद्रामार्फत वसुलात होणाऱ्या विविध फी रकमांचा तपशील सादर न करणेबाबत. | (9ड) | 240 |
| 118 | अंत्यविधी साहित्य मोफत पुरविणे योजनेसाठी नियमबाहय खर्च करणेची अनियमितता. | (9अ) | 29 |
| 119 | मक्ता पध्दतीने मनुष्यबळ पुरविणेबाबत. | (9अ) | 30 |
| 120 | सन 2012 - 2013 चे मंजूर अर्थसंकल्पाबाबत अभिप्राय. | (9अ) | 32 |
| 121 | आस्थापना बाबींवरील खर्च ठरवून दिलेल्या निकषापेक्षा जास्तीचा झाल्याबाबत. | (9अ) | 36 |
| 122 | वार्ड क्रमांक 67 मोहाडी भागात शिवानंद कॉलनी ते महादेव मंदिर डि.पी.रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमितताबाबत. | (9अ) | 37 |
| 123 | वार्ड क्रमांक 66 मोहाडी वरचे गाव श्री.संजय उचाळे ते ब्युटी पार्लर ते विक्रम पाटील रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमितता. | (9ब) | 138 |
| 124 | विहीत महानगरपालिका हिस्सा रक्कम वेळेत शिक्षण मंडळास अदा न झाल्याने थकबाकीचे दायित्व यात वाढ झालेबाबत. | (9अ) | 40 |
| 125 | बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना अदा मानधन खर्चाबाबत. | (9अ) | 42 |
| 126 | अभिन्यासास तात्पुरती मंजुरी नंतर अंतिम मंजुरी प्राप्त न करणेची अनियमितता. | (9अ) | 43 |
| 127 | शासकीय वाहनांचा विमा शासकीय विमा निधी यांचेकडूनन उतरविणे बाबत. | (9ड) | 241 |
| 128 | शासकीय वाहन क्रमांक एमएच 18 जी 1007 (जे.सी.बी.) च्या दुरुस्ती करतांना झालेली अनियमितता. | (9ड) | 241 |
| 129 | भांडार विभागातील कर्मचा-यांकडून प्रतिभूती बंधपत्र न घेतल्याबाबत. | (9ड) | 242 |
| 130 | शासकीय वाहन जे.सी.बी. एम.एच 18 जी. 1007 चे करीतानविन टायर्स खरेदी करताना झालेलीअनियमितता. | (9ड) | 243 |
| 131 | भांडार विभागाने जंगम मालमत्ता नोंदवही परिरक्षित केले नसले बाबत. | (9ड) | 245 |
| 132 | सुकवद व बाभळे या पाणी पुरवठा केंद्राचे विद्युत देयके थकीत असणेबाबत. | (9ड) | 246 |
| 133 | पदाधिका-यांना वाहन भाडे भत्ता अनुज्ञेय नसतांना प्रदान केल्याची अनियमितता. | (9अ) | 45 |
| 134 | वॉर्ड क्रमांक 50 मधील भागात नवीन पथदिवे सुविधा करणे | (9ड) | 248 |
| 135 | वॉर्ड क्रमांक 2 शिवाजीनगर कॉलनी, ओसवाल नगर, भूजल क्रांती, आरती, तिरूपती इ. भागात गर्डर पोल टाकणे व पथदिवे बसविणेबाबतच्या कामात झालेल्या अनियमितते बाबत. | (9ड) | 250 |

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 136 | सन 2012-13 मध्ये विद्युत विभागाने पथदिवे देखभाल, दुरूस्ती, निगा यावर नियमबाहय केलेल्या खर्चाबाबत. | (9ड) | 252 |
| 137 | कंत्राटी कामासाठी नियुक्त मक्तेदाराने शासकीय विमापत्र न घेता खाजगी विमा संस्थेकडून विमापत्र घेणेची अनियमितता. | (9अ) | 47 |
| 138 | मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मंजुरी दिलेल्या बांधकामांची संविदा नियमबाहयपणे करणेची अनियमितता. | (9ड) | 253 |
| 139 | बांधकाम उपकर अदा देयकातून वसुली न करणे तसेच शासन सदरी भरणा न करणेची अनियमितताबाबत. | (9ब) | 142 |
| 140 | अनामत नोंदवही व प्रलंबित रकमांबाबत. | (9ड) | 255 |
| 141 | कामे पुर्ण झालेनंतर मक्तेदारांना अनुज्ञेय रक्कमेपैकी अंशत: रकमा प्रदान करणेबाबत. | (9ड) | 257 |
| 142 | मालमत्ता कर मागणी नोंदवही मधील गंभीर अनियमिततांबाबत. | (9ड) | 261 |
| 143 | वार्ड क्रमांक 15 नदी किनारी जुने शौचालयाचे नजीक नवीन 10 सीटचे शौचालय बांधणे कामातील अनियमितता. | (9ब) | 143 |
| 144 | वार्ड क्रमांक 15 मधील नकाणे रोड ते वाडीभोकर रोड पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | (9अ) | 48 |
| 145 | वरखेडी रोड ते सुभाष पुतळा पावेतो नाल्यास रिटेनिंग वॉल बांधणे कामातील अनियमितताबाबत. | (9ब) | 146 |
| 146 | सन-2008 ते 2015 या कालावधीतील आस्थापना विभागाकडील पदोन्नती, नियुक्ती इ. मध्ये झालेल्या अनियमितता बाबतची प्राप्त तक्रारी अर्जानुसार वस्तुनिष्ठ तपासणीवरील अभिप्रायाबाबत. | (9अ) | 52 |
| 147 | मौ.महिंदळे सं.न.92/पै 2 अ 4 चे अभिन्यास मंजुरीतील अनियमिततेबाबत. | (9ड) | 263 |



DRAFT

# Not Approved

DRAFT

## कलम 9 अ खालील आक्षेप

------------- निरंक -------------

## कलम 9 ब खालील आक्षेप

| परिच्छेद क्र. | परिच्छेद शीर्षक | स्थिती | लेखापरीक्षक क्र. |
|---|---|---|---|
| 56 | धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 12 शिवाजी नगर, वाडीभोकर रोड भागात नवीन 150 व 100 एमएम व्यासाची एचडीपीई अेसी प्रेशरपाईप लाईन टाकणे बाबत. | Delete | REVSSSM5909 |
| 58 | महानगरपालिका धुळे येथील सन 2012-13 चे लेखापरिक्षणात दलित वस्ती योजने अंतर्गत वार्ड क्रं. 17 नागसेनवाडी ते रमाबाई आंबेडकर नगर पावेतो नविन 6 इंची एसी प्रेशर पाईप लाईन टाकणे बाबतचे कामातील अनियमीतता बाबत. | Delete | REVSSSM5909 |
| 60 | धुळे महानगरपालिकेचे सन 2012-13 चे लेखापरिक्षणात दलित वस्ती योजने अंतर्गत वार्ड क्र. 35 भीमनगर भागामध्ये नविन 4 इंची डीआय पाईप लाईन टाकणेचे कामातील अनियमीतता बाबत | Delete | REVSSSM5909 |
| 63 | वार्ड क्रं. 28 मध्ये चंपाबाग पत्रकार कॉलनी व जमनागीरी भीलारी भागात नविन 160 एमएम डी पाईप लाईन टाकणे बाबत. | Delete | REVSSSM5909 |
| 64 | धुळे महानगरपालीका वार्ड क्रं. 53 मध्ये कैलास नगर भागात 160 व 110 एमएम एचडीपीई पाईप लाईन टाकणे बाबत. | Delete | REVSSSM5909 |
| 69 | धुळे महानगरपालिकेचे सन 2012-13 चे लेखापरिक्षणामध्ये वार्ड क्रं. 56 गुरुकृपा नगर भागात 110 एमएम पाईप लाईन टाकणे कामेचे संचिकेत आढळुन आलेल्या अनियमीतते बाबत. | Delete | REVSSSM5909 |

## कलम 9 क खालील आक्षेप

------------- निरंक -------------

## कलम 9 ड खालील आक्षेप

| परिच्छेद क्र. | परिच्छेद शीर्षक | स्थिती | लेखापरीक्षक क्र. |
|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण रोखवही (डे बुक) मधील अपुर्णताबाबत. | Delete | FDSRKNM8201 |
| 30 | भविष्य निर्वाहनिधी खाती विहित दराने वर्गणी जमा न करणेबाबत. | Delete | DVERSKM7501 |
| 86 | धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात देखभाल दुरुस्ती लेखाशिर्षात पाणी पुरवठा विभागाअंतर्गत केलेल्या खर्च विषयक अभिलेखे व निविदा संचिका लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न केले बाबत. | Delete | REVSSSM5909 |
| 87 | धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात नविन पाईप लाईन लेखाशिर्षात पाणी पुरवठा विभागाअंतर्गत केलेल्या खर्च विषयक अभिलेखे व निविदा संचिका लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध न केले बाबत. | Delete | REVSSSM5909 |
| 88 | धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात पाणी खरेदी लेखाशिर्षात पाणी पुरवठा विभागाअंतर्गत केलेल्या खर्च विषयक अभिलेखे व निविदा संचिका लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्धक न केले बाबत. | Delete | REVSSSM5909 |
| 89 | धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात पाईप लाईन दुरुस्ती लेखाशिर्षात पाणी पुरवठा विभागाअंतर्गत केलेल्या0 खर्च विषयक अभिलेखे व निविदा संचिका लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्धा न केले बाबत. | Delete | REVSSSM5909 |
| 90 | धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात विधंन विहिरी लेखाशिर्षात पाणी पुरवठा विभागाअंतर्गत केलेल्या खर्च विषयक अभिलेखे व निविदा संचिका लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्धक न केले बाबत. | Delete | REVSSSM5909 |
| 91 | धुळे महानगरपालीकेने सन 2012-13 या वर्षात पाणी टाकी बांधणे लेखाशिर्षात पाणी पुरवठा विभागाअंतर्गत केलेल्या खर्च विषयक अभिलेखे व निविदा संचिका लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्धक न केले बाबत. | Delete | REVSSSM5909 |
| 93 | धुळे महानगरपालिका वार्ड क्रं. 58 मध्ये (वार्ड क्रं. 38 च्या यादीनुसार) कोळवलेनगर भागात नविन 160 व 110 एमएम एचडीपीई पाईप लाईन टाकणे बाबतचे कामातील अनियमीतता. | Delete | REVSSSM5909 |
| 101 | धुळे महानगरपालीकेतील कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या पदांचा आकृतीबंध मंजूरी बाबत | Delete | REVSSSM5909 |

DRAFT